१६८५

REFBK-0014791

REFBK-0014791

## अमरशेख यांचें साहित्य

(१) कलश

(२) धरती माता

(३) अमर गीत

(४) पहिला बळी

सन १९६५

स्थळप्रत
दि:
नोंद दि:

# अमरशेखांची कविता

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रमांक ४०७५८ वि: का/८१
क्रमांक १९९५ नोंदि: २८/१/६५

लेखक

आचार्य माधव पोतदार

REFBK-0014791
REFBK-0014791
मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ना. क्र. ९४०८१

अभिनव प्रकाशन, मुंबई १२

प्रकाशक :
वामन विष्णु भट,
**अभिनव प्रकाशन,**
७ अंबा सदन, जेरबाई वाडिया रोड,
परळ, मुंबई १२

पहिली आवृत्ती
७ नोव्हेंबर, १९६५

**किंमत साडेसहा रुपये**

मुद्रक :
शि. गो. भावे,
**नागरिक छापखाना,**
व्यंकटपुरा, सातारा.

# अर्पण—

महाराष्ट्राचे विनोदसम्राट

झुंजार पत्रकार

थोर नाटककार

प्रख्यात टीकाकार

ज्येष्ठ कवी—

**आचार्य- प्र. के. अत्रे**

**यांना सादर सप्रेम अर्पण**

४०१५८ वि: 
१६६५ नों. दि. २।११५५



# निवेदन

शाहीर अमरशेखांच्या कवितेवर एक टीकाग्रंथ लिहिता येणे कितपत शक्य आहे याबद्दल अनेकांनी माझ्याजवळ शंका प्रदर्शित केलेली होती. काहींना तर त्यांच्या कवितेवर टीकाग्रंथ लिहिणेच हास्यास्पद वाटले. आमच्या दैनिक 'मराठा'ने तर अमरशेखांच्या कवितेवर टीकाग्रंथ लिहिला जाणार म्हणून उभ्या महाराष्ट्रात गर्जना देखील केली... पण त्यामुळे माझ्या जबाबदारीत आणि जाणिवेत मात्र नवी भरच पडली. अमरशेखांच्या कवितेवर टीकाग्रंथ लिहिणे काही एक कठीण नाही हे त्यांचा 'कलश' प्रथम माझ्या हाती पडला तेव्हा-पासूनच वाटू लागलेले होते. 'मराठा'तील बातमीने मात्र मला उलट स्फूर्तीच मिळाली हे अभिमानपूर्वक नमूद करावेसे वाटते. महाराष्ट्रातल्या काही साप्ताहिकांनी आणि मासिकांनी 'मराठा'तल्या वृत्तप्रसिद्धीनंतर 'आमच्याकडे काही लेख पाठवा' म्हणून पत्रद्वारे वारंवार मागणी केली. परंतु मी ठरविले की फुटकळ लेख लिहिण्यापेक्षा ग्रंथरूपाने 'अमरशेखांची कविता' प्रकट करणेच अधिक चांगले.

या ग्रंथांत मी साधार विवेचन करण्याचा प्रयत्न केलेला आहे. मी केलेले एकंदर विवेचन ही अमरशेखांची वकीली मात्र नाही. त्यात वाचकांना जिव्हाळा आढळेल तो कलावंताच्या कृतीबद्दलचा; प्रांजळपणा आढळेल तो स्पष्ट विवेचनाचा. जे पटले, रुचले, तेच मांडले.

श्री. अमरशेख यांच्या कवितेवर जाहीर रीत्या तसे कुणी काही आक्षेप घेतलेले नसल्याने खंडन करण्याचा प्रयत्नच करावा लागला नाही. मला वाटते, आक्षे-पांचे खंडन केले असते तर एक प्रकारे ती वकीली ठरली असती. अमरशेखांच्या कवितेचा हा ग्रंथ म्हणजे एक 'अभ्यास' आहे. अमरशेखांची कविता म्हणजे 'महाराष्ट्र कविपरंपरा खंड न पडला तिला जरा' ही उक्ती किती सार्थ करणारी आहे हेच पटविण्याचा प्रयत्न केलेला आहे. चोखंदळ आणि प्रामाणिक वाचकांच्या ही गोष्ट तात्काळ ध्यानात येईल असा विश्वास वाटतो.

कलावंताच्या कृतीबद्दल जिव्हाळा असला की थोडेफार कौतुक हे येतेच. या ग्रंथात तसे घडलेही आहे. पण ते करताना मराठी साहित्यक्षेत्रात अमरशेखांच्या कवितेचे वेगळे वैशिष्ट्य कसे आहे हे पटविण्याचा ध्यास आहे. अमरशेखांची कविता ही केशवसुतांचीच–त्यांच्या परंपरेचीच–कशी 'दिशा' आहे हे पटवि-ण्याचा मी जरूर प्रयत्न केलेला आहे. हा पोटतिडिकेने लिहिणारा खराखुरा कवी आहे. 'मिरासदारां'कडून हेतुपुरस्सर त्याची उपेक्षा केली गेली तर त्यामुळे मराठी

साहित्याची फार मोठी हानी होण्याचा संभव आहे. आणि म्हणूनच कलावंताच्या कृतीची कदर करणारी जी काही प्रामाणिक माणसे आहेत त्यांना तरी अमरशेखांच्या कवितेचे मोल कळावे म्हणून हा सारा 'प्रपंच' केला आहे.

या ग्रंथात मांडलेले सर्वच विचार योग्य आहेत असा निदान माझा तरी दावा नाही. त्यांतील सत्याची पारख तेवढी सुज्ञांनीच करावी अशी अपेक्षा आहे. कोंदटलेल्या मनांतील जळमटे जरी या टीकाग्रंथाने पार निघून गेली तरी माझ्याएवढा आनंद कुणालाच होणार नाही.

उद्याचा मराठी वाङ्मयाचा प्रामाणिक अभ्यासक अमरशेखांचे नाव इतिहासात एक श्रेष्ठ कवी म्हणून निश्चितच नमूद करील अशी माझी खात्री आहे. अमरशेखांच्या कवितेला साहित्यक्षेत्रात मानाचे स्थान मिळाल्यास एक नवे समृद्ध दालन सर्वत्रांना खुले होईल असा विश्वास वाटतो.

ज्या ज्येष्ठ टीकाकारांच्या लेखनाचा संदर्भासाठी उपयोग झाला त्या सर्वांचा मी ऋणी आहे. श्री. पालकर, श्री. मधु भावे, श्री. प्रभाकर पाटील, शाहीर बाळ पाटसकर आदि माझे मित्र आणि माझे स्नेहांकित श्री. वामनराव भट यांचे आभार मानावे तितके थोडेच.

महाड, जि. कुलाबा

**माधव रा. पोतदार**

# प्रस्तावना

श्री. अमरशेख यांच्या कवितेवर मोठासा ग्रंथ लिहिला गेला आहे हे प्रथम ऐकले तेव्हा ते अक्रितासारखेच वाटले. अजून हयात असलेल्या कवीविषयी इतक्या विस्ताराने कोणी सहसा लिहीत नाही; आणि तेही श्री. अमरशेखांबाबत घडावे हे विशेष! आजवर त्यांच्या कवितेवरील फारसे लेखही डोळ्यांत भरले नाहीत; कवितासंग्रहांवर कधी पोचवजा अभिप्राय दिसले होते; आणि साहित्याची चिंता सदैव वाहणाऱ्या नियतकालिकांनी तर त्यांचा उल्लेखही वर्ज्य मानला. पुस्तकी जमातीने, निदान तिच्यावर ताबा चालविण्याचा आव आणणाऱ्या शिष्टांनी श्री अमरशेखांना असे वाळीत टाकावे अशी कोणती पापे त्यांनी केली होती? पहिले : हजारांनी गणावेत असे श्रोते त्यांच्या गीतांनी भारून जात. दुसरे : त्याचा (कालपरवापर्यंतचा) राजकीय विचार सदहू शिष्टांना मंजूर नव्हता. यापैकी दुसरे पाप अर्थातच अधिक घोर. त्या विचारांचा रंग अलीकडे थोडासा बदलला असला (व चालू रंगाच्या तो जरा जवळ आला असला) तरी 'पतित एकदा पतित तो सदा' हा कर्मठ न्याय त्यांच्या बाबतीत कडवेपणाने लावण्यात आला आहे. सर्वांबाबत तसे होत नाही. आजवर सोय पाहून अनेकांनी रंग बदलले, अनेकदा बदलले. कोणी रंगाच्या विसंगत छटाही अशा बेमालूम मिसळून टाकल्या की, ही का ती असा संभ्रम पडावा. पण साज जमवून घेण्याच्या व्यवहारकुशलतेने विसंगती झाकली; अशा पटाईतपणे की विसंगती हा सुद्धा गुण वाटावा! गोडीगुलाबी हे त्या गुणाचे दुसरे नाव. किंबहुना गुलाबी छटा ही ललित साहित्याप्रमाणे राजकारणातही संभावित झाली आहे—जेवढी फिकट तेवढी अधिक संभावित! पण अमरशेखांचा रंग थोडा मंदावला तरी गडद आणि उग्र राहिला; तो दृष्टीसमोर नकोसा वाटला.

आपल्या साहित्यप्रांतात लोकप्रियता हा अपराध गणला जातो तो दोन कलमांखाली. एकतर साहित्याचा (म्हणजे कला वगैरेचा) आस्वाद घेण्याचा अधिकार अल्पसंख्यांना बहाल केलेला असतो; सबब तो आस्वाद बहुसंख्यांनी घेतल्यास ती कला (वगैरे) खरी नव्हे; म्हणजे तो कलावंतच खोटा. 'उपरिनिर्दिष्ट अल्पसंख्याक' हे असामान्य आणि उरलेले बहुसंख्याक हे सामान्य, हे त्यामागील सूत्र. दुसरे म्हणजे विशिष्ट परिस्थितीत, उदाहरणार्थ लेखक मृत झाल्यावर किंवा त्याची लेखनशक्ती मृतप्राय होऊन तो निरुपद्रवी झाल्यावर, लोकप्रियता क्षम्य मानली तरी 'लोक'

या शब्दाचा व्याप मर्यादित ठेवला पाहिजे. थोडेफार शिक्षण झालेले, कमीअधिक नियमितपणे आणि आवडीने पुस्तके वाचणारे त्या मर्यादेत बसतात. त्यापलीकडे पसरलेला अफाट बहुजनसमाज हा असून नसल्यासारखा. 'बहुजनसमाज' हा राजकारणात कालपरत्वे परवलीचा शब्द बनला असला तरी साहित्यात त्याची नाव-निशाणीही नसते. (अपवाद : कथाकादंबऱ्यांत मालमसाला म्हणून तो खपतो.) आजचे आपले जहाल कलावादी हे लोकमान्य टिळकांना 'तेल्यातांबोळ्यांचे पुढारी' म्हणून हिणविणाऱ्या मवाळांचे साहित्यिक वारस होत. त्यांच्या कलाकोष्टकात लोकप्रिय कलावंत हा तेल्यातांबोळ्याचा कलावंत असतो; किंबहुना तो कलावंत नसतो. पोटभरू खुषमस्कऱ्या असतो. असा हा बहुसमाज कलासाहित्याच्या व्यवहारात अस्पृश्याचे जिणे जगतो; म्हणून त्याचा कलावंतही अस्पृश्य. स्त्री-शूद्रांना वेद वाचण्याचा अधिकार नाकारणाऱ्यांचेच आपण वंशज. असे हे लोकप्रियतेचे व्यस्त गणित आहे. अमरशेखांच्या गीतांनी लाखांना जिंकले म्हणूनच कला-साहित्यांत त्यांना स्थान नाही; त्या पवित्र (पण कुबट) गाभाऱ्याच्या आसपास फिरकण्याची त्यांना मुभा नाही; ते फार तर पायरीचे मानकरी.

ही काही एकट्या अमरशेखांचीच परवड नाही; अलीकडच्या काळात तर हे पुन्हा पुन्हा घडले आहे. अगदी कवितेच्या अंगणातील दाखला द्यायचा झाला तर श्री. ग. दि. माडगूळकरांचा देता येईल. त्यांच्या गीतांनी आणि गीतरामायणाने लक्षावधी श्रोत्यांना वेडे केले; पण कवित्वाचे शेलापागोटे त्यांना चढविण्याबाबत केवढा वाद! फार तर त्यांना 'यशस्वी गीतकार' म्हणू असा गाभाऱ्याचा कौल पडला! आचार्य अत्रे अथवा श्री. पु. ल. देशपांडे हे फारच लोकप्रिय असले तरीसुद्धा त्यांची सर्वोत्कृष्ट निर्मिती लक्षात घेता आणि साकल्याने विचार करता ते चांगले साहित्यकार आहेत असे म्हणावयास हरकत नसावी असा सावध आणि सवलतीचा सूर तेथूनच निघतो. श्री रणजित देसाई यांच्या 'स्वामी'वर वाचकांच्या न भूतो न भविष्यति अशा उड्या पडू लागताच श्री. देसायांचे कलात्मक दोष एकाएकी उघडे झाले!

सध्या आपल्याकडे तुकारामाचा भाव खूपच वधारला असला तरी त्या काळच्या पंडितानी त्याची कशी संभावना केली ते आठवण्यासारखे आहे. खरे म्हणजे चित्रपटांतून आणि रंगभूमीवर आणि पुस्तकांतून ते आपण वारंवार आणि मोठ्या चवीने आठवीत असतो; त्याचे मर्म मात्र विसरतो. हे एकंदरीने जुन्या बंडखोरांचे दुर्भाग्य असते; ते निघून गेले की त्यांच्यावर शेंदूर चढतो आणि नव्या कर्मठांचे ते दैवत बनतात. तुकाराम हा शास्त्रशिष्टांचा कवी नव्हे; तो बहुजनसमाजाचा कवी. त्याच्या उबड्याबागड्या अभंगवाणीने त्या मरगळलेल्या समाजाला चेतना दिली; ती द्यावी हा त्या वाणीचा हेतू. त्यासाठी ती वाणी राबली, समर्पण झाली. म्हणून

स्वयंमन्य उच्चपदस्थांनी ती बुडविण्याचा अट्टाहास केला तरी कृतज्ञ लोकगंगेने ती तारली, उचलून धरली. असला लोकसंपर्क आता साहित्याच्या हिशेबी संशयास्पद झाला आहे; आणि अशी जागविणारी, आवाहन करणारी कविता लिहिणे हे तर अब्रह्मण्यम्–आम्ही तिला काव्य म्हणणार नाही असा अहंमन्य आणि आडमुठा ग्रह पोपटपंचीने बोलून दाखविला जात आहे. असली पोपटपंची या कवितेवर प्रचारकी हा शिक्का मारते; अभिप्राय असा की पोटतिडीकेने उच्चारलेला विचार, आणि तोही समाजाला उद्देशून सांगितलेला—त्यांच्या दोषांवर घाव घालणारा, त्याच्या उद्धाराचा विचार कवितेतील काव्य नष्ट करतो. प्रचारकी साहित्य म्हणजे हीन साहित्य असे ठोकळेबाज सोपे समीकरण पाठ केले जात आहे. ही नवी कवाईत.

तुकारामाचीच नव्हे तर अनेक आधुनिक कवींचीही या शिक्क्यापासून सुटका नाही. आधुनिक कवितेचे जनक ही ज्यांची पदवी त्या केशवसुतांना त्या शिक्क्याने बरबटून टाकणे फार सोपे आहे. येत्या वर्षी त्या कविश्रेष्ठाची जन्मशतसंवत्सरी महाराष्ट्रभर साजरी होईल. त्या गौरवात असा सूर उठवला जाईल की, ' तुतारी ', ' गोफण ', ' नवा शिपाई ' इत्यादि कविता लिहिणारा कवी कच्चा आणि कलादृष्ट्या अशुद्ध. खास गाहिवर राखून ठेवला जाईल तो त्यांच्या प्रेमकवितांसाठी आणि ' झपूर्झा ', ' हरपलेले श्रेय ' यासारख्या गूढ कवितांसाठी. पहिल्या प्रकारातील नाजुक भावना आणि दुसऱ्या प्रकारातील प्रतिभेची भरारी यांची बूज करणारी रसिकता अशा ठोकळेबाजांच्या आवाक्यात असेलच असे नाही. कवितेत हरवून जाण्याऐवजी आपली पढिक मोजमापे तिला अट्टाहासाने लावू पाहाणारांच्या हाती शेवटी तिचे चिपाड उरेल. ' जुनी मापकोष्टके जराशी बाजूस सारा ती ' असे चाळीसपन्नास वर्षांपूर्वी श्री कवी म्हणून गेले; आज ते हयात असते तर कदाचित् ' जुनी ' ऐवजी ' नवी ' असे परिष्करण त्यांनी केले असते.

या पुस्तकात आचार्य पोतदार यांनी अमरशेख हे केशवसुतांच्या परंपरेतील कसे हे तपशिलाने दाखवून दिले आहे खुद्द अमरशेखांनीच केशवसुतांवरील कवितेत ' हे तात कृष्ण केशवा ' असा त्यांचा ध्रुवपदाने गौरव केला आहे, त्यामागील उमाळा पूर्णपणे सच्चा आहे. वस्तुतः ज्ञानेश्वर–तुकारामांप्रमाणे केशवसुतांचेही नमनासाठी नाव घेण्याची टूम आता जुनी झाली आहे; पण ती वापरणाऱ्या कित्येक कवींचे गोत्र केशवसुतांशी मुळीच जुळणारे नाही. याची हवी तेवढी गमतीदार उदाहरणे देता येतील. विस्तार नको म्हणून ती टाळायची. पण केशवसुतांचा ' चेला सच्चा ' हा अभिमान मिरविणारे गोविंदाग्रज देखील गुरु-मार्गापासून चळले याचा तरी उल्लेख अवश्य केला पाहिजे. आजच्या जीवनावरील मर्ढेकरांची टीका ही निराळ्या सुरातील असेल, पण ती तळमळीने केलेली टीका आहे आणि म्हणून केशवसुतांच्या परंपरेत तिचा अंतर्भाव करता येईल हा

विचारही आचार्य पोतदारांनी स्वच्छपणे मांडला आहे, याबद्दल त्यांना धन्यवाद दिले पाहिजेत. कोण जाणे, उद्या साहित्यक्षेत्रातले वारे उलटले तर कदाचित प्रचारकी (किंवा 'सामाजिक' किंवा मानवतावादी) काव्य लिहिणारे अशी मर्ढेकरांची तारीफ करण्याची प्रथा पडेल!

'प्रचारकी' कवितेविषयी आणखी एक मौज. अजूनही ती भरपूर लिहिली जात आहे–कधी सांगूनसवरून, कधी चोरूनमारून. खोट्या नवतेच्या सोसाने काहीजण तिचे खरे रूप छपविण्याची यातायात करतात आणि परिणामी तिला विद्रूप करून सोडतात. उघड प्रचारकी कवितेसंबंधीही एक चमत्कारिक फरक केला जातो. तुम्हाला न रुचणारा आणि न पचणारा विचार सांगणारी ती 'प्रचारकी' कविता आणि तुमच्या पंथाची ती मात्र राष्ट्रीय किंवा देशभक्तिपर इत्यादि. म्हणून आपापल्या पक्षाची गाणी बडविणारे बरेवाईट कवीही अमरशेखांना 'प्रचारकी कवी' अशी शिवी घालतात! म्हणजे ते कवीला वा कलावंताला स्वातंत्र्य देणार ते त्यांना स्वतःला पसंत असेल तेच सांगण्याचे; त्यांना नापसंत असलेले सांगण्याचे त्याने आरंभले तर त्याची मुस्कटदाबी करायला हे मंडळी सर्व सूक्तासूक्त मार्ग चोखाळायला तयार असतात. अमरशेखांचे विचार तुम्हाला पटत नसतील, पण ते मांडण्याचा हक्क तुम्ही हिरावून घेऊ शकणार नाही. ते विचार एकांतिक, कडवे असतील, पण इतर काही पंथही त्यांच्याहूनही कडवे आणि एकांतिक आहेत. त्या सर्वांनाच तो हक्क दिला पाहिजे. कट्टर जातीयवाद्याप्रमाणे कट्टर समाजवाद्यालाही उच्चारस्वातंत्र्य हवे, नाहीतर तो स्वातंत्र्याचा बकवा व्यर्थ आहे. समाजवादाविरुद्ध तऱ्हेतऱ्हेच्या संपन्न साधनांनी सांघिक प्रचार करणारी माणसेच समाजवादाचा प्रचार साहित्यात झाला तर बिथरून उठतात हा मोठा विनोद आहे.

अमरशेखांच्या कवितेची जात अलीकडच्या बहुतेक कवितेहून फार निराळी आहे. वाणी हे तिचे खरे वाहन आहे; मुद्रण नव्हे. आपल्याला कविता डोळ्यांनी वाचण्याची सवय झाली आहे; ती कानांनी वाचायाला हवी ही जेरर्ड मॅनली हॉपकिन्स या इंग्रजी नवकाव्याच्या प्रणेत्याची मागणी लक्षात घेण्यासारखी आहे. छपाईत शब्द जणू थिजतात; कंठातूनच त्याचे सारे ऐश्वर्य आणि चैतन्य प्रकट होऊ शकते. तसा कंठाचे देणे अमरशेखांना आहे. छापील कवितेत आपण मात्रा आणि ऱ्हस्वदीर्घ मोजतो ते अगदी जुन्या पंतोजीच्या आविर्भावात; आणि मग कवितेवर शुद्धाशुद्धतेबाबत शेरे मारतो. जिवंत वाणीच्या ओघात या भाकड तपासणीला अर्थ उरत नाही. हे गद्याबाबतही खरे आहे; त्याचा आपल्याला वारंवार विसर पडतो. म्हणून आपले बरेचसे छापील गद्य इतके बोजड आणि कृत्रिम असते. मुद्रणकलेने आपल्यावर अनंत उपकार केले असतील, पण तिच्यावर सदैव अवलंबून राहिल्याने

भाषा पांगळी होण्याचा धोका असतो हे आपण जाणले पाहिजे. याचा व बोलीतील, एरव्ही अकारण अशुद्ध समजल्या जाणाऱ्या, शब्दांचा अमरशेखांनी कसा उपयोग केला आहे याविषयी आचार्य पोतदारांनी या पुस्तकात विवरण केले आहे. ते सर्वसंमत होण्यासारखे नसले तरी या मुद्याकडे लक्ष वेधण्यास त्याचा निश्चित उपयोग होईल.

या सगळ्या लिहिण्यामागे असा आग्रह नाही की अमरशेखांची सर्वच कविता गुणसंपन्न आहे; कोणत्याही कवीप्रमाणे त्यांच्यातही डावेउजवे आहेच. हे या पुस्तकाच्या लेखकालाही मान्य आहे. पण जे उजवे आहे त्याला न्याय मिळाला पाहिजे, आणि कोणत्याही 'कलाबाह्य' कारणासाठी तो नाकारणे अप्रामाणिकपणाचे ठरेल. संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत आपल्या तेजस्वी वाणीने विलक्षण चैतन्य ओतणाऱ्या या लोककवीचे आपण मराठी माणसे ऋण मानतोच; पण कवी म्हणून त्याचे स्वतंत्र स्थान आहे, त्याची स्वतंत्र दीक्षा आहे हे सुद्धा मानले पाहिजे. कवितेचे अनेक जातिवंत प्रकार असू शकतात; त्यापैकी हा एक. कसली तरी झापडे बांधून याकडे डोळेझाक करणे अरसिकपणाचे होईल.

या वाळीत टाकलेल्या कवीचा आचार्य पोतदारांनी इतक्या कसोशीने अभ्यास केला, आणि त्या अभ्यासाचे फळ या पुस्तकाच्या रूपाने वाचकांना दिले. मराठी वाचकांतर्फे त्यांचे मी मनापासून आभार मानतो; आणि अभिनंदनही करतो.

**मंगेश विठ्ठल राजाध्यक्ष**

# शुद्धिपत्र

| पान | ओळ | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|
| १९ | २६ | निस्संकोचपणी | निस्संकोचपणे |
| ३० | ९ | सन्नद्ध | सश्रद्ध |
| ३१ | ८ | स्वर्गातूनी | स्वर्गामधुनी |
| ३१ | १५ | अभग | अभंग |
| ३१ | २६ | तेजाला | तेजाळा |
| ३३ | २१ | निचित | निश्चित |
| ४१ | ९ | मागल्याची | मांगल्याची |
| ४१ | २४ | विकासासाठी | विकासाची |
| ४२ | ७ | तरीतण | तरी पण |
| ४२ | १८ | शत्रे | शस्त्रे |
| ४३ | ३१ | पद्यपोथिची | पद्मपोथिची |
| ४५ | १६ | बि सुटली | बिसुटली |
| ४९ | २६ | तिला | तिचा |
| ५१ | १५ | व्यख्या | व्याख्या |
| ५३ | १७ | समाष्टीच्या | समष्टीच्या |
| ५३ | १७ | होते ते | होते ती |
| ५५ | ११ | उत्कुट | उत्कट |
| ५७ | ८ | कर्तव्याचे | कर्तव्यचि |
| ५७ | २४ | माधळ | मधाळ |
| ५७ | २५ | कुतल | कुंतल |
| ५८ | ८ | सातल्याने | सातत्याने |
| ५८ | २३ | चुकीची | चुकीचे |
| ५८ | २६ | भावनात्म | भावनात्मक |
| ५९ | १५ | असलेव्या | असलेल्या |
| ५९ | २१ | हाय तुझी हाय बाळे | हाय तुझी हाय बाळ |
| ५९ | २८ | eulture | culture |
| ५९ | २९ | clement | element |
| ६० | १४ | स्वतंत्र्य | स्वतंत्र |
| ६१ | २८ | प्रामणात | प्रमाणात |

| | | | |
|---|---|---|---|
| ६४ | १७ | सर्वोच्य | सर्वोच |
| ६४ | २७ | म्हणूणच | म्हणूनच |
| ६८ | ७ | तार सप्त स्वरकी | तार सप्तकी स्वर |
| ७२ | २६ | चम कारिक | चमत्कारिक |
| ७४ | २४ | त्याचे | त्यांचे |
| ७५ | ६ | लावीत आग | लावीन आग |
| ७५ | २३ | महाराष्ट्रात | महाराष्ट्रात |
| ८३ | २४ | हिलाच अमुत | हिलाच अमृत |
| ८४ | ६ | पायी घा न | पायी घालिन |
| ११३ | ३० | मुळातील | क्षणात तुजला उमजुन येइल |
| | ते | चार | शक्ती माझी सामान्याची |
| | ३४ | ओळींऐवजी | कवळ्यातच पृथ्वीला आवळुन |
| | | | असे रसायन कठिण त्यांतुन |
| | | | अमृत जे जगताला होउन |
| | | | फुलेल अवघे जीवन त्यातुन |
| | | | कल्पतरूंची बाग होउनी |
| | | | कामधेनुची लाविन दावण |
| ११६ | २५ | कलावंताने | कलावंताचे |
| १२१ | ६ | उजळावी | उजवावी |
| १२६ | ९ | तुझा हिरवागार | तुझा हिरवा हिरवागार |
| १२९ | २६ | मस्त मद | मस्त मंद |
| १३६ | १२ | भूमिहीना कवटाळितो | भूमिहीना प्रेमे कवटाळितो |
| १३७ | २० | बोटावर्ती त्या | बोटावरती त्याला |
| १५० | २२ | शब्प | शब्द |
| १५४ | १६ | पुनरुक्नी | पुनरुक्ती |
| १५५ | ३० | प्रत्यन | प्रत्यय |
| १५६ | ४ | चदेरि | चंदेरी |
| १५६ | २९ | भाषचा | भाषेचा |
| १५६ | २९ | मीती | भीती |
| १५७ | १६ | फार | फाटं |
| १६० | १४ | असेल त्यांच्या | असेल तर त्यांच्या |
| १६१ | १७ | ष्टिकर्त्याची | सृष्टिकर्त्याची |
| १६४ | १७ | असलेला लयही | असलेली लयही |
| १६६ | २२ | खुले मग ती | खुलेल मग ती |

| | | | |
|---|---|---|---|
| १८२ | २० | धनि ध्या दिसा | धन घ्या दिसा |
| १८२ | ३० | चाल मिळून | चल मिळून |
| १८५ | १३ | टिळकांच | टिळकांचा |
| १८७ | १३ | घे ब्रह्मा | घे ब्रह्माचा |
| १८८ | २ | निर्दतेने | निर्दयतेने |
| १८८ | १६ | जळता डोके | जळता डोळे |
| १८९ | ४ | एकून | ऐकून |
| १८९ | १७ | मदन | मदत |
| १९० | ३ | कूर | क्रूर |
| १९३ | २४ | अत्मीयतेतून | आत्मीयतेतून |
| १९३ | २४ | वाटणाल्या | वाटणाऱ्या |
| १९३ | २४ | भावता | भावना |
| १९४ | २३ | फुललेली | फुलवेली |
| १९५ | २२ | त्याच्या उरल्या | त्यांच्या उरल्या |
| १९५ | २३ | नको तू काही | नको तू नाही |
| १९६ | ८ | छातीवर आई | छातीवरती आई |
| १९६ | २४ | भात्वस्पर्शी | भावस्पर्शी |
| १९७ | २६ | घुमे शीळी | घुमे शीळ |
| १९९ | २१ | घाल घण | घाला घण |
| २०३ | ११ | अशावाद | आशावाद |
| २११ | २० | राष्टीय | राष्ट्रीय |
| २२१ | १५ | विचारप्रकटीककण | विचारप्रकटीकरण |

००००००

स्थळप्रत
दि:
क्रमांक
नों: दि:

# अनुक्रमणिका


| | | पृष्ठे |
|---|---|---|
| | निवेदन | एक |
| | प्रस्तावना | तीन |
| | शुद्धिपत्र | आठ |
| १ | भूमिका | १३ |
| २ | कवितेचे स्वरूप | १६ |
| ३ | श्रद्धा आणि आवेश | २९ |
| ४ | मानवतावाद आणि आशावाद | ३३ |
| ५ | ध्येयवाद–परंपरा आणि प्रचार | ५१ |
| ६ | राष्ट्रीय कविता | १०० |
| ७ | व्यक्तिमत्वाला लागलेली ओढ | १०९ |
| ८ | बोलकी शब्दचित्रे | ११६ |
| ९ | प्रेमकाव्य | १२३ |
| १० | पोवाडे आणि लावणी | १३१ |
| ११ | बालेघाटी बोली | १४५ |
| १२ | काव्य आणि तालबद्धता | १६३ |
| १३ | रसग्रहण | १७५ |
| १४ | काव्यरचनेतील दोष | २०४ |
| १५ | हिंदू नाही मुस्लिम नाही | २०९ |
| १६ | काही निष्कर्ष– आणि अपेक्षा | २१३ |
| १७ | संदर्भ सूची | २२४ |

प्रकरण १

# भूमिका

१९५८ सालातील गोष्ट. लो. टिळक पुण्यतिथीचा दिवस. सौ. प्रेरणाची ( माझी पत्नी ) व माझी विवाहपूर्व ओळख झाली. त्या दिवशी तिने मला आपल्या घरी गप्पा मारण्यासाठी बोलाविले. संध्याकाळची वेळ होती. गप्पा खूपच रंगात आल्या. अनेक विषय निघाले. मात्र काव्यावर बोलू लागताच सौ. प्रेरणा खूपच आनंदली. तिला काव्यवाचनाचे पहिल्यापासूनच विलक्षण वेड. मी कविता करतो हे तिला ऐकून चांगलेच माहीत होते. तिने मला एकाएकी बोलण्याच्या ओघात प्रश्न विचारला, " तुम्ही अमरशेखांना ओळखता का ? " मी 'हो' म्हटले; त्यांचा एक कार्यक्रमही पाहिल्याचे सांगितले. अमरशेख आतडे पिळवटून गातात यावर त्या वेळी आमचे दोघांचेही एकमत झाले. थोड्याच वेळात सौ. प्रेरणा घरात गेली आणि एक सुंदरसे पुस्तक घेऊन आली. ते पुस्तक तिने माझ्या हाती देत म्हटले-- " हा कवितासंग्रह आपण मुद्दाम वाचून काढा, आपल्याला निश्चित आवडेल." ते पुस्तक होते 'कलश'– अमरशेखांचा काव्यसंग्रह. सौ. प्रेरणा त्या वेळी म्हणाली–" हा संग्रह मुंबईच्या माझ्या मामेभावाने मुद्दाम पाठविला आहे. कला आणि काव्य यांचा सुंदर संगम या संग्रहात पाहायला आपणास सापडेल" मी 'कलश' हाती घेतला आणि कविता-वाचनास जवळ जवळ तिथेच सुरुवात केली.... त्या दिवसापासून 'कलश'ने माझ्या मनात जे घर केले आहे ते अगदी कायमचेच.

...'कलश' माझ्या हाती अगदी योगायोगानेच आला होता. लोकमान्यांच्या पुण्यतिथीच्या दिवशी महाराष्ट्रातील एका 'लोकमान्य' शाहीराची कविता संग्रह-रूपाने हाती आली होती. समर्थ रामदासांनंतर सद्यस्थितीचे रोखठोकपणे भाष्य करणारा कवी मी तरी प्रथमच पाहत होतो.

'कलश'मध्ये मला कविवर्य केशवसुतांची आशागर्भ वृत्ती पहिल्यांदाच जाणवली. केशवसुतांच्या मानवतावादाचे मूळ व्हिटमनच्या काव्यात आढळते. परंतु केशव-सुतांच्या मानवतावादापेक्षा अमरशेखांचा मानवतावाद अधिक प्रखर वाटला. त्या-पाठीमागे विशिष्ट तत्त्वज्ञानाची बैठक असल्याची खात्री झाली. केवळ मानवतेबद्दल प्रेम व्यक्त करण्यापेक्षा तिच्या भवितव्याची रूपरेषा बारकाईने प्रकट करण्याची वेगळी लकब दिसली. माणसापेक्षा त्याच्या जीवनाचीच अधिक काळजी वाहणारा कवी मी तरी प्रथमच पाहत होतो. अमरशेखांची कविता केशवसुतांच्या कवितेपेक्षा

अधिक जीवनाभिमुख दिसली. अनिल हेही मानवतेचे कवी पण त्यांच्या मानवतेच्या भवितव्याची कल्पना बरीचशी तोकडी. अमरशेखांच्या मानवप्रेमाला जीवननिष्ठेतून निर्माण झालेल्या तत्त्वज्ञानाची सुंदरशी बैठक असल्याचे मला जाणवले.

केशवसुतांच्या परंपरेचा प्रवाह सतत पुढे नेणारे गोविंदाग्रज व रविकिरणमंडळातील मान्यवर कवी यांच्या रचनेत आणि अमरशेखांच्या काव्यरचनेत सर्वांत महत्त्वाचा फरक हा की इतर कवींच्या रचनेत जी पाल्हाळिकता आढळते ती नेमकी अमरशेखांच्या कवितेत आढळत नाही. संयम हा तिचा महत्त्वाचा गुण. आशय थोडक्यात पण संयमित रीत्या प्रकट करण्याचे कसब अमरशेखांइतके कुसुमाग्रजांखेरीज मला तरी इतरत्र आढळलेले नव्हते. केशवसुतांची तुतारी जो आशय व्यक्त करते त्यासाठी अगणित ओळी खर्च झालेल्या दिसतात. पण तोच आशय अवघ्या एक दोन ओळींत अमरशेख व्यक्त करतात. साहजिकच अविष्कारपद्धतीतही वेगळेपणा दिसेल. तरीपण केशवसुतांच्या ओजस्वी रचनेची छाया पडलेली दिसलीच आणि रचनेतील रांगडेपणही दिसले. इतर कवींच्यापेक्षा अमरशेखांची तळमळ अधिक उत्कट आणि भव्य दिसली. तरीपण 'प्रकृती' मात्र बरीचशी 'केशवसुती' दिसली. मात्र सांकेतिक विषयापेक्षा अमरशेखांच्या कवितेचे विषय पूर्णपणे वेगळे दिसले. ते नित्याचे, परिचित वाटले.

या सर्वच गोष्टींमुळे 'कलश'बद्दल मला प्रेम वाटत गेले. एक दिवस एक 'नावाजलेले' प्राध्यापक महाशय अमरशेखांच्या कवितेबद्दल माझ्याजवळ म्हणाले, "वास्तविक साहित्य हा काही माझा प्रांत नाही, पण एवढे खरे की अमरशेखांच्या कवितेत वाचण्यासारखे काही नाही. त्यांची कविता ना? ती तशीच असायची."

मी विचारले, "तशी म्हणजे कशी हो?" त्यावर प्राध्यापक महाशय बोलले, तशी म्हणजे "तशीच प्रचारकी." मी त्यांना सांगितले, "अमरशेखांची कविता जर प्रचारकी तर मराठी कवितेला प्रचाराचे वावडे आहे की काय? संतवाङ्मयात प्रचार नाही का? केशवसुतांच्या कवितेत तो थाट नाही का?" त्यावर प्राध्यापक महाशय गप्प बसले. मग मीच त्यांना आपण होऊन विचारले की "आपण अमरशेखांच्या किती कविता वाचल्यात?" त्यावर महाशय म्हणाले, "नाही हो, मी अद्यापि एकही त्यांची कविता वाचलेली नाही. उलट त्यांच्या कवितांचा एखादा संग्रह प्रसिद्ध झाला आहे की नाही हेही मला माहीत नाही." मी त्यांच्या त्या 'विद्वत्ता'पूर्ण विवेचनावर हसू लागताच ते पाहतच बसले. मला त्यांनी हसण्याचे कारण विचारताच मी म्हटले, "कमाल आहे बुवा तुमची. अहो, एकही कविता न वाचताच आपण आपले मत खुशाल झोकून देता, त्याला काही आधार?"

"आधार कसला? वाटले ते सांगितले." -- प्राध्यापक; अशा या विद्वानांना वाटते ते कशाच्या आधारावर हे कुणाला सांगता येणार नाही. कुणाला तरी काही म्हणताना ऐकले आणि प्राध्यापकांचे ते मत बनले!

दुसरे एक राजकारणपटू प्राध्यापक महाशय महाडला भेटले. ते म्हणाले, " अमरशेखांची कविता त्यांच्या तोंडून ऐकावी. " मी म्हटले " पण तिच्यात साहित्यिक मूल्ये काहीच नाहीत का ? " त्यावर ते उतरले, " तो प्रांत आमचा नाही. आम्हाला एवढेच समजते. " मी त्या महाशयांना मनातल्या मनात धन्यवाद देऊन कोपरापासून हात जोडले. प्रत्यक्ष कविता न वाचता, न पाहताच पूर्वग्रहदूषित मत झोकण्याच्या या गलिच्छ पद्धतीचे मला दर्शन घडल्याने एक प्रकारची चीड निर्माण झाली...आणि त्यात भर म्हणून की काय अमरशेखांच्या ' धरतीमाते ' मधील ' सत्य ' वाचायला मिळाले. मिरासदारांनी दिलेल्या वागणुकीचे नमुने पाहिले; खेद वाटला. या कवीच्या काव्यकृतीबद्दल अगोदरच मनात एक मजबूत भावबंध निर्माण झाला होता. त्यामुळे माझे मन स्वस्थ बसेना. अखेर माझ्या मनाने ठाम निश्चय केला की हा कवी उपेक्षित राहता कामा नये. त्याला कुठे ना कुठे तरी न्याय हा मिळालाच पाहिजे. त्याच्या काव्याचे मोल दाखवून दिलेच पाहिजे. ते एक आपले कर्तव्य आहे अशी ठाम भूमिका घेऊन मी अभ्यासाला सुरुवात केली. अमरशेखांची कविता न वाचताच अपप्रचार करणारांची खरी चूक दाखवून दिली पाहिजे ह्या भावनेने मी लेखन केले आहे. अमरशेखांची कविता ही केशवसुतांच्याच परंपरेत बसणारी असून तिने एक पाऊल कोणत्या बाबतीत पुढे टाकलेले आहे हे दाखविण्याच्या भूमिकेवरून लेखनाचा सारा प्रपंच मांडला आहे. या कवीच्या कवितेला न्याय मिळाल्याने एक दालन समृद्ध होणार आहे.

## प्रकरण २

# कवितेचे स्वरूप

श्री. अमरशेख हे महाराष्ट्राचे एक लाडके शाहीर आहेत. आपल्या काव्याची जबरदस्त मोहिनी अनेक वर्षांपासून त्यांनी महाराष्ट्रावर घातलेली आहे. शाहीर अमरशेख म्हटले की छाती वेगळ्याच अभिमानाने फुलून निवते. मराठी परंपरेचा, मराठी बाण्याचा असा हा कवी असून महाराष्ट्राच्या ज्वलंत संस्कृतीचा महान उपासक आहे हे कवितांचे प्राथमिक दर्शन घेतल्यासही मनोमन पटते. लोकादरास पूर्णपणे पात्र होण्यास हेही एक कारण असू शकेल.

अमरशेख थोर कलावंत आहेत. आजवर महाराष्ट्राने खरी कलावंतांचीच एक जात मानली आहे. त्यांच्या कवितेचा अभ्यास करताना वंश, धर्म यांचा बागुलबोवा करण्यात काहीच अर्थ नाही.

अमरशेखांच्या भावपूर्ण कवितेने आज एका विशिष्ट समाजाच्या भावनांना बोलके केले आहे. त्या समाजाच्या भावना प्रतीत करण्यात त्यांनाही अभिमान वाटतो. ते स्वतः स्वभावतःच समाजोन्मुख कवी आहेत. आपल्या कवितेचा उगम सांगताना ते एके ठिकाणी म्हणतात —" वैराण माळरानात, खडकाळ जमिनीवर माझे काव्यबीज अंकुरले आहे. सामान्य जनांच्या आशा-आकांक्षा, हर्ष, विषाद, आनंद, सौंदर्य यांच्या कल्पनांपासून मी किमपिही दूर सरू शकत नाही." यावरून त्यांच्या कवितेचे स्व–रूप समजायला काही अडचण पडत नाही.

" अमरशेख हे ज्या वर्गाचे प्रतिनिधि आहेत त्या वर्गाच्या जीवनाचे अत्यंत रौद्र आणि भयानक दर्शन त्यांच्या काव्यामध्ये घडते. जीवनाचा विसर त्यांना क्षणभर पडत नाही. "[१]

अमरशेखांचे ' कलश ' आणि ' धरतीमाता ' हे दोन्हीही संग्रह चाळले तरी एक महत्त्वाची अशी गोष्ट प्रथमच लक्षात येते ती अशी की, अमरशेख हे केवळ स्वतःच्या 'समाधाना'साठीच काही काव्यलेखन करीत नाहीत. ते ज्या विशिष्ट समाजाचे प्रतिनिधित्व करतात त्याच्याच भावना उत्कटत्वाने प्रकट करतात. वास्तवजीवन आणि काव्य यांच्यात ते भेद करीत नाहीत. त्यामुळेच प्रकटीकरणामध्ये कधी उग्रता व कधी दाहकता भासते. हा परिपाक त्या समाजरचनेचा आहे.

१ 'कलश' – प्रस्तावना–अत्रे

त्यांचे काव्य जीवनदर्शी असल्यानेच एका संस्कृतीचे दर्शन यथायोग्य तऱ्हेने घडविलेले दिसते.

आचार्य अत्रे म्हणतात– " अमरशेख शाहीर आहेत ही गोष्ट विसरता कामा नये. शाहीराचे शब्द कानावर पडले की. वारुळातून फुंफाट करीत बाहेर पडणाऱ्या नागाप्रमाणे किंवा करवंदीच्या जाळीतून डरकाळी फोडीत बाहेर पडणाऱ्या वाघाप्रमाणे माणसाची अवस्था होते. शाहीराचे शब्द त्याची आतडी खेचतात. शाहीर हा दैनंदिन जीवनाच्या संग्रामामधला सांगाती आहे. शाहीर हा एखाद्या कोंबड्यासारखा आहे. पडक्या घराच्या भितांडावर, शेताच्या कुंपणावर, नाहीतर कामगारांच्या चाळीच्या जिन्यावर बसून त्याला सकाळ दुपार ववतशीरपणे आरवावेच लागते." याचा प्रत्यय त्यांच्या दोन्ही कवितासंग्रहांतून येतो. आपण एका शाहीराच्या कवितेचा आस्वाद घेत आहोत याची खूणगाठ मनात कायमची बांधून ठेवली की मग मनाच्या कोपऱ्यात कसलीच 'जळमटे' तयार होण्याचा मुळी संभवच नसतो

" अमरशेखांच्या शाहिरी धर्तीच्या कवितेने महाराष्ट्रातील सामान्य जनतेला मैफलीचा शुद्ध आनंद दिला. "[1] हे मोठेपण मान्य करण्यात आज अनेक रसिक टीकाकार पुढे सरसावत आहेत ही एका परीने अमरशेखांच्या कवितेची यशस्विताच मानावी लागते.

'कलशात' त्यांची प्रतिभा कमालीची आत्मपर झालेली आपल्याला तीव्रतेने जाणवते. अर्थात त्या आत्मपरतेत एक प्रकारचा कडवटपणाही असलेला आढळतो. असे असले तरी सर्व कवितेतून विषण्णतेचा सूर मात्र त्यांनी आळविलेला नाही. तरीपण काव्यातून एका विशिष्ट समाजाच्या उध्वस्त जीवनाची प्रतिबिंबे पाहायला सापडून त्याच्या अतृप्त आशा-आकांक्षांच्या आक्रोशाचे प्रतिनाद ऐकायला मिळतात, हे अमान्य करता येत नाही.

" कवितेला एक प्रकारे लोकाभिमुख करणे व लोकांच्या रोजच्या साध्या जीवनातल्या अनुभवांना वाचा देणे "[2] हे आधुनिक मराठी कवितेचे कार्य अमरशेखांचीही कविता करते. अमरशेख सर्वसामान्यांच्या भावना. आकांक्षा सामान्यांच्या भूमिकेवरूनच पण काहीशा आर्ततेने आणि उत्कटतेने व्यक्त करतात. त्या व्यक्त करताना त्यांची प्रतिभा वास्तवतेशी प्रतारणा करीत नाही. प्रत्येक चित्रण, मग ते लौकिक दृष्ट्या सामान्य का असेना, पण ते वास्तव करण्यावर मूळचाच भर अधिक असतो. 'जीवना वगळूनी शब्द कोणता सांगा' असा अमरशेखांचा मुळी खडा सवालच आहे.

केशवसुतादि कवींच्या भूमिकेतील उद्दंड आत्मविश्वास, बालकवींचा हळुवारपणा

---

१ प्रा. हिंमतराव चव्हाण

२ आधुनिक मराठी वाङ्मयाचा इतिहास

४०१५८
१६९५ २१।५।९५

आणि कविवर्य तांबे यांची जीवनदृष्टी आणि तिच्या जोडीला असलेला अदम्य आशावाद अमरशेखांच्या कवितेत ठासून भरलेला दिसतो.

" उद्दाम प्रगतिपरंपरेतून उस्फूर्त झालेला सामाजिक विषमतेबद्दलचा व अन्यायांबद्दलचा तीव्र प्रक्षोभ हा केशवसुती वळणाचा व्यवच्छेदक घटक "[१] अमरशेखांच्या कवितेत तर दिसतोच; शिवाय त्या वळणामागे असलेली तेजस्वी, तडफदार वृत्ती हिचाही चांगलाच प्रत्यय येतो. त्यांची सहानुभवी प्रत्ययकारी कविता वाचतानाच वाचकाला ते ' आमचे कवी ' असेच वाटू लागतात.

अभिजात कवीच्या कवितेत कल्पकतेचे भव्य उड्डाण असते. तसाच प्रकार या कवीच्या कवितांत दिसून येतो.

"प्रतिभा म्हणजे नवीन कल्पना, नवीन उत्साह, नवीन शोध, जीवनाची नवीन दिशा."[२]

अमरशेख जीवनाची नवी दिशा दाखवतांना म्हणतात —

उगीचता सारी नाही हे जीवन
जीवन आहे हे प्रयोग महान

यावरूनच त्यांच्या प्रतिभेची सहज कल्पना येते.

उपहास ही अमरशेखांच्या कवितेतून प्रकट होणारी एक ठळक अशी प्रवृत्ती आहे. " वैयक्तिक निराशेच्या चरकातून बाहेर पडणाऱ्या माणसाच्या स्वभावात उपहास-वृत्ती निर्माण होणे क्रमप्राप्त असते. समाजाच्या ज्या विशिष्ट परिस्थितीत त्याचा जीव गुदमरत असतो आणि अनेकजण गुदमरताना त्याला दिसत असतात तीविषयी त्याच्या मनात अनास्था उत्पन्न होणे केवळ स्वाभाविक आहे. "[३] अमरशेख प्रचलित जीवनाचे चित्रण कित्येकदा उपहासपूर्ण करतात.

ताजमहालाचा
दगड पायाचा
तो पण जायाचा
नेम नाही

अशी एखादी उपहासगर्भ रचना चमकून जाते. भोवताली सर्वचजण गुदमरताना पाहिल्यावर कवीचा सूर तीव्र उपहासाचा बनतो आणि मग—

फाटके आभाळ
दिसे दिशा दाही

१ आधुनिक कवी—दा. न. शिखरे
२ आचार्य विनोबा भावे.
३ यशोनिधि—परीक्षण— वि. वा. शिरवाडकर.

टिगळ त्या काही
लावता ये ना

हे स्पष्टपणे सांगून मोकळाही होतो; पण एवढ्यावरच थांबून कवीचे काही भागत नाही. विचाराला आचाराची जोड हवीशी वाटते आणि मग अमरशेख सांगतात—

आता सत्यासत्या । [illegible]
विचाराला जाग । येऊ दे रे ......

त्यांच्या कवितेला स्वप्नात रममाण होण्याचे कधीच मानवत नाही; ती सत्या-पासून ‘ स्वप्नातही ’ दूर जात नाही. तिला अगम्य, अनाकलनीय असे जे जे काही आहे त्याची ओढ नाही. जीवनाचा कोपरान कोपरा हुडकण्याचा तिला हव्यास आहे; आकाशाला गवसणी घालण्याचा नसता मोह नसल्याने तिचे पाय ‘ अधांतरी ’ राहत नाहीत. ती भोवतालच्या कणा कणाचाच अचूक वेध घेते आणि पुढे जात जात जीवनाचा साक्षात्कार घडविते. म्हणूनच सुसंगतीचा साक्षात्कार घडतो. अमरशेखांच्या कवितेतील कल्पना उद्दाम असल्या तरी त्या लोक-विलक्षण नाहीत. ते ज्यांच्याबद्दल लिहितात त्यांच्या आशा-आकांक्षांपेक्षा, त्यांच्या भावविचारांपेक्षा भिन्न स्वरूपाचे असे काव्याचे अंतरंग नाही. त्यामुळे कविता वाचताना आपण कधीच न पाहिलेली, न अनुभवलेली सृष्टि पाहत आहोत असे वाचकाला तरी निदान वाटत नाही.

अमरशेखांच्या कवितेतून प्रकट होणारे तत्त्वज्ञान विशिष्ट वर्गाच्या मनोवृत्तींचे एक प्रकारे काव्यात्मक असे मूर्तिकरणच वाटते. कवितेत एक प्रकारची अंतर्मुख-तेची खोली आढळते, तिचा उगम त्यांच्या चिंतनशील अशा प्रवृत्तीत सामावलेला आहे. किंबहुना चिंतनशीलता हा त्यांच्या कवितेचा स्थायी भावच म्हणावा लागतो. त्यामुळेच कवितेचा आशय सामान्यत्वाच्या कक्षा कधी उल्लंघिताना दिसत नाही. अमरशेखांची प्रतिभा भविष्याचा वेध, घेते पण तो घेताना ती सत्याचा जयजय-कारही करते. सत्याकडे गतिमान होणारी प्रतिभा अंतर्बाह्य सुंदर बनते आणि सत्य, शिव, सुंदरतेची निस्संकोचपणी पूजा करते. संस्कृती आणि मानवता सतत बहरावी, फुलून यावी, तेजोमय व्हावी हा त्यांच्या काव्यप्रतिभेला लागलेला ध्यास आहे. सामाजिक अन्यायावरील सर्वच कविता कवीच्या मनःप्रकृतीला अनुसरून जळजळीत त्वेषातून उत्पन्न झालेल्या आहेत.

“ वृत्त आणि व्याकरण म्हणजे काही काव्य नव्हे काव्यात जिवंतपणा लागतो; तृप्ती लागते, धुंदी लागते. ”[१] “ उत्तम काव्यात शब्दाकडे, यमकाकडे लक्ष

---

१ ‘ कलश ’ -- प्रस्तावना-अत्रे.

जात नाही, गेले तर कवितेचा दोष नाही. काव्यात शेवटी परिणामकारक म्हणजे व्यक्त झालेला अनुभव "[1] "या दोन्ही गोष्टींचा निकष लावायचे म्हटले तरी अमरशेखांची कविता निस्संशय श्रेष्ठ ठरावी काव्याच्या व्याख्या अनेकांनी केलेल्या आपल्याला पाहायला सापडतात एक व्याख्या "वैयक्तिक भावनांचा सहजोद्गार हे काव्याचे सर्वस्व नव्हे; तर त्या भावनांना प्रौढ आणि अवैयक्तिक स्वरूप देऊन त्यांची सालंकृत टापटिपीची मांडणी केल्याने जे प्रतिबिंबित स्वरूप प्राप्त होते ते काव्य होय "[2] दुसरी व्याख्या अशी आहे की–"कविता म्हणजे संस्कृति-टीका."[3]

"कवी हा मूलतः पौराणिक, ऐतिहासिक वा काल्पनिक, प्राचीन वा स्वकालीन कथा सांगणारा आणि स्वतःची व इतरांची सुखदुःखे सहानुभूतीने वर्णून मनोरंजन करणारा म्हणजे एका दृष्टीने प्रतिष्ठित तमाशेकारच होय."[4] ह्या कवीच्या भूमिकेशी बऱ्याचशा प्रमाणात जुळती-मिळती अशी अमरशेखांचीही भूमिका आहे. त्यांनी काव्याचीच मुळी अशी एक सुटसुटीत व्याख्या केलेली आहे. ते म्हणतात, "काव्य म्हणजे सत्याकडे जीवनाची ज्वलंत आणि अव्याहत अशी धाव." "सत्य म्हटले म्हणजे जिला कोणत्याही प्रकारची विसंगती ठाऊक नाही असली सुसंगती. सुसंगती, सर्वच बाबतीत सुसंगती, हेच सत्याचे मुख्य लक्षण आहे. सत्याला असत्य खपत नाही, विरोध खपत नाही; त्याचा अर्थ त्याला कोठल्याही प्रकारची विसंगती खपत नाही असाच आहे. ते अथपासून इतिपर्यंत अंतर्बाह्य सुसंगत असते; त्याला जर नाद असेल तर त्या नादातील सगळे सूर एकमेकांशी पूर्ण संवादी असतात. त्याला जर रूप असेल तर त्या रूपातील सर्व आकार हे एकमेकांना पूरक आहेत, मारक नाहीत असेच दिसून येते. व त्याला जर रंग असेल तर त्या रंगातील प्रत्येक छटा संवादी आहेत, एकत्वसूचक आहेत, असेच आढळते. सुसंवाद, सुसंगती, सुरूपता, सुरेलता हेच सत्याचे भावगुण आहेत, त्यांनीच सत्याची प्रकृती बनविलेली आहे."[5] अमरशेखांची सत्याकडे धाव आहे म्हणजेच त्यांना सत्याच्या भावगुणांची निर्मिती हवी आहे. ह्या निर्मितीसाठीच तर त्यांची अव्याहत धडपड चालू आहे. जीवनावरची अढळ आणि अविचल श्रद्धा हे अमरशेखांच्या कवितेचे प्रमुख 'भांडवल' आहे. जीवन हे एक महान सत्य मानणाराच जीवनातले खरे काव्य समजू शकतो. सत्याशी प्रतारणा करणारा कुणीही जीवनाबद्दलच्या पोटतिडीकेने लिहू शकत नाही. आपल्या आणि समाजाच्या आशा-आकांक्षा उंचावू

१ आधु. मराठी कविता–प्रा. रमेश तेंडुलकर.

२ कविवर्य–चंद्रशेखर.

३ प्रा. माधव त्रिंबक पटवर्धनकृत सुधारक–काव्य, पृष्ठ १७३.

४ प्रा. माधव त्रिंबक पटवर्धन.

५ वाङ्मयातील सत्य–शिव–सौंदर्य–प्रा. वा. ल. कुलकर्णी.

शकत नाहीत. तो कल्पनेच्या विश्वातच एकाकी विहार करतो आणि अखेर त्याच्या मनात वैफल्याची भावना निर्माण होते. अश्रद्धेचा उगम त्यातूनच होतो. अमरशेखांचे तसे नाही. ते सश्रद्ध तर आहेतच, शिवाय त्यांची कविता सूक्ष्म अवलोकन आणि स्वानुभूती यांच्या रसायनातून निर्माण झालेली आहे. त्यांच्या कवितेत वैफल्याची भावना न आढळता उलट त्यांचा दुर्दम्य आशावाद प्राप्त परिस्थितीवर कठोर प्रहार करायला अगदी सज्ज असलेलाच दिसतो. त्यांची कविता त्यामुळेच जणू काही ओघवती बनलेली असावी. ती वाहाती आहे. वाहणे हेच मुळी चैतन्याचे लक्षण असते. ती वाहाती, गतिशील असल्यानेच स्वकालीन जीवनाचे प्रतिबिंब तिच्यात उमटलेले पाहावयास सापडते.

अमरशेखांची वृत्ती केशवसुतांसारखी आहे. ती मूलतःच सामाजिक आणि तत्त्व-चिंतक अशी आहे. त्यामुळे तिला देशभक्तीचे आणि सामाजिक क्रांतीचे स्वरूप चटकन आकलन होते. तिचा सूक्ष्म, उत्कट आणि कल्पनात्मक आविष्कार आत्म-निष्ठपर कवितांतूनच प्रामुख्याने झालेला दिसतो.

अमरशेखांच्या कवितेत केवळ छायाचित्रणावर भर दिलेला कधीच दिसणार नाही. तिला काहीतरी सांगण्याची ओढ लागलेली पदोपदी दिसून येते. त्यामुळे कलात्मकता आणि सामाजिक आशय याने ओथंबलेली ही कविता ओजस्वी आणि तेजस्वी झालेली दिसते. ती अधिक हृद्य होण्याचीच जणू काही धडपड करीत असावी. अमरशेखांनी आपल्या कवितेसंबंधात म्हटले आहे की,– “ माझ्याकडून कुणीही लिहवून घेत नाही. कुठल्या मोहानेही मी लिहू शकत नाही. माझी कविता माझ्या पुरतंच बोलायचं तर ती एक अति तीव्र अशी वेदना आहे. ”

विषमतेमुळे बहुसंख्याकांच्या कपाळी अखंड घाम गाळणे, राबणे आले आहे. पुन्हा त्याला निर्भेळ साधी सहानुभूती सुद्धा मिळणे कठीण झाले आहे म्हणून मर्ढेकर मोठ्या कळकळीने विचारतात —

नाही कोणी का कुणाचा । बाप लेक मामा भाचा
मग अर्थ काय बेंबीचा । विश्वचक्री......

अशीच कळकळ अमरशेखांच्या खालील ओळींतून कशी दिसून येते ती पाहा– ते म्हणतात,

मरण हवे पण क्रमाक्रमाने । कुत्र्याच्या मौतीने नाही
मौतीने वाघाच्या नाही । सरळ नि साधा माणुस म्हणुनी

याच साध्या माणसाबद्दलची तीव्र तळमळ ते व्यक्त करतात. सहानुभूतीसाठी नेत्याकडे वळावे तर तो नुसता ‘ लंब्याचवड्या बाता मारणारा ’ मर्ढेकरांना दिसतो. त्याच नेत्याची ओळख अमरशेख अशी करून देतात—

... सांगू मी कुणाला ? मंत्र्याला का ?
त्यानेही कापिला । खिसा माझा काल
कराची कमाल । झाली त्याच्या ...

मर्ढेकरांच्या दृष्टीला विकलता, विफलता सभोतालच्या जीवनांत तीव्रतेने जाणवलेली आहे आणि तीच त्यांनी आपल्या कवितांतून, कधी उपहासाने तर कधी निर्भय फटकळपणाने व्यक्त केलेली आहे. अमरशेखांनीही अगदी याच मार्गाचा अवलंब केलेला पाहायला सापडतो. माणसाकडे पाहण्याची दोघांचीही दृष्टी जवळ जवळ एकाच प्रकारची आहे. त्यांच्या वेदना एकच असल्याची जाणीव होते. फक्त फरक पडतो तो नेमका भावनाप्रकटीकरणांत. अमरशेखांचा प्रखर आशावाद त्यांच्या कवितेतून वारंवार प्रकट होतो. "मर्ढेकरांचे कवी म्हणून मोठेपण मात्र मुख्यतः एका वेगळ्याच गोष्टीवर आधारलेले आहे. ती गोष्ट म्हणजे त्यांची वेदना. ही वेदना तीव्र आहे. तिची पाळेमुळे खोलवर रुजलेली आहेत. 'येथे नंग्याचाच कारभार' असल्यामुळे ती 'कासावीस' झाली आहे. 'त्या'चे नख आपल्या गळ्याला लागावे म्हणून ती उतावीळ झालेली आहे. 'अतींद्रियार्थाची आच' लागलेली आहे."[1] अमरशेखांनी आपल्या वेदनेला वाट करून दिली आहे. नवसंस्कृतीचे ओंगळ स्वरूप दिसताच या जगालाच एक दिवस आग लावायला ते निघतात. विचारांचे 'मंथन' करतात 'ढोंगी' महात्म्यांचे दर्शन घडवितात. "मी मीन वेगळा जळाविणा । हे दुःख हृदीचे सांगू कुणा" अशी व्यथाही सांगतात.' त्यांची वेदना तीव्र असल्यामुळेच 'पाव शतक' धडपड चाललेली दिसते आणि मग इतके करूनही 'पेटत नाहीत कशी ही मने !' म्हणून आश्चर्य व्यक्त करतात; पण एवढ्यावर न थांबता आपली सहनशक्ती संपल्याचे सांगून शेवटची धडक घ्यायला तयार होऊन 'एक तो तरी एक मी तरी । कुणीतरी पण एकच ठेविन' असा निर्धार व्यक्त करतात. अमरशेखांच्या वेदनेला पेटून उठण्याचे मोठे 'वेड आहे. मानव्याची विटंबना करणाऱ्या परिस्थितीवर मात करायला सज्ज होतानाच मानवता नष्ट करणाऱ्या हैड्रोजनची पुरती ओळख करून देतात. ते म्हणतात–

हैड्रोजन जागा होता । नष्ट करिल ही मानवता
भविष्य कुठले मग पुसता । मार्ग कसा येइल हाता ?

म्हणूनच तर......

निजल्या जागी हा । ठार करा रे ठार करा.

अमरशेखांची वेदना ही अवैयक्तिक स्वरूपाची आहे. ती एका विशिष्ट वर्गाची

---

१ आधु. म. वा. इ. –डॉ. अ. ना. देशपांडे,

२०१५८ १९८५ २२।२।८५



आहे. " आपल्या काव्यातील आशयाचा प्रत्यक्षातून वेध घेणारा कवी आज मराठी साहित्यात अमरशेखांसारखा अमरशेखच. "[1] अमरशेखांची कविता प्रत्ययकारी बनली आहे; तिचे रहस्य त्यांच्या पोलादी व्यक्तिमत्वात सामावलेले आहे. तेच भोवतालच्या परिस्थितीचा अचूक वेध घेते.

अमरशेखांची जीवनाच्या प्रगमनशीलतेवर नितांत श्रद्धा आहे; म्हणूनच गढूळलेले समाजजीवन बदलण्याची त्यांना आच लागलेली आहे. ' पाथवरट ' कवितेतील पहिल्या दोन ओळीच वाचल्यानंतर पुरती खात्री होते. ते म्हणतात–

जुनाट इमला झाला सारा पाडुन टाका
देउनि धक्का.. ......

आणि हे कशासाठी करायचे ? तर.. मानवतेचे नवीन मंदिर या जागेवर बांधायला मिळावे म्हणून.

" कलावंत हा जीवनाचा पुनर्निर्माता असतो, छायाचित्रकार नव्हे. तो वस्तुसृष्टी-पासून आपले साहित्य घेत असला तरी त्याचा उपयोग अपरसृष्टी उत्पन्न करण्याचा असतो. किंबहुना निसर्गाची काय किंवा संसाराची काय हुबेहूब अनुकृती न करता तो जेव्हा स्वतःच्या कल्पनेनुसार वास्तवाची पुनर्घटना करतो तेव्हाच त्याच्या कृतीला कलात्मक स्वरूप येते. खरा वास्तववादी हा समाजाची सुधारणा करण्याच्या आंतरिक तळमळीने प्रेरित झालेला असतो. जीवनाच्या प्रगमनशीलतेवर त्याची श्रद्धा असल्यामुळे त्याच्या कुंठित झालेल्या गतीला चालना मिळावी ह्या हेतूने तो वस्तुस्थितीचे चित्रण करतो व त्यामुळे त्याने रेखाटलेल्या वस्तुचित्राला ध्येयवादाची उज्ज्वल पार्श्वभूमी लाभते. "[2] अमरशेखांच्या कवितेला ती निश्चित लाभलेली आहे हे त्यांच्या सूत्रे, माझा माग, रावे–रावे, अंधाराचे हद्दत, पाथरवट, मंथन, कर्ण आणि कुंती, कलावतीस, क्षयाने मेली इत्यादि कवितांतून दिसून येते.

अमरशेखांच्या वास्तवदर्शी चित्रणात त्यांची कलेची श्रेष्ठता सामावलेली आहे. सामाजिक ऊर्मी प्रतीत करणे ही गोष्ट साधी नव्हे. तिचा आशय रेखीव, स्पष्ट आणि कलात्मकरीत्या मांडावा लागतो. आपला आत्मा समाजजीवनाशी समन्वित करणाऱ्यालाच समाजाचे दैन्य, दुःख, दारिद्र्य, आर्तता, पिळवणूक समजू शकते; आणि तोच दंभाचा खरा स्फोट करू शकतो. समाजाच्या गलिच्छ रुढींविरुद्ध बंड पुकारायचे, परंपरेविरुद्ध झुंज द्यायची, बंडाची ' तुतारी ' फुंकायची म्हणजे काही चेष्टा नव्हे. त्यासाठी छातीत फार मोठे सामर्थ्य असावे लागते. अमरशेख ध्येयवादी आहेत, त्यांच्या छातीत ते सामर्थ्य निस्संशय आहे. म्हणूनच तर त्यांच्या कवितेत ' अंगार ' फुलताना दिसतो.

---

१ प्रा. हिंमतराव चव्हाण.

२ ग. त्र्यं. माडखोलकर ( कलेचे स्वरूप व कार्य )

समाजाबद्दलचे गाढ प्रेम असल्याशिवाय, त्याच्याबद्दलचा विलक्षण आदर असल्याशिवाय समाजशुद्धी व्हावी ही तळमळ असणार नाही. आजच्या परिस्थितीत समाजशुद्धी ही बाब काही जादूची कांडी फिरवण्याइतपत सोपी राहिलेली नाही. अनेक अपप्रवृत्ती समाज-जीवन उध्वस्त करून टाकीत आहेत. दुसऱ्या महायुद्धात होरपळलेल्या साऱ्याच जगाची आर्थिक, सामाजिक स्थिती पार ढासळलेली आहे. त्याच्यात भर म्हणूनच की काय धनिकांनी समाजशोषण चालविले आहे. समाजाची नागवणूक करून त्याला त्रस्त केले आहे. त्यामुळे समाजाची घडी पार विस्कटून गेली आहे. जुने अवशेष पार खिळखिळे झाले आहेत. बहुजनसमाज पुरता गांजून गेला आहे. जीवन सुसह्य बनण्याऐवजी उलट असह्य आणि घृणास्पद बनले आहे. ही सर्व परिस्थिती उघड्या डोळयांनी पाहणारा संवेदनाक्षम कवी स्वस्थ कसा बसणार ? पिडलेल्या, नाडलेल्या, दीन, दलित, पतित अशा साऱ्यांच्या जीवनाची चाललेली ससेहोलपट त्याला कशी पाहवणार ? अशा वेळी त्याची वेदना तीव्रतर बनली तर नवल नाही. म्हणूनच अमरशेख समाज-परिवर्तनाची, नव-निर्मितीची, समाजशुद्धीची हाक कळवळून देतात. त्यांना आपली वेदना दाबून धरणे अशक्य होते. मनाचा बंधारा मग फुटतो आणि त्यातून काळीज कापीत जाणाऱ्या ओळी बाहेर पडतात. प्राप्त परिस्थितीचे नुसते आवाहन देऊन चालणार नाही हे पुरते ओळखलेले असल्यानेच त्यांच्यामधला सुप्त क्रांतिकारक जागा होतो. तो सांगतो--

शांतता लढा हा लढा प्राण लावोनी

आणि हा लढा लढायची वेळ तरी का आली ? तर त्याचे कारण-

चरकात घालुनी यौवन जीवन सारे
लाविती वाट हे धनिक चोर परभारे

म्हणूनच तर—

या कत्तलखान्याविरुद्ध गाणी गातो
धनिकांचा फाडुनि बुरखा मी दाखवितो

अशी आपली भूमिका अमरशेख स्पष्टपणे व्यक्त करतात. आपली वेदना प्रकट केली की संपले असे या कवीच्या बाबतीत होत नाही. त्यांची आशावादी वृत्ती उफाळताना दिसते. ते म्हणतात–

मी जिंकणार ही बात असे ठरलेली
या शांति-लढ्यातुनि फुलेल यौवन-वेली

यातील 'मी' हा प्रातिनिधिक स्वरूपाचा आहे. म्हणूनच तो शांति-लढ्याची भाषा करतो. हा शांति-लढा म्हणजेच एक प्रकारची क्रांती अशी कल्पना अभिप्रेत आहे. म्हणूनच कवीने म्हटले आहे—

ती लाट क्रांतिची चल आणू घडवून
या टाकू त्याना दर्यातच बुडवून.

अमरशेख आपल्या 'वेदने'संबंधात एके ठिकाणी म्हणतात— "लिहिल्या-शिवाय मोकळं मोकळं वाटत नाही. त्या माझ्या या निर्मितीला, तळमळीला, वेदनेला कुणी कसलाही रंग दिला तरी मला त्याचे काही वाटत नाही. पुन्हा लिहून ती केवळ दप्तरात ठेवून दिली किंवा एखाद्या देवळात, क्लबात, पार्टीत जाऊन चार दोस्तांपुढे भेळ-कॉफीबरोबर ठेवली की पुरे असेही मला कधी वाटत नाही; तर ती हजारो, लाखो लोकांच्या भावनांशी ताडून पाहावी असे मला मला वाटते. मी तसे करतोही, आणि तिथे प्रतिसाद मिळतो, कदर होते, न्याय लाभतो. हे सांगायला मला अभिमान वाटतो. माझी कविता याच पायावर उभी आहे."[1] अमर-शेखांची वेदना अवैयक्तिक स्वरूपाची असून ती समाजजन्य कशी काय आहे हे ह्यावरून लक्षात येते. लाखो लोकांच्या भावनांशी आपली वेदना जुळती मिळती आहे हे पाहून अमरशेखांना अभिमान वाटतो. याचाच अर्थ ती प्रातिनिधिक स्वरूपाची का आहे याचा उलगडा होतो.

"कवी काय किंवा शाहीर काय, तो स्वकालीन युगप्रवृत्तीचा प्रवक्ता असतो. युगधर्माचा तो गतिशील वाहक असतो. येईल त्या परिस्थितीला तोंड देऊन त्या युगातील सत्य म्हणजे युगधर्म त्याने सांगायचा असतो. आजचा युगधर्म समाजवाद आणि म्हणूनच मी त्याचं वाहन आहे. त्याचा मला मनापासून अभिमान आहे."[2] 'अवघे जीवन सडू लागले । सहनशक्ति संपली यापुढे' असे अमरशेख म्हणतात त्याचे कारण समाजात बोकाळलेली विषमता त्यांना सहन होत नाही हे आहे. विषमतेची कीड नष्ट झाल्याशिवाय समाजवाद येणार नाही हे त्यांना पक्के कळून चुकले आहे. म्हणूनच विषमतेचे उग्र दर्शन ते जागजागी घडवितात. समाजवाद–समाजवाद हाच एक त्यांच्या चिंतनाचा विषय बनला आहे आणि तोच युगधर्म प्रस्थापित व्हावा अशी त्यांची तळमळ आहे. त्याच जिद्दीने त्यांचे लेखन चालू आहे. "अमरशेख म्हणजे धग, रग, आग, धुंदी आणि बेहोषी यांची जिवंत बेरीज."[3] हीच जिवंत बेरीज सामान्यांतील 'उणीवांचा' जाहीर पाढा वाचते. आणि बहुजन समाजाच्या अंतरंगाचे यथायोग्य दर्शन घडविते. जे हृदयाला भिडते ते काव्य अशी काव्याची सुटसुटीत व्याख्या केली तर ती पहिल्यांदा अमरशेखांच्याच कवितेला लागू पडेल. कारण "एखाद्या कारखान्याच्या धुराड्यातून धूर अन ठिणग्या ह्यांचा लोट जसा वर उफाळत असतो त्याप्रमाणे काव्याचा अंगार सदैव

१ धरतीमाता.
२ 'सत्य'– धरणीमाता पान १३.
३ आचार्य अत्रे.

त्यांच्या शरीरातून आणि वृत्तीमधून धुमसत असतो. "[1] हे धुमसणे वरवरचे नसते, ते काळजापासूनचे असते म्हणूनच त्यात जळजळीतपणा आणि त्वेष दिसतो.

अमरशेखाची प्रत्येक कलाकृती कलात्मक आविष्काराच्या रसायनांतूनच बाहेर पडते. भावनात्मकता आणि विचारात्मकता यांचा साहचर्यभाव जुळलेला दिसतो. त्यांच्या प्रतिभेचा चिंतनविषय झालेल्या विशिष्ट जीवनानुभावांतील चित्राकृती ते व्यक्त करतात. म्हणूनच सामान्य माणसाला क्षुल्लक वाटणाऱ्या भोवऱ्यापासून तो युद्ध-शांतीच्या सर्व विषयांना त्यांच्या प्रतिभेने स्पर्श केलेला असतो. कवितेतून काहीतरी साक्ष पटविण्याचा त्यांचा प्रयत्न चाललेला असतो. कोणताही कवी रसिकाला नुसत्या झगमगत्या शब्दांनी कांही भुलवू शकत नाही आणि ते त्याचे कार्यही नव्हे. माणसाला जीवनाबद्दलची दुर्दम्य ओढ असते म्हणूनच त्याला नवे भावविश्व पाहण्याची उत्कंठा लागलेली असते. तिची पूर्तता झगमगते शब्द कसे करू शकणार? रसिकाला जीवनाचा कुठे ना कुठे तरी साक्षात्कार घडलेला पाहायला मिळावा लागतो. अमरशेखांच्या कवितेत हा साक्षात्कार पुरेपूर घडतो. ज्या महाराष्ट्राने गेली अनेक वर्षे त्यांच्या कविता कंठात रुळवल्या, ओठांत घोळवल्या व त्यांचे मोठ्या उदार अंतःकरणाने स्वागत केले त्याचेही कारण लोकांना जीवनाचा साक्षात्कार घडतो हेच आहे. 'बक्षिसाच्या किंवा किताबांच्या अमिषाने भाटगिरी जन्मास येते, काव्य नव्हे' हे ते पुरेपूर जाणून आहेत. म्हणूनच तर छातीठोकपणे ते म्हणतात– "माझी कविताच काय पण माझा एक शब्द देखील बक्षीसाच्या वा तत्सम सोनेरी प्रलोभनाकडे बघून अथवा भाळून लिहिलेला नाही."

या जगातल्या कुठल्याही कलावंताला सारेच अनुभव आत्मसात होत नाहीत. त्याचे संवेदनाशील मन इतरांच्या अनुभवाशी तद्रूप व्हावे लागते. तरच तो इतरांच्या अनुभवांना कलात्मक रुप देऊ शकतो. इतरांशी सहज समरस होणारे आणि परत आपल्याच कलेच्या शिंपल्यात येऊन बसणारे व्यक्तिमत्व कलावंताजवळ असले पाहिजे. तसे व्यक्तिमत्व अमरशेखांजवळ निश्चित असल्याची खात्री मालन कामात सुकली, कोकिळेस, एकच दाणा, इ. कविता करून देतात. अशा कविता उच्च अभिरुचीच्या वाटतात.

"जनमनावर खरीखुरी पकड जर कोणाची असेल तर ती भावनाप्रधान कवीची. ह्याचे कारणही तितकेच जबरदस्त आहे. कल्पनाप्रधान कवीला आपल्या वर्ण्य विषयापासून अलिप्त राहून आपले काव्य लिहिता येते; तर भावप्रधान कवीला आपल्या वर्ण्य विषयापासून कधीच अलग करता येत नाही. किंबहुना तो जितका जितका त्या विषयाशी तद्रूप होत जाईल तितकी तितकी त्याची ती कविता सरस वठत जाईल.

१ कलश– प्रस्तावना पान १०.

भावनाप्रधान कवी हे कविता लिहितात म्हणण्यापेक्षा कविता जगतात असे म्हणावे लागते. त्यांचे चरित्रच एक काव्य बनते."[१] अमरशेख हे भावनाप्रधान कवी असल्यामुळेच त्यांच्या काव्यात भावनोत्कटता जास्त प्रमाणात आढळते. वर्ण्य विषयाशी भावनाप्रधान कवी तद्रूप होतो, त्याला समरसता साधता येते कारण त्याच्या हृदयाचीच तार मुळी छेडिली जाते हेच आहे... "खरं सांगायचं म्हणजे सुखापेक्षा दुःख, दुःखच खूप पाहिले, अगदी दुभंगण्याइतके पाहिले...तरी संसारातील दुःख नाहीसे व्हावे म्हणून जीवाची कासावीस मात्र सारखी चालू असते. काय करावे म्हणजे हे सर्व नाहीसे होईल व मानवाला हवं ते मिळेल याच प्रश्नाची घालमेल सतत चालू असते मनात. त्यातून सुटणारे शब्दच काव्यरूप घेत असावेत." असे स्वतः अमरशेखच सांगतात म्हणजे त्यांच्या हृदयाची तार कशी सतत छेडिली जात असेल त्याची चांगलीच कल्पना येते. भावनाप्रधान कवीखेरीज जीवाची कासावीस चालू राहत नाही. त्यांचे स्वतःचे चरित्रच मुळी काव्य आहे. तेच स्वतःच सांगतात-

तुकयाची ही आहे गाथा
अक्षय आहे अक्षय राहिल
प्रचिति अमरत्वाची येइल. (चरित्र माझे)

"आपले साहित्यिक केवळ मध्यम वर्गातूनच निर्माण होत आले आहेत. मध्यम वर्गातले साहित्यिकही आपल्या प्रतिभेच्या बळावर अन्य वर्गातील अनुभव सांगू शकेल, पण स्वतः जगून सांगणे वेगळे असते. अनेक जातीजमातींतून, अनेक विभागांतून जीवन जगलेले साहित्यिक आपली अनुभूती जेव्हा शब्दान्वित करतील त्या वेळी साहित्यात अनुभवाची समृद्धी होईल. आणि वेगवेगळे जीवन साहित्यात आणायचे ते टूम म्हणून केवळ आणायचे झाले तर ही समृद्धी लाभणार नाही. केवळ रंगीबेरंगी कपडे घातलेल्या बाहुल्या दिसतील. अनुभवाची समृद्धी करणारे विविध थरांतील साहित्यिक हवे आहेत आणि अनुभवाने त्यांचे जीवन प्रथम समृद्ध असायला हवे." हे विचार अमरशेखांच्या अनुभव समृद्धीच्या संदर्भात जरूर विचारात घ्यावे लागतात. साहित्यसमृद्धीसाठी अशा या दालनाकडे दुर्लक्ष करून चालणार नाही.

"पैशाकरिता जगणारे ते धनिक, स्वजनरक्षणाकरिता जगणारे ते सैनिक, तसे जीवनाचा अर्थ पाहण्याकरिता व दाखविण्याकरिता जगणारे ते साहित्यिक."[२] ही साहित्यिकाची व्याख्या अमरशेखांना लावून पाहिल्यास ती तंतोतंत जुळते. त्यांचा बाणाच मुळी सैनिकाचा आहे; झुंजाराचा आहे. "कलावंत हा नवसमाज

१ रे. टिळकांची कविता. पान ३३
२ प्रा. क्षीरसागर.

निर्मितीसाठी लढणारा झुंजार सैनिक आहे."[१] अमरशेखांची सत्यावरती असीम श्रद्धा आहे. म्हणूनच काही प्रसंग पाहिले की त्यांची बेहोषी वाढते. त्यांचा संताप तीव्र होतो. ते म्हणतात—

सत्य पळाले जगातुनी या । लावा या जगताला आग
श्रमास नाही कवडी किंमत । माणुस हिंमत झाली खाक.

त्यांची झुंजार वृत्ती 'हद्दत' कवितेतून पुरेपूर दिसून येते. त्यांच्या काव्याबद्दलचेच मुळी ते 'हद्दत' आहे.

होय, तोच आहे अंगार। आग ओकणे मजला प्यार
बाग आगीची फुलवावी। ...सर्व चांगले ठेवावे।
सगळे वाईट जाळावे। आता नाही हा मरणार
जीवन प्यालेला अंगार। येइल काळ कराया वार
वारावरती करीन वार। होय तोच आहे अंगार
नाही हो आता विझणार."...

नवनिर्मितीसाठी झुंजणे हीच एक आच त्यांना लागलेली आहे. याचा अर्थ सृष्टी, निसर्ग, मानवता यांच्या साहजिक प्रवृत्तींबद्दल त्यांना आस्था नाही असे मात्र नव्हे. त्यांना हवी आहे ती जीवनाची उन्नती, जीवनातील उदात्तता आणि समावेशकता. विश्वातील प्रागतिक सूत्राशी स्वत्वाचा समन्वय करण्याची त्यांची धडपड आहे. निरामय समृद्धी त्यांना हवी आहे. म्हणूनच ते सांगतात—

मारा हाका जमवा लोका
लोकशक्तिचा साधुनि मोका.

अमरशेखांच्या कवितेचे 'स्वरूप' हे असे आहे. त्यांच्या कवितेच्या पोटात खोल भावना असून तिचे प्रकटीकरण उदात्त आहे. क्रांतिदर्शी विचार मांडायला ती कचरत नाही. बेडरपणा हा तिचा विशेषच आहे. पूर्वपरंपरेचा प्रवाह सामावून देखील त्यांची कविता ही अस्सल त्यांचीच झालेली आहे. तिच्यावर अमरशेखांच्या व्यक्तिमत्वाचा ठळक ठसा उमटलेला आहे. जुन्या नव्याचा समन्वय साधूनही शिवाय आपले खास 'स्वरूप' प्रकट केले आहे. ते कसे आहे ते पुढील प्रकरणांतून पाहायचे आहे.

●●●

१ मायकोव्हस्की.

२०७५८ वि: काव्य
१९९५ आ: वि: १।११।५५

## प्रकरण ३

# श्रद्धा आणि आवेश

" वाङ्मय हे मानवांनी मानवांकरिताच निर्माण केलेले असल्यामुळे त्यातील जी सत्ये मानवी जीवनाशी अधिक संलग्न असतात, त्यांतील संगति-दर्शन हे मानवांना विशेष महत्त्वाचे वाटते हे स्वाभाविकच आहे. त्यामुळे केवळ नादसंगती, रंग-संगती वा रूपसंगती (Beauty of form) ज्यातून व्यक्त होते ते वाङ्मय वाचकांना एवढे महत्त्वाचे वाटत नाही; तर ज्यामध्ये जीवन-व्यवहारातील अत्यंत व्यापक, अत्यंत सूक्ष्म अशी भावसत्ये, जीवनसत्ये प्रकट झालेली असतात ते वाङ्मय त्यांना महत्त्वाचे वाटते तेच श्रेष्ठ दर्जाचे वाङ्मय होय असा निर्णय सर्वसामान्य वाचक कालामार्फत देत असतो... जीवन कसे जगले असता ते खऱ्या अर्थाने अधिक सुखदायी होईल हे कळून घेण्याची मानवाची जोपर्यंत इच्छा आहे तोपर्यंत त्याची धडपड चालू राहणार आहे, तोपर्यंत ज्या वाङ्मयांतून जीवनातील अत्यंत व्यापक व अत्यंत सूक्ष्म अशी जीवनसत्ये प्रगट होत असतात, त्या वाङ्मयाला तो सर्वश्रेष्ठ समजल्याशिवाय कधीही राहणार नाही...वाङ्मयाच्या सतत परिचयाने ज्याच्या अंतःकरणात खऱ्याखुऱ्या सुरूपतेची आवड उत्पन्न झालेली आहे त्याला कोठल्याही प्रकारची विरूपता सहन होणे शक्य नाही. मग ती राजकीय क्षेत्रातील असो, सामाजिक क्षेत्रातील असो, सांस्कृतिक क्षेत्रातील असो वा धार्मिक क्षेत्रातील असो. ह्या विसंगतीबद्दल एक प्रकारची चीड त्याचे मनात निर्माण झाल्याखेरीज राहत नाही."[१] अमरशेखांच्या वाङ्मयात जी चीड आहे ती या विसंगतीबद्दलची, विरूपतेबद्दलची. जीवनावर नितांत श्रद्धा असल्यानेच त्यांना भोवतालचे विसंगतिपूर्ण दर्शन असह्य होते. ते संतापून उठतात आणि म्हणतात—

जीवनावरी माझी श्रद्धा
सत्यावरती असीम भक्ती

सत्यावरती असीम भक्ती असल्यामुळेच कवी शब्दांना देखील सत्य सांगायला येण्याचे आवाहन करतो.

सत्य जगा सांगायाला
शब्दा चल ये गायाला— ...

---

१ वाङ्मयांतील वादस्थळे– प्रा. वा. ल. कुलकर्णी.

पण या शब्दांनी कसे यावे? तर कुसुमाचे मन घेऊन आणि रूप मात्र रुद्राचे घेऊन. आणि कशासाठी? तर ध्येयाचा प्यारा मेरू पूजिण्यासाठी. जीवनात अंगार फुलवण्यासाठी. मात्र अमरशेखांना जीवनात काही नुसताच अंगार फुलवायचा नाही. त्यानेच काही त्यांचे समाधान होते असेही नाही. उलट ते शब्दाना सांगतात–

नवकमलांची फुलवू बाग
कळ्याकळ्यांवर गाऊ राग
अमरत्वाचे गाऊ गीत
ये चल गाऊ नवसंगीत

अमरत्वाचे गीत गाणाऱ्या या सन्नद्ध कवीला सत्य-सूर्याचा साक्षात्कार घडतो.

नव क्षितिजावर लाले लाल
सत्य सूर्य उधळितो गुलाल

श्रद्धेला कृतीची जोड अमरशेख देतात. ते म्हणतात–

या मायावी दुनियेचा
अन कराच चक्काचूर

जीवन हा एक संग्राम आहे अशी कवीची ठाम समजूत असल्याने जसजसा जीवनाचा साक्षात्कार होतो तसतसा आवेश प्रकटतो. सैनिकाचा बाणा असल्याने आवेशपूर्ण उद्गार अपरिहार्य ठरतात. जीवनातला संघर्ष, झगडा अटळ असल्याची त्यांची खात्री असल्यामुळेच विसंवादित्व नष्ट करण्यासाठी ते लढत राहतात. म्हणूनच कलावंताच्या शक्तीची महती आवेशपूर्ण गाताना लेखणीला धार येते. ते म्हणतात—

प्रत्यय येइल आगळा तुम्हास
मेला माणुस जिवंत करील
हाच वेडा तुम्हामधील

अमरशेखांचा श्रद्धायुक्त आवेश प्रामाणिक वाटतो; त्यात दंभाचा लवलेशही आढळत नाही. भावनाप्रधानतेमुळे काही अपेक्षेपेक्षा वेगळे आणि भयंकर पाहिले की राग उफाळून आलाच. जीवनात शब्दाचे फार मोठे मोल आहे अशी त्यांची सात्त्विक श्रद्धा आहे. शब्दाचे जीवनच ज्याच्या हाती त्या जिवाची माती जर होत असेल तर जीवनाला खरा अर्थच नाही असे त्यांना विश्वासपूर्वक वाटते. जीव आणि शब्द यांचा अन्योन्य संबंध असल्यामुळेच ते विचारतात—

जीवन वगळुनी शब्द कोणता सांगा

याच शब्दांना कवी जीवन हे अभंग आहे याची जाणीव देऊन म्हणतो—

क्षय तुम्हास होइल अभंग जीवन आहे
रे, अटळ सत्य मी तुम्हास सांगू का हे ?

म्हणून शब्दांनी आपलाच उद्धार करून घ्यायला हवा. तो त्यांना कसा करून घेता येईल याचा मार्ग कवीच दाखवून देतो.

उद्धार असे तुमचा या बाळाहाती
या धावत अमृत घेउनि बाळासाठी
शब्दांनो ! या रे धावत स्वर्गातूनी

ज्ञानेश्वर, केशवसुत यांच्याबद्दलची कवीची केवढी श्रद्धा. ‘ बंडाचा या झेंडा ज्ञानेशाने रोवियला ’ असे सांगून केशवसुतांना म्हटले आहे—

ज्ञानेशाच्या वंशाचा तू एक शोभतो दिवा

शिवप्रभूंबद्दलची अतीव श्रद्धा खालील ओळींतून दिसून येते.

तूच सह्यगिरि कठोर, निर्घृण फत्तर काळावरुनी
खडकाखालुन झुळुझुळु निर्झर तूच आळविशि गाणी
तू ज्ञानेश्वर, एका, तुकाची अभग समर्थ वाणी
तुझ्या भागवति ठायी ठायी मानवतेच्या खाणी
भिमातटाकी दिसे तुझा मज अजब आगळा वेश

महात्मा फुले, आगरकर, महर्षि कर्वे ही सारीच मंडळी अमरशेखांच्या श्रद्धेची स्थाने का आहेत ? तर त्यांना जीवनाचा खरा अर्थ उमजला होता व मानवतेच्या अभ्युदयासाठी यांच्या शरीराचा कण नि कण झिजला होता म्हणून.

अमरशेखांचा आवेश हा पट्टीच्या झुंजाराचा कसलेल्या लढवय्याचा आहे. तो आवेश वाईट तितके जाळण्यासाठीच ‘ अंगारा ’चे रूप घेतो रडत बसून ठेचाळून घ्यावे अशा स्त्रैण जीवनाचा त्यांना कोण तिटकारा. ते लगेच आवेशाने म्हणतात—

घ्या मशाल ती तेजाळ । पेटवा पुन्हा त्यावरती
घालुनी तेल रक्ताचे । तेजाला लाखो कोटी
मशाल मोर्चा एकजुटीचा चोहिकडे फेका

संयुक्त महाराष्ट्र निर्माण होऊ नये म्हणून काही करंट्या लोकांनी वेळोवेळी अपशकुन केला, अडथळा आणला त्या वेळीं त्यांना इशारा देताना अमरशेखांनी भाष्य केले ते असे—

स्वातंत्र्य शांतता स्थापू । अवघे जग त्याने व्यापू
फडकवू ध्वज समानतेचा । पर्वा न जिवाची करता
संयुक्त महाराष्ट्र दाखवू । विभवाप्रत चढताना–

माणसांच्या सुखासाठी देहाची समई करून जळणारा, पण जळता जळता जग उजळण्याची, मानवतेच्या कल्याणाची चिरंतन काळजी वाहणारा हा कवी आहे. श्रद्धेपोटीच आवेशाचा जन्म झालेला असावा असेच कविता वाचताना त्यांतील जोष आणि जिद्द पाहून वाटू लागते.

●●●

## प्रकरण ४

# मानवतावाद व आशावाद

"अर्वाचीन मराठी काव्यामध्ये केशवसुतांनी मानवतावादाचा प्रथम स्पष्ट स्वरूपात अविष्कार केला. त्यांचा 'नवा शिपाई', 'स्फूर्ति' या कवितांतील विलक्षण आवेशाचा खुलासा या नव्या निष्ठेच्या नव्या मानवतावादी धर्माचा अर्थ कळल्याखेरीज होणार नाही केशवसुतांच्या आशावादी मानवतावादी निष्ठेचे मूळ व्हिटमनच्या मानवतावादात होते, असे म्हणायला पुष्कळच आधार आहे. केशवसुतांच्या आशावादी मानवतावादाची परंपरा चालविणारे अलीकडील काळातील कवी म्हणून अनिल, बोरकर, कुसुमाग्रज यांचा उल्लेख करता येईल."[१] याच परंपरेत अमरशेखांच्या नावाचा आवर्जून उल्लेख करावा लागतो. "अमरशेखांना मानवी मनात आज प्रक्षोभक आंदोलने हवी आहेत. आपल्या जीवनात कधी कधी त्रस्त करणारी स्मशानशांतता आढळते म्हणून निराशावाद आणि एक दिवस पेटून उठणे या जनतेच्या स्वभावधर्मावरील विश्वासपूर्ण आशावाद यांचे एक विचित्र द्वंद्व 'पेटत नाहीत कशी ही मने' यासारख्या काव्यात आढळते."[२]

अमरशेखांना जीवनातील मांगल्याचे, सौंदर्याचे शोषण करून घेणारी समाजरचना व आर्थिक गुलामगिरी नष्ट करायची आहे. हे त्यांचे ध्येय आहे, आणि या ध्येयाच्या यथार्थ व प्रभावी अभिव्यक्तीला आवश्यक असलेल्या ओजस्वितेची समर्थता त्यांच्या लेखणीत पुरेपूर आहे. "मानवतेबद्दल जिव्हाळा हा केशवसुतांपासून तो मर्ढेकरांपर्यंतच्या सर्वच प्रमुख कवींच्या कवित्वाचा एक ठळक विशेष राहिला आहे."[३] अमरशेखही त्याला काही अपवाद नाहीत. मानवतेला मारक असलेल्या अनेक आसुरी शक्तींची त्यांना जाणीव आहे. त्या शक्तीवर मात करून, तिच्याशीच मुकाबला करून, आपले सर्व सामर्थ्य एकवटून मानवताच विजयी ठरणार आहे. आपला उज्ज्वल भविष्यकाल तिचा तीच निश्चित करणार आहे. याच दुर्दम आशावादाच्या दीप्तीने त्यांची सारी विचारसृष्टी उजळून निघालेली आहे. मानवतेला आपल्या यशस्वितेसाठी संग्राम करावा लागणे अटळ आहे हे अमरशेखांच्या

---

१ नवमानवतावाद– प्रा. श्री. के. क्षीरसागर.

२ धरती माता–परीक्षण– प्रा. हिंमतराव चव्हाण

३ दा. न. शिखरे.

कित्येक कवितांवरून नजर टाकताच समजून येते. मानवी जीवनातल्या उफाळून येणाऱ्या जीवनशक्तीवर त्यांचा दृढ विश्वास आहे. म्हणूनच लोकशक्तीचा मोका साधण्याचे ते वारंवार आवाहन करतात आज मानवता अनेक मार्गांनी कलंकित झालेली पाहून कवी उरात पिचून जातो. अशा काही घटना पाहून अमरशेखाचे हृदय इतके गदगदते की त्या घटनेबद्दल काय करावे हे त्यांना देखील कळेनासे होते. मग ते म्हणतात—

करु मी शिक्षा कुणाकुणाला
तरुणच सारा समाजातला
सर्वांस दिसे वखवखलेला
करु मी शिक्षा कुणाकुणाला ?

मानवतेला सहन कराव्या लागणाऱ्या अन्याय्य विषमतेचे आणि दारुण असहायतेचे निर्मूलन शांततेच्या मार्गाने होणे अशक्य असून त्याकरिता तिला भीषण संग्रामच करावा लागणार आहे याबद्दल त्यांची पुरी खात्री होऊन चुकलेली आहे. त्यासाठीच उराउरातला अंगार पेटवायची त्यांना अत्यावश्यकता वाटू लागते. हे एकट्या दुकट्याचे काम नाही, त्यासाठी सामूहिक शक्तीची जरूरी आहे याची त्यांना उत्कट व पूर्ण जाणीव झाली आहे. म्हणूनच ते म्हणतात–

दिसे जरी मी आज एकला
उद्यास मिळविन अनेक साथी
हात देऊनी त्यांच्या हाती
ओढुनि स्वर्गा आणिन जगती
वाट अचुक मी चालत आहे......

- पाव शतक

मानवतेच्या विजय-यात्रेचा आरंभ होणार आहे याबद्दल खात्री होऊन चुकल्याचे ‘ वाट अचुक मी ’ या ओळी सांगतात.

आजच्या प्रचलित जीवनातील दारिद्र्याचे व त्यापायी त्याच्या होणाऱ्या सर्व-नाशाचे करुण, भीषण असे चित्र साक्षात मनश्चक्षूंपुढे उभे करणाऱ्या ‘ क्षमा करा मत्प्रिय चिमण्यांनो, ’ ‘क्षयाने मेली बाबूची बहीण’, ‘लोकलमध्ये’, ‘एकच ठेवीन’ अशा अमरशेखांच्या कितीतरी कविता दाखविता येणे शक्य आहे.

दीन, दलित, पीडित या साऱ्यांच्याबद्दलचा वाटणारा जिव्हाळा त्यांच्या कवितांतून ओतप्रोत भरलेला दिसतो. सहानुभूतीने भावधारा चिंब होतात. या सहानुभूती-मागची जाणीव कमालीची तीव्र आहे. समाजाभिमुखता हा अमरशेखांच्या सर्वच कवितांचा ठळक विशेष. ते माणसाबद्दलच जास्त बोलतात. त्यांच्या सामाजिक

स्वरूपाच्या बहुतेक कविता ह्या आत्मविष्कारात्मक स्वरूपाच्याच जास्त करून आहेत. देशातल्या राजकीय व सामाजिक घटनाही अमरशेखांच्या हृदयाचा तात्काळ ठाव घेतात आणि मग त्यासंबंधीची आपली भावनात्मक प्रतिक्रिया ते व्यक्त करतात. पण ती व्यक्त करतानाही त्यांच्या वेदनांचा आवेगच प्रामुख्याने जाणवतो. रंजल्या-गांजल्यांच्या दुःखाचे प्रतीकात्मक स्वरूप अमरशेखांच्या कवितेत दिसते.

अमरशेखांच्या विचारप्रकटीकरणामागे विचाराची एक तात्त्विक बैठक आहे. त्यांची विचारगर्भ परिपक्व अशी जीवन-दृष्टी आहे. त्यांच्या एकापेक्षा एक जहाल कविता वाचताना क्रांतिवादी हे बिरुद लावण्याचा कुणालाही मोह व्हावा. एक प्रकारचा उद्दामपणा, बेछूटपणा, एवढाच क्रांतिवादाचा अर्थ करता येणार नाही. त्यांनी आपले विचार केवळ उच्छृंखल आणि कलंदरी वृत्तीने मांडण्याचे धाडस केलेले नाही. नवनिर्मितीच्या विशिष्ट तत्त्वज्ञानाने भारावल्याने आणि भोवतालच्या जीवनांत भयानक विसंगती आढळल्याने तप्त झालेल्या भावनांचा उद्रेक दाबता न आल्यानेच जळजळीत शब्दांच्या ओळी बाहेर पडल्या. त्यांना अखेर क्रांतीच अभिप्रेत असलेली दिसते; केवळ मामुली बदल नको आहे. आमूलाग्र असे परिवर्तन अपेक्षित आहे. केवळ क्रांतिदर्शी विचार मांडण्याचाच हव्यास त्यांचा नाही, तर ते कृतियुक्त जाणीव देऊन क्रांतीचा मार्ग स्पष्टपणे दाखवून मोकळे होतात. मानवता जागी व्हावी हाच त्यांच्या कवितेला लागलेला ध्यास आहे. त्या ध्यासाच्या पोटीच क्रांतीच्या ठिणग्या उडालेल्या दिसतात. मानवता ती नुसती जागी होऊन तरी भागेल होय ? नाव नको, तर त्या मानवतेचे सुंदरसे मंदिर उभारले पाहिजे. क्रांती अभिप्रेत आहे ती अखिल मानवजातीच्या कल्याणासाठी, विध्वंसनासाठी नव्हे. सारे मोडून जोडायचे आहे.

> चक्र मनाचे फिरते माझ्या
> इतकी गति या जगात नाही
> कृति यातुनि मी ऐसी निर्मिन
> तेच तयाची देइल ग्वाही

मानवतेच्या भवितव्याचीच ते चक्र ग्वाही देते याबद्दल संशयच उरत नाही.

'जिकडे जावे तिकडे माझी भावंडे आहेत' असे विश्वबंधुत्व केशवसुतांचा नवा शिपाई उद्घोषितो. 'मळ्यास माझ्या कुंपण पडणे अगदी न मला साहे' अशी त्याची मानवताप्रेमी वृत्ती आहे. आणि तोच 'समतेचा ध्वज उंच' धरायला सांगून मानवतेचा मंत्र पढवीत आहे. अमरशेखांचा 'पाथरवट'ही नेमके हेच सांगतो आहे. त्या पाथरवटाला समाजातील रुढिप्रियता, संकुचितता धक्का मारून घालवायची आहे आणि तेथेच उदार मानवप्रेमाचे महन्मंगल मंदिर बांधायचे आहे. तो म्हणतो–

पाथरवट मी नव्या युगांतिल
आहेच सोबत
असेन जरि मी अज्ञ रांगडा
एक दगड तरि घडु द्या रे या माझ्या हातुन
एक छन्निचा एक घाव तरि
बसु द्या माझा त्या दगडावर
मानवतेचे नवीन मंदिर
येथे बांधा या जागेवर--

समाजातील दुष्टत्वाच्या दडपणाखाली कवीचे हळुवार हृदय चिरडून जाते. अन्यायाच्या आघातांनी कवीचे कोमल मन पिळवटून निघते आणि मग त्यातून कधी कधी निराशेचे सूर कसे उमटतात ते खालील ओळींतून दिसून येईल. अमरशेख म्हणतात--

कोपऱ्यातल्या बंधू-भगिनी
निढळाच्या घामाने भिजल्या
थिजल्या सर्व दिशा हे बघुनी
रक्त आटते निर्मितिसाठी
निर्मितिसाठी हात, शरीर अन
होते नव्हते मनही झिजले
आज क्षुधेने सारे थिजले
हात शरीर अन मनहि न उरले
प्रचंड ऐशा निर्मितिपाठी
निर्मिति व्हावी ज्याच्यासाठी
त्याच जीवनाची घ्या माती
आज चालली हातोहाती......

..."पण हेच मन प्रतिभेच्या पंखावर बसून उदात्त विचाराच्या अंतराळात भराऱ्या मारू लागले की मग ते अत्यंत आशावादी आणि सामर्थ्यशाली बनते, एवढेच नव्हे तर त्या दुष्टत्वाशी व अन्यायाशी युद्ध करण्याचा स्फूर्तिदायक संदेशही ते जगास देते."[१]

कै. गडकऱ्यांसारख्या श्रेष्ठ कवीच्या कवितेत निराशेचे चीत्कार उमटलेले दिसतात. त्यांनी सामाजिक व्यंगावर व वैषम्यावर कठोर हल्ले चढवलेले आहेत.

---

१ मराठी वाङ्मयाचा परामर्श.

स्मशानातील भुतांपेक्षा समाजातील माणसेच अधिक हिंस्र व स्वार्थी असल्याचे त्यांनी दाखवून दिले.

शंख कुणाचा पोटासाठी। गात कुणी तर तिसऱ्यासाठी
छाया जीवाची उफराटी। जो तो ज्या त्यासाठी।
चल, हे मी तू, त्यांना सांगू.

या ओळींतून व्यक्त होणारी निराशा आपणास चटकन समजून येते. परंतु सामाजिक व्यंगावर अचूक बोट ठेवणाऱ्या या कवीने समाजाला झगडा करण्याची, झुंज देण्याची, प्रतिकार करण्याची प्रेरणा दिली आहे केशवसुतांचा सच्चा चेला त्यांच्याच पावलावर पाऊल टाकतो–

जुन्या मतांचा जाळा कचरा। श्रुतिस्मृतींना आता विसरा।
अंध भक्तिचा पांगुळगाडा। मोडुनि तोडुनि उपडा पाडा
पाताळी तो नेउनि गाडा। — गडकरी

अशा तऱ्हेचाच बंडखोरीचा आशय अमरशेखांच्या कित्येक कवितांतून दिसून येतो. काही उदाहरणे–

१) जगहि जळू दे शेष मरू दे
नफा आमुचा आम्हास उरु दे
आइ मुले मरु देत उपाशी
तोंड फक्त माझेच भरू दे
या वृत्तीचे असुर नवे हे–
गाड सख्या जगधाता तू जाग आता रे जाग आता

२) जगामधिल पिळले जाणारे, सर्व साथिला घेऊ यारे
शक्ति आघाडीवर लढणाऱ्या, हाक तयांना देउ एकिची
माणुसकीने जगण्यासाठी लढून विजयी व्हा रे

३) उघड नेत्र तो तिसरा भयकर लालेलाल अंगार
ऐतखाउंचे कर निर्दालन घेइ रुद्र अवतार
ऊठ हे सर्वव्यापि भगवान, राम राम राजा
कुणवि हरे राम

अमरशेखांच्या कवितेत बुद्धीला, हृदयाला आणि कृतीला एकाच वेळी प्राधान्य दिलेले आढळून येते. "बेडकीसही लाभे यौवन। मानव टाचा घाशित मरतो" अशी मनोव्यथा व्यक्त करूनच अमरशेख थांबत नाहीत तर केशवसुतांनी, गडकऱ्यांनी सामाजिक वैषम्यजन्य परिस्थितीबद्दल जे सांगितले तेच वेगळ्या

कलात्मक दृष्टीने अमरशेखही सांगतात. केशवसुत, गडकऱ्यांनी सामाजिक स्थिती बदलण्यासाठी ज्या तऱ्हेची कृती करायला सांगितली तशीच अमरशेखही सांगतात. या सर्वांनाच मानवता फुलून यावी असे मनोमन वाटत आले आहे. अमरशेख म्हणतात—

जुनाट इमला झाला सारा पाडुन टाका देउनि धक्का...

अशी एकाच ओळीत आजच्या समग्र स्थितीची ओळख देऊन त्याची कारण-मीमांसा खालीलप्रमाणे करतात. ते म्हणतात—

आज इमारत जुनाट झाली
जीव अकारण मरतिल खाली
म्हणुनि आधि या पाडुनि टाका । देउनि धक्का

ही इमारत जुनी झाली म्हणजे तरी काय झाले? तर...

घाण गाळ कीटकहि माजले
शेवाळ तसे दुर्गंधीने
अवघे जीवन सडू लागले

ही सर्वच परिस्थिती कवीला बदलायला हवी आहे. अखिल मानवतेचे कल्याण साधील अशीच नवसंस्कृती जन्माला यायला हवी. ती नवी संस्कृति कशी असेल? ती अमरशेखांच्याच शब्दांत पाहा—

नव मानव संस्कृति येइ तिथे उदयाला
दुष्काळ न बेकारी नाही नावाला
ती धनिकांची माजोरी सत्ता नाही
गे नाहि तिथे नावाला धनिकच नाही
दारिद्य, भिकारी जिणे तिथे मग कुठले?

अर्थात ही नवसंस्कृती लगेच म्हटल्याबरोबर काही निर्माण होणार नाही, त्यासाठी सारी मानवता जागी झाली पाहिजे असे अमरशेखांना वाटते. मानवतेच्या सामर्थ्याबद्दल कवी फार मोठा आशावादी आहे. कवीचा प्रखर विश्वास खालील ओळींतून उघड होतो—

दान कुणी देईल धनी, करुनि ठेवण्या आम्हा ऋणी,
दानावरचे लाचार जिणे, नष्ट करिल ही
आज, चंद्रावरचा डाग.

माणसाचे मन म्हणजे काही दगड नाही. याबद्दलचे विवेचन करताना आजच्या अजागृत मनाबाबत अमरशेख म्हणतात—

कानमंत्र का कुणी दिला त्या
बन दगड तू, अगदी फत्तर
निर्गुण आणि निराकार हो

परंतु ते संशय व्यक्त करतात की

... पण मानवी मने कशी ही
बनतील फत्तर ?

मानवी मनाच्या चैतन्यशीलतेवर त्यांचा अढळ विश्वास आहे, म्हणूनच त्यांनी म्हटले आहे–

फत्तर होतिल त्या वेळी ती
मेणहि असतील
पाणी असतील ती ज्या वेळी
त्या वेळी ती आगहि असतिल
दिसतिल विझली धुमसत राहतील
धुमसतील पण वेळेवरती
पेटहि घेतिल– ...

" समाजातील दुबळेपणाचा बीमोड करण्याची शक्ती कवीतेमध्ये असते असा केशवसुतांचा विश्वास होता. काव्य हे एक प्रगतीचे प्रमुख साधन आहे असे त्यांचे मत होते. त्यांच्या दृष्टीसमोर मानवतेचे स्वप्न नित्य तरळत होते."[१] अमरशेखांच्या स्वप्नांतही मानवतेची ओढ होती. त्यांनी म्हटलेच आहे—

विकास मम संस्कृतिचा व्हावा
मानव्याचा वेल चढावा
फुले, फळे त्या यावी गोड
हीच अंतरी लागे ओढ

त्यासाठीच तर– ते म्हणतात...

मी एकाकी लढतो आहे
एकटाच धडपडतो आहे
धडपड माझी माझ्यासाठी
अगदी नाही, अगदी नाही.

---

१ नवा शिपाई– प्रा. कुसुमावती देशपांडे.

"केशवसुतांचा 'नवा शिपाई' केवळ परदेशी कल्पनांची पोपटपंची करीत नाही. त्याच्या शब्दाशब्दांत जोर आहे. जाणिवेचा जोम आहे. त्याची प्रत्येक कल्पना स्वाभाविक आहे. भारतीय जीवनांतून उद्‌भवलेली आहे. ब्राह्मण नाही, हिंदु नाही, न मी एक पंथाचा
किंवा—

चतकोराचे मला न सूख
कूपांतील मी नच मंडूक

इ. साध्यासुध्या कल्पनांतील स्वाभाविकता व जोम हेच त्यांच्या सच्चेपणाचे साक्ष आहेत."[१] हीच स्वाभाविकता अमरशेखांच्या कवितेत प्रामुख्याने दिसून येते. अमरशेखांची प्रकृती काव्यदृष्ट्या तरी केशवसुतांशी बरीच जुळती मिळती आहे. खालील चारच ओळी त्याची खात्री कशी पटवितात ते बघा. अमरशेख म्हणतात-

माझा देहचि धरतीमाता
हा कुराण ही माझी गीता
यांतच धन, ऋण शक्ति उपजल्या
बुद्धि भावना रूप जाहल्या...

साध्या पण स्वाभाविक कल्पनेतला अहंप्रवृत्तीचा उदात्त आशय प्रगट करणारा कवी 'कूपातील मंडुक' नाही याची बालंबाल खात्रीच पटविणारा आहे. काव्यदृष्ट्या प्रकृतिसाधर्म्य आहे ते नेमके इथेच.

केशवसुतांचा शिपाई 'समतेचा ध्वज' उंच धरायला सांगतो तर रे. टिळकांचा 'वेडा' म्हणतो—

सोडा अवघा राग आतां
ओळखून घ्या मज पुरता
गिरिशिखरावर उभा असो
दरींत किंवा कुणी वसो
समान दोघेही मजला
कारण मी पुरताच खुळा
वरी खालती
जगात म्हणती
परंतु दिसती
एकच मज अवघी सत्ता
कारण मी वेडा पुरता

---

१ प्रा. कुसुमावती देशपांडे.

किंवा

मी ब्राह्मण वा महार मी
गणी न कवणालाच कमी.

ही समतापूर्ण दृष्टी ठेवून मनुष्यत्वाला टिळक मोठेपणा देतात.

या सृष्टीतिल दिव्यपण । तेच तेच हे मनुजपण
मांगल्याची ही ठेव । हीस्तव देइन मी जीव

मानवतेच्या कल्याणाची काळजी वाहणारे टिळक किंवा केशवसुत यांच्या दृष्टीत आणि अमरशेखांच्या दृष्टीत वस्तुतः मुळीच फरक नाही. टिळकांना सृष्टीतील दिव्यपण मनुजात दिसते, ती त्यांना मांगल्याची ठेव वाटते, तिच्यासाठी स्वतःचा जीव देखील द्यायला ते तयार होतात. अमरशेखांना अहोरात्र मानवतेच्या कल्याणाची चिंता तर आहेच परंतु तिचा अभ्युदय खरा कोणत्या मार्गाने होईल याची तळमळही लागून राहिलेली आहे. त्यांना केवळ 'मनुजपण' ठेवायचे नाही, तर एक पाऊल पुढे टाकून आगळेच जीवन जगायचे आहे. या आगळ्या जीवनानेच मुळी त्रिभुवन व्यापले पाहिजे असे त्यांना वाटते. ते म्हणतात—

जगणे असे तसे नच
हक्काचे अन मानाचे पण
लढत राहुनी रोज मरुनिही
जगेन मी आगळेच जीवन
मी मेलो की सर्व संपले
नाहि म्हणत मी याला जीवन
मी मेलो तरि व्यापुन राहिल
माझे जीवन अवघे त्रिभुवन

ह्या प्रागतिक विचाराच्या 'मी'ला समतेबरोबर स्वतंत्रता हवी आहे. व्यक्ति-विकासासाठी कल्पना त्यात अभिप्रेत आहे. जगणे हक्काचे आणि मानाचे हवे असे बजावून सांगणारा मराठीतील बहुधा हा पहिलाच कवी असावा ह्या 'मी'-ला अणु परमाणु जनतेच्या सेवेला आणून नवी संघसंस्कृती बाणवायची आहे. नवजीवनशक्तीचे सुकाणू हाती धरून जीवनाची बाग फुलवायची आहे. जुन्याला आग लावून नव्या जगापुढे नवा राग आळवायचा आहे. हे सारे ज्या मानवा-कडून घडवायचे आहे तोच आज उरात पिचलेला अमरशेखांना तरी पाहवणार कसा ? ते विचारतात—

मानव आला का जन्माला । दुःख जुलुम केवळ सहण्याला
ही दुनिया जहागीर दिली का । कुणी कुणा जहागीरदाराला ?
आम्हा वगळुनी मिळविले कुणी । जगी ताज आणिक राज

पण लगेच सांगतात मानवता– जागी झालेली आहे.

कविवर्य कुसुमाग्रजांच्या 'माती-पुत्रा'ने ज्या गर्वोद्धत देवदेवतांना आव्हान दिले, स्वर्गाच्या दारी जातीची महती गायिली, हिरावलेली स्वतंत्रता परत मागितली ती स्वतंत्रता बाह्यदृष्ट्या का होईना, पण आज लाभलेली आहे हे खरे तरीपण अखिल मानव जातीवर ओढवलेल्या संकटाचे काय ? माणूसच माणसाचा संहारकर्ता बनू पाहत आहे त्याला कुणी थोपवायचे ? विज्ञानाने जग जवळ आणले ...पण...पण माणसाचे मन मात्र हिरावून नेले. माणसाची भौतिक उन्नति झाली, तरीतण आत्मिक उन्नतीचे काय ? ती नको का वाढायला ? ॲटम, हैड्रोजन तयार झाले आणि मानवतेचा संहारकाळ अगदी समीप आल्यासारखा वाटू लागला-- असे असूनही कवी अमरशेखांना मात्र मानवता नष्ट होणार नाही असा विश्वास वाटतो. आज शस्त्रास्त्रांनी सुसज्ज असलेले राष्ट्र दुसऱ्या राष्ट्राला गुलाम बनविण्यासाठी अगदी टपून बसले आहे. अमरशेख मात्र अशांना भारतीयांतर्फे दरडावून विचारतात—

कोण जिंकु शकणार आम्हाला । ॲटम, हैड्रोजन बॉंब ?

आणि मग विज्ञानयुगातील मानव प्रतिकारासाठी सज्ज झाल्याचे कवी सांगतात–

मैदानि येउ द्या घालु आम्ही एकजुटीचा बांध
तोफा रणगाडे । इथेहि लढतील
मानव शत्रूंचे । मुडदे पडतील
शत्रे घेऊ, अस्त्रे घेऊ, जिंकुनि दावू
मानव नाहि गुलाम—

विज्ञानाच्या संहारक युगाची जाणीव एकट्या अमरशेखांना तेवढीच झाली असे नाही. कोठल्याही संवेदनाशील कवीला ती होणे अपरिहार्यच आहे. कविश्रेष्ठ अनिलांनाही ती झालेलीच आहे. एकीकडे मानवतेचा उद्घोष करणाऱ्या विज्ञानाने दुसऱ्या बाजूने कसला ध्यास घेतला आहे हे अनिलांनी सुंदर सांगितले आहे. त्यांनी म्हटले आहे—

शरीरातल्या रक्ताचा अणू अणूंचा
अणुस्फोट करणाऱ्या रसायनशास्त्राच्या
साहित्याचा— आम्ही घेऊन ध्यास
मानवता बेचिराख केली...
अरे! जे घोकित शांततापाठ निर्लज्ज शठ
उभा करुनी पोकळ देखावा
जगदैक्याच्या राष्ट्रसंघात

बोलत गोष्टी शस्त्रसंन्यासाच्या
निव्वळ ओठें
गुपचीप होते वाढवीत नित्य
संहारक शक्ती–शस्त्रे–आयुधे.

याच संहारक शक्तीची पुरेपूर जाणीव झाल्यामुळेच अमरशेख वेळीच इशारा देतात की—

हैड्रोजन हा दुष्ट आहे      घात करिल हे स्पष्ट आहे.
खळ्यावरिल हा शेतकरी      उफणुनि पडलेली ज्वारी
त्याची करिल हा राख पुरी—...
बेचिराग हा करील हो ... म्हणुनिच मी फोडित टाहो

गेला झोपी तो मेला      मारू नये मेलेल्याला.
सुंदर आहे तत्त्व खरे      'मारु नये झोपल्या नरे।'
परि हा निद्रेतच मारा      तत्त्व नवे हे स्वीकारा
हैड्रोजन जागा होता      नष्ट करिल ही मानवता

भविष्य कुठले मग पुसतां
मार्ग कसा येइल हाता ?
म्हणुनिच निजल्या जागी हा
ठार करा रे ठार करा–

अमरशेख काय किंवा कविश्रेष्ठ अनिल काय दोघेही मानवाच्या बुद्धीवर विश्वास असणारे; म्हणूनच आवाहन करणारे मानवतावादी कवी. दोघांच्याही आवाहनात मानवाच्या कल्याणाचीच भावना अनुस्यूत आहे.

उरेल न भीती मानवांचीच
संहाराचे शोध लावे जी बुद्धी
करील ती उभी सर्वोद्‌यासाठी
मानवहिताच्या समाहाराचा—नवा संसार

— अनिल

'मंथन' करायला निघालेले अमरशेख
"बुद्धीची रवि घट्ट धरुनि करि" पावित्र्यात उभे राहायला सांगतात.
अमरशेखांचे काव्य केवळ मानवतावादावर अधिष्ठित नसून शास्त्रशुद्ध समाजवादावर अधिष्ठित आहे.

पद्यपोथिची गळली पाने नको सर्प निष्प्राण
घेइ आता ही एकजुटीची मशाल–उचल निशाण

अशी मानवी कर्तृत्वाला म्हणूनच त्यांच्याकडून हाक दिली जाते विषमतेचे बीभत्स, ओंगळ दर्शन मोठ्या उद्वेगाने केले जाते. हे जग नयनमनोहर आहे याबद्दल कवीला तिळमात्र शंका वाटत नाही. तरीपण भोंवतालचे दैन्य, दुःख, दारिद्र्य आहे तसेच आहे. ते काही कमीच होत नाही. नयनमनोहर सृष्टीत वास्तविक ही विषमता का असावी ? ती निसर्गनिर्मित आहे का ? नाही. ती मानवनिर्मितच आहे. म्हणूनच अमरशेखांनी एका कवितेत म्हटले आहे की, "मला या जगात नयनमनोहर असे जरी आकाश लाभले तरी ते फुकट आहे. पायाखालती धरती नसेल तर नीलांबर घेऊन राहायचे कुठे ? आणि समजा धरती मिळाली, त्या धरतीवर सर्वत्र फुले उमलली तरी अन्नाचा कणच नसेल तर त्या गंधावर माणूस जगेल तरी कसा ? स्वरात साक्षात अमृत ओतले आणि अमृतानेच भरलेले शब्द कानावर आले तरी–

अमृत अमुप पिऊनिही । अमृत ते पण जगविल कुठवर ?

या जगात गंध, अमृत, सुंदरता यांच्यावर काही माणूस जगू शकत नाही, तर मानवाच्या मूलभूत गरजांचीच पूर्तता व्हायला हवी आहे; हेच अमरशेखांना सुचवायचे आहे. त्याच गरजांची पूर्णता विषमतेमुळे होत नाही, हेच तर त्यांना बोचणारे नेमके दुःख आहे. तीच तर त्यांची खरी 'वेदना' आहे. परंतु असे असूनही निराश होणे त्यांना मुळी पसंत नाही. ही विषमता मानवनिर्मित असल्यामुळेच ती नष्ट करणे काही कठीण नाही याबद्दल अमरशेखांची खात्री होऊन चुकलेली आहे. त्यांची आशावादी वृत्ती म्हणूनच वेळोवेळीं उचल खाते. शेतकऱ्याची आज दैन्यावस्था असली तरी–

ऋद्धिसिद्धि ना बनवू शकतो जो धरतीचा दास
ओढुन आणिल स्वर्ग उद्या जो मावळतीच्या आत

असा त्यांना दृढ विश्वास वाटतो.

यांत्रिक जीवनात निर्माण झालेल्या विषमतेला कायमचीच 'मूठमाती' दिली पाहिजे. माणसाला माणसाने घडविले पाहिजे, बदलले पाहिजे; त्याची आत्मिक उन्नती झाली पाहिजे अशी कवीची उत्कट इच्छा आहे. ही विषमता का नष्ट करायला पाहिजे याची कारणमीमांसा अमरशेखांनी खालीलप्रमाणे केलेली आहे. ते म्हणतात–

इथले सगळे जीवनपुष्पच
रस्त्यावर आहे पडलेले आज
धुळीत मळत उन्हाने जळत
हुडहुडत आणि कुडकुडत कधी
क्षयाला आपला करून साथीदार

भांडवलशाहीने आपल्या कठोर पंजाखाली साऱ्या समाजाचे जीवन दाबून टाकले आहे. भांडवलशाहीमुळेच समाजजीवन खऱ्या अर्थाने उध्वस्त बनले आहे. श्रम-प्रतिष्ठेला मोल उरलेले नाही, खपणारांना किंमत नाही. टीचभर, वीतभर पोटा-साठी सर्वस्व गमावायला लागत आहे. दुनियेचा सर्वांगीण कायापालट करणारा श्रमजीवी कामगार त्याची सर्वच दृष्ट्या स्थिती अनुकंपनीय बनली आहे. निर्मिती करणारा, रात्रंदिवस हाडाची काडे करणारा, रक्ताचा थेंब थेंब आटवणारा कामगार आज हीन दीन बनलेला पाहूनच अमरशेखांचे आतडे पिळवटते. निर्मिती करणारा कामगार आणि त्याच्या श्रमावर मजले उभारणारा धनिक यांच्या जीवनां-तील दरी किती भयप्रद आहे हे अमरशेख आपल्या कवितांतून दाखवितात. श्रमजीवी कामगाराप्रमाणे आज कलावंताच्या जीवनाचाही कसा बाजार चाललेला आहे हे पाहून कवीचे अंतःकरण तिळतिळ तुटते. अमरशेख कलावंतास उद्देशून म्हणतात—

कॉन्ट्रॅक्टर बनवितोय आगळा
मॅनेजर गटारीतला बगळा
म्हेनतीचा खातो तुझा गोळा
झोपडी नशिबाला, दार नाही जिला, त्योच बंगला तुला
बटास्याची बि सुटली चाळ, गर्व त्या फासाचा

आजच्या जगाचे माध्यम आहे पैसा; सर्वस्व आहे पैसा. तेव्हा ज्याच्याजवळ पुरेसा जगण्याइतपतही पैसा नाही अशा गरीबांचा छळ तरी एकाच मार्गाने का व्हावा? बहुजन समाजाला पदोपदी छळणारे अनेक 'ग्रह' नेहमीच 'वक्री' होऊन त्यांची चाल थंडावण्याचा प्रयत्न करीत आहेत. आज स्वातंत्र्य मिळून देखील माणसाच्या जिवाची होणारी काहिली काही थांबलेली नाही. स्वातंत्र्यानंतर उलट स्वकीयांकडून अतोनात हालच चाललेले आहेत. भांडवलशाहीचा बसलेला मगरमस्त विळखा जराही ढिला पडलेला नाही. त्यामुळे लोक-जीवन गांजून आणि गंजून चालले आहे. बहुजन समाजाचा छळ करण्याचा सत्ताधारी आणि भांडवलदार यांनी जणू काही विडाच उचललेला आहे. ना नीती, ना चांगुलपणा, ना सद्भावना. इथून तिथून क्रूर जाचणूक. 'करा'चा कर अधिकच आवळला जात आहे आणि भांडवलदारांना मात्र आपल्या 'करपाशात' कवटाळून घेण्याचा सत्ताधारी प्रयत्न करीत आहेत. मानवी जीवनाची इथून तिथून वाताहात झाल्यावर सत्प्रवृत्ती समाजात सुखाने नांदणारच कशी? ही भयानक अवस्था तशीच राहणार का? यावर काहीच उपाय नाही असे कसे होईल? अमरशेखांना तो उपाय निश्चित सापडलेला आहे. विषमतेचा अंधार नष्ट करायला ते सज्ज झाले आहेत. उपाय एकच, तो म्हणजे सामूहिक शक्ती निर्माण करणे. तिच्या सामर्थ्यावर जीवन बदलून टाकणे. म्हणूनच अमरशेख म्हणतात—

त्यांचा संताप अनावर होतो. आणि त्याच्याविरुद्धच त्वेष व्यक्त झालेला दिसतो. अमरशेखांच्या कवितेत बुद्धिवादी अशा माणसाच्या जीवनातला अति उग्र असा वैचारिक प्रक्षोभ आहे. "काव्यात वैचारिकता येणे हा देखील यंत्रयुगाचा परिपाक मानला पाहिजे."[1] अमरशेखांनीही मर्ढेकरांप्रमाणेच दंभस्फोट केलेला आहे. 'ढोंगी', 'नवे संत', 'आपले धोतर', 'सून सुभेदाराची' या कविता या दृष्टीने मुद्दाम पाहण्यासारख्या आहेत. अमरशेख अंतर्मुख होऊन आत्मशोधन करीत असलेले त्यांच्या काव्यकृतीवरून दिसते. त्यांचा मानवाच्या भवितव्याचा विचार अगदीच पराकोटीला गेलेला आहे, म्हणूनच या क्षुद्र जगाला एक दिवस आग लावण्याची भाषा ते वापरतात.

ज्या विषमतेविरुद्ध अमरशेख दंड थोपटतात, बंडाची भाषा बोलतात त्याच विषमतेविरुद्ध मर्ढेकर म्हणतात —

सत्तेचे तूप सत्तेचीच पोळी। मानव्याची होळी भाजाया ती
...नंग्याचाच येथे आता कारभार। कोंडी आरपार फोडाया ही

"अनिल मानवतावादी व आशावादी बनले. आणि मानवतेचा — आशावादाचा संदेश देणारी कविता जन्माला आली. परंतु विशिष्ट मर्यादेपर्यंतच अनिल यशस्वी झाले...अनिलांची भूमिका प्रामाणिकपणाची असेल, परंतु अनिलांच्या प्रवृत्तीला बंड झेपण्यासारखे नाही."[2] आणि अमरशेखांच्या प्रवृत्तीला ते नेमके झेपण्यासारखे आहे. त्यांच्या सर्वच कवितेत जळजळीतपणा आणि जोष आढळतो त्यावरूनच कवीचा पिंड क्रांतिकारकाचा असल्याची खात्री पटते. बंडखोरी ही स्वभावतःच आहे. मानवतेवर अमाप प्रेम करणाऱ्या अमरशेखांच्या कवितेचा पेला आशावादाने अगदी काठोकाठ भरलेला आहे आणि क्रांतीचा फेस भरभर उसळतानाही त्या पेल्यात दिसतो. अमरशेख म्हणूनच आशावादी असूनही क्रांतिवादी वाटतात.

दिवे जादुचे लाख पेटवुनि
क्षणात बदलुन टाकिन जीवन
हे जग जर होईल निकामी
तरिही काढिन युक्ती नामी
एक नवा ग्रह सुंदर बनविन
इथले जीवन तेथे फुलविन

या ओळीतील विविध कल्पनांवरूनच कवीच्या बंडखोरीची साक्ष पटते. एक नवा ग्रह बनवून त्यावर इथले जीवन फुलविण्याची रम्य कल्पना मराठी कवितेत निश्चितच

१ प्रा. भ. प्र. मोहरीर [ नवभारत, जुलै, १९५६ ]
२ आधुनिक मराठी कविता– प्रा. रमेश तेंडुलकर.

दिसे जरी मी आज एकला
उद्यास मिळविन अनेक साथी
हात देउनी त्यांच्या हाती
ओढुनि स्वर्गा आणिन जगती.

दुसऱ्या एका ठिकाणी कवीने म्हटले आहे–

आम्ही अंधाराचा सदा करू धिक्कार
अन स्वप्न कालचे करूच ते साकार

समाजांतर्गत दोषांचे निर्मूलन करून ' स्वप्न ' साकार करण्याचा मनोदय निस्संशय कौतुकास्पदच म्हणावा लागतो.

कविश्रेष्ठ मर्ढेकरांनी तर आजचा मानव ' यंत्रमुग्ध ' म्हटला आहे. आधुनिक युगप्रवृत्तिदर्शन (character of modernity) हे मर्ढेकरी काव्याचे वैशिष्ट्य मानले पाहिजे. यंत्रयुगामुळे मानवी संस्कृतीची व मानव्याची जी राखरांगोळी होत आहे त्याचे भयानक चित्रण मर्ढेकरांनी काव्यातून निर्भयपणे केलेले आहे. मानव्यावाचून विज्ञानाचा बडेजाव सर्वत्र केला जात आहे. 'नरांना नरमेध धन्य वाटतो.' ' भांडवली वृत्ती मनातून नष्टचर्य पिकवीत असून कामगाराहाती करवंटीच ' असा विदारक अनुभव मर्ढेकरांना येतो.[१] अमरशेखांना धनिक ' कसाई ' वाटतात म्हणूनच त्यांच्या आदर्श (!) कृतीचे चित्रण त्यांनी विखारी भाषेत केले आहे. भांडवलशाही-विरुद्ध एकटे अमरशेखच काही ओरडा करीत नाहीत. विद्यमान काळांतील बरेचसे कवी आपली कुरकूर व्यक्त करीतच आहेत.

मर्ढेकर कामगाराच्या हाती भांडवली वृत्तीमुळे ' करवंटी ' मिळते असे म्हणतात तर अमरशेख श्रमास कवडीची किंमत नसून माणसाची हिंमतच खाक झाल्याचे सांगून क्षुधेने सारे थिजल्याचे दर्शवितात. दोघांनाही ही आर्तता बहुधा सारखीच जाणवते.

विद्यमान काळातील प्रक्षोभ प्रकट करणे– To express the tension of our time—हेच काव्याचे एक प्रयोजन समजण्यात येते. मर्ढेकरांच्या काव्यात वैफल्यानुभूतीबरोबरच सामाजिक अन्यायाविरुद्ध त्वेष व चीड उफाळून आलेली आहे. मर्ढेकरांनी लब्धप्रतिष्ठितांचा दंभस्फोट केला आहे. भांडवलदारी वृत्तीचा निषेध केलेला आहे. ' नंग्याचाच जेथे कारभार ' असे ते म्हणतात. आणि ' स्त्रिया अर्धपोट जोवरि आहेत, ओंगळ समस्त आम्ही नंगे ' ही त्यांची शापवाणी आहे. ''[२]

मानवतेवर अमरशेखांचे अथांग प्रेम आहे त्यामुळेच विषमतेच्या वैषम्याबद्दल

१ मर्ढेकरांच्या काव्यांतील अनुभूती व अभिव्यक्ती.
२ प्रा. भ. प्र. मोहरीर [ नवभारत जुलै, १९५६ ]

त्यांचा संताप अनावर होतो. आणि त्याच्याविरुद्धच त्वेष व्यक्त झालेला दिसतो. अमरशेखांच्या कवितेत बुद्धिवादी अशा माणसाच्या जीवनातला अति उग्र असा वैचारिक प्रक्षोभ आहे. “ काव्यात वैचारिकता येणे हा देखील यंत्रयुगाचा परिपाक मानला पाहिजे. ”[१] अमरशेखांनीही मर्ढेकरांप्रमाणेच दंभस्फोट केलेला आहे. ‘ ढोंगी ’, ‘ नवे संत ’, ‘ आपले धोतर ’, ‘ सून सुभेदाराची ’ या कविता या दृष्टीने मुद्दाम पाहण्यासारख्या आहेत. अमरशेख अंतर्मुख होऊन आत्मशोधन करीत असलेले त्यांच्या काव्यकृतींवरून दिसते. त्यांचा मानवाच्या भवितव्याचा विचार अगदीच पराकोटीला गेलेला आहे, म्हणूनच या क्षुद्र जगाला एक दिवस आग लावण्याची भाषा ते वापरतात.

ज्या विषमतेविरुद्ध अमरशेख दंड थोपटतात, बंडाची भाषा बोलतात त्याच विषमतेविरुद्ध मर्ढेकर म्हणतात —

सत्तेचे तूप सत्तेचीच पोळी । मानव्याची होळी भाजाया ती
...नंग्याचाच येथे आता कारभार । कोंडी आरपार फोडाया ही

“ अनिल मानवतावादी व आशावादी बनले. आणि मानवतेचा — आशावादाचा संदेश देणारी कविता जन्माला आली. परंतु विशिष्ट मर्यादेपर्यंतच अनिल यशस्वी झाले...अनिलांची भूमिका प्रामाणिकपणाची असेल, परंतु अनिलांच्या प्रवृत्तीला बंड झेपण्यासारखे नाही. ”[२] आणि अमरशेखांच्या प्रवृत्तीला ते नेमके झेपण्यासारखे आहे. त्यांच्या सर्वच कवितेत जळजळीतपणा आणि जोष आढळतो त्यावरूनच कवीचा पिंड क्रांतिकारकाचा असल्याची खात्री पटते. बंडखोरी ही स्वभावतःच आहे. मानवतेवर अमाप प्रेम करणाऱ्या अमरशेखांच्या कवितेचा पेला आशावादाने अगदी काठोकाठ भरलेला आहे आणि क्रांतीचा फेस भरभर उसळतानाही त्या पेल्यात दिसतो. अमरशेख म्हणूनच आशावादी असूनही क्रांतिवादी वाटतात.

दिवे जादुचे लाख पेटवुनि
क्षणात बदलुन टाकिन जीवन
हे जग जर होईल निकामी
तरिही काढिन युक्ती नामी
एक नवा ग्रह सुंदर बनविन
इथले जीवन तेथे फुलविन

या ओळींतील विविध कल्पनांवरूनच कवीच्या बंडखोरीची साक्ष पटते. एक नवा ग्रह बनवून त्यावर इथले जीवन फुलविण्याची रम्य कल्पना मराठी कवितेत निश्चितच

१ प्रा. भ. प्र. मोहरीर [ नवभारत, जुलै, १९५६ ]

२ आधुनिक मराठी कविता– प्रा. रमेश तेंडुलकर.

अभिनव अशा प्रकारची आहे. अमरशेखांचे मानवतेचे प्रेम उत्कट आणि भव्य आहे. म्हणूनच तिला ग्रासणाऱ्या 'ग्रहांना' फेकून देण्याची हिंमत कवीच्या तत्त्वज्ञानांत निर्माण झालेली आहे. या कवीच्या कविता वाचून माणूस अंतर्यामी द्रवेल, आत्महत्येला कधीच प्रवृत्त होणे शक्य नाही; उलट झाला तर बंडखोरच होईल.

अमरशेखांच्या कवितेत पारतंत्र्याबद्दलची चीड व स्वातंत्र्याची आच या राजकीय भावनांचा सुरेख संगम झालेला आहे. बुद्धिप्रामाण्य व व्यक्तिस्वातंत्र्य ही सामाजिक ध्येये कवितांतून ओसंडताना दिसतात 'नवसमाज-निर्मितीचा' आशावाद कवितेतून सर्वत्रच फुललेला दिसतो.

केशवसुतांची तुतारी जागृतीसाठी उपयोगी होती तर टिळकांचे रणशिंग कंबर कसून लढाईला निघालेल्या सैनिकाला प्रेरणा देणारे होते. त्या रणशिंगातून एकच ध्वनी उमटत होता. नवयुग! नवयुग!

जोर मनगटातला पुरा घाल घाल खर्ची
हाण टोमणा चळ न जरा, अचूक मार बर्ची

अशा प्रेरक शब्दांचे घावामाघून घाव केशवसुतांच्या कवितेत पडताना दिसतात.

तुतारी, रणशिंग यातला आवेश अमरशेखांच्या 'अंगारात' धगधगताना दिसतो. मात्र त्यातून आशावादाचे स्फुलिंग उडताना दिसतात. 'अंगार' आपले हृद्गत सांगतो ते असे—

आता नाही हा मरणार
जीवन प्यालेला अंगार
वाइट ते सगळे जळणार
मागमूस नाही राहणार
आहे अग्नीचा निर्धार
खोटा कोण कसा करणार?
...नाही हो आता विझणार...

केशवसुतांच्या कवितेतील ओजस्विता अमरशेखांच्या 'रात्र आहे वैऱ्याची' या कवितेत पाहायला मिळते.

साम्राज्याच्या छुप्या दलाला अन जातीयवाद्यांना
कोटि हातांची मूठ बांधुनी काढ झोडपून त्याला
स्वैर लहरू ध्वजा दिल्लिवर साद घाल दिल्लीला
संघराज्य-जनशक्ति पाठिशी तुझ्या उभी ही पहा

महायुद्धात पतन पावलेल्या सैनिकांनी दिलेला कणखर इशारा पाहून अमरशेखांच्या प्रखर आशावादाची चांगलीच कल्पना येते. मानवपूजक मानव धमक्यांनी चीत होणार नाही, असे सांगून ते पुढे म्हणतात—

क्षण थांबा रे ! पुन्हा एकदा जन्माला येऊन
अमानवाचा घोट नरडिचा घेउन अन दाबून
समूळ उपटुनि भविष्यातुनी जाइन मग मातीत
ध्यानि असू द्या मानव जाइल यशाप्रती निश्चित...

आपली भौतिक उन्नती करून घेणाऱ्या मानवाला आत्मिक उन्नती करून घेतलीच पाहिजे. नाहीतर तो अपुरा, अधुरा राहून त्याला अंतिम सत्याकडे जाता येणार नाही. त्यासाठी त्याला मार्गदर्शन करणारा आदर्श नेताच हवा. तो तसा आज नाही म्हणूनच सर्व जीवनात सुसूत्रता आढळत नाही. आजचे समाज-जीवन शुद्ध नाही. ह्याची पुरी जाणीव अमरशेखांना आहे, पण म्हणून काही त्यांनी आशा सोडली नाही. ते दूरवर दृष्टी टाकतात. कसला तरी वेध घेतात— त्यांना दूर आसमंतात आशेचा किरण दिसतो. आणि आज जरी जीवनात सुसूत्रता नसली तरी ती येईल यावर त्यांचा विश्वास बसू लागतो. त्याचाच प्रत्यय खालील ओळींतून येतो की नाही ते पाहा. अमरशेख म्हणतात—

एक मुनीवर जन्मा येइल
गति-मति-कृतिची सांगड घालिल
सूत्रे घेउनि पायाखाली
विज्ञानाचे भस्म लावुनी
सर्वांगाला बसेल मुनिवर
कोट्यवधींच्या हृत्पटलावर
सुसूत्र होइल, सूत्रे-जीवन

अमरशेखांची आशावादी वृत्ती दुःखातही समाधानाचीच राहते. तिला सर्वस्वाचा त्याग करण्याची उत्कंठा लागून राहिली आहे. ‘झोपा रे बाळांनो’ ह्या कवितेत तिला चांगलाच प्रत्यय येतो.–

समई देहाची रक्ताचे तेल
ज्योती प्रळयातही माझी जळेल
होई तो चिमण्यांची जीवन-पहाट

आशावादाचा उदात्त आशय रक्त आणि समई या दोन वेगवेगळ्या प्रतीकांद्वारे व्यक्त केला आहे.

देशाबद्दलची–भारताबद्दलची–अमरशेखांची अभिनव दृष्टी तर मनाला अधिकच

थक्क करणारी आहे. उद्याच्या भारताचे चित्र रेखाटताना त्यांनी म्हटले आहे—

भारत म्हणजे जिवंत-मानव
या देशांतिल चाळिस कोटी
लाचारी, दारिद्र्य, पिळवणुक
मिळेल त्यांना वाव न तेथे...

अमरशेखांचा मानवाच्या बुद्धीवर विलक्षण विश्वास आहे. बुद्धी हे एक प्रकारचे शस्त्र मानून त्याची धार आजही पूर्वीसारखी असल्याचे त्यांनी सांगितले आहे. बुद्धीसंबंधात ते म्हणतात—

धार त्याची आहे तशीच
तीक्ष्ण आहे, राहील तशीच
तीक्ष्ण अशी चिरकाल अमर
आणि अजर यावच्चंद्र दिवाकरौ।

केवढा हा बुद्धिवादावरील दृढ विश्वास!

●●●

दा. क्र. ७४०.९१

प्रकरण ५

# ध्येयवाद—परंपरा आणि प्रचार

" काव्य हे उत्स्फूर्त असते, ते रक्तातून उगम पावते. काव्य लिहिता येत नाही; लिहिले जाते...काव्यामध्ये 'आत्माविष्कार' याशिवाय दुसरे ध्येय नसते. कवीला लिहावेसे वाटते म्हणून तो लिहितो. आणि म्हणूनच काव्य हे कवीच्या व्यक्तित्वाचा आविष्कार असते...कविहृदयाशी फारकत केल्यास काव्य उरणार नाही. काव्य हे कवि-हृदय व्यक्तीशी शंभर टक्के निगडित आहे हे त्रैकालिक सत्य आहे. कविमती साहजिकच अतितरल व संवेदनक्षम असल्यामुळे समष्टीचे आघात–प्रत्याघात त्या मनावर साहजिकच होतात; पण कवी आपले काव्य साकार करतो ते त्याच्या हृदयाच्या मुशीतून."[१]

कालमानाप्रमाणे काव्याचा प्रवाह बदलतो; त्याच्या आशय आणि आविष्कारांतही कळत नकळत बदल होतच असतो. मात्र असे जरी असले तरी त्या त्या काव्यात समाजाचे मन, त्याच्या आशा–आकांक्षा, ध्येये, कुठे ना कुठे तरी प्रगट होतातच. प्रत्येक कालमानाप्रमाणे, युगमानाप्रमाणे काव्याची कसोटीही बदलते; व्याख्या बदलते.

"रमणीयार्थप्रतिपादकः शब्दः काव्यम्"[२] असे जगन्नाथ पंडित म्हणतो. 'रसवदेवकाव्यम्' अशी साहित्यदर्पणकारांनी व्याख्या केली आहे. "ज्या लेखनांत आनंदोत्कटता निर्माण करण्याची शक्ती आहे ते काव्य",[३] जे वाङ्मय वाचताना हृदयाला भिडतं, हलवतं, फुलवतं ते काव्य."[४] "Poetry is the powerful application of ideas to life"[५] ( मनुजसंसारावर झालेली कवीच्या विचारांची प्रतिक्रिया म्हणजे काव्य ) असा एकंदर काव्याच्या व्याख्येबद्दल मतामतांचा गलबला झालेला दिसतो. हेतूबद्दलही तसेच म्हणता येते.

कवी हा आपल्या मनात स्फुरलेले भावनांचे, अनुभवांचे, विचारांचे, विकारांचे,

---

१ नवकाव्य समीक्षा—श्री. स. वा. दीक्षित.

२ रसगंगाधर

३ नवकाव्य समीक्षा

४ नवकाव्य समीक्षा

५ ऑर्नाल्ड

आशांचे, इच्छांचे, स्वप्नांचे उदात्तीकरण करून जेव्हा सुंदर शब्द, प्रतीके, उपमारूपके यांनी रंगवून ती लोकांपुढे मांडतो तेव्हा ती वाचून मनाला आनंद होतो. 'हृदयंगम-युक्त वाङ्मय' म्हणजे काव्य याला तरी निदान कबुली द्यायला हरकत नाही ...व्यवहाराचे वास्तववादी, आदर्शवादी वा स्वप्नवादी वर्णन त्या त्या कालानुसार प्रतिभेच्या लयानुसार करून एका नवप्रत्ययाचा प्रत्यय कवी घडवून आणतो. तेव्हा 'जीवनाकडून जीवनाकडे' हा काव्यहेतू साकार होतो."[1] "संवेदना, विचार किंवा त्यांचा शब्दवृत्तबद्ध आविष्कार इत्यादि मानवी मनाच्या कुठल्याही व्यापारात खरेखुरे, निखालस, अंतिम किंवा मूलदृष्ट्या नावीन्य कवीला ओतता येत नाही. तो त्याच्या प्रतिभेच्या धर्म नव्हे आणि ते तिचे कार्य नव्हे."[2]

"काव्याचे ध्येय नैतिक आहे. मनाच्या समुल्लासाबरोबर मनाची समुन्नती झाली पाहिजे."[3]

काव्याचे हेतू, सिद्धी यांच्याबद्दलचे वरीलप्रमाणे वरेचसे मतभेद असले तरी सर्वांनीच काव्याचे उगमस्थान निश्चित केलेले आहे. व्यक्ती तितक्या प्रकृती या न्यायानेच काव्याचा विषय, आशय, आविष्कार यांत बदल अपरिहार्य ठरतो. कवी समष्टीपासून दूर राहू शकत नाही. तो संवेदनाक्षम असल्यामुळेच आघात-प्रत्याघात त्याच्यावर होतच राहतात आणि त्याचेच प्रकटीकरण कित्येकदा आपण पाहतो. जसा समाज तसे काव्य हेच अखेर मान्य करावे लागते. म्हणूनच कवीच्या काव्यावर बंधने घालता येत नाहीत. कवीने अमुकच लिहिले पाहिजे, अमुक लिहू नये असे बंधन घालणे म्हणजे एका परीने त्याच्या मनोव्यापारांना अडथळाच आणण्यासारखे असून त्याचे जग संकुचित बनविण्यासारखे आहे. "कविमनाला जर उपदेशाचीच उत्कट तळमळ लागली असेल तर तीही काव्यात व्यक्त होईल अन तो 'जुने जाउ द्या मरणालागुन' असे म्हणेल."[4] कित्येकदा कवी स्वमत-प्रस्थापना मोठ्या हिरिरीने करतो. एकनाथकालीन महाराष्ट्राचे जीवन जेव्हा गढूळ बनले तेव्हा त्यांनी स्वमत-प्रतिपादनाचा जोरदार पुरस्कार केला. मुस्लीम आक्रमणाच्या काळात माजलेल्या अराजकामुळे हिंदु समाजाला बराच काळ अस्थिर जीवन नि आर्थिक विपन्नावस्था भोगावी लागली. त्याचे दुष्परिणाम धार्मिक व नैतिक अधः-पाताच्या रूपात समाजातील सर्व थरांत पसरले. म्हणूनच नाथांनी 'सर्वाभूती भगवद्भाव' हे भक्तीचे मर्म पटवून देताना हठयोग, ज्ञानयोग, कर्मयोग वा आश्रम-धर्म हे सारे उपाय अपाय ठरतात असे सांगून रूढ आचाराच्या नव्या व्याख्या केल्या.

---

१ नव-काव्य-समीक्षा
२ मर्ढेकर
३ आर्नोल्ड
४ लोकशिक्षण, १९३७

तप म्हणिजे नव्हे योग - नव्हे याग - नव्हे दान
नव्हे शास्त्र व्याख्यान । तप म्हणिजे वासना त्याग
तटस्थादि काष्ठावस्था । समाधि सर्वथा नव्हे

तर—

सर्वत्र जे समसाम्यता । या नाव समाधि तत्त्वता

या मधून एकनाथांची स्वमत प्रतिपादनाची तळमळ विशेषत्वाने प्रतीत होते. चिनी आक्रमणाच्या गर्द छायेखाली सापडलेल्या भारताला—

बर्फ पेटला हिमालयाला विझवायाला चला
वृद्ध तरुण या फक्त रक्त द्या, द्या रे साद हाकेला

असे आवाहन करून—

पक्ष, पंथ, धर्म भेद सारुनी
गिळिली भूमि मुक्त करोनी
गान शांतिचे घुमवू गगनी
न्यायी भारत नाहि आक्रमक दावू या जगताला.

असे स्वमत प्रतिपादन अमरशेखांसारखा लोकाश्रयी कवी करीत असला तर त्यात नवल नाही. किंबहुना लोकाश्रयी कवीचे ते प्राथमिक कर्तव्यच ठरते. म्हणूनच समाष्टीच्या जीवनातील नैतिक मूल्यांची जी अवहेलना होते ते अमरशेखांना पाहवत नाही. तेव्हा ते उपरोधिकतेने आपल्या मतांचे प्रतिपादन करताना म्हणतात--

ताजमहालाचा दगड पायाचा । तो पण जायचा नेम नाही
...नेम नाही काही । सांगोनि अमर । आपले धोतर सांभाळी बा

स्वमत प्रतिपादन करताना कोणताही लोकाश्रयी कवी त्या त्या युगमानाप्रमाणेच रूढ शब्दातून नवा अर्थ काढण्याचा प्रयत्न करतो; म्हणूनच तर समाजाला त्याची विशेष करून जाणीव होते.

समाजजीवन हे गतिमान असते. त्याचा अचूक वेध घेण्याचे सामर्थ्य कलावंताच्या प्रत्ययकारी प्रतिभेत असावे लागते. त्यासाठी त्याच्याजवळ मर्मग्राही दृष्टी असावी लागते. ती दृष्टी ज्या कलावंताजवळ असेल तोच कलावंत वास्तववादी चित्रण करण्यात यशस्वी होतो. परंतु केवळ वास्तववादी चित्रण करणे एवढेच काही कलावंताचे कार्य नसते. त्यापेक्षा ते निःसंशय वेगळ्या प्रकारचे असते. आणि हे वेगळेपण म्हणजे वास्तवाशी आपल्या जीवन विषयक तत्त्वज्ञानाची सांगड घालणे होय. वास्तववादी चित्रण करणारा कलावंत हा मूलतःच ध्येयवादी असावा लागतो. तो पुरोगामी वृत्तीचा असतो. केवळ हुबेहूब चित्रणापेक्षा वास्तव आणि आदर्श यातील महदंतर त्याने दाखवून द्यायचे असते.

"वास्तववादी वाङ्मय समाजाच्या गतिमान जीवनाचे निदान करते म्हणून त्याला

पुरोगामी वाङ्मय असे म्हटले जाते. मानवतेच्या अंतिम ध्येयाच्या दिशेने मानव समाजाची प्रगती घडवून आणणे हेच वास्तववादी किंवा पुरोगामी वाङ्मयाचे प्रमुख लक्षण आहे."[१]

लेखकाचे सर्वसाधारणतः दोन भाग पडतात. ध्येयबुद्धीने लिहिणारे लेखक आणि इतर. शाहीर अमरशेख हे ध्येयबुद्धीने लिहिणारे आहेत. "क्रांतिकारक लेखक हा निर्मळ ध्येयवादी असतो. ध्येयवादी माणसाच्या ठिकाणी अंतःकरणाची आत्यंतिक तळमळ, स्वभावाचा उमदा उतावळेपणा, संकटाविषयीची बेफिकीरी, हृदयाची उदारता, वृत्तीची निर्भयता आणि भावनेची उत्कटता असे गुण विशेष दिसून येतात."[२]

"आजचा युगधर्म आहे समाजवाद आणि म्हणूनच मी त्याचं वाहन आहे. त्याचा मला मनापासून अभिमान आहे." अमरशेखांच्या या वाक्यावरूनच त्यांच्या ध्येयवादाची कल्पना येते. समाजवादावर त्यांचे अतोनात प्रेम आहे. त्यांची सारी जीवननिष्ठाच त्याने व्याप्त झालेली आहे. कवीजवळ काय आणि कलावंताजवळ काय स्वतःचे असे काही तत्त्वज्ञान असत. त्याला काहीतरी सांगायचे असते. ते सांगण्यासाठीच तर त्याची अव्याहत स्वरूपाची धडपड असते. जेव्हा सांगितलेच पाहिजे, आता सांगितल्याशिवाय मनाची तगमग शांतच होणार नाही असे वाटून कलावंत हाती लेखणी वा कुंचला घेतो तेव्हाच खऱ्याखुऱ्या जिवंत कलाकृतीचा जन्म होतो. काहीतरी सांगायलाच हवे म्हणून काही ध्येयवादी कलावंत सांगत नसतो. त्याला उत्कट तळमळच लागते. अमरशेखांची कुठलीही कविता काढून पहा, याचा निश्चितच प्रत्यय येईल. शाईने लिहिणारे लेखक आणि रक्ताने लिहिणारे लेखक यांच्यात हाच नेमका फरक असतो म्हणूनच अमरशेखांसारखे रक्ताने लिहिणारे लेखक काळाच्या ओघात 'अमर' ठरतात. केवळ शाईने लिहिणारे नव्हेत. समाज आणि कलावंत यांच्या अभिन्नत्वातूनच नवे तत्त्वज्ञान जन्माला येते. अर्थात कुणीही कितीही मोठा असला तरी 'नवे' काही सांगत नाही हे खरे, पण कलावंत समाजाला ज्याचा म्हणून नेमका विसर पडलेला असतो त्याचीच नव्याने जाणीव देतो. हेच त्याचे श्रेष्ठ आणि उच्चतम असे कार्य असते समाजाला प्रगतीकडे कसे जाता येईल, सामाजिक कल्याण कशाने साध्य होईल याचाच विचार कलावंताने करायचा असतो आणि त्याचप्रमाणे रक्ताचा कलावंत समाजाला मार्गदर्शन करतो. ते करीत असताना तो वास्तव आणि आदर्श यातील महदंतर पुन्हः पुन्हा जाणवून देतो. विसंगतीचे दर्शन घडवितानाच ध्येयवादी कलावंत सुसंगति म्हणजे नेमके काय हेही सांगून मोकळा होतो.

---

१ आचार्य अत्रे.

२ द. वि. ताम्हनकर–रत्नाकर

"समाजाच्या प्रगतीला चालना देणारे वाङ्मय निर्माण करणाऱ्या लेखकाला समाजाच्या विविध स्वरूपाचे आणि लेखन कलेचे ज्ञान असून केवळ भागत नाही. तर त्याच्या लेखनामागे तत्त्वज्ञानाची स्पष्ट भूमिका असावी लागते. त्याच्या जीवनाला आणि लेखनाला सुसंगत विचारसरणी असणे जरूर असते. अशी विचारसरणी असेल तरच त्याला आपल्या लेखनाबद्दल आत्मविश्वास वाटू लागेल; आणि त्याच्या हातून प्रभावी लेखन होत जाईल. साहित्याचा पक्ष हा जनतेचा पक्ष असल्याने सर्व जनतेला सुखी करण्याचे तत्त्वज्ञान हेच त्याच्या जीविताचे तत्त्व ज्ञान असावे. जनतेच्या आकांक्षा ह्या त्याच्या आकांक्षा असाव्यात. जनतेच्या चळवळी आणि धडपडी ह्या त्याच्या चळवळी आणि धडपडी असाव्यात."[1]

अमरशेख स्वतःला समाजवादाचे 'वाहन' म्हणवून घेतात. समाजवाद निर्माण व्हावा ही त्यांची उत्कट तळमळ आहे. ती त्यांची ओढ आहे. समाजवाद हे त्यांनी अंतिम साध्य मानले आहे. ती त्यांची जीवननिष्ठा आहे. या साध्याचे साधन म्हणूनच ते साहित्यनिर्मिती करतात. समाजाच्या प्रगतीची त्याना अहोरात्र तळमळ लागलेली दिसून येते. नव्हे ती त्यांची 'वेदना'च बनली आहे. अमरशेख थोर ध्येयवादी कलावंत ठरतात ते नेमके इथेच. "कलावंताचे जीवन हे काही सामान्य माणसाप्रमाणे ठराविक चाकोरीने जात नसते. तो अंतर्बाह्य उत्क्रांतिवादी असतो. निर्जीव परंपरा, रुढी यांना तो आपल्या कलेमध्ये आणि जीवनामध्येही झुगारून देतो. कलेच्या स्वरूपातच कलावंत समाजापुढे येतो. तेच त्याचे स्वरूप समाजाने आपल्या हृदयात साठवावे. कलावंत क्षणभंगूर आहे; कला ही अमर आहे."[2] All the fine arts must be dida ctic to the people, and that is their chief end.[3] तत्त्वज्ञ बुद्धिवादाने जे लोकाना शिकवितो तेच कलावंत कलाविलासाने शिकवितो. कलावंत सत्य दाखवितो पण ते तर्कशुद्ध विचारसरणीने नव्हे; तर प्रतिभा प्रेरित कलाविलासाने, शब्दाने, चित्राने अथवा इतर साहित्याने. प्रतिभा ही दैवी देणगी असून तिचा उपयोग लोकांना सत्यदर्शन करून देण्याकरिता व सदाचार शिक विण्याकरिता आहे. अमरशेख तर 'सत्याकडे जीवनाची ज्वलंत आणि अव्याहत धाव' घेत आहेत. आपल्या उत्तुंग प्रतिभेने खऱ्याखुऱ्या सुखकर जीवनाचा साक्षात्कार घडवून देत आहेत. सच्चा कलाकाराचे हेच कार्य असते.

"ललितकला ह्या उपदेशात्मकच असल्या पाहिजेत.–उपदेश हेच त्यांचे मुख्य ध्येय होय. कलावंत हा लोकांचा शिक्षक, उपदेशक होय. त्याचा स्वभाव नीति-प्रधान असला पाहिजे. एरव्ही तो कलावंत नव्हे. काला ही नित्युपदेश करणारी देवता होय. आणि ह्या देवतेचे सौंदर्य उदात्त नीति तत्त्वांचे पोषण करणारे असते.

---

१–२ मुद्दे आणि गुद्दे– अत्रे.

३ रस्किन

क्षुद्र विकारांचे पोषण करणारी कलाकृति ही खरोखर कलाच नव्हे."[१] "कला म्हणजे करमणूक नव्हे."[२] ज्या कलावंताला आपल्या विशिष्ट तत्त्वज्ञानाची योग्य मांडणी करायची आहे तो कलावंत ते तत्त्वज्ञान सामन्यातील सामान्याला समजेल अशाच भाषेत मांडतो. अशावेळीं त्याच्या कलाकृतीत उपदेश डोकावतोच.

स्वकष्ट निर्मित घृतामृताची जिव्हाग्रे गोडी चाखा
परिस्थितीचे दही घुसळा रे कृतार्थ व्हा साधा मोका.

असा उपदेश अमरशेखांच्या कवितेतही केशवसुताप्रमाणेच दिसतो. पण जरा सूक्ष्म विचार केला तर हे पटेल की समाजवादी ध्येयाचा पुनरुच्चारच कवीकडून केला गेला आहे. " Literarure is a criticisun of life[३] साहित्य ही जीवनावरील टीका होय. साहित्यिक अथवा कलावंत हा जीवनाचे प्रतिबिंब वा केवळ दर्शन घडवीत नाही; तर तो जीवनावरच एक प्रकारची टीका करीत असतो. आदर्शभूत जीवन कसे असावे याच विचाराने त्याच्या डोक्यात थैमान घातलेले असते. ध्येयवादी कवीला एक वेळ निराशा चाटून जाईल पण त्याने तो कधीच हतबल होत नाही. उलटपक्षी जीवनात निराशेचे क्षण जितके तो जास्त अनुभवील तितकी जीवनाबद्दलची त्याची आसक्ति वाढती राहील. जीवन कसे आहे हे दाखवितानाच ते कसे असावे हे नेमके त्याला दाखवायचे असते. स्वातंत्र्याची कल्पना तर त्याच्या हाडीमासीच खेळलेली असते. म्हणूनच तर त्याच्या त्या स्वातंत्र्याच्या कल्पनेबरोबरच त्याच्या व्यक्तिस्वातंत्र्याच्या कल्पनेचाहि प्रादुर्भाव होतो. केशवसुतांनी नाही का म्हटले आहे ?

पूजितसे मी कवणाला ? तर मी पूजी आपणाला

हाच व्यक्तिवाद अमरशेखांच्या कवितेत अगदी ओतप्रोत भरलेला असल्यामुळेच तेहि व्यक्तिस्वातंत्र्याची कल्पना पदोपदीं मांडून आपला जीवनावरचा अढळ विश्वास व्यक्त करतात.

तो मरतो हे पाहुनिसुद्धा
धडपडतो मी जगण्यासाठी
जगण्यामध्ये आहे ' गंमत '
ती पुरती अनुभवण्यासाठी
मी मेलो की सर्व संपले
नाहि म्हणत मी याला जीवन
मी मेलो तरि व्यापून राहिल
माझे जीवन अवघे त्रिभुवन........

---

१ लोकशिक्षण जाने–१९३७.

२ रास्कीन.

३ मॅथ्यू अर्नोल्ड. ( ज. ग. जोगळेकर )

ध्येयवादी कवि मृत्यूची तमा बाळगीत नाही. मरण म्हणजे अवस्थांतर या कल्पनेपर्यंत तो येऊन पोहोचतो. आणि मृत्यूवर विजय मिळविण्याचीच भाषा करतो. अमरशेखांच्या खालील कवितेत नेमका या म्हणण्याचा कसा प्रत्यय येतो तो पहा.

जन्मता आम्ही जन्म पावला
त्या मृत्यूची भीति आम्हाला ?
छायेतच जो सदा साधिला
तो आम्हावरि घालिल घाला ?
तो तर झाला मित्र जिवाचा कर्तव्याचे अजि त्याचे
साथ राहुनी अमुच्या अवघा सागर जिंकायाचे
…… कां माझी ध्येयाची नौका मजला बंदीशाला ?
अवघा जीवन संगर माझी नौका जाइल तरुनी
जीवन्मोती घेउनि येइल सागर मंथन करुनी

मृत्यूला आपला मित्र बनवून जीवनसंगर जिंकायला निघालेल्या मराठीतील हा पहिला वहिलाच कवि असावा. "कशास मृत्यूस भीतोस मूर्खा। भीतो म्हणोनी यम सोडितो का ?" हीच सर्वत्र भावना पसरलेली. पण अमरशेख त्याला अपवाद आहेत. ध्येयवादी कवीला सर्व तऱ्हेच्याच सामाजिक कल्याणाची आच लागलेली असते. सत्य सांगणे हाच त्याचा बाणा असतो अशा कवीला जगातील सौंदर्य नष्ट होत आहे ही कल्पनाही असह्य होते. मग ते कुठले का असेना ? त्याबाबतची आपली कल्पना त्याने मांडलीच म्हणून समजा. अमरशेखांची 'ब्रह्मदेव पण हसला गाली' ही कविता पहा—

अगदि चिमुरडी तिळाएवढी
मासाचा तो केवळ गोळा
झाली त्याला वर्षे सोळा
…स्वप्नाळू पण माधळ डोळे
लांब सडक ते कुतल काळे
…जणु दवबिंदूचीच बाहुली
जगावेगळी नार नवेली
…हा बसलेला बाबा शंकर
भस्म लावुनी सर्वांगावर
…काय कळे त्या विद्रुप सुंदर !
निर्माल्यच तो करिल सुमाचे !
जया वावडे सौंदर्याचे
मज करी जर येईल "ते खाते"

आगळेपणा आणिन त्याते
हिलाच अमृत देउन सुखविन
अजर नि अक्षय बनवुन ठेविन
सौंदर्य असो कुठलेही मग...त्यास अमरपद देउनि टाकिन ..

कलावंत हा मुळी ध्येयप्रेरितच असतो. सामान्य माणूस आणि तो यांच्यात इथेच नेमका फरक राहतो कलावंत ध्येयप्रेरित असतो असे मानले की त्याच्या मताचा प्रचार हा ओघानेच आला. सत्याविष्कार करताना त्याला ध्येयाचा मागोवा सातत्याने घ्यावा लागतो. आपल्या ध्येयाचा विसर पडून त्याला कधीच चालत नाही. ' जीवनांतील सुखदुःखे त्यातील आशा निराशा ही चितारून कलावंताने आपले जीवनाचे तत्त्वज्ञान सांगितले पाहिजे. त्याच्या दिग्दर्शनाने जीवित सुखमय अथवा दुःखमय का व कसे होते हे वाचकाना समजले पाहिजे. "कवीच्या कला-विलास जरी एक वेळ अपूर्ण दिसला तरी चालेल, पण जीवनाचे सत्यत्त्व कवीने पूर्णपणे चितारले पाहिजे. कलेतील न्यूनत्त्व सत्यत्वाने भरून काढता येते."[१] "खरा कलावंत हा जीवनापासून अलिप्त असूच शकत नाही. म्हणूनच तर त्याच्या कलाकृति ही एकापरीने जीवनावरील टीका ठरते. " Great art has something of the soul of humanity in it. It finds its logical. Its architectural place in the great structure of human life '[२] हे तत्त्व कवीने विसरू म्हटल्यास विसरता येणार नाही. कवि आणि जीवन यांच्यात अभिन्नत्त्व असल्याची खात्री झाल्यामुळेच तर अमरशेख विचारतात.

जीवना वगळुनी शब्द कोणता सांगा ?

प्रेरणाहीन साहित्य हे साहित्य या पदवीला पोहोचू शकत नाही. अर्थात असे जरी असेल तरी साहित्यात अमूकच प्रेरणा असली पाहिजे वा असावी असा दुराग्रह धरणे सर्वथैव चुकीची ठरते. कारण त्यामुळे कलावंताच्या जगाचा परिसर फारच संकुचित होईल. त्याच्यवर बंधन पडेल आणि कला ' मुक्त ' ठरणार नाही साहित्याच्या लेखनामागे विविध प्रकारच्या प्रेरणा असू शकतात. मग एखाद्या कलावंताची प्रेरणा सौंदर्यात्मक असेल, भावनात्म असेल किंवा ती संशोधनात्मकहि असू शकेल. कधी, कधी ती वैचरिक वा तात्त्विकही असेल. तेव्हा साहित्यात एकाच प्रकारची प्रेरणा असावी असा अट्टाहास धरणे याला दुराग्रहाखेरीज दुसरा कोणताच सार्थ शब्द असणार नाही. अर्थात "साहित्य गुणवत्ता त्याच्या लेखनामागे ज्या प्रेरणा असतात-त्यावर अवलंबून असते असेही नाही. कोणी काहीहि म्हटले तरी वाङ्मय

---

१ आर्नोल्ड.
२ वॉल्टर पेटर.

म्हणजे अखेरतः निवेदन (Communication) असते. आविष्काराचीच परिणति निवेदनांत होते आणि ते शब्दाच्या साह्याने साहित्यरूप धारण करते. तसे नसते तर साहित्यिक पुष्कळदा लेखन करण्याऐवजी नुसते अंगविक्षेप आणि हातवारे करीत राहिले असते. तसे होत नाही. अनुभवाच्या सामर्थ्याबरोबर निवेदनाची समर्थता ज्या प्रमाणात लेखकाजवळ असेल त्या प्रमाणात ते साहित्य कमी अधिक प्रभावी होते. कलात्मक वा सौंदर्यात्मक प्रेरणा आहे म्हणून ते साहित्य अभिजात स्वरूपाचे होईल आणि वैचारिक, तात्त्विक वा प्रचारात्मक प्रेरणा आहे म्हणून ते निकृष्ट होईल असे कोष्टक मांडणे साफ चुकीचे आहे. अनेक शतकातील साहित्याच्या इतिहासाने, काळानेच ते सांगितले आहे. लेखकाला वा कवीला जे जाणवते ते त्याच्यापुरते सत्य आणि वास्तवच असते. सृष्टीतील सौंदर्य जेवढे खरे तेवढेच सामाजिक जीवनातील प्रक्षोभही खरे आहेत."[१] अमरशेखांच्या कवितेत कित्येक ठिकाणी प्रक्षोभ दिसतात; एक दिवस पेटून उठण्याची जिद्द दिसते; समाजमनाची आर्तता जाणवते. बेगुमानपणे शब्द फेकणाऱ्या या कलावंताच्या कृतीत बेहोषी दिसते तर कधी उघड उघड बंडखोरी दिसून येते. जीवनावर अविचल श्रद्धा असलेल्या अमरशेखांच्या कवितेत दंभावर आसूड उगारलेला का दिसतो ? कुंतीच्या भेदरलेल्या अवस्थेचे चित्रण पिळवटून का केले जाते ? 'ज्ञ' वर मोर्चा काढायची का वेळ येते ? उपहासाचा आसरा का घेतला जातो ? 'वेडकीसही लाभे यौवन। मानव टाचा घाशित मरतो अशी चीड का व्यक्त होते ? "सत्य जगा सांगायला। शब्दाचल ये गायाला। असे अमरशेखांना का म्हणावेसे वाटते ? "बेट्या या जीवासाठी। करी जिवाची करवंटी। याने रे केले काय। लागावी याला हाय ? तू तर आगीचा लोळ। हाय तुझी हाय बाळे।" अशी भावपूर्ण रचना ते का करतात ? या सर्वांचे उत्तर एकच संभवते ते हे की सामाजिक प्रेरणा त्यांना स्वस्थ बसू देत नाही. म्हणूनच तर त्यांच्या कवितेत समाजमनाचे चित्र सजीव होताना दिसत.

"समाज आणि वाङ्मय ही दोनही परस्परावलंबी असतात. समाजाच्या आचारांच्या मुळाशी विचाराचेच अधिष्ठान असते. म्हणून समाजातील तत्त्वज्ञान, वाङ्मय इत्यादिकांचा समाजावर फार मोठा परिणाम होतो. आणि म्हणूनच वाङ्मयास विचारविश्वांत फार महत्त्वाचे स्थान आहे. एका इंग्रज ग्रंथकाराने म्हटले आहे की "Literature is an integral part of the entire eulture of the people tied by a tissu; of connection with every other clement, yet it has its own fanction"[२] वाङ्मयात तत्कालीन समाजाच्या आकांक्षा वासना-सुखदुःखे, महत्त्वाचे प्रश्न, सौंदर्यकल्पना व नीतिमूल्ये ही प्रतिबिंबित झालेली असतात व म्हणूनच वाङ्मयास जीवनाच्या दर्पणाची वारंवार उपमा दिली जाते.

---

१ वि. वा. शिरवाडकर.

२ लोकशिक्षण १९३७ (भ. व्यं. देशमुख)

" लेखकाच्या मनावर होणारे आघात किंवा त्याला मिळणारे अनुभव हे समाज-निरपेक्ष नसून ते समाजावरच अवलंबून आहेत. ज्या प्रकारच्या समाजात तो असेल त्याच प्रकारचे अनुभव त्यास येतील. आणि त्याच समाजाचे चित्रण त्याच्याकडून केले जाईल. या दृष्टीने वाङ्मयात जीवनाचे प्रतिबिंब पहावयास मिळते.[१]

एकनाथांच्या काळात ध्वन्यर्थाने जेवढे म्हणून सांगण्यासारखे होते तेवढे तेवढे त्यांनी सांगितले तो काळ परवशतेचा होता. एकनाथांनी 'अर्जे' अर्जदास्त, अर्जाचा जाब, अभयपत्र, ताकीदपत्र, जाबवेठी, कौलपत्र, महार इ. स्फुटे गद्यात सरकार दरबारच्या भाषेचे अनुकरण करून लिहिली. त्यावरून तत्कालीन देशस्थितीची चांगलीच कल्पना येते. उदा. 'अर्जदास्त' नामक एका स्फुटात आध्यात्मिक रूपकातून एकनाथ जे वर्णन करतात त्यावरून गावोगावचा कारभार त्या काळीं कसा चालत असे त्यावर प्रकाश पडतो.

आशय आणि अभिव्यक्ती यात कलावंताच्या अनुभूतिनुसार नेहमीच फरक पडतो. नाथांनी निर्माण केलेल्या विविध काव्यप्रकारात तत्कालीन समाजाचे प्रतिबिंब स्पष्टपणे उमटलेलेच पाहायला मिळते. " स्वतंत्र्य व सलग अशा कथाग्रंथ निर्मितीचा, आख्यान काव्याचा आणि पदे, गौळणी, भारुडे यासारख्या विविध स्वरुपाच्या ललित व ग्रामीण काव्यप्रकारांचा पायंडा नाथांनी पाडला."[२] एका अर्थाने नाथांनी आपले काव्यप्रकार प्रतिनिधिक स्वरूपातच हाताळले. ग्रामीण जनतेला, सर्वसामान्य माणसाला त्याच्याच विचाराचे दर्शन घडेल अशीच वाङ्मयनिर्मिती नाथांकडून घडली.

'कथाकल्पतरु' कर्ते कृष्ण याज्ञवल्की व मधुकर हे एकाच काळातील कथाकवि. 'संस्कृताचा अर्थ। प्राकृतासी नव्हे प्राप्त।' म्हणून वेद, शास्त्रे, पुराणे, उपपुराणे, रामायण, महाभारत, भागवत या ग्रंथात विखुरेलेल्या अनेक कथा मऱ्हाटीत आणण्या-साठी ३९ हजार ओव्या लिहिण्याचा विक्रम या दोघांनी केला; तो कौतुकास्पद तर खराच, पण त्यावरून तत्कालीन लोकांची अभिरुचि स्पष्ट होते,"[३]

ढोंगी गुरू व नालायक शिष्य यांचा खरपूस समाचार घेण्यात तुकारामाप्रमाणे मुक्तेश्वराचीही वृत्ती निर्भीड व वाणी सडेतोड असल्याचे दिसून येते.

गृह त्यागुनी मठाची माया। शिष्यिणी करुनी त्यागी जाया।
सुहृद त्यजोनी। धरी शिष्य समुदाया। तो एक मूर्ख.॥
परोपदेशी कुशल भारी। आपण अधर्म अकर्म करी
त्याच्या वचनाचा विश्वास धरी। तो एक मूर्ख जाणावा॥

यातील सामाजिक आशय स्पष्ट आहे.

---

१ लोकशिक्षण ऑगष्ट-सप्टे. १९३८-श्री. भ. व्यं. देशमुख.

२ प्रा. शेणोलीकर.

३ प्राचीन मराठी वाङ्मयाचे स्वरुप.

"तुकारामाच्या जीवन चरित्राला व वाङ्मयीन कर्तृत्वाला सामाजिक अधिष्ठान आहे. साधकावस्थेतील मोहवशता व लब्ध प्रतिष्ठितांचा विरोध या दोहोशी झगडून त्याला आपली आत्मिक प्रगति करून घ्यावी लागली. 'रात्रंदिवस आम्हा युद्धाचा प्रसंग। अंतर्बाह्य जग आणि मन।' असे या झगड्याचे दुहेरी स्वरूप ते स्वतःच वर्णन करतात. त्यांचा हा झगडा केवळ वैयक्तिक नव्हता. तत्कालीन शूद्रातिशूद्रांच्या जीवनाच्या सामाजिक पार्श्वभूमीवर तो चालू होता. त्यामुळे त्या वर्गाचे सामुदायिक मन तुकोबांच्या या उद्‌गारात व्यक्त झाले आहे. तुकारामांच्या एकंदर अभंगवाणीतही व्यक्तिगत आत्मविष्कारावरोबर वर्गीय सुखदुःखांचा अविष्कार झाला आहे."[1] सर्वच वेळी कवी आत्मकेंद्रित बनतो असे नाही सामुदायिक मनही त्याला-तो जर प्रखर संवेदनाशील असेल तर-स्वस्थ बसू देत नाही. अशावेळी कधी स्वतःचेच प्रतिक उभे करून तर कधी उघड उघड समाजजीवनाबद्दल भाष्य करतो. वर्गीय सुखदुःखांचा अविष्कार करण्याची परंपरा मराठी साहित्यात तरी काही नवीन नाही.

दुर्जनासी पंचानन। तुका रजरेणु संतांचा—किंवा

दया तिचे नाव। भूतांचे पालन<br>
आणिक निर्दाळण। कंटकाचे

या तुकारामाच्या उक्तीवरून तुकारामाच्या सामाजिक कामगिरीचे स्वरूप विधायक व विध्वंसक असे दुहेरी असल्याचे स्पष्ट होते...मनाच्या उदारतेबरोबर वृत्तीचा झुंजारपणा, सहृदयतेशी संलग्न असलेली न्यायनिष्ठुरता आणि व्यक्तिविषयक निर्वैर बुद्धी बरोबर दुष्ट प्रवृत्तीवर प्रहार करण्याची कठोरता इ. विशेषांनी तुकारामाचे व्यक्तिमत्त्व संपन्न झाले आहे. समाजाच्या विशिष्ट वर्गाच्या सुखदुःखाशी समरस होणाऱ्या कोणत्याही कवीच्यात हे विशेष थोड्याफार फरकाने असलेले दिसतात. ते जितक्या प्रखरपणे जाणवतात तितक्या प्रमाणात कवीचे सामाजिक मनाशी तादात्म्य पावलेले आहे असे स्पष्ट होते. प्रातिनिधिक स्वरूप विशद करणारा कोणत्याही काळातील कवी तुकारामाप्रमाणेच बहुधा दुहेरी अशा स्वरूपाचीच कामगिरी बजावीत असतो. जो जो कवीच्या आयुष्यात झगडा जास्त तो तो विचाराचा सडेतोडपणा अधिक. कवीच्या रसरशीत व्यक्तित्वाचे खरे दर्शन घडते ते अशा वेळीच. दुष्टता, दैन्य, बेकारी, दौर्बल्य, असहायता, दांभिकता, कुकर्म ज्या प्रामणात असेल त्या प्रमाणात कवीचा शब्दांचा वापर होतो. तुकारामाचीच उदाहरणे पाहा—

१) अभक्त ब्राह्मण जळो त्याचे तोंड। काय त्यासी रांड प्रसविली।
२) तुका म्हणे टाकी घाये देवपण। फुटलिया जन कुला पुसी
३) नपुंसका पुरुषासी, काय करील बाइल त्यासी?

१ प्राचीन मराठी वाङ्मयाचे स्वरूप.

अशा ओळीतून 'गांवढळ' उपमा, दृष्टांत दिसतात; पण हे मात्र कबूल करायला लागते की 'तसल्या' शब्दांची योजना तुकाराम योग्य त्याच ठिकाणी करतात. त्यामुळे अशा ठिकाणी त्यांच्या भाषेचे अस्सल मराठपण अधिक स्पष्ट होते.

समाजसुधारक असलेल्या कोणत्याही कवीची भाषा, जिव्हाळा, औचि य, ओज यांनी युक्त असते ह्याचे तुकाराम हे एक ठळक उदाहरण आहे.

रामदासांच्या काव्यरचनेत तत्कालीन देशस्थितीचे प्रतिबिंब उमटलेले आहे. "आत्मनिष्ठ काव्यरचनेपेक्षा विषयनिष्ठ काव्यरचनेत रामदासांचे वेगळेपण स्पष्ट दिसते. कारण इतर संतकवींच्या मानाने रामदासांची वृत्ती व दृष्टी अधिक बहिर्मुख आहे. त्यांच्या या वस्तुनिष्ठ दृष्टीमुळेच 'अस्मानी सुलतानी' व 'परचक्र निरूपण' यासारख्या प्रकरणात तत्कालीन देशस्थितीचे ठसठशीत शब्दचित्र उमटले आहे. भोंदू गुरूंच्या कथा—

जिकडे तिकडे ज्ञान झाले । उदंड गोसावी उतले ।
तयाचे संगती झाले । बाष्कळ पाणी ॥
एक म्हणती गुरू आमुचा । करी अंगीकार निष्ठेचा ।
तयासारिखा दुजा कैंचा । भूमंडळी ॥
...आमुचे गोसावी महायोगी । औषधे देती जगालागी ॥
नपुंसक वनिता भोगी । चमत्कारे ।—गुरु भविष्य सांगती ।
रेड्याकरवी वेद म्हणविती । गधड्याकरवी पुराणे सांगविती ।
सामर्थ्य बळे ॥

रामदासांप्रमाणेच नागेशाचे अवती-भवतीच्या समाजाचे निरीक्षण सूक्ष्म नि वेचक दिसते. तत्कालीन गुरू शिष्य संबंध, शिष्याचा बडबडा स्वभाव, गोसाव्याचे बकध्यान, स्त्रीलंपटांची बुवाबाजी, कोकणस्थांची बुद्धितरलता, ग्रामजोशांची रुढि-प्रियता, विवाहविधीतील धर्मकृत्यावरून होणारी भिक्षुकांची भांडणे इ. उल्लेख प्रसंग-परत्वे कवीनी केले आहेत. त्यामुळे शिवकालीन समाजातील दोषावर कवीने चांगला प्रकाश टाकला आहे.

मध्वमुनींनी देखील आपल्या कवितेत त्या काळच्या समाजजीवनाचे यथार्थ चित्रण केले आहे. मध्वमुनींचे अवलोकन पुष्कळ विस्तृत व खोल आहे.

तो म्हणतो—

श्रृंगारप्रिय सर्व लोक विषयी जाले विलासी महा
ऐसे देखुनि मध्वनाथ म्हणतो वाटे मला खेद हा ॥

"हे सारे तत्कालीन परिस्थितीचे अनुभव समाजशास्त्राच्या अभ्यासकाला केव्हाही

मार्गदर्शकच ठरतील. समाजजन्य परिस्थितीचे साद्यंत प्रतिबिंब उमटविणारे काव्य हे समाजशास्त्राच्या दृष्टीने फारच महत्त्वाचे असते. काव्य म्हणून तात्कालिक उणेपणा द्यायचा कितीही कुणीही प्रयत्न केला तरी समाजशास्त्राच्या दृष्टीने त्याचे महत्त्व तसूभरही कमी होत नाही; तर उलट वाढत जाते. आणि म्हणूनच अशा काव्याची जोपासना करणे, त्याची आबाळ होऊ न देणे हे एक महत्त्वाचे असे प्राथमिक कर्तव्य ठरते. सुशिक्षितांनी तर अशा काव्याकडे डोळेझाक करून केव्हाही चालणार नाही."[१]

हा एवढा प्रपंच करण्याचे कारण एकच की समाज आणि वाङ्मय हे परस्परावलंबी असतात हे पटावे. कलावंत आणि समाज यांच्यात मुळी अभिन्नत्वच असते. समाजाच्या उद्धाराची, प्रगतीची सारी मदार असते कलेवरच. कला आणि कलावंत यांच्याशिवाय समाजाला काही अर्थच येऊ शकत नाही. अमरशेखांसारख्या कलावंतांची सामाजिक दृष्ट्या फार आवश्यकता असते. असेच कलावंत विशिष्ट ध्येय उराशी कवटाळून समाज जागृति करून मानवाचे अंतिम कल्याण साधण्यास मदत करतात. ते कशाने साधेल हे ध्येयवाद्याखेरीज कुणीच सांगू शकणार नाही. खरा कलावंत केवळ वर्तमानाचा विचार करीत नाही. तो भूतकाळाचा वेध घेऊन भविष्याकडे कसे जायचे याचे वर्तमानात यथायोग्य दर्शन घडवितो, मार्गदर्शन करतो. आणि ते करताना कधी कधी मतप्रचाराची त्याला कास धरावीच लागते एकच गोष्ट समाजमनावर चांगली बिंबल्याशिवाय ध्येयाची निश्चित कल्पनाच येत नाही. कुठे जायचे हेच जर कळले नाही, तर नुसते जागे होऊन तरी काय उपयोग ?

" निसर्गाच्या उत्क्रांतीचे अपरिहार्य कार्य चालू ठेवणे हेच कलावंताच्या आयुष्याचे ध्येय आहे. समाजाच्या आनंदासाठी, प्रगतीसाठी आणि उद्धारासाठी कलेची आणि कलावंताची जरुरी आहे. कलावंताच्या पावलानी समाज चालत असतो; कलावंताच्या डोळ्यानी समाज पाहत असतो; हजारो वर्षांच्या काळात मानवजातीने प्रगतीचा आणि संस्कृतीचा जो टप्पा गाठलेला आहे त्याच्या श्रेयाचा वाटा कलावंतानाच द्यावयाला पाहिजे. कलावंताची कला ही समाजासाठी आहे. आणि कलावंतावाचून समाज हा सर्वस्वी असहाय आहे. [२]

परंतु आजच्या आमच्या मराठी साहित्यात समाजमनाचे यथार्थ दर्शन घडविणे याला मतप्रचार म्हणून नाक मुरडले जाते; पण विशिष्ट ध्येयाने वाटचाल करणाऱ्या कलावंताच्या कलाकृतीत तो अपरिहार्य असतो याचा विचार व्हावा तितका झालेला नाही.

---

१ प्रा. शेणोलीकर.

२ मुद्दे आणि गुद्दे– अत्रे.

"आज आपल्या साहित्यात सामाजिक जीवनातून निष्पन्न झालेले वैफल्य, हे एक अत्यंत लोकप्रिय आणि चलनी नाणे आहे. किंबहुना तेच एक चलनी नाणे आहे. इतर नाणी बाजारात दिसता कामा नयेत असा आमच्या वाङ्मयातील नबाबांचा आग्रह आणि आदेशही आहे.

बदललेल्या परिस्थितीचा पहिला जबरदस्त आघात आमच्या पांढरपेशा मध्यमवर्गावर झाला आहे; यात शंका नाही, पण या वर्गापलीकडचे जग साहित्यिकाच्या दिव्यदर्शी प्रतिभेला दिसावयाला नको काय? हजारो वर्षे अज्ञानाच्या, जातिभेदाच्या आणि दारिद्र्याच्या खाईत बेशुद्धावस्थेत पडलेला समाज आपले हातपाय हालवू लागला आहे. नव्या जाणीवाना, अहंकारातही निपचित पडलेल्या मनात नविन चैतन्य निर्माण केले आहे. सत्तेच्या संपर्काने का होईना, पण माणसाना आपल्या माणूसपणाचा शोध लागत आहे. आपले उध्वस्त जीवन संघटीत, संपन्न आणि सुसंस्कृत करण्याचा विराट प्रयत्न तेथे सुरू झाला आहे. हे सारे काही वाङ्मयात आणि तेही सर्व वाङ्मयात आले पाहिजे असे मी मुळींच म्हणणार नाही. कोणतीही सामाजिक प्रतिक्रिया वाङ्मयात यायची असेल तर ती वैफल्याच्याच स्वरूपाचीच असावी असा जो आग्रह प्रत्यक्षाप्रत्यक्षपणे वैफल्याच्या ठेकेदारकाडून केला जातो तो वास्तवाशी सुसंगत नाही एवढेच मला सांगावयाचे आहे. शिव्या-शापांचा वर्षाव करीत कोणी रडारड केली तर ते विशुद्ध वाङ्मयाचे सर्वोच्च स्वरूप आणि कोणी आपल्या लेखनातून एखादी प्रागतिक, राष्ट्रीय किंवा दलितासंबंधी सहानुभाव प्रकट करणारी भावना मांडली तर ते मात्र प्रचारी थाटाचे, आक्रस्ताळीपणाचे, कृत्रिम, इ.! मला वाटते साहित्यात ही एक नवीन पुरोहितशाही अवतीर्ण होत आहे."[१]

या 'पुरोहित' वर्गाची रचना वैफल्यगर्भ तर अमरशेखांची रचना आशागर्भ आहे. हाच सर्वात मोठा फरक असल्यामुळे अमरशेखांचे या सर्वापेक्षा जे वेगळेपण आहे ते उठून दिसणारे आहे. त्यातील काहीना जरब बसावी इतके ते मोठे आहे. अमरशेखांच्या कवितेत मतप्रचार आहे, निश्चित आहे. पण तो सामाजिक प्रतिक्रियेच्या प्रतिकात्मक स्वरूपातला आहे. जनस्वी कवी, लोकाश्रयी कवी हाच खराखुरा ध्येयवादी कवी असतो. तो स्वतःचा आणि लोकांचा असा दुहेरी स्वरूपाचा असतो. म्हणूनच ध्येयवादी कवी हा स्वाभाविक असल्याची आपली खात्री होते. त्याची साहित्यिक निर्मिती मग सहेतुक होत असल्यास त्यात आश्चर्य वाटण्याचे काहीच कारण नाही. "माझ्या मते साहित्यातील जी मुख्य गोष्ट त्यातील श्रेष्ठता ही सर्वस्वी सामावलेल्या विचारावर असते, तो विचार हा केवळ त्या व्यक्तीची अशी खास बाब आहे. मनामध्ये विचार येतात व पुष्कळ वेळा जसा एखादा धबधबा असावा त्याप्रमाणे मोठ्या वेगाने ती साहित्यगंगा मनोरूपी शंकराच्या जटेतून

१ कविवर्य—कुसुमाग्रज.

१०९५८ १५५ कार्य २९।१५

जाणिवेच्या भगीरथापर्यंत येते. त्या स्थितीपर्यंत हे साहित्याचे स्वरूप केवळ लेखकाच्या अगर साहित्यिकाच्या मनाचे लेणे आहे असे नव्हे; व्यक्तीच्या मनात उत्पन्न होणारे विचार त्याच्या भोवतालील आधिभौतिक व आध्यात्मीक परिस्थितीच्या संदर्भात उत्पन्न होतात व यामुळे काहीतरी हेतू, काहीतरी प्रयोजन त्या कृतीत निश्चित असते...सामान्य जनाचा अनुभव सर्व साधारण आशा व आकांक्षा यातील श्रेष्ठ भाव काढून कुणाच्या तरी जीवनात तो दाखवायचा म्हणजे समाजाचा अनुभव व आकांक्षा व्यक्तिस्वरूप करावयाच्या व व्यक्तिस्वरूप आशा व आकाक्षा विचार व विवेक याना सहज व सामान्य दाखवावयाचे ही साहित्याची अपरिहार्य भूमिका असते ..ज्या साहित्यात संवेदनाला आवाहन नसते ते साहित्य 'साहित्य' या पदवीला योग्य ठरत नाही...उदात्त हेतू, सत्यनिष्ठा, स्वाभाविकपणा, अनुभवातील अकृत्रिमपणा यातून जे काही मनामध्ये निर्माण होते व त्याचा अविष्कार केल्याशिवाय मनाला प्रसन्नता वाटत नाही; किंबहुना तसा अविष्कार होणे अपरिहार्य होते अशाच परिस्थितीत साहित्य निर्माण होते. कलिका झाली या पर्णे, मंकरंदाते राखो नेणे, रावरंकाते देणे, आमोदाचे॥ कलिका उमलत आहे तिने मनात आणले तर स्वाभाविक मकरंद ती रोधू शकत नाही. आणि मग निर्माण होणारा आनंद ती रावरंकाना देत असते हीच स्थिती खऱ्या साहित्याच्या निर्मितीबाबत आहे."[१]

अमरशेखांच्या हृदयात विशिष्ट ध्येयाने कायमचे ठाण मांडले आहे. त्याच्या काव्यात दुःखाचा पीळ आहे, जीवनाशी एक प्रकारचा झगडा चाललेला आहे. जगाच्या फंदापासून ते जराही अलग राहिलेले नाहीत. भावनांचे हळुवार चित्रण करण्यापेक्षा अमरशेख उग्र दर्शनच प्रामुख्याने घडवितात आणि त्याद्वारेच आशावादी वृत्तीचा प्रत्ययही आणून देतात. त्यांच्या ध्येयवादी कवितेत सतत जळणाऱ्या हृदयाचे आक्रंदन दिसते. समाजरचनेचा विशिष्ट आराखडा त्यांच्या डोळ्यापुढे आहे. म्हणूनच प्राप्त कालातील जीवनाचे यथार्थ प्रतिबिंब त्यात दिसते तत्कालीन जीवनाचे काव्यात दर्शविण्याची एक विशिष्ट परंपरा कशी आहे हे मागील काही कवींच्या उदाहरणावरून आपण पाहिले आहे अमरशेख काही त्याला अपवाद म्हणता येणार नाहीत. एका कवितेत ते म्हणतात--

करू मी शिक्षा कुणाकुणाला
तरुणच सारा समाजातला
सर्वांस दिसे वखवखलेला
...नेत्र विषारी शिव्या भिकारी
कर्कश कानावर आदळती...

दुसऱ्या एका ठिकाणी त्यांनी म्हटले आहे—

१ साहित्याचे प्रयोजन आणि सामर्थ्य– काकासाहेब गाडगीळ.

कवने गातो मेलेल्यांची
श्रद्धांजली पण सदा वाहतो
स्मारकेही पण आम्ही बांधितो...
पण जे मरती क्षणाक्षणाला
फूटपाथ गल्लीबोळातुनि
बेकारीस्तव औषधाविणा
भाकरीविणा तशीच त्यांची
इच्छा असता जगावयाची
दखल तयांची कधी न घेता
मौन धरून आम्ही कृतज्ञ असता
स्थितप्रज्ञागत झापड लावुनि...

आजच्या जीवनाचे सुंदर प्रतिबिंब आहे हे; आणि हे असे चित्रण सहेतुक तरी का केले जाते ? तर कवीच्यासमोर जे ध्येय आहे त्याशी ही वस्तुस्थिती अगदी विसंगत आहे हे कवीला दाखवायचे आहे म्हणून 'वाङ्मय हे पूर्ण व ध्येयरूप असते. त्यात सुखदुःखांचा उंच-सखलपणा जीवितासारखा दिसून येत नाही. मानवी प्रगतीचे मैलमैलानी मोजमाप दाखविणारा वाङ्मय हा सीधा राजरस्ता आहे. मानवी जीविताचे सुखदुःखात्मक नागमोडी वळण त्यात मुळीच नसते... वाङ्मय हे आदर्शभूत ध्येयरूप आणि म्हणूनच पूर्ण असे असते जीवित बोलके झाले म्हणजे वाङ्मय होते; व वाङ्मय कृतिरूप झाले म्हणजे जीवित होते.''[१]

जीविताबद्दल ज्याच्यात काही सांगितले आहे असे वाङ्मय ध्येयरूपच असते. त्यामुळे कित्येकदा ध्येयवाद हा साहित्यात अपरिहार्य ठरतो. एकदा ध्येयवाद मान्य केला की त्याच्या जोडीला मतप्रचार हात जोडून उभा राहतोच. सहत्व हा वाङ्मयाचा प्रधान धर्म. आमच्या मराठी संतांच्या वाङ्मयातही ध्येय कसे ओतप्रोत भरलेले होते. आमच्या संतांपुढे नराचा नारायण करण्याचे प्रमुख ध्येय होते त्या ध्येयाने प्रेरित झालेल्या संतांनी अमृतवाणीचे सर्वत्र सिंचन केले.

"सकल जीवमात्रांच्या कल्याणाकरिता संतांनी भक्तीचा राजमार्ग तयार केला. ते स्वतः याच मार्गाने गेले. व पुढीलाकरिता तोच मार्ग त्यांनी ठेविला. तुकोबा म्हणातात—

मारगे बहुत । याचि गेले साधुसंत
ऐसी गर्जती पुराणे । नका जाऊ आडराने
चोखाळल्या वाटा । नलगे पुसाव्या धोपटा
झळकती पताका । गरुड टके म्हणे तुका...

---

१ वि. कृ. आंबेकर.

भक्ती हा सिद्धपंथ आहे असे तुकोबांनी सांगितले आहे.—

पुढे गेले त्यांचा शोधित मारग । चला जाऊ माग घेत आम्ही
जन्ममरणाच्या खुंटतील खेपा । होईल हा सोपा सिद्धपंथ[1]

विशिष्ट ध्येयाने प्रेरित झालेल्या कलावंताच्या कलाकृतीत मतप्रचार अपरिहार्य कसा ठरतो हे पहायचे असेल तर तुकोबांचे अभंग जरूर पहावेत. तुकोबादि सारेच ध्येयवादी संत हे लोकाश्रयी कवी होते.-तेच खरे जनस्वी कवी. आणि अशाच कवींचे काव्य अमर ठरले अशी काळाने स्पष्ट जाहीर कबुलीही दिलेली आहे. काळाच्या ओघात जनतेच्या हृदयात अमर होतात ते जनस्वी कवी. राजाश्रयी कवी नव्हेत. "तन्मयता हा कलेचा आत्मा होय. आणि तन्मयतेने केलेला कलाविष्कार हेच काव्य होय. तेच कलात्मक काव्य होय. जीवनाच्या संग्रामात जीवनाशी एकरूप होऊन तिचा गोड अविष्कार करील तोच खरा कलावंत व त्याचेच खरे कलात्मक काव्य."[2] तुकोबांना जीवनातील संग्रामाची समग्र कल्पना येऊन चुकली होती. म्हणून तर त्यांनी व्यवहार शिकविला. गृहस्थाश्रमात वागणूक कशी असावी हे सांगताना ते म्हणतात —

जोडोनिया धन उत्तम वेव्हारे । उदास विचारे वेच करी
...भूतदया गाई पशूंचे पालन । तान्हेल्या जीवन वनामाजी

दयेची व्याख्या—

दया तिचे नाव भूतांचे पाळण । आणिक निर्दाळण कंटकाचे.

हा उपदेश उघडच आहे. पण ह्याचा जन्म समाजवादाच्या कल्पनेपोटीच झालेला आहे. 'उचनीच काही नेणे भगवंत' असा उपदेश संतांनी केलेला आहेच ना? समाजवादाची बीजे यात नाहीत असे कोण म्हणेल? शब्दाचे सामर्थ्य मराठी संतांनी अचूक ओळखले होते. जसा काळ तसे वाङ्मय ही गोष्ट कुणालाच सहसा नाकारता येणार नाही. संतांनी जी वाङ्मय निर्मिती केली ती विशिष्ट मतप्रचारासाठीच. शब्दात संस्कार करण्याची प्रचंड शक्ती सामावलेली आहे ते सर्वच संतांनी मनोमन ओळखले होते म्हणूनच त्यांनी समतेचा रात्रंदिवस पुकारा केला. त्यासाठीच तर कंटक दाखवून निर्दाळण करण्याचा महामंत्र ते देत गेले.

मऊ मेणाहुनी आम्ही विष्णुदास । कठीण वज्रास भेदू ऐसे ।
...भले तरी देऊ कासेची लंगोटी । नाठाळाचे काठी देऊ माथा
माय बापाहूनी बहू मायावंत । करू घातपात शत्रूहूनी ।

---

१ भक्तीचा कल्पवृक्ष-वहिरट

२ महाराष्टाचे कलात्मक काव्ये-रा. वि. कोळी.

अमरशेखांसारखा लोकाश्रयी कवी लोकांच्यात्र भावनाना बोलक्या करतो. अमरशेख सद्य:स्थितीबद्दल म्हणतात —

जीवन ठायी ठायी नाहिले। घटसर्पच जणु घशास भिडले. आणि पुढे तुकोबा-प्रमाणेच उपदेश करतात की—

होत आहे उध्वस्तच सारे
म्हणुनी तरी या उठा उठा रे
तार सप्त स्वरकी लावा रे
फुलवा गीत नव्याने ..
कणाकणातुन गीत स्फुरुं द्या
नवरस गंगा ही निर्झरु द्या
लढत गाउनी हे दाउनिया
अमर आमुचे गाणे.

किंवा कोकिळेला इशारा देताना ते म्हणतात—

गायचेच तर काढ नवा स्वर
साद शिंपुनी वनात निर्भर,
उठव वनीचा भोळा शंकर
नाचायाला लाव तयाला
घुमु दे तांडव गीत...कोकिळे

तुकोबा वज्रापेक्षा कठोर व्हायला सांगतात तर अमरशेख वनीच्या भोळ्या शंकराला तांडव नृत्य करायला सांगतात. किंवा या मायावी दुनियेचा चक्काचूर करा म्हणून आदेश देतात. या पाठीमागे विशिष्ट तळमळ आहे हे सहजच दिसून येते. "अमर-शेख हे कवी आहेतच, पण त्याचं काव्य जिवंत, जीवनाचं असं ते काव्य आहे. त्यामध्ये जीवनाचा ओबडधोबडपणा आहे, जीवनाचा जिवंतपणा आणि जीवनाची रसवत्ता आपल्याला त्यांच्या काव्यात आढळते.[१]

मराठी संतांना जातीयतेची धार बोथट करायची होती. कारण समतेसाठी ती एक मोठी अडचण असल्याची त्यांची निश्चित खात्री पटलेली होती. तुकोबा म्हणतात—

ब्राह्मण तो याति अंत्यज असता
मानवा तत्त्वता निश्चयेशी...
शांति क्षमा दया अलंकार अंगी
अंभग प्रसंगी धैर्यवंत...

१ प्रा. अनंत काणेकर.

यातीने अंत्यज असला तरी तो नामनिष्ठ असल्यास ब्राह्मणच मानला पाहिजे ही तुकोबाची स्पष्ट भूमिका आहे. परिस्थितीला विटून आत्महत्त्या करणाऱ्यांना तुकोबानी इशारा दिला आहे.

जीवनात काही 'राम' नाही. जीवन म्हणजे 'उगीचता' वाटते अशाना उद्देशून अमरशेख सांगतात–

उगीचता सारी नाही हे जीवन
जीवन आहे हे प्रयोग महान
...'उगीच' पोकळी नाही हे जीवन
जीवन आहे हे प्रयोग महान.

"समाजातले सर्व भेद, दुःख, दैन्य आणि व्याधि नष्ट करून न्यायाच्या, समतेच्या आणि माणुसकीच्या पायावर त्याची नवीन रचना करणे हे समाजवादाचे ध्येय आहे. हे ध्येय साध्य कसे होईल ह्या एकाच निदिध्यासाने साहित्यकारानी आणि कलावंतानी जनता जीवनाचे वास्तववादी चित्रण कलात्मक रीतीने करावयास हवे. समाजाचे सुख आणि प्रगति हेच साहित्याचे साध्य आहे. ज्ञानेश्वर म्हणतात—

वाचे बरवे कवित्व। कवित्वी बरवे रसिकत्व
रसिकत्वी परतत्त्व। स्पर्शु जैसा॥

साहित्याला परतत्त्वाचा स्पर्श व्हायला हवा. लोककल्याणाची भावना हेच परतत्त्व असे मी मानतो. समाजवाद हा लोककल्याणाचा एक मार्ग आहे. त्या मार्गाने जाणाऱ्या कोट्यावधी श्रमजिवी जनतेच्या आघाडीवर 'समाजवादी वास्तववादाचे' निशाण उंच धरून साहित्यिकानी आणि कलावंतानी चालावे"[1] लोककल्याणाची भावना तर सर्वच संतांच्या मनात मूळ धरून होती. तुकोबा नाही का म्हणतात ?...

जे का रंजले गांजले। त्यासी म्हणे जो आपुले
तोचि साधु ओळखावा। देव तेथेचि जाणावा.

" संत वाङ्मयात ज्याप्रमाणे उत्कट भावनावशता व दृढ श्रद्धामयता आहे त्याप्रमाणे तर्कशुद्ध व सुसंबद्ध असे तत्त्वज्ञानही आहे. या तत्त्वज्ञानाचे बलावर मानवजातीस भक्तीच्या साम्राज्यात उचलून नेण्याची शक्ति त्यात सामावलेली आहे. (The mystic may be a philosopher but is not necessarily so. His mystic experience is sufficient for his own elevation into Divinity but if he philosophies, he may raise thinking humanity into a Divine Kingdom of Ends.–pro–R. D. Ranade) संतकार्याचे

---

१ आचार्य अत्रे.

मुख्य क्षेत्र धार्मिक आहे. त्या धार्मिक क्षेत्रात एक विशिष्ट तत्त्वज्ञान अनुस्यूत आहे."[१] ह्या तत्त्वज्ञानात समतावादी विचारच प्रामुख्याने सामावलेला स्पष्ट दिसतो...." संतांचे सामाजिक कार्य हे अप्रत्यक्षरित्या घडलेले आहे. शास्त्र प्रामाण्याला व जातिव्यवस्थेला धक्का न लावता वारकरी पंथाने स्त्री शूद्रादिकांना आत्मविकासाचा मार्ग खुला करून दिला."[२]

संतांनी विशिष्ट ध्येय समोर ठेवूनच त्याचा आपल्या साहित्याद्वारे प्रचार केला. श्रीज्ञानदेव-तुकाराम आदि करून संतांची अक्षरे अमोल आणि आदर्शभूत आहेत. "ऐश्वर्याची वचनाक्षरे । वदती मधुरे तत्त्वदाती ।' असे निळोबारायांनी यथार्थ वर्णन केले आहे. संताना आदर्शभूत रचनाच अभिप्रेत होती आणि म्हणूनच संतबोध हा तत्कालीन समाजाला उद्देशून होता. ध्येयवादी साहित्यात मतप्रचार, बोध हा अपरिहार्य असतो हे आजवरच्या संतवाङ्मयानेच खरे म्हणजे सिद्ध केलेले आहे.

अमरशेखांच्या समाजवादी विचारसरणीच्या कवितेतही कित्येक ठिकाणी बोधपरता प्राप्त झालेली आहे.

शांतता लढाईत आधी लाव या जोम...
एकसंघ उभारुनि फळी युवकसेनेची
कर हड्डी नरम या धनिक युद्धखोरांची...
　क्षणात तुजला उमजुन येइल
　शक्ती माझी सामान्याची
　कवळ्यातच पृथ्वीला आवळुन...
　घशात श्वास असे तोवर
　शेवटचा टोला प्राणांतिक देऊन
　क्षयाला ठेचून काढलेच पाहिजे

या ओळीतून एक गोष्ट पुनः पुन्हा जाणवते ती ही की ध्येयवादाने पछाडलेल्या अमरशेखांना सारखे झुंजावेसे वाटते अशा वेळी सुप्रसिद्ध कवी ब्राऊनिंगची प्रामुख्याने आठवण येते.

Browning was a ever fighter. He looked upon life as a fight and preached, that we must fight this battle. 'With fire and faith within,' strive and thrive is his best blessing to mankind."

अमरशेखांचं काव्य नुसतं पुस्तकातलं नाही. ते त्यांच्या अंतःकरणापासून फुलून येऊन प्रत्यक्ष कृतीमध्ये नृत्यातून डोळ्यासमोर उभं राहतं. धरतीमधून कसे

१ भक्तीचा कल्पवृक्ष—वाहिरट.
२ प्रा. सरदार.

फळाफुलांचे कोंब वर येतात, तसे त्यांच्या अंतःकरणातून त्याचं काव्य येते ते काव्य जनतेच्य एकंदर सुख-दुःखाचं असं काव्य आहे. ”[१]

अमरशेखांचे काव्य वाचताना प्रसिद्ध कवी शेली याचीही आठवण येते. किंबहुना शेलीशीही त्यांचे अगदी जवळचे नाते आहे. ध्येयवादी कवीत कधी कधी कसे आश्चर्यकारक साम्य आढळू शकते त्याचे हे एक आदर्श असे उदाहरणच आहे.

शेलीने विचारस्वातंत्र्याचा व व्यक्तीवादाचा निराळ्याच रीतीने उत्कृष्ट उपयोग करून घेतला आहे. ईश्वरविषयक परंपरागत खोट्या समजुती, धर्मविषयक विवेक-शून्य कल्पना, चुकलेल्या मार्गाने जाणारी श्रद्धा इ. गोष्टीवर कवितेच्याद्वारे त्याने कठोर प्रहार केले. त्याचप्रमाणे घातक रूढीमुळे व वेडगळ समजुतीमुळे उत्पन्न झालेले अनेक सामाजिक अन्याय, सामाजिक विषमता, मानसिक गुलामगिरी, बौद्धिक गुलामगिरी इ. तिरस्करणीय गोष्टीवरही त्याने अगदी निर्दयपणे कोरडे ओढले आहेत. “ जुने जाऊ द्या मरणालागुनि जाळुनि किंवा पुरुनी टाका ” या केशवसुतांच्या उद्गाराप्रमाणे त्यानेहि उद्गार काढले असले तरी नवसमाजनिर्मितीचा आशावादही त्याच्याठायी ओतप्रोत भरलेला आहे अन्यायावर प्रहार करीत असता न्याय कोणता हे सांगावयासही तो विसरला नाही. त्याला स्वतःला सर्व प्रकारचे स्वातंत्र्य अत्यंत प्रिय होते.आणि असे स्वातंत्र्य विचार स्वातंत्र्य व आचार स्वातंत्र्य- प्रत्येकाला स्वतः च्या व्यक्ती विकासासाठी मिळालेच पाहिजे असाही त्याचा आग्रह होता. मूर्तीभंजन करून तो थांबला नाही, नवीन मूर्ती सुबकपणे कशी घडवावी हेही त्याने दाखविले हे शेलीचे वैशिष्ट्य आहे. ज्या गीतामधून शेलीची ही नवीन उदार विचारसरणी आविष्कृत झाली आहे. त्यांच्यामधूनच विशाल व सर्वव्यापक मानवतेचे उदात्त विचारही त्याने प्रकट केले आहेत... दीनाविषयी, दलिताविषयी आपला कळवळा अनेक ठिकाणी व्यक्त करून शेलीने स्वातंत्र्य व आशावाद या कल्पना ओजस्वी रीतीने आविष्कृत केलेल्या आहेत ”[२]

अमरशेखांचा नवसमाज निर्मितीबद्दलचा प्रखर आशावाद खालील कवितातून दिसतो. ते एके ठिकाणी म्हणतात—

१) दिवे जादुचे लाख पेटवुनि
    क्षणात बदलुन टाकिन जीवन
हे जग जर होईल निकामी
    तरिही काढिन युक्ती नामी
एक नवा ग्रह सुंदर बनविन
    इथले जीवन तेथे फुलवीन...

---

१ प्रा. अनंत काणेकर.

२ डॉ. रा. शं. वाळिंबे.

२) फेसाळत झेपा घेइल पाणी जेथे
सुंदरता जन्मा येइल तेथे तेथे
ठेचाळत मानव जाइल जेथे जेथे
बुद्धीची वृद्धि होइल तेथे तेथे

"जुनाट इमला झाला सारा पाडुन टाका.. देऊन धक्का...असा आदेश देताना अमरशेख त्याची कारणमीमांसाहि करतात. ते म्हणतात, इमारत जुनी झालेली आहे, ती जर पाडली नाही तर उगीचच जीव तिच्याखाली मरतील. म्हणून धक्का देऊन पाडून टाका. परंतु एवढेच भंजनाचे कार्य घडून उपयोगाचे नाही असे अमरशेखांना वाटते म्हणून ते पुढे म्हणतात—"

मारा हाका जमवा लोका
लोकशक्तिचा साधुनि मोका
आणिक बांधा नवी इमारत

ही इमारत एक दोघानी बांधून उपयोग नाही तर त्यासाठी अमरशेखांना संघ-शक्तीचीच आवश्यकता वाटते आणि त्याचे कारणही आहे ते हे की त्यांना जे मंदिर बांधायचे आहे ते मानवतेचे. हे मानवतेचे मंदिर व्यक्तिस्वातंत्र्य आणि व्यक्तिविकास या खेरीज मुळींच बांधले जाणार नाही. त्यासाठी प्रत्येक घटक कार्यप्रवण बनला पाहिजे. मंदिराचे रूपक असल्यामुळे पाथरवट ओघानेच येतो. तेव्हा प्रत्येक पाथरवटाने म्हटले पाहिजे की—

एक छन्निचा एक घाव तरि
बसु द्या माझा त्या दगडावर

अमरशेखांना जुनाट इमला पाडून टाकून नवे मानवतेचे मंदिर बांधण्याची उत्कट तळमळ लागलेली आहे. भंजनाबरोबर नवनिर्मिती हवी असे सांगणारे अमरशेख हे अलीकडच्या काळातील कदाचित पहिलेच असावेत.

"पूर्वी अराजकाच्या काळात कवीनी महाराष्ट्राच्या वृत्तीला वळण लावले. कृतीला चालना दिली कवीनी महाराष्ट्रधर्म स्थापला."[१] आजही सामाजिक स्थिति चमत्कारिक बनली आहे. अशावेळीं समाजाला कार्यप्रवण करण्याची जबाबदारी कवींना पार पाडावी लागणे अटळ बनले आहे. म्हणूनच—

धैर्य चिकाटीच्या कसोटीचा तो प्रसंग आहे बाका
दसकी लकडी एक्का बोजा दहा जमविण्यासही शिका

१ पु. म. लाड.

असे मंथन या कवितेत अमरशेख सांगतात. परिस्थितीची समाजाला जाणीव देण्याबरोबरच त्यांनी संघटनेचा संदेश दिला आहे.

" परिस्थितीचे दहि बुसळा रे कृतार्थ व्हा साधा मोका " असे अमरशेख का म्हणतात ? तर विशिष्ट ध्येयवाद उरी बाळगल्याने त्यांना समाजाने कार्यप्रवण व्हावे असे वाटते म्हणून. " भीष्मागत संकल्प सोडुनी प्राणपणाने भेरी फुंका " असा संकल्प कार्यप्रवण समाजाकडूनच घडेल याची पुरेपुर खात्री असल्यानेच अमरशेख तसा आदेश देतात.

" सिडनी, शेली, आजचे नवयुगाचे रशियन कवी, तरुण पिढीचे इंग्रजी आणि अमेरिकन कवी या सर्वांनी काव्याचा उपयोग काय व तो कसा करता येनो हे केवळ चर्चेनेच नव्हे तर आपापल्या कृतीने देखील सिद्ध करून दाखविले आहे."[१]

इलियट म्हणतो—

" The poet is much more vitally concerned with the social uses of poetry and with his own place in Society and this problem is now perhaps more importunately pressed upon his concious attention than at any previous time. "[२]

" संस्कृत साहित्यकारांना काव्याच्या या सामाजिक कार्याची विशेषसी चर्चा करावी असे वाटले नाही. "[३]

" काव्य हे शुद्ध आनंदाचे निदान आहे हे मान्य; पण केवळ आनंदाने माणसाच्या मनाचे कधीच समाधान होत नाही. म्हणूनच तर काव्याला सत् आणि चित् यांच्यात कार्यी लावले पाहिजे हे मत युरोपात प्रथम सॉक्रेटिसाने अगर प्लेटोने म्हणा, ठासून मांडले. नाहीतर आपल्या ' सुराज्या 'तून त्याला हाकून लावावे असे या तत्त्वज्ञान्यांनी ठरविले. सॉक्रेटिसाच्या मनावर काव्याची इतकी जबर मोहिनी पडली होती की, काव्याला हद्दपार करताना सीतेला घरातून काढताना रामचंद्रालासुद्धा झाला नसेल इतका विषाद त्याला झाला. राजकीय सुव्यवस्थेला व मानवी जीवनाला कविता उपयोगी पडेल असे जर कुणी कवी किंवा कवितेचा कैवारी शाबीत करील तर तिला सुराज्यात परत घेऊ अशी त्यावेळीच त्याने दवंडी पिटविली. कारण त्याला हे मान्य होते की कविता आनंददायी तशीच उपयोगी झाली तर खरे जनहित साधेल. "[४]

काव्याच्या सामाजिक ध्येयाचा संतकवींचा शोध रामदासस्वामींनी आपल्या

---

१ साहित्यातील संप्रदाय.

२ इलियट.

३ पु. म. लाड.

४ सह्याद्रि, जून १९४२

नित्याच्या निःसंदेह शब्दात स्पष्ट मांडला. काव्याचे धीट पाठ व प्रासादिक असे तीन वर्ग त्यानी कल्पिले.

धीट म्हणिजे धीटपणे केले। जे जे आपुल्या मनास आले
बळेचि कवित्व रचिले। या नाव धीट बोलिजे ।।
पाठ म्हणिजे पाठांतर। बहुत पाहिले ग्रंथांतर।
तयासारिखा उतार। आपणहि केला सीघ्रचि
कवित्व जोडिले। दृष्टि पडिले तेच वर्णिले।
भक्तीवाचून जे केले। त्या नाव धीटपाठ।
...जेणे सद्वस्तु भासे। जेणे भास हा निरसे।
जेणे भिन्नत्व नासे। या नाव कवित्व। जेणे
होय समाधान। जेणे तुटे संसारबंधन। जया मानिती
सज्जन। तया नाव कवित्व

अशी कवित्वाची व्याख्या करून रामदासांनी कवीकडून कोणत्या अपेक्षा केल्या, त्या त्याच्याच शब्दात पहा—

की हे सुखाची तारुवे लोटली। आक्षै आनंदे
उतटली। विश्वजनास उपेगा आली। नाना प्रयोगा
कारणे। की हे निरंजनाची संपत्ति। की हे
विराटाची योगस्थिती। ना तरी भक्तीची फळश्रुती।
फळास आली. ।।

सॉक्रेटिसापेक्षा रामदासाची अपेक्षा अधिक व्यापक व विशाल होती.

प्रचीति आणि व्यक्तित्व यांच्या समन्वयातूनच काव्याचे ध्येय आणि कार्य ठरत असते. अमरशेखांना भोवतालच्या विश्वाची प्रचीति सूक्ष्मपणे येत असल्याने त्यांच्या तरल भावनांना त्यातील आर्तता आणि उत्कटता साहचर्याने जाणवते. मग त्याचे व्यक्तित्व वेगवेगळ्या कृतींद्वारा अविष्कृत होण्याची धडपड करते. गुदरून जाणारे मन आक्रंदून उठते. ते कधी उपहासाचा आश्रय घेते, तर कधी पेटून तरी निघते. 'नव संस्कृति' कविता त्या दृष्टीने पाहण्यासारखी आहे. ते म्हणतात—

. नेत्र विषारी शिव्या भिकारी
कर्कश कानावर आदळती
ते हातवारे नेत्रपल्लवी
तसे अंग विक्षेपही छळती
त्यातहि सफेद संस्कृतिवाले
ते तर अगदी असूसलेले

शिष्ट संमतच धक्का त्यांचा
कायद्यासही धूळ चारितो . . .

आणि हे असह्य जिणे पाहून त्यांना अगदी पुरता वीट येतो. सामाजिक कल्याणाची आच लागलेल्या अमरशेखांना हे उघड्या डोळ्यांनी मुळी पाहवतच नाही आणि मग ते म्हणतात–

' एक दिवस लावीत आग या । क्षुद्र, असंस्कृत अशा जगाला... "

" Great writing is the echo of a great soul "[१] ( व्यक्ति विशाल, प्रचीती व्यापक असली तर काव्यही विशाल व व्यापक होईल. ) कवीचा राग, द्वेष, आचार, विचार, आशा-निराशा, हर्ष-विषाद ही सारी याबरोबर काव्याची सामग्री समजली पाहिजे.

" माझी कविता मी हजारो लोकापुढे ठेवतो...तिथे प्रतिसाद मिळतो. कदर होते. न्याय लाभतो ..माझी कविता याच पायावर उभी आहे. "[२] अमरशेखांच्या कवितेत सर्वसामान्य माणसांच्या कल्पनांचे, आशा-आकांक्षांचे, हर्ष विषादाचे स्वच्छ प्रतिबिंब दिसत आहे म्हणूनच ती खऱ्या अर्थाने प्रत्ययकारी झाली आहे.

" कवि हा त्या काळच्या राष्ट्र पुरुषाचे मुख झाला तरच त्याच्या वाचेमागे समाजाचा भावार्थ धावत येईल. मध्ययुगाच्या अंधारात प्रजा चाचपडत असता प्रकाशाकडे नेणारा डान्टे, यंत्रयुगाच्या आरंभी समतेची स्वप्ने सांगणारा शेली, पंडिताच्या अहंकाराच्या वेटोळ्यांतून अमृताचे घट हिराबून आणून शूद्रास मुक्तहस्ताने वाटणारा ज्ञानेश्वर ह्या सर्वांनी समाज व व्यक्ति यातील आडपडदा काढून टाकला होता. आपली भावना ती लोकांची व लोकांची ती आपली इतका मनाचा व्यापार केल्यावर ते अपार काव्य संसाराचे प्रजापति होऊ शकले यात काय नवल ? "[३]

महाराष्ट्रात संयुक्त–महाराष्ट्रासाठी झालेला लढा अपूर्व होता. त्यावेळी महाराष्ट्राच्या जाज्वल्य भावनांचा कवितेद्वारे जर खरा उद्रेक केला असेल तर तो अमरशेखांनी " आमच्या महाराष्ट्राची कवी परंपरा अगदी स्पष्ट आहे. ती परंपरा अगदी शुद्ध स्वरूपामध्ये, निर्मळ स्वरूपामध्ये आज अमरशेखांनी चालवलेली आहे. अमरशेखांनी महाराष्ट्राची जी सेवा केलेली आहे ती महाराष्ट्राच्या इतिहासामध्ये सुवर्णाक्षरांनी लिहावी लागेल. "[४] संयुक्त महाराष्ट्राच्या विराट लढ्यात आघाडीवर उभे राहून अमरशेखांनी आपली कवने गाऊन ती गीते म्हणजेच साऱ्या मराठी

---

१ Longinus

२ अमरशेख.

३ पु. म. लाड.

४ आचार्य अत्रे.

जनतेची मागणी हे सिद्ध केले. त्याच्या तेजस्वी आणि ओजस्वी गीतानी भारलेले हजारो लोक त्यांच्या मागून चालू लागले. अमरशेखांच्या काव्यातून समाजाचा खरा भावार्थ धावत होता हे संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्यात तर प्रकर्षानेच सिद्ध झाले. " मायकोव्हस्कीच्या काव्याचे वर्णन जे आचार्य अत्र्यांनी केले तेच वर्णन महाराष्ट्राच्या चळवळीच्या वेळी अमरशेखांच्या काव्याला बरोबर तंतोतंत लागू पडते. "[१]

कवी कविता कशी लिहितो या आपल्या निबंधात मायकोव्हस्कीने एकच गोष्ट अग्रगण्य म्हणून मांडली आहे. ती म्हणजे--

" काव्याव्यतिरिक्त न सुटणारा सामाजिक प्रश्न. " (The existence in society of problem the solution of which is inconceivable except in terms of a poetic work.) ' अर्थात असल्या प्रश्नाचा निकाल करण्यासाठी सामाजिक अडचणी काय आहेत याचे यथार्थ ज्ञान हवे. समाजाची चेतना कवीच्या मनात आली म्हणजे, पुढे जन्मास येणारा नवा अवतार कौसल्येप्रमाणे त्याच्या अंगात आधीच संचारतो. ' समाजाच्या जागृतीचा साथीदार ' या शैलीने केलेल्या कवीच्या वर्णनाचा मायकोव्हस्कीने निराळ्याच शब्दात पुनरुच्चार केला आहे. "[२]

भोवतालच्या परिस्थितीची प्रचीती उत्कटत्वाने यायला कवीची संवेदनाशक्ती अतिशय तरल आणि तीव्र असावी लागते. तशी ती असली की काव्यविषयासाठी त्याला स्वतःला तरी अडून बसण्याची वेळ येत नाही. तो जे जवळून पाहतो त्याच्याशी त्याचे साहचर्य निर्माण होते. आणि त्याचेच प्रतिबिंब त्याच्या कलाकृतीतून जन्माला येते. ध्येयवादी कवी मात्र केवळ चित्रण करून थांबत नाही. तो त्याच्या पुढे जातो. समाजाच्या आशा-आकांक्षेचा तो उद्गाता बनतो. आपली मतप्रणाली, आपले तत्त्वज्ञान याच्या निकषावर प्रत्येक गोष्ट घासून पाहण्याचा त्याचा मनोधर्म जागृत होतो. स्वतःला अभिप्रेत असलेले सत्य त्याला आढळले नाही, तर तो संत्रस्त बनतो. विसंगतीचे अचूक निर्देशन करतो आणि तिचे कधी विदारक, कधी भयप्रद, कधी भीषण कंगोरे दाखवितो. मात्र केवळ बीभत्स, केवळ स्त्रैण असे चित्रण सहसा ध्येयवादी कवी करणार नाही. आपल्या वेदनेची कळ नुसती दाबून ठेवण्यात ध्येयवादी कवीला समाधान होत नाही, तर ती आविष्कृत करण्यात त्याला समाधान लाभते.

" शेतकरी, मजूर यांच्या समाजात जो खुद्द वावरत नाही त्याच्या काव्यनाडीचे ठोके लोकात खेळणाऱ्या ताज्या रक्ताबरोबर कसे पडतील? मायकोव्हस्की मजुरांचा इतका मित्र होता की ओडेसा येथील गोदीत काम करणाऱ्या मजुरांना तो आपल्यापैकीच वाटे. तुझे ' लेनिन ' हे काव्य जरा स्वस्त किमतीत छापावयास सांग असे

---

१ प्रा. अनंत काणेकर.

२ पु. म. लाड.

एकदा तेथील मजुराने त्याला रस्त्याने जाता जाता विनविले आणि म्हणूनच त्याच्या कवितांच्या लक्षावधी प्रती खपल्या. आमच्यापैकी किती कवी ‘ जनमित्र ’ या संज्ञेस पात्र आहेत ? इतकी पात्रता नसताना केवळ नवी टूम म्हणून जर आम्ही मजुरांचे जीवन ग्रथित केलेल्या समाजसत्तावादी ( socialist ) कविता लिहू लागलो तर मार्क्सवादावर एक नवे भक्तिकाव्य लिहिण्याचे श्रेय मात्र आमच्या पदरी पडेल. ज्याची प्रचीतीच आली नाही, ते सत्य काव्यात सांगावयाचा प्रयत्न जर आम्ही केला तर ते काव्य कृत्रिमच ठरणार. अनुभव आत्मसात न झाल्यामुळे काव्य श्वानाच्या वमनाप्रमाणे किळसवाणे होईल. त्यात ‘ श्री ’ नसल्यामुळे ते खरोखर अश्रील म्हणजेच अश्लील होईल. त्यापेक्षा सत्याला स्मरून आपापल्या खऱ्या वृत्तीप्रमाणे काव्य लिहावे हा उत्तम मार्ग.”[१]

अमरशेख आपल्या खऱ्या वृत्तीप्रमाणेच काव्य लिहीत आणि जगत असल्यामुळे त्यांच्या कवितेत कामगारजीवनाचे बारकावे दिसतात. ‘माझी मालन कामानं सुकली’ या कवितेतील वास्तव जीवन पाहा —

फाटं पिकलेलं जांभूळ ताजं
नाचे चौखूर हरिणच माझं
निरत्या सायीचं रं लोणि ताजं
ज्वानी साच्याच्या सांध्यात टाकली रं...
कोंडवाड्यात कोंडून घेऊन
टाकला जीव रहाटानं खाऊन
काम केलं तरी मन लावून
वर्ति नायकिनीची चाले टकली रं...

किंवा ‘ राधे राधे-होय राधिके ’ ही कविता घ्या -

...मी गोकुळीचा नाही राजा
कृष्ण आहे मी, आहे परंतु अगदी साधा
कारकून मी...
गोवर्धन गिरिधारी नाही
की जगताला देईन आश्रय
गिरि उचलोनी करंगळीवर
आश्रय नाही तुला मला . . .
तिष्ठलीस तू माझ्यासाठी
हे का मजला उमगत नाही !

---

१ पु. मं. लाड. ( सह्याद्रि, जून १९४२ )

काय करू मी हतबल झालो...
...लग्नानंतर ते चिरमीलन
मी तू, तू मी विसरुन जावे
एवढीच ना मनी अपेक्षा!...
म्हणुनिच खोली शोधायाला
गेलो होतो माझ्या राधे
धडपड माझी निष्फळ ठरली...

केवळ चित्रण करून चालत नाही. सत्य हे सांगितलेच पाहिजे. म्हणूनच अमरशेख ते कळवळून सांगतात. कवी विंदा करंदीकरांनीही अमरशेखांप्रमाणेच 'मजूर' कवितेत "मृत्यूची ही प्रयोगशाळा भेसुर' हे सत्य सांगितले आहे. शाहीर अमरशेख क्षयाचे भेसूर दर्शन घडवितात आणि करंदीकर वराचे 'घरपण' दाखवतात. मजुरांच्या जीवनाची प्रचीती दोघांनाही आलेली आहे. मजुरांच्या जीवनाचे चित्रण करणारे हे दोनच कवी नाहीत. प्रा. वि. म. कुलकर्णीही यांच्या 'पंगतीला' सहज बसतात. त्यांचा 'रात्रपाळीचा मजूर' पाहा. ही प्रचीती यावी लागते; पण असे असले तरी अमरशेखांच्या 'मजूर' दर्शनात जी खोल उत्कटता आहे ती इतरांच्यात मात्र तेवढ्या प्रमाणात दिसत नाही. प्रचीतीबरोबर सत्य-प्रकटीकरणाची आवश्यकता उत्पन्न होते. ती अमरशेखांच्या कवितेत अधिक दिसते-म्हणूनच त्यांच्या कवितेत एक प्रकारचा कडवटपणा दिसतो.

"आपल्या लोकांची व कालाची जो काव्ये करतो, त्यास रामदासांचा शब्द योजून 'जनस्वी' म्हणू. हे विशेषण रामदासांनाच खुद्द लागू केले पाहिजे. लोककवी या दृष्टीने रामदास आणि मायकोव्हस्की यांत बरेच साम्य दिसते."[१]

समर्थ रामदासांना त्या काळी 'आनंदवनभुवन' निर्माण करायचे होते. ते त्यांचे स्वप्न होते. ते म्हणतात—

सर्व सद्या, कला विद्या । न भूतो न भविष्यती
वैराग्य जाहाले सर्वै । आनंदवनभूवनी

आणि हे स्वप्न ध्येय-साकार करण्यासाठीच 'मराठा तितुका मेळवावा' हा मंत्र दिला तो 'महाराष्ट्र-धर्म' वाढण्यासाठी. तो कोणत्या मार्गाने वाढेल? . तर

रामदासी ब्रह्मज्ञान । सारासार विचारणा
धर्मस्थापनेसाठी । कर्मकांड उपासना

रामदासांनी महाराष्ट्रधर्माचाच अव्याहत प्रचार केला.

१ सह्याद्रि, १९४२.

१०१५८ १७०१ ७० २ ११४५९

" जाहिरातीपासून महाकाव्यापर्यंत मायकोव्हस्की लिहीत असे. आणि संसारातील किडामुंगीसारख्या बारीकसारीक गोष्टीपासून तो वेदांतापर्यंत रामदासांची प्रतिभा चाले. दोघाच्याही दुकानात सारखाच व्यापार चालू होता. देशार्थच त्यातून निष्पन्न होत असे. त्या काळचे प्रश्न रामदासांच्या वाङ्मयात निश्चयात्मक समाधान होईल अशा रीतीने सोडविलेले आहेत. प्रपंच आणि परमार्थ यांचा मेळ कसा घालावा, हा त्या काळी महाराष्ट्रापुढे असणारा प्रश्न त्यांच्या काव्याचा मुख्य प्रतिपाद्य विषय. त्याप्रीत्यर्थ क्वचित धीट उद्गार काढावे लागले तरी त्याची त्यांनी क्षिती बाळगली नाही. कवी ' जनस्त्री ' झाला म्हणजे त्याला आपण बंधने घालू नयेत. त्याची कृती नियतिकृत नियमरहितच शोभते. त्याच्या काव्यात सर्व प्रकारच्या काव्याचा अंतर्भाव आपोआप होईल. "[१]

आजची सामाजिक विषमता कशी नष्ट होईल आणि खराखुरा समाजवाद कसा प्रस्थापित होईल याचीच घोर चिंता अमरशेखांना लागून राहिली आहे. म्हणूनच तो आणण्यासाठी कोणत्या गोष्टी आचरण्याची वेळ आली आहे ते ते निर्भीडपणे मांडतात. तीव्र असंतोष वाटला की ते उपहासात्मक रचना करतात विषमतेचे उपहासात्मक दर्शन त्यांनी " मुंग्या आणि साप " या कवितेत उत्कृष्टपणे घडविलेले आहे.

समर्थांनी ' धर्मस्थापनेसाठी । कर्मकांड उपासना ' सांगितली. अमरशेखांनीही समाजवादासाठीच कर्मकांडाचीच उपासना सांगितली आहे. ते म्हणतात—

परिस्थितीचे दहि घुसळा रे व्हा कृतार्थ साधा मोका
लोणी आले, झाले आता सर्व संपले म्हणू नका
त्या लोण्याचे तूप कराया करा प्रज्वलित अग्निसखा

हाच उपासनेचा संदेश. ध्येयवादी कवी जनकल्याणासाठी किती तळमळत असतो त्याचे अमरशेख हे एक ज्वलंत चालते बोलते असे उदाहरण आहे. अमरशेख हे सर्वार्थाने ' जनस्त्री ' कवी ठरतात.

आजच्या परिस्थितीत संघटनेची नितांत आवश्यकता असल्याचे आवर्जून सांगतात. ( दसकी लकडी एकका बोजा दहा जमविण्यास शिका '—मंथन ). रामदासांना आनंदवनभुवन निर्माण करायचे होते; तर अमरशेखांना नवभारत निर्माण करायचा आहे. त्यांची ' पाव शतक ' ही कविता त्या दृष्टीने जरूर पाहावी. ते म्हणतात—

रोगी कुठला ? दुःखी कोण ?
मिळणे नाही शोधशोधुनी

१ सह्याद्रि, १९४५.

अशा भारताची निर्मिति
करून दाविन मी या जगती

'जगाच्या पाठीवर' असा नवभारत निर्माण करण्याचे स्वप्न अमरशेखांपुढे तरळत आहे. त्यासाठीच तर संघटना हवी आहे. सामूहिक शक्तीची जरूरी आहे. म्हणूनच ते आत्मविश्वासपूर्वक म्हणतात —

दिसे जरी मी आज एकला
उद्यास मिळविन अनेक साथी
हात देऊनी त्यांच्या हाती
ओढुनि स्वर्गा आणिन जगतीं
वाट अचुक मी चालत आहे
तोवर कुठली चैन जिवा या...

रामदासांच्याच जातकुळीतील ही विचारसरणी नाही असे कुणीही 'जागा' झालेला म्हणणार नाही.

"जनमनाचा ठाव घेऊन, परंपरा राखून कविता निर्माण करताना मानवतेच्या सनातन ध्येयाचा विसर पडू देता कामा नये. जनमनाचा ठाव घेणे म्हणजे वरची घाण उपसणे नव्हे. लोकांकरिता कविता लिहिणे म्हणजे लोकांना पाहिजे अशी कविता लिहिणे नव्हे. तर या काळास पुढे नेणारी, त्या काळाला कल्याणकारी अशी. समाजातील सत्यात विश्वातील ऋत स्थापित करणे हे तर कवीचे मुख्य कार्य. ज्याला त्या युगाचा कवी होणे आहे त्याने आपला नावेचा मार्ग विश्वप्रेमाच्या अढळ ध्रुवताऱ्याच्या साहाय्याने काढला पाहिजे म्हणजे मग तो ते तारू मानवतेच्या बंदरात नेऊ शकेल."[१]

अमरशेखांच्या कवितेत साम्यवादाचा प्रचार आहे असा आक्षेप घेतला जातो. होय, आहे; जरूर आहे. पण साम्यवादाचा प्रचार अमरशेखांच्याच कवितेत प्रथम दिसतो का? त्या काळाचा कवी अनुरूप असणाऱ्या तत्त्वज्ञानाचा प्रचार करीत राहिला तर त्यात बिचकण्यासारखे काय आहे? 'साम्यवाद म्हणजे समतावाद.' या समतावादाचा प्रचार मराठी कवितेद्वारे कधी झालाच नाही, असे म्हणणे निश्चितच निराधार आहे. माणसामाणसांत तरी जन्मामुळे विषमता नसावी हे साम्यवादाचे प्रमुख तत्त्व मानले जाते. "ईश्वरप्राप्ती करून घेणे व इतरेजनांनाही तेच सुख प्राप्त करून देणे हाच (संतांच्या) चळवळीचा मुख्य भाग होता. पण या ध्येयसिद्धीसाठी जातिभेद आड आला, अस्पृश्यत्व आड आले तर साधुसंतांनी त्याविरुद्ध परंपरेस व प्रस्थापित धर्माच्या रूढीस सोडून क्रांतिकारक विचार बोलून दाखविले व प्रसंगी

१ पु. मं. लाड.

आचरणही केले. चातुर्वर्ण्याविरुद्ध कडाक्याने कोणी प्रहार केले नाहीत. पण भक्तीच्या क्षेत्रात त्याचा उगाच बडेजावही माजवून ठेवला नाही. परमेश्वराची लेकरे असणारी सर्व माणसे एकाच समान भूमिकेवर असून त्यांच्यांत भेदभाव करताच येणार नाही हे मुख्य सूत्र संतांच्या साम्यवादाचे होते." [१]

आज काळ बदलला आहे. आज धर्माची धार बरीचशी बोथट झाली असून त्याची जागा 'अर्थाने' व्यापली आहे. या आर्थिक दृष्टीने निर्माण झालेली विषमता नष्ट करण्याचे तत्त्वज्ञान अमरशेख मांडीत आहेत. "माणसामाणसांत विषमता आणि ती जीवनाच्या सर्वच क्षेत्रांत असावी हेच सर्व अनर्थाचे मूळ मानले जाते. धर्म, अर्थ, वर्ण, अधिकार, देश, भाषा, संस्कृती, ज्ञान इ. विविध कारणांनी माणसामाणसांत फरक पडत राहतो. पण विषमतेचाच धर्म बनविणे व या विषमतेमुळेच जीवनास वैचित्र्य व त्यायोगे शोभा प्राप्त झाली आहे, परमेश्वरानेच जेथे भरपूर विषमता निर्माण केली आहे तेथे आपण बापुडे मानव ती कशी दूर करणार असे म्हणणे, अशा प्रकारच्या तत्त्वज्ञानाचा पाया आजकाल ढासळू लागल्याचे आपण पाहतोच. माणसाने एकमेकांत केवळ जातीवरून, वर्णावरून, पैशावरून, धर्मावरून भेद-उपभेद करावेत व त्यात पुन्हा एक श्रेष्ठ, दुसरा कनिष्ठ असे जन्मावरून ठरवावे ही रीत अगदीच विपरीत व माणुसकीस लांछन आणणारी आहे. केवळ जन्म अमक्या जातीत झाला म्हणून एखाद्या व्यक्तीच्या मनातील नवविचारांचे कोवळे अंकुर बाहेर येण्याची संधीच न देणे हा शुद्ध स्वार्थ आणि समाजाच्या दृष्टीने घातकारक उपाय आहे. या विलक्षण समाजरचनेमुळे कित्येकाची जीवने उदास होऊन गेली, कित्येकांची मुखे काळवंडून गेली, शतकेच्या शतके निघून गेली आणि मानवप्राण्याच्या एका फार मोठ्या विभागास सर्व सुखांना वंचित होऊन राहावे लागले. माणसाने माणसाला किती हीन दीन करून टाकले! विद्या नाही, पैसा नाही, धर्म खऱ्या अर्थाने नाही, व्यावहारिक सुख नाही— असे हे लाजिरवाणे जिणे माणसांनी जगावे तरी कसे? पशूंच्यापेक्षा आपण काही वेगळे आहोत ही जाणीवच त्यांना उरली नव्हती. ती करून देणारा पहिला महात्मा गौतम बुद्ध. आणि त्याच्याच म्हणण्याचा अनुवाद निदान या बाबतीत तरी का होईना पण तो देशी भाषांना आध्यात्मिक वैभव व लावण्य प्राप्त करून देणाऱ्या साधुसंतांनी केला व आध्यात्मिक वादाबरोबरच व्यावहारिक समतेची कल्पनाही लोकांना आणून दिली." [२]

संतांनी विशिष्ट ध्येयवाद कसा 'साकार' केला हे ह्यावरून समजते. त्यासाठीच तर त्यांनी नवे तत्त्वज्ञान जन्माला घातले आणि त्याचा प्रचारही भरपूर प्रमाणात

---

१ डॉ. प्र. न. जोशी.

२ नवभारत, मार्च, १९५६.

केला. काळाबरोबर तत्त्वज्ञानही बदलते आजचे युग समाजवादाचे, समतावादाचे आहे. तेव्हा त्या तत्त्वज्ञानाचा प्रचार 'जनस्त्री' कवीकडून होत जाणे अगदी अपरिहार्य आहे. अमरशेख त्याला अपवाद नाहीतच. त्यांना मानवतेच्या बंदराकडे जायचे आहे. म्हणूनच ते आपल्या काव्याचे तारू योग्य दिशेने हाकतात हे, "वाट अचुक मी चालत आहे" ही ओळच मळी स्पष्ट करते. शाहीर अमरशेखांजवळ बुद्धिवादी जीवनदृष्टी निश्चितच आहे. म्हणूनच ते इतक्या आत्मविश्वासपूर्वक सांगतात. मानवतेच्या बंदरात तारू नेणाऱ्या कवीला 'प्रकाशमय जीवन झाल्याचा' पदोपदी साक्षात्कार होत असतो. अमरशेखांना तो तसा झाला असल्याचे 'माझा देहचि धरतीमाता' या कवितेत दिसते.

काळातील विचारसरणी आत्मसात करून तिचा काव्याच्या द्वारे अत्यंत तळमळीने व प्रामाणिकपणे आविष्कार करणे ही गोष्ट फार थोड्या कवींच्या मनोवृत्तीला रुचते. आपल्या काळातील सभोवताली डोळ्यांसमोर घडणाऱ्या गोष्टी सूक्ष्म दृष्टीने व सहानुभूतीने पाहून आणि नवीन उदार व स्वातंत्र्यवादी विचारसरणी पचवून, खोट्या नीतिकल्पना, दांभिक रूढी, अनेक सामाजिक अन्याय, अनेक प्रकारची गुलामगिरी इ. गोष्टींविरुद्ध पराकाष्ठेच्या धीराने झगडण्याचे कार्य करण्यासाठी एखादा केशवसुत किंवा एखादा शेलीच जन्माला यावा लागतो. भोवतालच्या सामाजिक किंवा राजकीय घटनांची संपूर्णपणे उपेक्षा करून अगदी तटस्थतेने किंवा अलिप्ततेने आपल्या स्वतःच्या कलानिर्मित स्वप्नसृष्टीमध्ये 'गुंफीत कल्पनाजाला गुंगणे' हेच बहुतेक स्वच्छंदवादी कवींचे सर्वात महत्त्वाचे कार्य असते; इतकेच नव्हे तर हेच आपले एकमेव कार्य असून जगातील व्यावहारिक गोष्टींशी आपला सुतराम् संबंध नसतो, अशीच जणू त्यांची प्रतिज्ञा असते; बरोबरच आहे; 'जगाचे बंध कोणाला ?... जगाला बांधला त्याला.'

प्रणयगीतात, निराशागीतात, निसर्गगीतात आपल्या कल्पनाविलासाचा विलोभनीय आविष्कार दाखविणाऱ्या शेलीने स्वातंत्र्यवादी गीतांत व आशावादी गीतांत प्रत्यक्ष वर्तमानकाळातील घटनांविषयी ममत्व दाखविले आहे. आपल्याकडील विनायका-सारखे कवी मनाने नेहमी भूतकाळात रममाण झालेले दिसतात. परंतु वर्तमान काळाविषयी आत्यंतिक आस्था दाखविणारे कवी विरळाच. यामुळे शेली व केशवसुत यांच्यासारखे कवी अपवादात्मकच मानले पाहिजेत. मनुष्याच्या अमर्याद कर्तृत्वावर विश्वास; नवीन विचारांचा तेजस्वीपणा, जीर्ण विचारांचा निर्जीवपणा यांचा आविष्कार आणि भावी काळाविषयी जबरदस्त आशावाद या गोष्टी शेलीच्या Ode to the West Wind या प्रसिद्ध कवितेत अत्यंत ओजस्वी रीतीने प्रकट झाल्या आहेत...जातिवंत व रसरसलेला आशावाद प्रकट करणाऱ्या कवीच्या ठिकाणी काही वेळा पराकाष्ठेचे दौर्बल्य दिसावे व ते त्याने मोकळेपणाने प्रकटही करावे हा विरोध अनेकांना अतर्क्य वाटेल यात शंका नाही. परंतु शेलीसारख्या अतिरिक्त भावनाशील स्वच्छंदवादी

कवीच्या स्वभावधर्मात या परस्परविरोधी गोष्टी मुरलेल्या असतात. या भिन्न दोन प्रवृत्ती त्याच्या ठायी एकाच वेळी सुद्धा अस्तित्वात असू शकतात....आपल्याकडील केशवसुत, बालकवी इ. स्वच्छंदवादी कवींमध्येहि या विरोधी प्रवृत्ती दिसून येतात."[१]

अमरशेखांच्याही कवितेत या दोन्ही प्रवृत्तींचे मोठे मजेशीर मिश्रण झालेले दिसते. त्यांच्या कवितेत जसा रसरसलेला आशावाद दिसतो तशा निराशेच्या सूक्ष्म छटाही असल्याची खात्री होते.

१) ...अन्नकणाने जिवंत ठेवुन
ज्ञानकणाने फुलवित नेऊन
ज्ञानतोय ते
आकंठ सतत पिऊन, झिंगुन
...आदि अंताच्या झोल्यावरती
मुक्त आणि बेछूट
बेधडक झोले घेणे
बेट्या यात आहे रे जीवन
अरे मनाच्या क्षुद्र पारव्या...

२) सरिता सदाच राहिल वाहती
उतार धर्मा जागुनि जगती
...ये रोधाया कडेकपारी
बांध असू दे पर्वतमाथी
शक्ती एकवटुनिया सारी
फोड बांध तू सोडुनि भ्रांती
सरिता सदाच राहिल वाहती...

३) हिलाच अमृत देउन सुखविन
अजर नि अक्षय बनवुन ठेविन
सौंदर्य असो कुठलेही मग
त्यास अमरपद देउन टाकिन..

४) वर्षाऋतु मी क्षणात होईन
रिझवील जो जनगीत गाउनी
कोकिल-स्वरसह वसंत देइन

१ डॉ. वाळिंबे, ( साहित्यातील संप्रदाय )

उरल्या सुरल्या शब्दसंचया
लोकशाहिरा तुलाच अर्पिन
जिद्द नि ईर्षा मर्दाची पण
मर्दालाही मुजरा देईन

या कायेचे करुनी जोडे
त्या देवाच्या पायी घा न
मानवदेही असूनिही जो
स्वर्गच मानव-चरणी आणील...

निराशेच्या छटा—

१) होते नव्हते मनही झिजले
आज क्षुधेने सारे थिजले
हात शरिर अन मनहि न उरले
प्रचंड ऐशा निर्मितिसाठी
निर्मिति व्हावी ज्याच्यासाठी
त्याच जीवनाची घ्या माती
आज चालली हातोहाती

२) सत्य पळाले जगातुनी या
लावा या जगताला आग
श्रमास नाही कवडी किंमत
माणुस हिंमत झाली खाक
रेती–मातीलाही मोल
कवडी आज आहे अनमोल
अनमोल असे झरती आसू
भावनांचि पण जळते बाग

३) ताजमहालाचा । दगड पायाचा
तो पण जायचा । नेम नाही

४) आता वाळू झाले जीवन
फिरे किनाऱ्यावरती वणवण
संघर्षातच आहे उभा पण
हर्ष कोठला ? हिरमुसले मन
त्या डबक्याच्या शोधि खुणा
...मी मीन वेगळा जळाविणा

२) कडेलोट दुःखाचा होता
अजुनि कशी ती पेटत नाहित
पेटत नाहित कशी ही मने ?
का मनेच मरुनी गेली ?...

अमरशेखाच्या एकाच मनात आशा-निराशा यांच्या पाठशिवणीचा खेळ कसा मजेशीर चालला आहे हे वरील ओळींवरून सहज समजून येते.

मनुष्याच्या अमर्याद कर्तृत्वावर अमरशेखांचा गाढ विश्वास आहे, तसाच शेली-प्रमाणेच काळाविषयीचा जबरदस्त आशावादही आहे.

१) आता सत्यासत्या लावूनिया आग
विचाराला जाग येऊ दे रे

२) पक्ष पंथ धर्म भेद सारुनी
गिळिली भूमि मुक्त करोनी
गान शांतिचे घुमवू गगनी
न्यायी भारत नाहि आक्रमक दावू या जगताला...

३) कभिन्न काळ्या पाषाणाला
मुळ्या कोवळ्या छेदित ज्या
त्याच मुळ्यांच्या जोरावर मी
उडविन काळाच्या चिंध्या
जरी उन्मळुन पडेन झुंजत
तरी समाप्ती नाहि तिथे
मुळ्या हजारो वृक्ष प्रसवतील
पाय रोवतिल पुन्हा इथे ..

ध्येयवादी कवीच्या कवितेत आशा-निराशेच्या छटा बहुधा दिसतातच. भोवतालच्या काही दृश्यांमुळे तो क्षणैक निराश बनतो. परंतु ती निराशा सतत काही टिकून नाही. त्या निराशेवर त्याचा प्रखर आशावाद मात करतो.

" समाजात सुधारणा घडवून आणण्यासाठी एक साधन या दृष्टीने केशवसुत काव्याकडे पाहत आहेत. 'स्फूर्ति' कवितेतील "पद्यपंक्तिची...देउ कसे" या ओळी त्याची साक्ष देतात.

काव्याचे निशाण हातात धरून केशवसुतांना समाजात जिकडे तिकडे बंडाची धामधूम उडवून द्यावयाची आहे. काव्याच्या प्रयोजनाविषयीचा हा विचार या पद्धतीने केशवसुतांनीच प्रथम आवेशाने मांडला. अर्थात काव्याचे हे एकच प्रयोजन असले पाहिजे असा त्यांचा आग्रह नाही. त्यांचा आग्रह इतकाच आहे की,

काव्याची जी अनेकविध प्रयोजने असू शकतील त्यांच्यापैकी उद्‌बोधन अथवा जागृती हे एक महत्त्वाचे प्रयोजन आहे. आणि प्रचलित दुरवस्था व तिचे घातुक दुष्परिणाम विचारात घेतल्यावर काव्याने हे कार्य तातडीने करावयास पाहिजे. "[1]

" केशवसुतांना परमेश्वरी सृष्टीतील असंख्य रम्य वस्तूंमध्ये जसे काव्य आढळून आले असेल तसेच ते मानवी जीवनातील अनेक दृश्यांमध्ये व घटनांमध्ये आढळून आले असले पाहिजे. काव्यामध्ये कोणत्या विषयांचा अंतर्भाव होऊ शकेल या-विषयी केशवसुतांच्या या उदारमतवादानेच त्यांच्या भोवतालच्या जगतात प्रस्थापित होऊ पाहणाऱ्या उदारमतवादी विचारांचे प्रतिबिंब आपल्या कवितांमधून उमटविण्यास भाग पाडले. यामुळेच सामाजिक विषमता आणि दुष्ट रूढी याविरूद्ध त्यांनी बंड पुकारले. प्रचलित सामाजिक वैगुण्यांचा नुसता निषेध करून निराळ्याच एखाद्या विषयात रममाण होणे त्यांना जमले नाही. त्यांनी या सगळ्या गोष्टींविरुद्ध बंडाचा झेंडा उभारला."[2] केशवसुतांसंबंधात अमरशेखांनीच काय म्हटले आहे पाहा ..

रे तात कृष्ण केशवा
ज्ञानेशाच्या वंशाचा तू एक शोभतो दिवा...
बंडाचा या झेंडा ज्ञानेशाने रोवियला
अभंगवाणी तुकयाने तो तेजे झळकाविला
प्रसंग येता त्या झेंड्याचे रक्षण करण्याला
प्राणपणाने तुतारि गाने हलवी तू भूला
तू नव मनुचा नव्या दमाचा शूर शिपाई नवा
आशा, प्रेम नि शौर्याच्या तू उधळुनि सरिवर सरी
टिळक, आगरकर ज्योतीबांचा दिला साधुनी दुवा
रे तात कृष्ण केशवा

"जुन्या नव्यांची शक्य तेथे तडजोड करावी असला समन्वयवाद केशवसुतांना पूर्णपणे नामंजूर आहे. एका अर्थाने आगरकरी सुधारणावादावर ही कडी आहे .. 'जुने जाउ द्या मरणालागुनि जाळुनि किंवा पुरुनी टाका' हा केशसुतांचा आग्रह आहे. त्यांना जुन्यातून नव्याची निष्पत्ति पाहिजे. हा नव्याचा हव्यास ही केशव-सुतांच्या कवनांतील एक अत्यंत महत्त्वाची गोष्ट होय. "[3]

शाहीर अमरशेख विनम्रपणे म्हणतात– " ज्ञानेश्वर तुकयाची समर्थवाणी ऐकली– नव्हे त्यांच्या मानवतावादी प्रकाशातच माझे सारे बाल्य उमलले; केशवसुतांच्या तुतारीने मला उभा केले. "

" ज्ञानेश्वरांनाही संस्कृत भाषेत ग्रंथरचना न करता मराठीत करण्याच्या आपल्या उपक्रमाची हिरीरीने तरफदारी करावी लागली. मराठीच्या सामर्थ्याचे, सौंदर्याचे व

१–२–३ डॉ. वाळिंबे

व्यापकपणाचे ठायी ठायी त्यांनी जे संकीर्तन केले आहे ते आपल्या बंडखोरीची वकिली करण्यासाठीच होय. 'बी' कवींनी ज्ञानेश्वरांच्या या बंडखोरीचे पुढील-प्रमाणे वर्णन केले आहे. . . .

| | |
|---|---|
| या बड्या बंडवाल्यात | 'ज्ञानेश्वर' माने पहिला; |
| मोठ्यांच्या सिद्धांतांचा | घेतला पुरा पडताळा |
| डांगोरा फोलकटाचा | पिटविला अलम दुनियेला |

यानंतर सोळाव्या शतकात एकनाथांना हेच करावे लागले. "...माझी मराठी भाषा चोखडी। परब्रह्मी फळली गाढी" असे उद्गार काढून परंपराभिमानाला त्यांनी थप्पड दिली. दासोपंतालाही मराठी कविता करण्याच्या बंडखोरपणाची अशीच तरफदारी करावी लागली. पुढे अठराव्या शतकाच्या उत्तरार्धात मोरोपंतालाही मराठी भाषेत कविता करण्याच्या अपराधाबद्दल जबानी द्यावी लागली. "रामाचे रचिले चरित्र मुनिने वाल्मीकीने संस्कृती। नाही हानि कदापि अन्य कविही जे वर्णिता प्राकृती ॥" असा त्याला आपल्या मराठी कवित्वाचा पाठपुरावा करावा लागला."[1]

अमरशेखही आज बंडखोरी करून 'प्राकृतातच' रचना करीत आहेत. बहुजन समाजाच्या भाषेची जी 'प्रकृती' आहे तिच्यातच त्यांची सारी रचना असल्यानेच 'मिरासदार' मंडळी त्यांच्या कवितेला दूर करू पाहत आहेत. विसाव्या शतकात जग पुढे गेले पण ही मंडळी आहेत तिथेच आहेत. वास्तविक आजवर ज्ञानेश्वर, तुकाराम, रामदास, एकनाथ हे सारे लोककवीच झाले. त्यांची रचना ही सामान्यांसाठीच जन्माला आली. म्हणूनच ते लोक-कवी ठरले. बहुजन समाजाच्या आशा-आकांक्षाच त्यांनी बोलून दाखविल्या. म्हणूनच काळानेही त्यांच्या काव्यावर कायमचे शिक्कामोर्तब केले. अमरशेख हे तर बोलून चालून लोककवीच. मग बहुजन समाजाच्या भाषेत लिहितांना बंडखोरी ही ओघानेच आली.

बंडखोरीची परंपरा मराठी कवितेत तरी अव्याहत चालू आहे आणि अगदी अज्ञात बंडखोरांची दखल समाजाने घेतली आहे. समाजाला आपला म्हणणारांचाच जयघोष होत आलेला आहे. अमरशेखांचा आता तर होतच आहे, पण पुढेही होईल. कारण त्यांचे बंड केवळ व्यक्तीपुरते मर्यादित राहिलेले नाही. ते व्यक्ति-निरपेक्ष आहे. भाषाविषयक बंडखोरी जशी संतांना, पंडितांना करावी लागली तशीच सामाजिक सुधारणा घडावी म्हणून काव्य हे त्याचे प्रयोजन मानणारांनाही करावी लागलेली आहे. आणि या बाबतीत आधुनिक कवींत केशवसुत 'माने पहिला' असेच म्हणावे लागते. याच केशवसुतांनी आपल्याला उभे केले आहे अशी प्रांजल

---

१ लोकशिक्षण.

कबुली देणाऱ्या अमरशेखांच्या प्रकृतीची नव्याने ओळख कशाला करून द्यायला हवी ? ती प्रकृती बंडखोर कुळातलीच आहे याबद्दल जराही संशयाला जागा उरत नाही.

"नवीनतेच्या अतिरिक्त अभिलाषेमुळे 'नवा शिपाई' या कवितेत 'नव्या मनूतिल नव्या दमाचा शूर शिपाई आहे' असे उद्गार केशवसुत काढीत आहेत. हा नवा शिपाई जुन्या गोष्टींची मुळीसुद्धा पर्वा करणारा नाही. त्याला जुन्या गोष्टींचे पूर्ण विध्वंसन हवे आहे. पण नुसतेच विध्वंसन करून तो थांबणार आहे असे मात्र नाही. त्याला मूर्तिभंजन पाहिजे आहे; पण ते मूर्ती पुन्हा जोडून अधिक चांगल्या करण्याकरिता पाहिजे आहे. 'मूर्तिभंजन' या कवितेत ते म्हणतात—

मूर्ती फोडुनिया देऊ जोडुनिया
परी विकूनिया टाकू न त्या

केशवसुतांना नावीन्याची जी इतकी लालसा लागलेली आहे ती केवळ मजबूत पायावर नवीन उत्कृष्ट समाजाची रचना करता यावी यासाठीच हे लक्षात ठेवावयास हवे. ही नवसमाजनिर्मिती शक्य व्हावी म्हणूनच त्यांना जुन्याचा विध्वंस करायचा आहे. हा केशवसुतांच्या ध्येयवादी विचारसरणीचा गमक आहे."[१]

अमरशेखांचा 'पाथरवट' हा देखील केशवसुतांच्या नव्या शिपायाच्याच कुळातला आहे दोघांची 'जातकुळी' अगदी एकच आहे. दोघेही ध्येयवादाने प्रेरित होऊन नवसमाजरचनेचाच ध्यास धरतात. मूर्तिभंजनापेक्षा नवनिर्मितीवर प्रमुख भर. सबंध समाजाची इमारतच जुनी झाली आहे– 'आज इमारत जुनाट झाली'– असे अमरशेखांचा 'पाथरवट' आवर्जून सांगतो त्याला केवळ जुनाट इमलाच तेवढा पाडायचा नाही; तो इमला एकट्यानेच पाडावा अशीही त्याची इच्छा नाही. त्यासाठी त्याला 'लोकशक्ती'चा मोका साधायला हवा आहे. आणि या जुनाट इमल्यातून त्याला नव्या इमारतीची 'घडण' व्हायला हवी आहे. अमरशेखांना केशवसुतांप्रमाणेच मूर्तिभंजन नको तर त्यांच्याप्रमाणेच मूर्ती पुन्हा जोडून अधिक चांगली करायला पाहिजे. म्हणूनच अमरशेखांचा 'पाथरवट' सांगतो—

पाडुन टाका
आणिक बांधा नवी इमारत

केशवसुतांना जे नावीन्य हवे तेच अमरशेखांना हवे की नाही ते या ओळी स्पष्टच करून सांगतात.

समाजाला इमारत कल्पून हा 'पाथरवट' नवी इमारत घडवू पाहतो. मात्र

---

१ डॉ. वाळिंबे.

त्या पाथरवटाला आपल्या ‘अज्ञ’तेची जाणीव आहे; ही गोष्ट विशेष म्हणावी लागते. केशवसुतांचा ‘नवा शिपाई’ नव्या युगातील आहे. अमरशेखांचा पाथरवटही नव्या युगातलाच आहे. व्यक्तिस्वातंत्र्याच्या कल्पनेने तो वेडावला आहे. त्याला आपल्या हातूनच नवी इमारत बांधायची आहे. पण त्याला आपलाच हात लागून काही बरे वाटत नाही, तर सर्वांचाच हात लागायला हवा आहे. हा पाथरवट आपल्या स्वतःचा वाटा उचलताना म्हणतो—

एक दगड तरि घडु द्या रे या माझ्या हातुन
एक छन्निचा एक घाव तरि
बसु द्या माझा त्या दगडावर...

व्यक्तिस्वातंत्र्याची इतकी मनोहर पण उदात्त कल्पना क्वचितच कुणी केली असेल.

कविवर्य केशवसुतांचा नवा शिपाई मानवतेचाच विचार करतो. त्याची प्रत्येक भावनाच मुळीं विश्वव्यापक बनलेली आहे. मानवतेचा तर त्याला नुसता ध्यास लागलेला आहे. ...आणि अमरशेखांच्या पाथरवटाला?... त्याला तर मुळीं “मानवतेचे नवीन मंदिर’च उभे करायचे आहे. “केशवसुतांच्या दृष्टीसमोर स्वतंत्र मानवतेचे स्वप्न नित्य तरळत असे.”[१] अमरशेखांच्याही पुढे तसेंच. त्यांचाच पाथरवट म्हणतो—

मानवतेचे नवीन मंदिर
येथे बांधा या जागेवर

नव्या शिपायाच्या सर्वंकष जीवनाकांक्षेमध्ये फुलांची कोमलता व नाजूक सौंदर्य-दृष्टीही आहे. मानवतेच्या कल्याणासाठी लढणारा हा योद्धा हृदयशून्य तिस्मारखां नसतो. बलहीन पण निष्पाप जीवनाच्या रक्षणासाठी तो आपले शस्त्र झिजवतो.”[२]

अमरशेखांच्या पाथरवटाचे हृदयही अगदीच कोमल आहे. मानवाच्या कल्याणाची त्याला तीव्र चिंता लागून राहिली आहे. निष्पाप जीवनाचे रक्षण व्हावे असे त्यालाही वाटत असते म्हणूनच तर तो म्हणतो—

आज इमारत जुनाट झाली
जीव अकारण मरतिल खाली
म्हणुनि आधि या पाडुनि टाका

पण हीच वाणी कठोरही बनते. आणि म्हणते—

देउन धक्का- पाडुनि टाका

१–२ प्रा. कुसुमावती देशपांडे.

कबुली देणाऱ्या अमरशेखांच्या प्रकृतीची नव्याने ओळख कशाला करून द्यायला हवी ? ती प्रकृती बंडखोर कुळातलीच आहे याबद्दल जराही संशयाला जागा उरत नाही.

"नवीनतेच्या अतिरिक्त अभिलाषेमुळे 'नवा शिपाई' या कवितेत 'नव्या मनूतिल नव्या दमाचा शूर शिपाई आहे' असे उद्गार केशवसुत काढीत आहेत. हा नवा शिपाई जुन्या गोष्टींची मुळीसुद्धा पर्वा करणारा नाही. त्याला जुन्या गोष्टींचे पूर्ण विध्वंसन हवे आहे. पण नुसतेच विध्वंसन करून तो थांबणार आहे असे मात्र नाही. त्याला मूर्तिभंजन पाहिजे आहे; पण ते मूर्ती पुन्हा जोडून अधिक चांगल्या करण्याकरिता पाहिजे आहे. 'मूर्तिभंजन' या कवितेत ते म्हणतात —

मूर्ती फोडुनिया देऊ जोडुनिया
परी विकूनिया टाकू न त्या

केशवसुतांना नावीन्याची जी इतकी लालसा लागलेली आहे ती केवळ मजबूत पायावर नवीन उत्कृष्ट समाजाची रचना करता यावी यासाठीच हे लक्षात ठेवावयास हवे. ही नवसमाजनिर्मिती शक्य व्हावी म्हणूनच त्यांना जुन्याचा विध्वंस करायचा आहे. हा केशवसुतांच्या ध्येयवादी विचारसरणीचा परिपाक आहे."[१]

अमरशेखांचा 'पाथरवट' हा देखील केशवसुतांच्या नव्या शिपायाच्याच कुळातला आहे दोघांची 'जातकुळी' अगदी एकच आहे. दोघेही ध्येयवादाने प्रेरित होऊन नवसमाजरचनेचाच ध्यास घरतात. मूर्तिभंजनापेक्षा नवनिर्मितीवर प्रमुख भर. सबंध समाजाची इमारतच जुनी झाली आहे– 'आज इमारत जुनाट झाली'– असे अमरशेखांचा 'पाथरवट' आवर्जून सांगतो. त्याला केवळ जुनाट इमल्याच तेवढा पाडायचा नाही; तो इमला एकट्यानेच पाडावा अशीही त्याची इच्छा नाही. त्यासाठी त्याला 'लोकशक्ती'चा मोका साधायला हवा आहे. आणि या जुनाट इमल्यातून त्याला नव्या इमारतीची 'घडण' व्हायला हवी आहे. अमरशेखांना केशवसुतांप्रमाणेच मूर्तिभंजन नको तर त्यांच्याप्रमाणेच मूर्ती पुन्हा जोडून अधिक चांगली करायला पाहिजे. म्हणूनच अमरशेखांचा 'पाथरवट' सांगतो—

पाडुन टाका
आणिक बांधा नवी इमारत

केशवसुतांना जे नावीन्य हवे तेच अमरशेखांना हवे की नाही ते या ओळी स्पष्टच करून सांगतात.

समाजाला इमारत कल्पून हा 'पाथरवट' नवी इमारत घडवू पाहतो. मात्र

---

१ डॉ. वाळिंबे.

त्या पाथरवटाला आपल्या ‘ अज्ञ ’तेची जाणीव आहे; ही गोष्ट विशेष म्हणावी लागते. केशवसुतांचा ‘ नवा शिपाई ’ नव्या युगातील आहे. अमरशेखांचा पाथरवटही नव्या युगातलाच आहे. व्यक्तिस्वातंत्र्याच्या कल्पनेने तो वेडावला आहे. त्याला आपल्या हातूनच नवी इमारत बांधायची आहे. पण त्याला आपलाच हात लागून काही बरे वाटत नाही, तर सर्वांचाच हात लागायला हवा आहे. हा पाथरवट आपल्या स्वतःचा वाटा उचलताना म्हणतो—

एक दगड तरि घडु द्या रे या माझ्या हातुन
एक छन्निचा एक घाव तरि
बसु द्या माझा त्या दगडावर...

व्यक्तिस्वातंत्र्याची इतकी मनोहर पण उदात्त कल्पना क्वचितच कुणी केली असेल.

कविवर्य केशवसुतांचा नवा शिपाई मानवतेचाच विचार करतो. त्याची प्रत्येक भावनाच मुळी विश्वव्यापक बनलेली आहे. मानवतेचा तर त्याला नुसता ध्यास लागलेला आहे. ...आणि अमरशेखांच्या पाथरवटाला ?... त्याला तर मुळी “ मानवतेचे नवीन मंदिर ’च उभे करायचे आहे. “ केशवसुतांच्या दृष्टीसमोर स्वतंत्र मानवतेचे स्वप्न नित्य तरळत असे. ”[1] अमरशेखांच्याही पुढे तसेच. त्यांचाच पाथरवट म्हणतो —

मानवतेचे नवीन मंदिर
येथे बांधा या जागेवर

नव्या शिपायाच्या सर्वंकष जीवनाकांक्षेमध्ये फुलांची कोमलता व नाजूक सौंदर्य-दृष्टीही आहे. मानवतेच्या कल्याणासाठी लढणारा हा योद्धा हृदयशून्य तिस्मारखां नसतो. बलहीन पण निष्पाप जीवनाच्या रक्षणासाठी तो आपले शस्त्र झिजवतो. ”[2]

अमरशेखांच्या पाथरवटाचे हृदयही अगदीच कोमल आहे. मानवाच्या कल्याणाची त्याला तीव्र चिंता लागून राहिली आहे. निष्पाप जीवनाचे रक्षण व्हावे असे त्यालाही वाटत असते म्हणूनच तर तो म्हणतो—

आज इमारत जुनाट झाली
जीव अकारण मरतिल खाली
म्हणुनि आधि या पाडुनि टाका

पण हीच वाणी कठोरही बनते. आणि म्हणते—

देउन धक्का— पाडुनि टाका

१–२ प्रा. कुसुमावती देशपांडे.

केशवसुतांचे नवनिर्मितीचे विचार अमरशेखांइतके आटोपशीर इतर कुठल्याही कवीने इतरत्र मांडलेले नसतील. आशयसंपन्न व आटोपशीर विचार खुद्द अमरशेखांच्याही इतर कवितेत शोधावा लागतो. ही कविता म्हणजे एक लेणे आहे. अमरशेखांची कविता ही केशवसुतांच्याच 'जातकुळी'तील आहे हे पटविण्यास त्यांचा एक 'पाथरवट'च माझ्या मते पुरेसा आहे.

माणसाला स्वत्वाची जाणीव होणे, आपल्या व्यक्तित्वाच्या कर्तबगारीविषयी श्रद्धेचा विचार त्याच्या मनात उत्पन्न होणे ही गोष्ट व्यक्तिविकासाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाची आहे. आगरकरांनी प्रयत्नाअंती जो व्यक्तिवाद ( Individualism ) समाजात दृढमूल करण्यात यश मिळविले तो व्यक्तिवाद केशवसुतांनी काव्याच्या द्वारे आकर्षक व स्पृहणीय करून टाकला. केशवसुतांचा व्यक्तिवाद ठायी ठायी प्रकट झाला आहे. केशवसुतांनी म्हटले आहे—

पूजितसे मी कवणाला ?...तर मी पूजी अपुल्याला.

हा व्यक्तिवाद अमरशेखांच्याही कवितेत ओतप्रोत भरलेला आहे.

१) जगणे असें तसे नच
हक्काचे अन मानाचे पण
लढत राहुनी रोज मरुनिही
जगेन मी आगळेच जीवन

२) विणिले वस्त्रच ठरो निवारा
दुःखि दीन मनुजास उबारा
मी तो कोष्टी आहे न्यारा
माझा माग मला बहु प्यारा...

३) तत्त्वासाठी आहे उभा मी
तत्त्वासाठी मरेन कटुनी
गद्ध्याचेही धरिन पाय मी
तत्त्वासाठी लोळण घेइन...

४) असुनी माणुस, भोग्य वस्तु मी ?
चिकटलेच जर मम भाग्याला
एक दिवस लावीन आग या
क्षुद्र, असंस्कृत अशा जगाला...

५) सहनशक्ति संपली यापुढे
धडक आता शेवटची घेईन
एक तो तरी एक मी तरी
कुणीतरी पण एकच ठेविन...

स्वःतमध्ये सारे विश्व सामावलेले असून आपण विश्वव्यापक आहोत असे मानण्याइतपत या व्यक्तिवादाची मजल गेली आहे.

" केशवसुतांच्या डोळ्यासमोर असलेल्या आदर्शभूत नवसमाजातील मनुष्याच्या ठायी दुर्दम्य आशावाद आणि आत्मविश्वास या गोष्टी भरपूर प्रमाणात असल्या तरी मानवाच्या ठायी दिसून येणाऱ्या विकार-विचारांचे प्राबल्य अर्थातच त्याच्या ठायी आहे. आणि म्हणूनच तो खराखुरा मानव वाटतो. तो कल्पना-सृष्टीतील अवास्तव ध्येयवादी दिसत नाही. आणि यामुळेच अनेक समाजविघातक विचारात मग्न झालेल्या निष्क्रिय लोकांशी आपले कमालीचे वैर आहे असे त्वेषाने उद्गार कवीने काढले आहेत. केशवसुतांचा हा त्वेष खरोखर अनावर आहे. पण यात त्यांची आत्यंतिक तळमळ असल्यामुळे तो स्पृहणीय वाटतो."[१] अमरशेखांच्या बाबतीत नेमके हेच म्हणावे लागते. त्यांचा जागोजाग दिसून येणारा संताप हा सात्त्विक आहे. सामाजिक कल्याणाच्या भावनेतूनच त्याची निर्मिति झालेली आहे. एके ठिकाणी ते संतापून म्हणतात –

करु मी शिक्षा कुणाकुणाला
तरुणच सारा समाजातला
सर्रास दिसे वखवखलेला
करु मी शिक्षा कुणाकुणाला !

दुसऱ्या ठिकाणी 'नवे संत' कवितेत ते म्हणतात--

कवने गाती मेलेल्यांची
श्रद्धांजलि पण सदा वाहतो
स्मारकेहि पण आम्ही बांधतो
कृतज्ञ म्हणवुनि घेण्या जगती
धन्य वाटते आम्हा मनोमन
. पण जे मरती क्षणाक्षणाला
फूटपाथ, गल्ली बोळांतुनि
बेकारीस्तव, औषधाविणा,

१ डॉ. वाळिंबे.

भाकरीविणा तशीच त्यांची
इच्छा असता जगावयाची
दखल तयांची कधी न घेता
मौन धरुन आम्हि कृतघ्न असता
स्थितप्रज्ञागत झापड लावुनि...

३) ... मुनिवर गेले, चिंतन गेले
ढोंग धत्तुरे येथे उरले
संत महंत नि त्यांचे चेले
धनसत्तेचे हंडीबाग
सत्य पळाले जगातुनी या
लावा या जगताला आग . . .

अमरशेखांच्या या सर्व ओळी वाचल्या की त्यांचाही त्वेष अनावर असल्याचे पटते. मानवता जागी झाल्याची ललकारी देणारे अमरशेख निष्क्रियता दिसल्यावर अगदी भडकून उठतात. ध्येयवादी मनाला अशा विकृत गोष्टी असह्य होतात आणि ते चिडून उठते. त्वेषाने जगाला आग लावायला उठते. आदर्शभूत समाजरचनेला अशा विकृत गोष्टी घातक आहेत, हा अडसर दूर झालाच पाहिजे. हीच तळमळ केशवसुतांप्रमाणे अमरशेखांच्या कवितेत सर्वत्र भरून राहिली आहे. "ध्येयवादी केव्हाही अयशस्वी होऊ शकत नाही. . . व्यक्तीच्या दृष्टीने तर ध्येयवादी यशस्वीच असतो, कारण तो आपली ध्येये आपल्या आचरणात आणीत असतो व तीच थोर ध्येये जगाने आचरणात आणावी म्हणून प्रतिकूल परिस्थितीतहि प्रयत्न करीत तो आपला देह ठेवतो त्याच्या आत्मसमर्पणाने त्याची ध्येयप्राप्ती निश्चित व जवळ येत असते व हेच त्याचे यश असते. उच्च ध्येये ज्याप्रमाणे चिरंतन सत्य असतात त्याचप्रमाणे ध्येयवादी नेहमी यशस्वीच असतो." [१]

अमरशेखांचे आजचे आचरण जर डोळसपणे पाहायचे म्हटले तर त्यांचा ध्येय-वाद आणि आचरण यांत जराही विसंगती कोठे दिसणार नाही. काव्यातील ध्येयवाद आणि आचार यांतही फरक नाही.

'तुतारी' या कवितेत केशवसुतांनी अनेक सामाजिक वैगुण्यांवर जोराचा हल्ला चढविला आहे. अन्यायांवर तर ते अगदी तुटूनच पडलेले आहेत. त्यांचा त्वेष अनावर झाला की त्यांना कुणाचीही दयामाया येत नाही व 'कठिण शब्द या धोंड्यांनी करितो हाणाहाण' असा हाणामारीचा प्रकार ते बेधडक करतात. अन्यायाची खरी चीड हीच एक गोष्ट यापाठीमागे आहे. केशवसुत 'हाणाहाण'

---

१ मराठी संतकाव्य–कर्मयोग–डॉ. शं. दा. पेंडसे.

करायला तयार आहेत तर अमरशेख 'आग' लावायला तयार आहेत. सामाजिक शुद्धी ही वाईटाला आग लावूनच होईल, यावर त्यांचा दृढ विश्वास आहे. 'जुने जाउ द्या..' हीच केशवसुतांची भावना त्यांच्याही कवितेत पुरेपूर दिसते. केशवसुतांना जुने जाळून किंवा पुरून टाकायचे आहे तर अमरशेखांना आजच्या समाजजीवनात जे जे वाईट आहे ते ते जाळायचे आहे. आणि ते का? तर 'विचाराला जाग' यावी म्हणून. केवळ विध्वंसनाची त्यामागे दृष्टी नसून समाजशुद्धीची खरीखुरी तळमळ आहे असेच दिसते. आजच्या गढूळलेल्या परिस्थितीबाबत अमरशेख म्हणतात—

ही धूसरता क्षण घटकेपुरती असती
तरि आम्हि तिची मुळि पर्वा केली नसती.
का धूसरतेला उषा आम्ही समजावे?
अन् अंधाराचे पोवाडे का गावे?
आम्हि अंधाराचा सदा करू धिक्कार
अन स्वप्न कालचे करूच ते साकार

हे स्वप्न म्हणजे दुसऱ्या तिसऱ्या कशाचे नाही, तर ते स्वतंत्रतेचे आहे. आज बाह्यार्थाने आम्हाला स्वातंत्र्य मिळाले, पण आमची मानसिक गुलामगिरी? ती थोडीच नष्ट झालेली आहे? व्यक्तीचे व्यक्तित्व पूर्ण विकसित होण्यासाठी ज्या अनुकूल वातावरणाची आवश्यकता असते, ते मुळी आहेच कुठे? अजूनही आमची मने परंपरेच्याच अंधारात आहेत. मनावरची जळमटे अद्यापही दूर झालेली नाहीत. आमच्यात खऱ्या अर्थाने ममत्वाची भावनाच मुळी रुजली नाही, तर समता यावी तरी कशी? सर्वत्र समता नांदावी हीच तर अमरशेखांची उत्कट इच्छा. त्यासाठी हवा व्यक्तिविकास, अगदी निर्लेपपणे होणारा. तो होत नाही हीच अमरशेखांची खरी तक्रार आहे.

ध्येयवादी कवीच्या कवितेत समाजाची काही पदचिन्हे उमटणे अगदी अपरिहार्य होते. प्रत्ययकारी कवीच्या कवितेत तर त्याचे स्वरूप अगदीच गडद होते. "समाजाच्या अभिरुचीचा वाङ्मयनिर्मितीवर परिणाम होतो. जनता भक्तिरसाच्या वाङ्मयाला कंटाळली म्हणजे रामजोशी उत्पन्न होतो. जनतेच्या अभिरुचीमुळे वाङ्मयाची दिशा बदललेली दिसते."[1] पूर्वी वाङ्मय म्हणजे विद्वानांची मिरासदारी होती, पण आज ते सार्वजनीन बनले आहे. त्याखेरीज कोणतीही गोष्ट घडली की तिचे प्रत्यंतर आपणास वाङ्मयात पाहावयास मिळते. आज वाङ्मय खऱ्याखुऱ्या अर्थाने प्रत्ययकारी बनलेले आहे.

१ भ. व्यं. देशमुख.

" मजुरांचे वाङ्मय, अस्पृश्यांचे वाङ्मय (आणि आता प्रादेशिक वा ग्रामीण वाङ्मय ) असे शब्द ऐकले म्हणजे समाजातील वर्गकलहाचे पडसाद वाङ्मयावर कसे उमटतात ते चांगलेच प्रत्ययाला येते. समाजात कोठेही काही महत्त्वाची गोष्ट घडली की वाङ्मयावरही तिचा परिणाम दिसून येतो. एका लेखकाने म्हटले आहे– " There is nothing in the compass of social life that does not play–directly or indirectly, immediately or ultimately–its on surrounding world. " या दृष्टीने पाहिले असता प्रत्येक क्रियेचा आघात वाङ्मयावर होत असतो. त्या त्या काळाची व समाजाची काही विशिष्ट चिन्हे वाङ्मयावर उमटलेली असतात."[१] ध्येयवादी कवी तर समाज-जीवनाचा खोलवर विचार करतो. आणि तसा तो करतानाच त्याला विसंगती चटकन जाणवते. ती टिपून तिचा प्रत्यय स्पष्ट शब्दात आणल्याखेरीज त्याच्या मनातील अभिप्रेत असलेल्या सुसंगतीची स्पष्ट कल्पना तरी आपल्याला कशी यावी ? नेमकी हीच सुसंगती दाखवितांना कळत नकळत मत-प्रचार होत जातो.

" वाङ्मयाचा विशेष म्हणजे शाश्वतत्त्व. ज्या ज्या लेखनात काही चिरकाल टिकणारे गुण असतील त्यासच वाङ्मय ही संज्ञा दिली पाहिजे. वाङ्मयाची सर्व-सामान्य कसोटी म्हणजे ' सत्यं, शिवं, सुंदरं ' ही होय. ज्या मानाने वाङ्मयात हे तीन गुण अधिक त्या मानाने ते वाङ्मय अधिक श्रेष्ठ होईल. या तीन गुणांची उपासना करणाऱ्या अशा वाङ्मयाच्या तीन शाखा आहेत. सत्यकथन करणारे ते शास्त्रीय वाङ्मय, सौंदर्याची आराधना करणारे ते ललित वाङ्मय व शिव म्हणजेच मंगलोत्पादनाकरिता निर्माण केलेले ते बोधवादी (मतप्रचारक) वाङ्मय होय. अर्थात अमुक ग्रंथ कोणत्या विभागात पडेल हे निश्चयाने सांगता येणार नाही. ज्याप्रमाणे सत्त्व, रज तम हे त्रिगुण कोणत्याही व्यक्तीत कमी–अधिक प्रमाणात असतात, त्याप्रमाणे कोणत्याही वाङ्मय-कृतीत सत्यकथन, सौंदर्यदर्शन, मंगलोत्पादन ही थोड्या ना थोड्या प्रमाणात आढळणारच. "[२]

ध्येयवादी कवीच्या काव्यात तर बोध हा अटळच ठरतो. अमरशेखांच्या कवितेत कविवर्य केशवसुतांप्रमाणेच बऱ्याचशा प्रमाणात बोध आढळतो. अमरशेख शब्दांना आवाहन करताना म्हणतात—

सत्य जगा सांगायाला
शब्दा चल ये गायाला

... आणि एकदा सत्य सांगणे हेच शब्दाचे ध्येय बनले की उपदेशासाठी,

---

१ भ. व्यं. देशमुख.

२ लोकशिक्षण, १९३८– भ. व्यं. देशमुख.

मतप्रचारासाठी त्याचा उपयोग कवी करणारच हे मुळी गृहीतच धरावे लागते. मराठी संत काव्यापासूनच बोधाची परंपरा अव्याहत चालत आलेली आहे. आमच्या संतांपुढे नराचा नारायण करण्याचे ध्येय होते. केशवसुतांना नवसमाजनिर्मिती हवी होती तर आज अमरशेखांना समाजवाद हवा. म्हणूनच समाजवादाचा मंत्र ते बहुतेक कवितांतून देतात. "जो जे वांछील। ते ते लाहो। प्राणिजात असा समाजवादाचा म्हणजेच कम्युनिस्ट तत्त्वज्ञानाचा मंत्र ज्ञानेश्वरांनी सहाशे वर्षापूर्वीच दिलेला आहे."[१]

खऱ्या जीवननिष्ठेतूनच ध्येयवाद फुलतो. अमरशेखांचा ध्येयवाद त्यांच्या जीवननिष्ठेतूनच– केशवसुतांप्रमाणे– फुललेला दिसेल.

"जगात प्रत्यक्ष काय आहे यापेक्षा काय असावे, माणूस व्यवहारात प्रत्यक्ष कसा दिसतो यापेक्षा तो कसा दिसावा या विचाराचा प्रभाव ध्येयवादी वाङ्मयावर विशेष असतो. जीविताची वाईट बाजू रंगविणे किंवा माणसाच्या दुष्टपणाचे यथातथ्य वर्णन करणे या गोष्टींचा वास्तववादात अंतर्भाव होतो परंतु जीवनातील चांगल्या गोष्टींचे वर्णन करणे, माणसाच्या ठायी असलेल्या सद्‌गुणांची महती गाणे, माणूस दुर्वर्तनी असला तरी काले करून तो सुधारू शकेल असे मानणे व तसा तो सुधारलेला दाखविणे, न्यायाची अन्यायावर, सद्‌गुणांची दुर्गुणांवर, नीतीची अनीतीवर सरतेशेवटी मात होते असा विश्वास बाळगून तशा घटना निर्माण करणे ही ध्येयवादी वाङ्मयाची प्रमुख कार्ये आहेत... मानवी जीवनातील अनेक उत्कृष्ट ध्येये, सद्विचार, सुनीतीचे विचार, माणसाचे आत्मिक सामर्थ्य, आध्यात्मिक शुचिता, भोगवादाचा तिरस्कार करून त्यागमय जीवितातील उदात्ततेचे स्तवन इ. गोष्टी ध्येयवादी वाङ्मयात दिसून येतात. मनुष्याच्या चांगुलपणावर दृढ विश्वास हे अशा वाङ्मयात दिसून येणारे महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे"[२]

"भावनांच्या प्रत्ययानंतर कलेचे कार्य थांबते असे थोडेच आहे? रंजन, विनोदन हेच कलेचे ध्येय असले तरी त्याखेरीज वाचकांच्या मनावर काहीच परिणाम होत नाही असे नाही कारण प्रत्येक कलावंताला आपला कलाविकास दाखविण्यास काहीतरी कलाविषय हा लागतोच. चित्रकाराला जशी देखाव्याची, मूर्तिकाराला जशी पाषाणाची तशीच ललित लेखकालाही कोणत्या ना कोणत्या विषयाची आवश्यकता ही असतेच आणि म्हणून त्याच्या हातून जाणून अथवा अजाणता कोणत्या तरी मताचा प्रचार केला जातोच. त्याचे ते उद्दिष्ट नसेलही. पण प्रचार हा होतोच."[३]

कलावंताचा मतप्रचार सहेतुक नसावा हे खरे, पण याचा अर्थ त्याला त्याचे संपूर्ण

---

१ संत तुकडोजी महाराज– [ संत आणि साहित्य ]

२ डा. वाळिंबे.

३ श्री. भ. व्यं. देशमुख.

वावडे असावे असा मात्र नाही. ध्येयवादी कलावंत मतप्रचार करीत असला तर तो त्याचा काही दोष ठरत नाही. त्यापूर्वी मतप्रचाराचीसुद्धा एक परंपराच निर्माण झालेली असते हे डोळसपणे पाहणाराला सुद्धा समजू शकते. एवढेच कशाला, मराठी कवितेत तर मतप्रचार अगदी ढळकच दिसतो. संत वाङ्मय तर मुळी मतप्रचारानेच भरलेले आहे. तुकोबा म्हणतात—

जे का रंजले गांजले । त्यासी म्हणे जो आपुले
तोचि साधू ओळखावा । देव तेथेचि जाणावा ।।

रामदास म्हणतात—

आहे तितुके जतन करावे । पुढे आणिक मेळवावे
महाराष्ट्र राज्य करावे । जिकडे तिकडे ।।
मारता मारता मरावे । तेणे गतीस पावावे । क्षात्रधर्म

ज्ञानोबा म्हणतात—

जिकडे जग तिकडे जगन्नायेक ।
कळला पाहिजे विवेक । १९।७।१२
पृथ्वीमधे जितुकी शरीरे ।
तितुकी भगवंताची घरे २०।४।४

केशवसुत म्हणतात—

प्राप्तकाल हा विशाल भूधर
सुंदर लेणी तयात खोदा
निजनामे त्यावरती नोंदा
बसुनी का वाढविता मेदा
विक्रम काही करा चला तर...
...शूरांनो या त्वरा करा रे
समतेचा ध्वज उंच धरा रे...

रे. टिळक म्हणतात—

नवयुग ! नवयुग ! नवयुग ! हो
शिंग फोडिते हा टाहो
...हात धरिला कालाने
धावा त्यासह हौसेने— ( रणशिंग )

गोविंदाग्रजांनी म्हटले आहे—

घ्या कृष्णाची करी "तुतारी"
रुढीच्या किल्ल्यावर स्वारी

'अगरकरांची' झडवा नौबत !

दीनपणाला गर्वे छळिते
अज्ञानाला भिउनी पळते
त्या वर घ्यावा नच हे वळते
उच्चत्वा त्या लावा, आग

—मानवधर्माचा हा दसरा......

ठाणे. स्थळप्रत
वि:

कविवर्य तांबे—

... "प्रकृति-गती-ही मनि उमजुनिया
उठा वीर, कार्पण्य त्यजुनिया
'जय-हर' गर्जा मानेस्तव या
बडबडुनी कांही का मिळते ?

ही मराठीतील काही 'मौक्तिके' आहेत. अशी असंख्य शोधून दाखविता येणे अशक्य नाही, पण विस्तारभयास्तव हात आखडता घेणे क्रमप्राप्त आहे.

ज्या समाजाचे उत्थापन व्हावे असे लेखकाला वाटते, त्या समाजावरील प्रेमानेच भारावून जाऊन तो आपल्या मार्गदर्शकाच्या भूमिकेवरून काही गोष्टी खुल्या रीतीने मांडतो. सूचक गोष्टी कुणाला सांगायच्या, तर ज्याची कुवत असेल त्यालाच. पण समाजातील सर्वच थर काही एका पातळीवर आलेले नसतात. तेव्हा एखादा थर असंस्कृत, अशिक्षित असेल त्याला त्याच्याच भाषेत सांगून कित्येकदा लेखकाला आपले मत गळी उतरवावे लागते. कधी फटकारून सांगावे लागते, तर कधी गोंजारावे लागते. ध्येयवादी लेखकाला अशा वेळी मतप्रचार करताना कधी कधी उघड उघड उपदेश करावा लागतो. समाजावर वाङ्मयाचा परिणाम होतो ही भावना त्याच्या मनात पूर्वीपासूनच मूळ धरून असते. मात्र वाङ्मयाचा समाजावर चटकन परिणाम होतो असे कुणीच मानणार नाही. वाङ्मय हे मुळी संस्कार करणारेच असल्याने त्याचा आज ना उद्या परिणाम हा होतोच. म्हणून मतप्रचार करणारा लेखक आपल्या मताचा काय परिणाम झाला आहे हे पाहण्याचा वेडगळ प्रयत्न करणार नाही तो आपल्या कलेद्वारे जमेल तेथे आणि जमेल तसा मतप्रचार करीतच राहतो. आणि तो हे सारे समाजविषयीच्या तळमळीने, सद्भावनेने करतो. "व्यक्तींवर परिणाम होण्यास तासाचा अवधी पुरतो, पण समाजावर परिणाम होण्यास पिढ्यांचा अवकाश लागतो शारदा नाटक लिहिल्याबरोबर चोहीकडे बालविवाह बंद झालेले नसले तरी आतापर्यंत शारदा ॲक्टही पास होऊन गेलेला आहे. 'एकच प्याला' वाचल्याबरोबर ताबडतोब त्याचा परिणाम झाला असो वा नसो आज मात्र मद्यपान बंदीची चळवळ काँग्रेसने हाती घेतली आहे. आगरकरांनी

आपल्या लेखांत सुधारणांचा पुरस्कार केला व त्या वेळी त्या सुधारणा लोकांना रुचल्या नाहीत तरी आज मात्र त्या सुधारणा पचवून आगरकरांना सनातनी म्हणण्याची वेळ आली आहे. शिवरामपंतांच्या लेखांत त्यांच्या वक्रोक्ति-प्राधान्यामुळे देशभक्तीची भावना फारच सौम्य आहे असे तरूण पिढी मानते. कारण काळ लोटला की समाजावर त्या वाङ्मयाचा परिणाम होऊन समाज त्या मानाने पुढे जातो आणि वाङ्मयाने केलेले संस्कार मुकाट्याने गिळून ते पचवून त्याप्रमाणे आचारांत फेरफार करतो. अशा रीतीने ललित वाङ्मय जीवनात फरक घडवून आणण्यास कारणीभूत होते. ललित वाङ्मयाचा सुद्धा समाजावर अप्रत्यक्ष रीत्या का होईना पण इतका परिणाम होतो तर बोधवाङ्मयापासून तो त्याहूनही अधिक प्रमाणात होईल यात नवल ते काय ? कित्येक लेखक समाजाला त्याच्या हिताची गोष्ट सांगून, त्याला त्याचे गुणदोष दाखवून त्याच्या कल्याणाचा मार्ग दाखविण्याची इच्छा करतात. अशाप्रकारे वाङ्मय जाणूनबुजून समाजावर परिणाम व्हावा म्हणून लिहिलेले असते तेव्हा साहजिकच त्या वाङ्मयाचा परिणाम समाजावर अधिक होतो. "[१]

इ. स. १२०० ते १६०० पर्यंत आमच्या अनेक संतकवींनी आपल्या लेखनाच्या द्वारे धर्मजागृतीची लाट सर्व महाराष्ट्रभर निर्माण केली. म्हणूनच शिवाजी महाराजास स्वराज्यस्थापना करणे सुलभ झाले. लेखकांनी हे पक्के ओळखलेले असते की मनुष्याजवळ विचारासारखी दुसरी मोठी शक्ती नाही. "There is no power like the power of thought."[२] समाजाच्या जुन्या विचारप्रवाहात नवीन विचारप्रवाह सोडून दिले की काम झाले.

समाजात सुख, समृद्धी शांती नांदावी असे ज्या ध्येयवादी कवीला वाटते तो समाजाला त्यासंबंधात वेळोवेळी मार्गदर्शन करीत असतो ते करताना त्याला मतप्रचाराचीच अखेर कास धरावी लागते. संस्कार करणे हे साहित्याचे सामर्थ्य त्याने समजून घेतलेले असते.

"व्यक्ती आणि राष्ट्र यांच्या मनोविकासाला साहित्याची अत्यंत गरज आहे. राष्ट्राची संस्कृती साहित्यामुळे चिरंतन होते. मोठमोठ्या दिव्य कल्पनांचा व आनंदाचा प्रतिभावंतांना झालेला साक्षात्कार सर्वांना सुलभ होण्यास साहित्य हे प्रभावी साधन आहे. आज आपण कुठे आहोत, आज आपल्या व्यक्तिविकासाला कोणते अडथळे येत आहेत, याची जाणीव समाजाला करून देऊन नव्या सौख्यपूर्ण व उन्नत जगाची ( अमरशेख ज्याला सुवर्णयुग म्हणतात–लेखक ) स्थापना करण्याची स्फूर्ती समाजाला देण्याचे महत्कार्य साहित्य साधीत असते. "[३] "साहित्य-कलाकार हे समाजरचनेचे

---

१ भ. व्यं. देशमुख.

२ एच. जी. वेल्स.

३ गोपीनाथ तळवलकर.

इंजिनिअर्स आहेत."[१] जडवादी कम्युनिस्टांनी देखील हे साहित्याचे सामर्थ्य मान्य केले आहे. अमरशेख हे तर समतेचे पुरस्कर्ते आहेत. मराठी साहित्यापेक्षा त्यांचे साहित्य कांही वेगळ्या प्रकारचे आहे असे थोडेच आहे? आजवरची मराठी साहित्याची परंपराच शिगोशीग भरलेली दिसते. ते करीत असलेला समतेचा पुरस्कार हा अभिनव प्रकार तर मुळीच नव्हे; उलटपक्षी केशवसुत यामुळेच तर युगप्रवर्तक ठरले की. त्यांच्या युगप्रवर्तनामागील हे एक कारण आहेच.

"मराठी भाषेचा उदयच मुळी लोकाभिमुख अशा समाजक्रांतीत झाला. परंपरा-प्रिय गीर्वाण पंडितांनी ज्यांचा छळ केला त्या ज्ञानेश्वरांनी 'बहुजन समाजासाठी ब्रह्मविद्येचा सुकाळ' करावा या उदात्त हेतूने मराठीत आपला अद्वितीय ग्रंथ रचला. ज्ञानाची मिरासदारी नाहीशी करण्यासाठी संतवर्यांनी..."वैष्णवांचा धर्म-भेदाभेद भ्रम अमंगळ" असे उच्चरवाने सांगितले. भागवत धर्माचा इतिहास म्हणजे मराठी भाषेचा विलास आणि लोकसत्तात्मक प्रवृत्तीचा विकास असे म्हणावयास हरकत नाही. आधुनिक काळात देखील मराठीचे प्रतिभाशाली मानकरी लोकशिक्षण व लोकजागृती याच हेतूंनी प्रेरित होऊन आपल्या तेजस्वी कृती निर्माण करते झाले. मुकुंदराय-ज्ञानेश्वरांपासून टिळक, राजवाडे यांच्यापर्यंत (जरी) मराठीची ही परंपरा लक्षात घेतली तरी वाङ्मय हे केवळ मनरंजनाकरिता आहे की लोकशिक्षणाकरिता आहे, साहित्यिकाचा दर्जा विदूषकाचा की नेत्याचा हा प्रश्नच पडण्याचे कारण नाही. मराठी वाङ्मयाचे आदिकर्ते समाजक्रांतिकारक समतेचे पुरस्कर्ते होते. त्यांनी मराठीत ग्रंथ-रचना तर उत्कृष्ट केलीच, पण ती करण्याकरीता मिरासदार वर्गाचा छळही सोसला. वास्तवाचे यथातथ्य चित्रण आणि ध्येयाचे सूचित दर्शन या दोन प्रवाहांनी वाङ्मय समृद्ध आणि सकस होते."[२]

अमरशेखांची कविता अथपासून इतिपर्यंत वाचली तरी एक गोष्ट प्रकर्षाने जाणवते ती ही की त्यांची काव्यनिर्मिती ही केवळ मनरंजनासाठी नसून ती पूर्वपरंपरेला धरूनच लोकशिक्षणासाठी आणि लोकगृतीसाठीच आहे. त्यांच्या कवितेला खऱ्याखुऱ्या अर्थाने परतत्त्वाचा स्पर्श झाला आहे. ध्येयवादाने ओतप्रोत भरलेल्या अमरशेखांच्या कवितेत समतेचा पुरस्कार पुन्हा पुन्हा केलेला दिसतो. या समतावादाकडे आजच्या राजकीय दृष्टीकोनातून पाहणे निःसंशय चूकच ठरेल. मराठी संतांपासून जी क्रांतीची आणि समतेच्या पुरस्काराची अव्याहत परंपरा चालत आलेली आहे तीच पुढे नेण्याचे कार्य अमरशेखांची कविता करीत आहे असे अभिमानाने म्हणावे लागते.

●●●

१ स्टॅलीन.

२ गोपीनाथ तळवलकर-(आनंद, जून १९४२)

# प्रकरण ६

## राष्ट्रीय कविता

आधुनिक कवींच्या कवितेतील दोष दाखवताना साहित्यसम्राट केळकरांनी एके ठिकाणी म्हटले आहे की राष्ट्र आणि जनता यांच्या जीविताशी संबंध असलेले किंवा त्याशी तादात्म्य करून देणारे विषय आधुनिक कवी फारसे घेत नाहीत, त्यामुळे त्यांच्या कवितेला लौकिक पठनाचे विस्तृत अधिष्ठान मिळत नाही. पूर्वीच्या वेदांती कवितेस किंवा पवाड्यास असे अधिष्ठान होते यामुळे ते काव्य अस्सल राष्ट्रीय असे मानले जात असे. तात्यासाहेबांचे राष्ट्रीय कवितेबद्दलचे हे विचार अमरशेखांच्या संदर्भात लक्षात घेणे अगत्याचे वाटते. त्यांच्या कवितेत राष्ट्र आणि जनता यांचा जीविताशी संबंध असलेले अनेक विषय हाताळलेले दिसतात.

राष्ट्रीय कविता म्हणजेच देशभक्ती व्यक्त करणारी कविता. "देशभक्तीला पोषक अशा भावनांचा वा विचारांचा प्रत्यक्षा प्रत्यक्ष रीतीने प्रचार करण्यावरच राष्ट्रीय कवितेचा प्राधान्याने भर असतो."[१] त्यासाठी पुष्कळ वेळा इतिहासातील व्यक्तिविशेषांचा आणि प्रसंगविशेषांचाही उपयोग करण्यात येतो... विशिष्ट ऐतिहासिक व्यक्तीशी किंवा प्रसंगाशी समरस होऊन त्याचे प्रत्ययकारी व कलापूर्ण चित्र रेखाटणारी अस्सल ऐतिहासिक कविता आधुनिक मराठीत फारच अल्प प्रमाणात आढळते. या दिशेने केलेल्या प्रयत्नांचे थोडेफार श्रेय कोणाला देता येण्यासारखे असले तर ते मुख्यतः कवी माधवांनाच देता येण्यासारखे आहे... पुन्हा आमच्या कवींनी आपल्या राष्ट्रीय आणि ऐतिहासिक कवितांकरिता इतिहासातील व्यक्ती आणि प्रसंग निवडताना विशेषेकरून मराठ्यांच्याच इतिहासाचा आश्रय घेतला आहे"[२] अमरशेखांच्या कवितेत ऐतिहासिक व्यक्तींची मात्र निवड झालेली दिसत नाही. तर देशभक्तीची भावना जाज्वल्य स्वरूपात निर्माण होईल अशाच प्रसंगांची निवड केलेली आहे. अमरशेखांच्या देशभक्तीपर कविता जितक्या रसरशीत आहेत तितकीच त्यांची रचनाही ठसठशीत आहे. कोणत्याही राष्ट्रीय विषयाशी तात्काळ समरस होऊन त्यातील वस्तुस्थितीचा अचूक वेध घेण्याचे सामर्थ्य त्यांच्यात निश्चितच आहे. अन्याय, जुलूम, यांविरुद्ध पेटून उठण्याचे वेड अमरशेखांच्या कवितेत तीव्रतेने जाणवत राहते.

---

१ डॉ. अ. ना. देशपांडे.

२ मराठी वाङ्मयाचा इतिहास– डॉ. अ. ना. देशपांडे.

मशाल मोर्चा एकजुटीचा चोहिकडे फेका
लोकशत्रु साधण्या बैसले अजूनिही मोका

असा संदेश देणारे अमरशेख हिंदु–मुस्लीम एकजुटीची मशाल तेजाळायला सांगतात.

" आज राष्ट्रीय कवितेची भूमिका पुष्कळच व्यापक झालेली आहे. पारतंत्र्याविषयीचा ज्वलंत व्देष आणि स्वातंत्र्याची उत्कट अभिलाषा एवढेच तिचे आज मर्यादित स्वरूप राहिलेले नाही. आर्थिक, सामाजिक, राजकीय अशा सर्व प्रकारच्या विषमतेविरुद्ध आणि अन्यायांविरुद्ध ती आता बंड पुकारू लागली आहे. आणि कृत्रिम भेदातीत अशा समतेचा आणि मानवतावादाचा पुरस्कार करण्यात ती उदंड उत्साह दाखवू लागली आहे. आजच्या राष्ट्रीय कवितांतील समतावादाचे क्रांतिकारक स्वरूप नीट न्याहाळून पाहिले तर ते गांधीवादावरील निष्ठेतून उत्स्फूर्त झालेले आहे असे हमखास म्हणता येणार नाही. "[1]

आपल्याच मायभूमीच्या एका 'विशेष' भागाचे ते खालीलप्रमाणे दर्शन घडवितात.

दख्खनचे नंदनवन आमुचे खाण दुजी सौंदर्याची
ताड, माड दुधसागर निळ्या, मनोहर दर्याची

'गोवे' हा निसर्गरम्य भूभाग स्वतंत्र झाला नाही म्हणून अमरशेखांचे मन उसळून निघत होते. ह्या सौंदर्यसंपन्न भूभागावर परकीयांनी आपले पाय कायमचे रोवून ठेवावे आणि भारताचा एक भाग गुलामगिरीत पिचत राहावा हे त्यांना कसे रुचावे ? आमचा भूभाग या मगरमिठींतून सोडवून घेण्यासाठी कवी आवाहन करीत आहे. हे आवाहन भारतियांच्या राष्ट्रीय वृत्तीला केले जात आहे. पक्ष, पंथ, धर्मभेद सर्व आम्ही झटकून टाकून फ्रेंच, पोर्तुगीज यांचे पाणीही जोखल्याचे ते आत्मविश्वासाने सांगतात आणि कृतियुक्त जाणीव देताना जळजळीत शब्दांची जशी काही तोफच डागतात. त्यांतून निघणारे शब्द पेट घेऊन उठतात.

यश हे आमुच्या पायाखाली उठा चला रे गोव्याकडे
वेचुनि काढा मत्त पोर्तुगिज मुळासकट अन् चला पुढे

केशवसुतांना एकदा जग भिकार वाटते तर टिळकांना ही भूमीच स्वर्ग आहे असे वाटले.

म्हणे जाऊ चला स्वर्गी, 'नको देवी म्हणालो' मी
तिथे नाही नवे काही धरीना जे इथे भूमी–

---

१ डॉ. अ. ना. देशपांडे.



१.४८८९

किंवा

हिंदभूमी माझी जननी
आले हीच्या कुशीतूनी
हिरेच अवघे माझे ते
मन्मन त्यां मोहुन जाते

टिळकांचे हे जन्मभूमीवरील उत्कट प्रेम पाहून मन अक्षरशः थक्क होते. अमरशेखांचेही 'जन्मभूमी'वरील प्रेम किती उत्कट आहे ते पाहा —

जन्म धरतिवरती धन्य आम्ही ते
पुजूं पुज्य मायभू ही गाउनि गीते

महाराष्ट्राबद्दलचे प्रेम तर काही विचारायलाच नको. ते तर त्यांच्या नसानसांतून जणू उफाळते आहे.

सौंदर्य महाराष्ट्राचे । क्षणक्षणा प्रत्यया येते
माती सुगंध उधळीते । दरि कपार रिझवि मनाते

"तो वारा मम जन्मभूमिवरुनी येतो जवे वाहत" असे केशवसुत केवढ्या आत्मीयतेने म्हणतात ! तो वारा अंगावरून वाहू लागला की कवीच्या डोळ्यांपुढे कोकणातील ती उंच गिरिशिखरे, ते विस्तीर्ण सागराचे तरंग-तांडव, ते खळखळा वाहणारे निर्झर व ते जुने-पुराणे किल्ले, हे सारे वैभव उभे राहते."[1] अमरशेखांना माती सुगंध उधळताना दिसते, दरिकपार मन रिझविताना दिसते ती याच भूमीची. याच दरिकपारीबद्दल गोविंदाग्रजांनी नाही का म्हटले आहे ? —

सह्याद्रीच्या कडेकपारी, कोठे मोठे घाट ।
दरी पठारी धुंडित जाणे भारी अवघड वाट ।

ज्या धरतीवर आपला जन्म झाला म्हणून अमरशेख स्वतःला धन्य मानून घेतात ती 'काळीसावळी' आहे. तीच धरतीमाता प्रकट होऊन म्हणते —

सोड पाडसा– भ्रांती चिंता
देईन दाणा तुझा तुला मी– अगदी नामी
ज्या दाण्याने तूही जगशिल जगा जगवशिल...

पण या अशा धरतीमातेवर जर हक्क कुणी सांगितला तर ?

शत्रू ठरुनी मोल जिवाचे तयास द्यावे लागेल

१ आधुनिक कवी– दा. न. शिखरे.

असे अमरशेख बजावून सांगतात. आमच्या या पवित्र धरतीचे एकच मागणे आहे, ते फक्त शत्रूचे मढे गाडायला हवे हेच. हे जरी असले तरी 'गिळिली भूमि मुक्त करण्यासाठी' आम्ही पक्ष, पंथ, धर्म विसरून शांतीचे गान गगनात घुमवू. आमची भारतभूमी ही आक्रमक नाही, ती न्यायी आहे असे आम्ही जगाला दाखवून देऊ. दाही दिशात संपूर्ण लोकशाहीचा मंत्र घुमवू, हिंदी ऐक्य साधू, उरल्यासुरल्या साम्राज्याला मूठमाती देऊ, पोर्तुगीजांना 'दाती तृण धरून' शरण आणू. धनिकशाहीला, गुलामगिरीला, जातीयतेला ना थारा ना आराम हा भारतीयांचा बाणा कवी निक्षून सांगत आहे.

आजच्या व्यापक झालेल्या राष्ट्रीय कवितेतील पारतंत्र्याविषयीचा ज्वलंत त्वेष या कवीच्या कवनातही दिसून येतो त्याचा हा एक मासला पाहण्यासारखा आहे.

साम्राज्याच्या छुप्या दलाला अन जातियवाद्यांना
कोटि हातांची मूठ बांधुनी काढा झोडपुन त्याला
स्वैर लहरु दे ध्वजा दिल्लिवर साद घाल दिल्लीला
संघराज्य जनशक्ति पाठीशी तुझ्या उभी ही पहा
जागा रहा —

वैऱ्याची रात्र आहे म्हणून साऱ्या भारतीयांना 'जागा रहा' म्हणून इशारा देणाऱ्या अमरशेखांच्या कवितेत पारतंत्र्याविषयीची विलक्षण चीड दिसून येते, इतकेच नव्हे तर या आदरणीय भारतभूचा एकही भाग पारतंत्र्यात खितपत पडलेला त्यांना सहन होत नाही. रामदासांच्या अखंड व्हावे सावधान या उक्तीची इथे आठवण येते. अमरशेख म्हणतात—

एक भारतिय जोवर राहिल गुलामगिरिच्या बंधात
तोवर कुठला घास सुखाचा कोण असे आनंदात ?

आणि म्हणूनच पारतंत्र्यातून कायमची मुक्तता करून घेण्यासाठी ते सांगतात—

फिरंगि साम्राज्याचे मिळवू धुळीत उरले कोट खडे
वेचुनि काढा मत्त पोर्तुगिज मुळासकट अन चला पुढे

अशाच क्रियाशील भूमिकेवरून यापूर्वी वीर सावरकरांनी स्वतंत्रतेचे स्तोत्र गायिले आहे.

जननि तुझ्या सन्मानरक्षणी अर्पु रणी हे प्राण ।
शत्रूकंठ भंगोनि घालु तुज दारुण रक्तस्नान ॥

ज्या जननीचे क्रांतिवीरांनी स्तोत्र गायिले त्याच जननीवर आज स्वातंत्र्यप्राप्ती-नंतरही केवढे तरी महान संकट आहे. 'बर्फ पेटला' आहे. त्यासाठी भारतीयांची

क्रियाशील भूमिका अमरशेखांना (कवीला) कशी हवी आहे ती पाहिली म्हणजे त्यांच्या राष्ट्रप्रेमाबद्दल केवढा तरी अभिमान वाटतो. ते सांगतात—

रक्तकलश हिमगिरिवर चढु द्या
जनसागर सीमेला भिडु द्या
शिरकमले अग्नीत पडू द्या
ध्वज राष्ट्राचा सीमेवरती, भिडु द्या रे गगनाला—

किंवा

आजही छाती उघडोनी । गर्जतसे पर्वतराजी
घाला घण अमुच्या छातीवर । अन पहा मराठी बाणा

अशा आत्मविश्वासाने उभे ठाकलेले हे अमरशेख एका आगळ्याच वेहोषीने म्हणतात—

जरी उन्मळुन पडेन झुंजत
तरी समाप्ती नाही तिथे
मुळ्या हजारो वृक्ष प्रसवतील
पाय रोवतिल पुन्हा इथे

विषमतेविरुद्ध बंड करणारी आजची राष्ट्रीय कविता अमरशेखांच्या 'कलशात' जास्त दिसते. 'ब्रह्मा–विष्णु-महेश' या कवितेद्वारे ते सुचवितात—

घे हाती या साऱ्या जमिनी घे ब्रह्माचा अवतार
पहिले खा तू विष्णू होउन जगुन जगाला तार
उघड नेत्र तो तिसरा भयकर लालेलाल अंगार
ऐतखाउंचे कर निर्दालन घेइ रुद्र अवतार
ऊठ हे सर्वव्यापि भगवान-माझ्या राजा कुणबि हरे राम

विषमतेने भाजून निघणाऱ्या जीवनाबाबतचे त्यांचे भाष्य तर मन अक्षरशः पिळवटूनच काढते. मानवतेचा आणि समतेचा अभाव असलेल्या या जगात सहनशक्तीला आता सीमा नाही. "का यौवनावरी हक्कच अमुचा नाही?" असे विचारून अमरशेख म्हणतात, जीवन जगणे हा हक्क गुन्हा ठरला आहे. मानवी जीवनाकांक्षा मरायला लागल्या आहेत. यौवन प्रीतीच्या प्रेतावरती जळत आहे. "शांत विचारी सदा रहावे" हे तत्व किती तरी सुंदर आहे. परंतु हे जपावे तरी कुठवर? (माणसाने) शांत विचारी तरी किती राहावे? विचार खाऊन जगता येत असते तर कितीतरी बरे झाले असते. एका कवितेत "परि सौख्य असे का सामान्या लाभेल?" असा प्रश्न विचारून "शंका ही रास्त पण क्षण सुखास बाधेल" असे लगेच ते पुढे म्हणतात. आज विषमता निर्माण होऊन बहुजन समाजाला ज्यांनी छळायला,

पिळायला सुरुवात करून आपली तुंबडी भरली आहे; जीवन जगणे असह्य करून सोडले आहे. गरीब व श्रीमंत ( धनिक ) असे उघड उघड दोन वर्ग देशात पाडले आहेत. त्यांच्याबद्दल ते म्हणतात—

ते खटनट सारे चोर भांडवलवाले
जे फक्त नफ्यासाठी चटावले गेले
ती सवयच साऱ्या धनिकांना जडलेली
बिन–मेहनत जगणे निशा सदा चढलेली

याच धनिकांनी अधम कृती करावी. ते कसाई तर आहेतच शिवाय निर्लज्जही आहेतच. आपल्याला नफा मिळत राहावा म्हणूनच बाजारपेठ त्यांना हवी आहे. आणि लष्करी योजना आखून ते युद्ध पेटवीत आहेत. ब्रिटिशांनी भारतीयांना आपले पार गुलाम बनविले, एवढेच नव्हे, तर जगावर जेथे तेथे आपलीच पाशवी सत्ता असावी, औद्योगिक क्रांतीमुळे निर्माण झालेल्या व पडून राहिलेल्या मालाच्या खपासाठी बाजारपेठा उघड्या मिळाव्यात म्हणून हे युद्ध सतत धगधगते ठेवले.

पृथ्वीवर होते राज्य तयांचे साऱ्या
मिळविलेहि होते करुनी मारामाऱ्या
या मारामाऱ्यांमधील रिक्रुट आम्ही
नेती सत्तेच्या जोरावर बांधोनी

आपल्या फायद्यासाठीच हे 'कसाई' नेहमी सज्ज राहिले होते. पण प्रत्यक्ष युद्धात आम्हाला पुढे करून हे मात्र मागे राहून नफ्याची लूट करीत. त्यामुळे आमच्या तारुण्याच्या भोवती मात्र आगच भडकत होती. धनिकांनी आमच्या जीवनाला शाश्वती अशी ठेवलीच नव्हती.

भस्मसात साऱ्या खुणा प्रीतिच्या होती
उध्वस्त जीवनाचीच हाती ये माती

अशी आमची अवस्था त्यांनी करून टाकली होती. आम्हाला सत्य, स्वत्व मुळी उरलेलेच नव्हते, चालली होती ती ससेहोलपटच. चालला होता तो अनर्थ. चालली होती ती सर्व गांजणूक— याचे चित्रण अमरशेख हृदयंगम रीतीने करतात—

कुणि मित्र कुणाचा चुलता, काका, मामा
या युद्धामधुनी अजाण येतो कामा
कोणाचा भाऊ, मुलगा, पती कुणाचा
कधि बुडेल रक्तामाजी नेम न त्याचा

कितिकांच्या आया-बहिणी रंडक्या होती
कित्येक घरादारासह बुडून जाती

ही स्थिती भारतात तर होतीच पण साऱ्या जगावरच एक प्रकारचे महान संकट कोसळलेले होते.

तो प्रचंड मानवतेचा संस्कृति-ठेवा
त्यावरी पसरला ॲटमबॉंबचा लाव्हा
गन, रणगाडे, तोफा, बंदुक, पिस्तूल
मानव यांना फळ-फूल कसा समजेल?
युद्धांनी गरिबाचे का झाले भले?
जग नवे बॉंबने सांग कुठे निर्मिले?

असे अमरशेख अगतिकतेने विचारू लागतात. या जगात पाहावे तो गरिबाच्याच जीवनाची दैना उडालेली. त्याला आधार कुठलाच उरलेला नाही. त्याचे जीवन-पुष्प हवे त्याने, मन मानेल तसे चुरगळावे ही नव्या जगाची जणू काही रीतच बनलेली आहे.

मी दुःख ओकण्या जातो दुसऱ्यापाशी
तो तोही निघतो दुःखी आणि उदासी

अशी एकजात इथून तिथून अवस्था झालेली आहे.

एकजात यौवन जळते मजला दिसले
कौतूक कुणाचे कुणी करावे कसले?

अशी मावनजातीची केविलवाणी स्थिती झालेली त्यांना दिसते.

माझ्याचसारखे लाखो कोटी जीव
तडफडती त्यांची कुणी करावी कीव

पारतंत्र्याच्या काळात इतकी अगतिक अवस्था बनलेली असताना अमरशेख हताश मात्र व्हायला तयार नाहीत. त्यांना हे उपमर्दकारक, असह्य जिणे जगणे लाचारीचे, स्वाभिमानशून्यतेचे वाटते. आणि ते इशारा देतात-

जगु शकतो तू शकतो यौवन प्रेम
शांतता लढाईत आधि लाव या जोम
एकसंघ उभारुनि फळी युवक सेनेची
कर हड्डि नरम या धनिक युद्धखोरांची

मानवतेवरील निष्ठा अमरशेखांनी आपल्या राष्ट्रीय कवितांतून कित्येक ठिकाणी प्रतीत केली आहे.

जीवन ठायी ठायि नाडिले
घटसर्पच जणु घशास भिडले

या अवस्थेची त्यांना चांगलीच जाणीव आहे. ही अवस्था पार बदलून देशात समृद्धी नांदावी हीच तर त्यांची खरी तळमळ आहे. म्हणूनच ते सांगतात—

होत आहे उध्वस्तच सारे
म्हणुनि तरी या उठा उठा रे
तार सप्तकी स्वर लावा रे
फुलवा गीत नव्याने
कणाकणातुनि गीत स्फुरू द्या
नवरस गंगा ही निर्झरु द्या
ल्ढत गाउनी हे दावुनिया
अमर आमुचे गाणे

दुसऱ्या महायुद्धात पतन पावलेले सैनिक कोणता इशारा देतात ते त्यांच्याच शब्दांत पहा—

शस्त्रास्त्रांनी, दमदाटीने ल्ढाइ का जिंकाल ?
लोखंडाचे चणे चारुनी का माणिक मिळवाल ?
चणे खाति नित लोखंडाचे त्या कराल भयभीत ?
मानवपूजक मानव का धमक्यांनी होइल चीत ?

म्हणूनच —

क्षण थांबा रे ! पुन्हा एकदा जन्माला येऊन
अमानवाचा घोट नरडिचा घेउन अन दावून
समूळ उपटुनि भविष्यातुनी जाइन मग मातीत
ध्यानि असू द्या मानव जाइल यशाप्रती निश्चित

आजच्या मानवाची अगतिक अवस्था कशी झाली आहे ते अमरशेख पदोपदी सांगतात. मानवतेवर विलक्षण श्रद्धा असणारे संवेदनाशील अमरशेख मानवाच्या सामर्थ्याबद्दल कधीच साशंक होत नाहीत. आजच्या मानवातल्या संहारक प्रवृत्तींचा नाश ‘ विज्ञानाचे भस्म ’ लावून अखेर मानवच करणार. आज मानवता जागी झाली आहे. पण तोच मानव पाण्याच्या थेंबाला मात्र महाग आहे. हे कटु सत्य ते सांगायला मुळींच डगमगत नाहीत. मानवाची पराक्रमशीलता त्यांना केवढी वाटते !

मुठीत सागर थोर हिमालय, ही ज्याची छाती
चंद्र, सूर्य झळके इतरांगत ज्या माथ्यावरती
तोच आज मी मानव पाण्याच्या थेंबास महाग

पण असे असूनही मानवता आग ओकणार आहे असा त्यांचा विश्वास आहे.

अमरशेखांच्या राष्ट्रीय कवितेत पारतंत्र्याविषयीचा ज्वलंत द्वेष जसा आहे, तशीच मातृभूमीवरची उत्कट भक्तीही आहे, आर्थिक, सामाजिक, राजकीय अशा सर्व प्रकारच्या विषमतेविरुद्ध आणि अन्यायांविरुद्ध त्यांची कविता बंड पुकारते. कृत्रिम भेदातीत अशा समतेचा आणि मानवतावादाचा पुरस्कार करण्यात ती उदंड उत्साह दाखवते. केवळ ऐतिहासिक पुरुष अगर ऐतिहासिक प्रसंग यांची चर्चा न करता राष्ट्र आणि जनता यांच्याशी तिचे नाते चांगलेच जुळलेले आहे.

●●●

प्रकरण ७

# व्यक्तिमत्वाला लागलेली ओढ

" कलावंत कलानिर्मिती करतो म्हणजे त्याच्या प्रतिभेचा चिंतनविषय झालेल्या च कलाविषय बनलेल्या एका विशिष्ट उत्कट जीवनानुभवांतील चित्राकृती तो व्यक्त करू पाहतो. ही चित्राकृती त्याच्या विशिष्ट प्रकृतीनुसार त्याला जाणवते. तो ज्या वृत्तीने जगाकडे, जीवनाकडे पाहील त्या वृत्तीवर, जीवनसत्याचा शोध घेण्याच्या त्याच्या मनाच्या कुवतीवर व त्याच्या सौंदर्यदृष्टीवर ही त्याला जाणवणारी चित्राकृती अवलंबून राहील. परंतु हिनेच तो वेडा होतो व हीच तो अभिव्यक्त करू पाहतो."[१]

" कवी एकांतिक व एकटा असा राहतो, त्याची मूल्ये प्रचलित सामाजिक मूल्यांपेक्षा निराळी असतात."[२]

" स यत्स्वभावः कविः तदनुरूपं काव्यम्" हे महाराष्ट्री राजशेखरांचे मत अनुभवाच्या कसोटीला पूर्ण उतरलेले आहे. " प्रचीती, प्रक्षोभ, प्रसाद, प्रतिभा आणि प्रयत्न हे काव्याचे पंचप्राण आहेत."[३] काव्यनिर्मितीचा सारा प्रपंच या पंचकात साठविला आहे.

पण प्रचीती हेच काव्याचे बीज असल्यामुळे जशी प्रचीती तशी काव्यकृती असे स्थूलमानाने म्हणावयास हरकत नाही. आत्मसात झालेला अनुभव म्हणजेच प्रचीती. तो अनुभव स्वतःच्या सुखदुःखांतूनच आला पाहिजे असे नाही. तो इतरेजनांचा-बहुजनांचा जरी असला तरी आपलासा करून घेता येतो. अनुभव आपला असो अगर आपलासा करून घेतलेला असो, तो जसाच्या तसा त्याच स्वरूपात सहसा संक्रमित केला जात नाही. कवीचे व्यक्तिमत्व या संक्रमणकार्यात दिसून येते.

आदर्श ( Ideal ) व वास्तव या दोहोत समतोल नसला की त्या वेळी उपरोधाची उपयुक्तता पटते. एखाद्या कवीच्या कवितेत उपरोधाचा आश्रय घेतलेला दिसतो त्याचे प्रमुख कारण हेच मानावे लागते. अमरशेखाच्या ' गाढवाला उद्देशून ' ' अज्ञानाचे मत, ' ' शुभ्र खेकडे, ' ' आपुले धोतर ' या कवितांतून उपरोधाची धार चांगली पाहायला सापडते. मध्यमवर्गीय पांढरपेशांची मनोवृत्ती ठराविक अशी बनून

१ वाङ्मयीन टीपा-टिप्पणी

२ नवभारत, १९५६

३ पु. मं. लाड.

गेल्यामुळे नैतिक, कलात्मक मूल्यांकडे लक्ष देण्यास त्यांना सवड नसते. व्यावहारिक बाबींवर त्यांचे लक्ष केंद्रित झालेले असते. साहजिकच त्यांचा परिणाम कलावंतावर होतो. तो त्यांच्याकडे उपहासाच्या चष्म्यातून बघतो. मध्यमवर्गातील अपप्रवृत्तींवर उपरोधाचे प्रहार जरी हा कवी करीत असला तरी त्यांच्या प्रवृत्तीचे काही नुसतेच विडंबन तो करीत नाही, किंवा त्यांच्या दुःखांना वाट करून देत नाही. तर आपली मानसिक प्रतिक्रिया कोणत्या तऱ्हेची झाली आहे हेच उलट प्रतीत करतो. आजच्या मध्यमवर्गीय जीवनातील विखार दाखवून देतो. दलित, पीडित कामगारांचे जीवन-चित्रण करताना अमरशेख फार करून उपरोधाचा आश्रय घेतच नाहीत. त्यांना जे उघडे, हिंस्र स्वरूपात जीवन दिसते त्याचेच बारकावे ते तपाशीत जातात. त्यातील कारुण्य, आर्तता उत्कटतेने दर्शवितात. पण एवढे दर्शविल्यानंतर या कलावंताच्या कार्याची समाप्ती होते असे मानले तर निःसंशय वेडेपणाचेच होईल. उलट जी आर्तता उत्कटतेने अमरशेख मांडतात ती मांडल्यानंतरच आपल्याला मानवी कर्तृत्वाचा हुंकार उमटलेला दिसतो. अहंप्रवृत्तीचा उदात्त आशय कवितेत जागोजाग दिसतो त्याचे कारण हेच आहे की, अमरशेखांची जीवनाकडे पाहण्याची वृत्ती वेगळी आहे. चिंतनशीलता हीच ती प्रमुख वृत्ती. हेच चिंतन कधी व्याजोक्तीचा आश्रय घेते तर कधी सरळच टीकास्त्र चालवते. सामाजिक दांभिकतेवर, असत्यावर तऱ्हेवाईकपणावर, नागडेपणावर चिंतनात्मक कोरडे ओढलेले दिसतात. पण ही सारी घृणास्पद स्थिती बदललीच पाहिजे, हीच तर त्यांची तळमळ आहे. ही तळमळ व्यक्त करताना अमरशेख स्वतःबद्दलचेच भाष्य करीत राहतात. त्यांच्या व्यक्ती-मत्वाला एक वेगळ्याच प्रकारची ओढ लागलेली आहे. ती ओढ व्यक्त होते ती त्यांच्या जीवननिष्ठेतून, आत्मप्रत्ययातून, अनुभुतीतून. ही ओढ कधी रस-रसलेली अशी दिसते तर कधी ती दाहकही बनलेली दिसते. अमरशेखांना व्यक्तित्व वेगळे घडवायचे आहे. प्रचलित समाजजीवनात परिवर्तन होणे अपरिहार्य झाले आहे अशी त्यांना मनोमन जाणीव झाली आहे. नवीनता निर्माण झाली पाहिजे ती जुन्यातुन; जुने नष्ट झाले पाहिजे ते त्याज्य आहे म्हणून; नवमंदिर घडले पाहिजे ते चैतन्यदायक आणि स्फूर्तिदायक अशीच जणू त्यांची श्रद्धा आहे. श्रद्धेच्या पोटीच खरे म्हटले तर त्यांच्या व्यक्तिमत्वाला ओढ लागून राहिली आहे. तिची पूर्तता व्हावी म्हणून ते नवे नवे आदर्श समाजापुढे उभे करीत आहेत. भारतरत्न कर्वे यांच्यासारखी महान विभूती अमरशेखांचा चिंतनविषय होते आणि त्याद्वारे ते व्यक्तिमत्वाला कशा तऱ्हेची ओढ लागली आहे ते सांगतात—

शुष्क करांतुन सदा मिळावी
तुजसम बाहूंना शक्ती
तुझ्याप्रमाणे मीहि शिकावी
रात्रंदिन मानवताभक्ती

... मर्द मराठी मन तव घ्यावे
तुजसम कणखर होउन निर्भय
निष्ठुर सेवाव्रत मी घ्यावे
कोपऱ्यातल्या उदबत्तीगत
परिमल देतच जळत रहावे

अमरशेखांचे व्यक्तित्व आणि कवित्व हे पूर्णपणे त्यांचेच आहे. ही गोष्ट त्यांनी गायिलेले 'चरित्र' व प्रतीत केलेले काव्य अत्यंत समतोल बुद्धीने पाहणाऱ्याच्या तात्काळ ध्यानात येईल.

"कलावंत हा प्रथम कलावंत असतो. परंतु तेवढाच त्याच्या व्यक्तित्वाच्या जाणिवेचा आणि जीवनाचा परिसर असत नाही. तो कलावंत इतर काही तरी असतो. त्या व्यक्तित्वातील हे काही तरी जेव्हा कलेच्या आश्रयाने वाङ्मयात प्रकट होते तेव्हाच त्या कलाकाराच्या व्यक्तित्वाचा संपूर्ण अविष्कार झाला असे म्हणता येईल."[१] आणि तसा तो शाहीर अमरशेखांच्या वाङ्मयात निश्चितच झालेला प्रखरपणे दिसून येतो.

रे. टिळकांनी नाही का मानवी कर्तृत्वाचे बल आणि महत्वाकांक्षा यांचे वर्णन आवेशपूर्ण भाषेने व विशाल मनोवृत्तीने केले आहे ? 'पुरे जाणतो मीच माझे बळ' या कवितेत ते गरजतात–

हा एक कक्षेत छावा गजाचा, दुजीमाजि हा सिंह केकावतो ।
हा जाहला अर्धमेला भयाने । ल्योनी महाव्याघ्र डोकावतो ।
हे पर्वताचे उभे क्षुद्र धोंडे । महासागरांचे पुढे पल्वव
बोला हवे ते, मला काय त्याचे । पुरे जाणतो मीच माझे बळ ॥

अमरशेखही मानवी कर्तृत्वाची ओळख अशी पटवून देतात. —

शक्ती माझी सामान्याची
असे रसायन काढिन त्यातुन
फुलेल अवघे जीवन ज्यातुन
कामधेनुंची लाविन दावण

किंवा

कभिन्न काळ्या पाषाणाला
मुळ्या कोवळ्या छेदित ज्या
त्याच मुळ्यांच्या जोरावर मी
उडविन काळाच्या चिंध्या

---

१ कुसुमाग्रज.

काळाच्या चिंध्या उडविण्याची कल्पनाच किती भयंकर आहे. मानवी कर्तृत्वाची ओळख ज्या स्फूर्तिशाली शब्दांद्वारे अमरशेख करतात त्यांपाठीमागे असलेल्या मनात अंगार फुलत असला तर त्यात आश्चर्य कसले ?

होय तोच आहे अंगार
आग ओकणे मजला प्यार
बाग आगिची फुलवावी
सर्व चांगले ठेवावे । सगळे वाइट जाळावे

ही व्यक्तिमत्वाला लागलेली ज्वलंत ओढ आहे. फुललेला अंगार नवनिर्मितीसाठी आहे. संहारासाठी नाही सर्व चांगले तर ठेवायचेच आहे; मात्र वाईट जाळण्यासाठी हा अंगार फुलतो आहे.

हा फुललेला अंगार सतत तसाच राहत नाही हे त्याचे वैशिष्ट्य आहे. तो विझूही शकतो. तो कसा विझवला जातो ? तर अमरशेख म्हणतात, 'मी गाणी म्हणत नाही-आग ओकतो. त्यात मी स्वतःला भाजून घेतो आणि माझ्याच अश्रूंनी मी ती आग विझवून टाकतो.'

क्षयासारख्या व्याधींनी समाजजीवन, कामगारजीवन सर्रास पोखरलेले पाहिल्यावर त्यांना भडभडून येत. ज्या जीवनाची दैना ते पाहतात त्या जीवनाचा भेसूर, भयानक चित्रपट त्याच्या डोळ्यांसमोरुन जातो. धनिक वर्गाच्या ख्याली-खुशालीतील जीवन आणि त्या जीवनाला मौल्किता प्राप्त करून देणारे जीवन-तळाचे जीवन मात्र क्षयात पिचलेले अमरशेखांना बघावे लागते. त्यांना ते असह्य होते. ते त्वेषाने चिडून उठतात.

जीवनात प्राण असे तोवर
जगात शाई असे तोवर
जिभेची हालचाल होते तोवर ..
शेवटला टोला प्राणांतिक देऊन
क्षयाला ठेचून काढलेच पाहिजे

अशी ते गर्जना करतात.

"तू अमुक वृत्तीने जीवनाकडे पाहा, अमुक प्रकारची सौंदर्यदृष्टी संपादन कर, अमुक प्रकारच्या आकृतींनाच जन्म दे असे कलावंतांना सांगणे म्हणजे कलेच्या प्रकृतीबद्दल अज्ञान- नव्हे अनादर व्यक्त करणे आहे. कितीही मोठ्या उच्च आणि उदात्त हेतूंनी प्रेरित होऊन आपण असे कलावंताना सांगत राहिलो तरी त्यापासून कलेचा फायदा नाही."[१] काव्य ही कला आहे. तेव्हा कलावंताने काव्यात

---

१ प्रा. वा. ल. कुलकर्णी.

अमुकच विषय हाताळावेत त्याच्या कवितांचा आशय रूपकात्मकच हवा किंवा तो नुसताच सौंदर्यात्मक हवा अशा तऱ्हेचा हट्ट धरणे चुकीचे अतएव त्याज्यच ठरते. कलावंत ज्या दृष्टीने जगाकडे पाहतो त्या दृष्टीचेच साक्षात्कारी 'स्वरूप' आपल्याला त्याच्या कलेमध्ये पाहायला सापडते. कवीचे व्यक्तित्व बहुरंगी, बहुढंगी असेल तर त्याचाही प्रत्यय त्याच्या कलाकृतीद्वारे पटतोच. कवीच्या व्यक्तित्वाची घडण ज्या प्रकारची असेल त्याच प्रकारचा आशय त्याच्या कवितेत दिसेल. दृष्टिकोन आणि व्यक्तित्व ही बऱ्याचशा प्रमाणात एकरूप झालेली असतात. कवीचे व्यक्तिमत्व आणि जीवनाकडे, जगाकडे पाहण्याची दृष्टी याच गोष्टींचा प्रत्यय कलाकृतीत येतो हे सामान्य वाचकाने वा रसिकाने समजून घेतले पाहिजे. सर्वसामान्य असलेल्या सामाजिक मूल्यांचीच कवीने जोपासना केली पाहिजे हे गृहीत धरून चालणे अयोग्य ठरते. कवीची म्हणून स्वतःची काही जीवनमूल्ये असतातच. त्या मूल्यांच्या दिशेने समाजरचना होत राहावी किंवा व्हावी असे त्याला वाटले तर तो काही गुन्हा ठरू नये. कवी काय किंवा कलावंत काय, हा त्या त्या समाजाचा, काळाचा प्रतिनिधी असतो सामाजिक मूल्यांची चाललेली ससेहोलपट जशी त्याला पाहवत नाही तसेच भरडले जाणारे भेसूर जीवनही त्याला सहन होत नाही. ज्या माणसांत तो वावरतो त्यांच्या दुःखाची झळ कधी ना कधी त्याला लागतेच. त्यातून तो प्रखर संवेदनाशील असला तर मग विचारायलाच नको. तो बंडखोर प्रकृतीचा असला की परिवर्तन व्हावे हे त्याला न वाटले तरच नवल. आणि त्यातूनच तो जीवनविषयक मूल्यांची जपणूक करण्याचा क्रांतिकारक मार्ग दाखवतो कवी हा समाजाचा उपकारकर्ता असतो तो तत्त्वज्ञ असतो, मार्गदर्शक असतो. तो समाजजीवनांतील कटु अनुभवाचे जिवत चित्रण करून समाजाला खऱ्या वस्तुस्थितीची जाणीव देतो. त्यातले कारुण्य, रौद्रता, भयानकता. बीभत्सता 'याचि डोळा' पाहायला लावतो. जीवनाविषयी घृणा उत्पन्न करण्यापेक्षा जीवनात शुद्धता कशी निर्माण करता येईल याचा मार्ग दाखवतो. मानवी कर्तृत्वाला, सामर्थ्याला हाक देतो, चेतना देतो, स्फूर्ती देतो. मेलेल्या मनात चैतन्य निर्माण करतो.

उगीचता सारी नाही हे जीवन
जीवन आहे प्रयोग महान

याची जाणीव देतो. जीवन परिवर्तनशील आहे याबाबतचा विश्वास उत्पन्न करतो, आणि माणसाला सुख, समृद्धी याकडे जाण्याचा ध्येयशील मार्ग दाखवितो.

क्षणात तुजला उमजुन येइल
कवळ्यातच पृथ्वीला आवळून
अमृत जे जगताला होऊन
कल्पतरूंची बाग लावुनी

अशा तऱ्हेचा आशावादही निर्माण करतो.

''साहित्यनिर्मितीच्या प्रक्रियेत कलाकृतीमध्ये साहित्यिकाच्या प्रकट झालेल्या व्यक्तिमत्वाचा दर्जा फार मोठा आहे. त्यात समृद्ध व्यक्तिमत्वाचे वलय अनुस्यूत असते. साहित्यिकाचे व्यक्तिमत्व साहित्यकृतिनिर्मितीमधील आशय आणि त्यावरील निष्ठा लक्षात घेता निश्चितपणे आदरणीय आहे. आत्मप्रत्याने प्रभावित झालेले साहित्यिकाचे व्यक्तिमत्व साहित्यनिर्मितीपाठीमागील एक क्रियाशील घटक आहे. साहित्यिकाची निष्ठा समाजाला विचारप्रवण करील. या साहित्यिक व्यक्ती-मत्वाच्या गुणामुळे सामाजिक आशयाची भूमिका समाजविकासक्रमाला हातभार लावणारी आहे.''[1]

कवीच्या व्यक्तिमत्वाला लागलेली ओढ, तिच्याद्वारे व्यक्त होणारा अहंप्रवृत्तीचा उदात्त आशय वाचकांस, रसिकांस त्या त्या क्षणी अंतर्मुख बनवतो, आत्मशोधन करायला लावतो. वाचक, रसिक जीवनाचा गंभीरपणे विचार करायला लागतात. वाचकाला, रसिकाला असा विचार करायला लावणारे कवीचे व्यक्तित्व मोठे लोभस आणि अनुभवसमृद्ध असावे लागते. अमरशेखांसारख्या कवीजवळ ते तसे निश्चितच आहे म्हणूनच त्यांचा प्रत्येक अनुभव हा वास्तविक असतो, आशयसंपन्न असतो. तो अनुभव मांडीत असतानाच ते आपल्या व्यक्तिमत्वाचे दर्शन रसिकांना घडवून त्यांना अंतर्मुख बनवितात. रसिकाला गंभीरपणे विचार करायला लावणारे वाङ्मय हे श्रेष्ठ दर्जाचे वाङ्मय असते. ते हृदयाला नुसते स्पर्श करीत नाही, तर पूर्णतः भिडते. बुद्धिवादी जीवनदृष्टीचा चिंतनात्मक आशयच अशा तऱ्हेच्या कलाकृतींतून आपल्याला पाहायला मिळतो. अमरशेखांच्या व्यक्तिमत्वाला लागलेली ओढ खालील ओळीत सहज पाहायला सापडते.

माझा देहचि धरती माता
हा कुराण ही माझी गीता
यातच धन, ऋण शक्ति उपजल्या
बुद्धि भावना रूप जाहल्या

शब्दांच्या या तारेमधुनी
जगी एक होउनी प्रकटल्या
प्रकाशमय हे जीवन झाले
गूढ उकलण्या पुढे निघाले.

---

१ यशवंत, दीपावली अंक, १९६१

प्रकाशमय झाल्याचा साक्षात्कार होऊन गूढ उकलण्यासाठी जीवन पुढे निघाले आहे. पण अमरशेखांना अखेर हवे आहे काय ? तर—

अंतिम सत्यासाठी सगळ्या
नीतिनियमा उडवुनि लाविन
वेच्चिन जीवन त्यासाठी मी
उभा राहिला मानव पाहिन

हीच तर व्यक्तिमत्वाला लागलेली खरीखुरी ओढ आहे. तिचा आशय उदात्त नाही असे कोण म्हणेल ?

●●●

मराठी ... स्थळ
अनुक्रम ४०९५८ दि: ३।०५
क्रमांक ९६६५ नों: दि: २९।।५

## प्रकरण ८

# बोलकी शब्दचित्रे

एखादा कुशल चित्रकार एकदोन वेलांट्यांतच एखाद्या व्यक्तीची बाह्य रेखा तयार करतो. त्याचे माध्यम असते रेषा. त्या रेषांतून अधिक बारकावे काढून तो एखादी आकृती बोलकी करतो. आकर्षक करतो. एखाद्या आकृतीत जिवंतपणा येण्यासाठी, ताजेपणा येण्यासाठी, आकर्षकता येण्यासाठी चित्रकाराला अतिशय मेहनत घ्यावी लागते. रंग, रेखा यांच्या विविधतेतून त्याला एकता निर्माण करायची असते. विसंगतीतून चित्रकार सुसंगती साधण्याचा प्रयत्न करीत राहतो. तो जितकी संगती अधिकाधिक साधील, तिचा आशय अधिक गोंडस आणि कलात्मक करील तितकी तितकी ती आकृती अधिक बोलकी होते. काव्यतही हे तत्त्व लागू पडते. काव्याचे माध्यम असते शब्द. शब्दाला मुळातच एक प्रकारचा नाद आणि ताल असतो. उचित शब्दयोजनेच्या साहाय्याने एखादा कुशल कलावंत अशी काही रेखीव शब्दचित्रे रेखाटतो की त्यांचा ठसा रसिकांच्या अंतःकरणावर उमटलाच म्हणून समजा. अर्थात आशय समर्पक शब्दांत बसविणे, तो अधिक कलात्मक करणे ही एक प्रकारची कसरतच असते. त्यासाठी कवीजवळ फार मोठे शब्द-भांडार असावे लागते. प्रतिभेची झेप उत्तुंग असावी लागते. विचारातील सुसूत्रतेला एखाद्या अनुचित शब्दाने बाध येणार नाही याबाबत तर अक्षरशः डोळ्यात तेलच घालावे लागते. समर्पक शब्दयोजना करून त्याच्या साहाय्याने एखाद्या घटनेचे, व्यक्तीचे, प्रसंगाचे हुबेहुब बोलके चित्रण करणे ही गोष्ट अतिशय अवघड आहे. परंतु अमरशेखांच्या काव्यात असे असूनही कित्येकदा जिवंत चित्रण केलेले आढळते. पावसाच्या सरीप्रमाणे शब्दांच्या पंक्ती सफाईने पडत जातात. शब्दाचे मार्दव व माधुर्य चटकन नजरेत भरते. एखाद्या प्रसंगाचे वर्णन करणे वेगळे आणि त्याचे चित्रण करणे वेगळे. थोडक्यात पण कलात्मक आशय व्यक्त करणाऱ्या कलावंताच्या प्रतिभेत मुळातच शब्दयोजनेचे सामर्थ्य असावे लागते. त्याची कल्पना-शक्ती तरल असावी लागते. तरच शब्दचित्रे रेखीव दिसतात. नाहीतर त्यांत ढिसूळ-पणा हा यायचाच.

त्यातून ज्याचे कलात्मक चित्रण करायचे असेल त्या वर्ण्य विषयाशी कलावंताने तादात्म्य पावले पाहिजे. कलावंताची एकरूपता आणि वर्ण विषय यांच्या सम-न्वयातून व त्यातून निर्माण होणाऱ्या सुसंगतीतूनच शब्दचित्रे बोलकी बनतात.

हृदयंगम होत जातात. अर्थवाही शब्दरचनाच बोलकी शब्दचित्रे अधिक आशयात्मक आणि कलात्मक करते.

कलावंत हा जात्याच सौंदर्यपूजक असतो. निसर्गात लपलेल्या सौंदर्याचे दर्शन तो आपल्या कलेद्वारे प्रतीत करतो. कवी शब्दांच्या साहाय्याने वस्तूवस्तूंत जे सौंदर्य लपलेले असते ते शोधून काढून रसिकाला दाखवितो. त्याची उकल अगदी हळुवारपणे करतो आणि त्या सौंदर्यदर्शनाने वाचकाला मुग्ध करतो.

" कलाकृती पाहिली की आपल्या मनातही बहुधा त्याच म्हणजे कलावंताच्या मनात असलेल्या अशा भावना अथवा वृत्ती निर्माण होत असतात. रसिकाने प्रथमपासूनच उचित वृत्ती स्वीकारलेली असेल तर या प्रकृतीने तो कलावंताच्या व्यक्तित्वासमीप पोहोचू शकतो. म्हणजे त्याचा मूळ स्वभाव व कलानिर्मितीच्या वेळच्या त्याच्या काय भावना असतात हे तो जाणू शकतो. कोणत्याही माणसास आपल्याशिवाय इतरांच्या व्यक्तित्वाशी अथवा भावनांशी या प्रकाराने समरस होता येते. अशी कलावंताशी समरसता साधली की कित्येकांचे समाधान होते. यालाच कलाकृतीचे ग्रहण म्हणावयाचे."[1] कवीने रेखाटलेल्या एखाद्या प्रसंगाशी, घटनेशी, व्यक्तीशी वाचकाची समरसता साधली की वाचकांना एक वेगळ्याच प्रकारचा आनंद होतो. कवीने आपल्या समर्थशील शैलीने बोलकी शब्दचित्रे रेखाटली की वाचक तिच्याशी समरस झाल्याशिवाय राहतच नाही. वाचक जितका त्या त्या वस्तूशी समरस होईल तितकी ती कलाकृती बोलकी व हृदयंगम ठरते. म्हणूनच बोलकी शब्दचित्रे रेखाटणे आणि त्यांनी रसिकांचे चित्त मोहित करणे ही कला उच्चतम म्हणावी लागते. " कलेचे खरे महत्त्व वाचकांच्या ठिकाणी स्वतःच्या निरपेक्षतेचा उत्कट अनुभव मिळवून देण्यात असतो. ज्या व्यक्तीशी आपला इतरथा संबंध येण्याचा संभव नाही, त्याच्याशी मानसिकरित्या संबंध आणून देण्याचे कार्य कला करते." त्या कलेचे माध्यम जे शब्द आणि त्यांनीच रेखाटलेली कलाकृती सुंदर होत गेली की शब्दचित्रे बोलकी होतात.

एखाद्या प्रसंगाचे सूक्ष्म व रम्य वर्णन केशवसुतांनीही केले आहे. 'रांगोळी घालताना पाहून' या प्रसन्न काव्यातील बालिकेचे शब्दचित्र ते पुढील शब्दांनी रेखाटतात—

होती मंजुल गीत गात वदनी अस्पष्ट काही तरी।
गेला दाटुनि शांत तो रस अहा तेणे मदभ्यन्तरी
तीर्थे, देव, सती, मुनी, नरपती, देवी तशा पावना।
अन्तर्दृष्टि पुढूनिया सरकल्या, संतोष झाला मना॥

---

१ प्रा. कुलकर्णी

अमरशेख एका ' चंद्रावळी 'चे शब्दचित्र कसे रेखाटतात आणि ते रेखाटताना एक प्रकारचे माधुर्य कसे निर्मितात ते खालील ओळींवरून दिसून येईल–

शालीनता पाहून तुझी चंद्रावळी
वाटते चालावे तुझ्या शेजारून
नजर खाली तुझ्याचप्रमाणे
घालून अभिमाने मराठी मनाने
ठेक्यात चालणे तुझे ते पाहून
तालानेही लाजून खाली पहावे
आणि वाटते मग आपणहि शिकावे
चालाया, जगाया याच ठेक्यात

अशा तऱ्हेचे सात्विक चित्रण करायला शब्दसामर्थ्यच असावे लागते.

शब्दांची लीला व अलंकाराची चमत्कृती ही अमरशेखांच्या काव्यसृष्टीची बाह्य लक्षणे समजावीत अशा तऱ्हेची रचना किती तरी ठिकाणी आढळते. जेथे कारुण्य आहे तेथे अमरशेखांना पाझर फुटलाच म्हणून समजा. जीवनातले कारुण्य हुडकून काढण्यातच त्यांना एक प्रकारचा सात्विक आनंद होत असावा. कारुण्याने थबथबलेली चित्रणे अमरशेखांनी अनेक ठिकाणी केली आहेत. ती करताना समर्पक आणि आकर्षक शब्दयोजना केलेली पाहून तर मन स्तंभितच होते. मोजक्या उपमांच्या साहाय्याने करुण चित्र ते कसे समर्पक बोलके करतात त्याचे उदाहरण बघायचे असेल तर हे बघता येईल.

फाटं पिकलेलं जाभूळ ताजं
नाचे चौखूर हरिणच माझं
निरल्या सायीचं लोणि ताजं
ज्वानी साच्यान्च्या सांध्यात टाकली रं
माझी मालन कामानं सुकली.

किती अर्थपूर्ण आणि बोलके चित्र आहे हे ? पिकलेलं जांभूळ, सायीचं लोणी या कल्पना किती हृदयंगम आहेत ! या शब्दचित्रानेच काव्याचा आशय अधिक उत्कट व भावसंपन्न होत गेलेला दिसतो.

' नदितिरी उभी ' असणाऱ्या स्त्रीची मूर्ती कविवर्य तांबे यांनी मोजक्या शब्दांनी कशी कोरली आहे पाहा—

नदितिरी उभी ही दाट तृणी
आर्द्र वस्त्र ठिबके चरणी ।
नयन नभी, कर दोन्ही जुळले
केशपाश उरि पाठी रुळले ।

तुफान हृद्यी घोर उसळले ।
ही पसरे छाया मुखि नयनी ।
बर्वतिं तुङ्ग गिरि घेरा घालुनि ।
थिजले तरुवर तिला पाहुनी ।
स्थिरावले ढग पळता गगनी ।
डोकावि बालरवि ढगातुनी ।

अशाच तऱ्हेच्या कल्पनांमागून कल्पना चालवून अमरशेख 'मोळीवाली'चे सुंदर शब्दचित्र कसे रंगवितात ते पाहा—

डोईवरती आहे मोळी
मोळीखाली राधा भोळी
ठुमकत चाले घेत हिंदोले
जणु हंगामी शिवार डोले
मोडित डोळे निळसर काळे
जाई आगीचे विणीतच जाळे
अर्धि उमलती कळीं कोवळी

बालकवींची आठवण व्हावी इतक्या सहजतेने आणि सफाईने लिहिलेल्या किती तरी ओळी अमरशेखाच्या निसर्ग कवितेतून आढळतात. 'खंडाळा'सारखी कविता तर त्याचे चालते बोलते उदाहरण आहे. बालकवींच्या श्रावणमासाचीच छाया या काव्यावर पडलेली आहे की काय इतपत भास होतो. गेय चाल, सुगम शब्द, शब्दांची पुनरुक्ती, त्यांचे नादमाधुर्य, अनुप्रासादिक अलंकार, रेखीव सृष्टिवर्णन, तल्लीनतेची भावना आणि या सर्वांतून अमरशेखांना झालेला प्रेमाचा अद्‌भुत साक्षात्कार पाहण्यासारखा आहे. 'खंडाळा' ही निसर्ग कविता सर्वार्थानेच सुंदर आहे. त्यांतली निसर्ग वर्णने किती सफाईदार रीतीने अमरशेखानी बोलकी केली आहेत. त्याचे एकच खालील उदाहरण पाहिले म्हणजे खात्री पटेल—

फेर धरी ही दरी-कपारी हिरवे नेसोनी
सोनसळी नाजुक किरणांचा बुरखा ओढोनी
बुरखा घेउनि दुनिया राणी उचलि पावलांना
लचकत, मुरडत टाकि पावले गात यक्षगाना

शब्दचित्रे रेखीव करण्यात अमरशेख किती कुशल आहेत हे पाहण्यासारखे आहे. त्यांचे शब्दांवर असलेले विलक्षण प्रभुत्व पाहून मनाला कविता वाचण्याचा मोह होतोच. त्या त्या प्रसंगाचे हुबेहुब चित्रण अमरशेख किती सहृदयतेने करू शकतात. त्याची किती तरी उदाहरणे 'धरती माता' संग्रहात दाखविता येतील.

एखाद्या प्रसंगाने आणि तो कारुण्याने ओथंबलेला असला तर त्याचा ठाव अमरशेखांच्या हृदयाने न घेतला तरच नवल. 'लोकलमध्ये' या कवितेत एका स्त्रीचे चित्रण व्यथितपणाने पण सूक्ष्मतेने ते करतात ते असे–

मळकट चिंध्या, कळकट चेहरा नव्हती नवलाई
तडफड धडपड करीत घुसली बसली बाजूला
'कुणास ठावे' हातवाऱ्यांतुनि चेहऱ्यावर दावी
बडबड कधिमधि करी स्वतःशी दात ओठ चावी

एखाद्या घटनेचा चित्रपट डोळ्यापुढून झर्रकन सरावा इतक्या कुशलतेने केलेली शब्दरचना पाहायची असेल तर 'वेडी आई' ही अमरशेखांची कविता मुद्दाम उल्लेखिली पाहिजे. ही 'आई' अमरशेखांच्या तोंडूनच जवळ जवळ आपले हृदय उघडे करते की काय असाच भास होतो. त्या आईचे पुढील बोल पाहिल्यावर तिच्या मनातील तरंग सहजच कळून येतात. व्यक्तीच्या अंतर्मनांतील द्वंद्व चितारण्यात अमरशेखांचा हातखंडा आहे, हे खालील ओळीवरून सहज पटावे—

धुणी नि भांडी कधी उपाशी पोसायास्तव त्याला
सोसाट्याच्या वाऱ्यातच तो भर ज्वानीला आला
ओठ पिळावे, दूध निघावे, मिसरुड फुटले काही
माझी वेडी माया त्यातुन स्वप्न वेगळे पाही.

हे चित्रण किती हृदयंगम आहे! तसेच ते आर्द्रही आहे.

केवळ कल्पनाविलासात रममाण होण्याची अमरशेखांची वृत्तीच नाही. काही क्षणच ते कल्पनेत रमू शकतात इतकेच. वास्तवाचा त्यांना काडीमात्र विसर पडत नाही. व्यवहाराच्या खडबडीत जमिनीवरच त्यांचे पाय बहुतांशाने थबकतात. म्हणूनच आजच्या 'नवसंस्कृतीचे' ओंगळ दर्शन अमरशेखांना होते. त्या संस्कृतीचे दर्शन अमरशेख घडवितात ते असे—

तरुण सारा समाजातला
सर्रास दिसे वखवखलेला
नेत्र विषारी शिव्या भिकारी
कर्कश कानावर आदळती

अमरशेख आजच्या तरुणांच्या 'नवसंस्कृतीचे' दर्शन जसे वरीलप्रमाणे घडवितात त्याचप्रमाणे देशावर संकट आले असताना एखाद्या वेड्या आईचा 'बाळ'ही जास्तीत जास्त बोलका करतात.

बाळ म्हणे उत्तर सीमेहुनि येई गे किंकाळी
आई, लावुनि बसू कसा गे ब्रह्मानंदी टाळी?
उद्या तुझ्यावर हात टाकला जाता जाता कोणी
सांग आइ तू मुळमुळ गाळित बसू काय गे पाणी?
वंशाचा मी दिवा तुला मी फक्त काजळी द्यावी?
काजळिने का माझ्या आई तुझी कूस उजळावी?

बाळाचे हृदय अमरशेखांनी केवढ्या उदात्ततेने बोलके केले आहे. देशप्रीतीने ओथंबलेल्या हृदयाची साक्ष याच ठिकाणी मिळते. या प्रसंगाचे चित्रण करताना अमरशेख त्या त्या व्यक्तीशी किती एकरूप झाले आहेत हे सहजच उमजून येते.

कवीने आपल्या अनुभूतीशी इमान राखले की त्याचा अनुभव कृत्रिम किंवा उसना वाटत नाही तर उलट त्यात एक प्रकारचा ताजेपणा येतो, जिव्हाळा दिसतो आणि चित्रण आकर्षक बनून हृदयाला अक्षरशः भिडते.

पण जे मरती क्षणाक्षणाला
फूटपाथ न् गल्ली बोळांतुनि
बेकारीस्तव, औषधाविणा
भाकरीविणा तशीच त्यांची
इच्छा असता जगावयाची

आजच्या जीवनाचे हे हृदय छेदणारे चित्रण जिवंत नाही असे कोण म्हणेल? आजच्या परिस्थितीला बोलके करण्याचे कार्य अमरशेखांच्या कवितेने निश्चितच साधले जात आहे. त्याचे आणखी एक दुसरे उदाहरण पाहा—

मुनिवर गेले चिंतन गेले
ढोंग धत्तुरे येथे उरले
संत महंत नि त्यांचे चेले
धनसत्तेचे हंडीबाग
सत्य पळाले जगातुनी या—

श्रमजीवी वर्गाचे चित्रण आणि तेहि हुबेहूब आणि यथार्थ करण्याकडे त्यांचा प्रामुख्याने कटाक्ष असतो. जे जे जवळून पाहायला मिळाले, ते ते सजीव आणि बोलके करणे हा अमरशेखांचा जणू काही 'धर्मच' बनला आहे, त्या धर्माशी इमान राखण्याकडे त्यांचा कल असलेला दिसून येतो. एखाद्या कुशल चित्रकाराने रंगाचे आडवे उभे पट्टे मारताच जसे एखादे सुंदरसे, आकर्षक चित्र तयार व्हावे तसाच काहीसा प्रकार अमरशेखांच्या शब्दयोजनेने झालेला दिसतो. वाचकाला मुग्ध करण्याची किमया त्यांना निःसंशय चांगल्या तऱ्हेने साधलेली आहे. कामगार,

श्रमजीवी वर्गाचे चित्रण चारसहा ओळींतच ते मार्मिकपणे कसे करतात, ते खालील ओळी वाचल्याबरोबर दिसून येते.

श्रमास नाही कवडी किंमत
माणुस-हिंमत झाली खाक
रेती–मातीलाही मोल
कवडी आज आहे अनमोल
अन्मोल असे झरती आसू
भावनांची पण जळते बाग

या ओळींवरुनच आजच्या कामगार जीवनाची सहज कल्पना यावी.

शब्दचित्रे अधिक रेखीव आणि बोलकी करण्याच्या बाबतीत अमरशेखांचा स्वतंत्र असा विशेष दिसत असला तरी अलंकारिकतेचा बडिवार त्यांच्याकडून माजविला जात नाही. आपली भावना वाचकाला, रसिकाला सहज समजावी, तीत शब्द-बंबाळपणा येऊ नये, त्याचप्रमाणे लालित्याचा अट्टाहास असू नये, असाच अमर-शेखांचा एकंदर खाक्या दिसतो. ज्याच्यावर म्हणून अस्सल मराठी छाप आहे त्या त्या वस्तूंचे, प्रसंगाचे घटनेचे, विभूतीचे शब्दचित्र रेखाटतांना त्यांच्या लेखणीला एक वेगळ्याच प्रकारची धार चढते. एवढे मात्र खरे की अमरशेख माणसांच्या भावना, जीवनातले कारुण्यपूर्ण प्रसग जास्त तन्मयतने, सहानुभूतीने आणि सद्भावनेने चित्रित करतात. मात्र ते करताना आपण मुद्दामच शब्दचित्र रंगवीत आहोत याची जाणीव ते ठेवत नाहीत. शब्दचित्र रंगवायचे आहे, ते अधिक बोलके करायचे आहे या जाणिवेने कवी एकदा चित्र रेखाटायला लागला की मग त्यात पुढे पुढे कृत्रिमता येणे अपरिहार्यच होते. तसे अमरशेखांच्या बाबतीत होत नाही. ही निःसंशय समाधानाची गोष्ट आहे. भावनेच्या एकरूपतेमुळेच केलेले रेखाटन हे शब्दचित्रांकित होत जाते. आणि त्याला एक प्रकारचा घाटदारपणा येतो. मराठी साहित्यात व्यक्तिचित्रे बोल्की करणारे जे काही मोजके कवी आहेत त्यांच्या मालिकेत अमरशेखही बसावे इतक्या तोलामोलाचे ते आहेत.

● ● ●

## प्रकरण ९

# प्रेमकाव्य

"रविकिरण मंडळाने बरीचशी प्रेमकविता निर्माण केली. परंतु त्यांच्या कवितांतून प्रेमभावनेचे जे प्रतिबिंब दिसते, ते उत्कट भावनेचे प्रतिबिंब नसून सर्वसामान्य भावनेचे प्रतिबिंबच दिसते. प्रेम हे बंडखोर खरे; परंतु प्रेमाचे महत्त्व कमी होऊन त्यातील गैरलागू गोष्टींचे महत्त्व वाढू लागले. प्रेमविषयक भावनेतला मोकळेपणा, उद्दामपणा — जो नव कवितेत आढळून येतो तो रविकिरण मंडळाच्या काव्यात आढळला तरी नवकाव्याच्या मानाने तो फिकट वाटतो. मात्र त्यांचे अनुभव फिकट होते असे म्हणता येणार नाही."[1]

अमरशेखांच्या कवितेत प्रेमविषयक भावनेतला मोकळेपणा, उद्दामपणा निश्चितच दिसतो. मात्र असे असले तरी त्यांची कविता वाचून मात्र कुणीच कामुक बनणार नाही. भावनेची पारदर्शकता हा त्यांच्या प्रेमविषयक कवितेचा प्रमुख विशेष म्हणावा लागतो. त्यांच्या प्रेमविषयक कवितेचे अधिष्ठान आहे मानसिक उदात्तता. ही सर्वत्रच विखुरलेली दिसेल. प्रेम आणि जीवन यांची योग्य सांगड त्यांच्या कवितेने घातलेली आहे.

> उत्तुङ्ग प्रीतिच्या शिखरावरती जावे
> गाणे प्रीतीचे प्राणपणाने गावे

ही भावना ठसठशीत आहे असाच प्रकार बहुधा सर्वत्र आढळतो. उत्तुंग प्रीतीच्या शिखरावर जाण्याचे स्वप्न उरी बाळगणाऱ्या अमरशेखांना वास्तवाचा मात्र सहसा विसर पडत नाही. स्वप्न रंगवितानाच त्यांना गोड हुरहूर बोचावीशी वाटते यात वावगे काही नाही. तारुण्यसुलभ भावनांची खळाळी ही या ना त्या कारणाने कवितेत डोकावतेच, उलट ती न डोकावली तरच आश्चर्य. अमरशेखांना 'यौवनगीत' गाताना स्वार्थी जगापासून दूर जावेसे वाटते. 'दोघाविण तिसरे कुणीही न फिरकावे' ही भावना अखेर तारुण्यसुलभच असणार; पण याचा अर्थ जगापासून कायमचे दूर जाऊन नसती स्वप्ने रंगविणे मात्र नव्हे. अमरशेख 'यौवनगीत' मोठ्या उत्कटतेने गातात. मात्र ते गाताना उद्दाम कल्पनांची

---

१ आधुनिक मराठी कविता– प्रा. मं. वि. राजाध्यक्ष.

मजेदार गुंफण जरी होत असली तरी प्रीती खालच्या पातळीवर आणण्याचा प्रमाद अमरशेखांकडून कधीच घडत नाही. प्रीतिमीलनसमयीची त्यांची कल्पना जितकी रम्य तितकीच भावनोत्कट वाटते. मीलनाकडे अमरशेख उच्च पातळीवरूनच पाहतात.

निःशब्द शांतता प्रीती–मीलनसमयी
......ते मीलन उच्च प्रतीचे दोन जिवांचे
तेवत्या प्रकाशी आशा फुलुनी नाचे
वा रुजेल आनंदाचे दो हृदयांचे
अन् होईल या माझ्या सार्थक जन्माचे...

हीच उदात्तता प्रेमविषयक कवितेत दिसते. कविश्रेष्ठ तांबे यांच्या प्रेमविषयक गीतांतून जशी इंद्रियासक्ती दिसत नाही तशी ती अमरशेखांच्याही गीतांत दिसत नाही. लावण्यापेक्षा आंतरसौंदर्याचा ध्यास अमरशेखांना विशेष लागलेला दिसतो. प्रेम-गीतांतून ध्येयवाद आणि सात्त्विक भाव प्रकटताना दिसतात. कुसुमाग्रजांच्या प्रेमकाव्यांतून आढळणारा संयम अमरशेखांच्याही कवितेत प्रामुख्याने आढळतो.

शांति-प्रीतीची सांगड घालुनि कवनी
मज वाटे गावे सुन्दर सुन्दर गाणी
पण अपूर्ण जीवन मी एकाकी लढतो
त्याचाच कवडसा कवनी दृष्टिस पडतो.
पत्रात तुझ्या प्रीतीचा येतो वास
जो होता अंतरि माझ्याही ध्यास.

अमरशेख हा ध्यास धरूनही नवप्रीतीची नवीन दुनिया घडविण्यासाठी प्रियेला आवाहन करतात—

होईल तुझा नि माझा विकास जेथे
यौवनप्रीतिही खुलेल विकसुनि तेथे
म्हणुनीच आज गाऊ या कवनी शांती
सोडून क्षणिक ते बुरसट प्रेमभ्रांती
...सुख प्रीतीचे तू मी अनुभवणार
... तू मी मिळुनी ती प्रीत-ज्योत लावावी
जी मानाने चिरकाल जगी तेवावी...

ही ‘ ज्योत ’ चिरकाल तेवत ठेवू इच्छिणारे अमरशेख प्रियेला आदर्श प्रेमाला ओढून काढण्यासाठी ध्यास घ्यायला सांगतात आणि ‘ स्वीकार करशील याचा ’

असा विश्वास व्यक्त करून "गाशिल तू कवनी राग अशा शांतीचा" अशी इच्छाही प्रकट करतात. उत्तुंग ध्येयवादाला भावनोत्कटतेची अवीट जोड मिळाल्याने अमरशेखांची कविता क्रमाक्रमाने झेपावत गेलेली दिसते. एका भावनेतून दुसऱ्या भावनेचा उगम होत जातो आणि प्रेमभावनेतला ताजेपणा तसाच राहतो.

"सर्वसामान्य माणसाच्या हृदयातील प्रेमभावनेला वाचा फोडणे हे पूर्वी काव्याला कमीपणा आणणारे वाटे. पाश्चात्य कवी इहलोकवादी असल्यामुळे तेथील हमाल-मजुरापासून सर्वांच्या प्रीति-भावनेवर त्यांनी आपल्या काव्याची फुले वाहिली आहेत. ही मानवता केशवसुतांच्या अंतःकरणाला सहजच पटली आणि म्हणून त्यांनी वैयक्तिक प्रेमाची पर्स्तास गाणी रचिली."[१] वैयक्तिक प्रेम-भावनेचे चित्रण करण्याचे आधुनिक कवीला मुळीच वावडे नाही. आणि मानवता-वादी कवीला तर प्रेमभावना व्यक्त करणे मुळीच कमीपणाचे नाही.

'नसे प्रणय तो माझियाहि कां अंतरीं' असेच तो मग विचारीत राहिला तर त्यात आश्चर्य वाटण्यासारखे काहीच नाही. व्यक्तिस्वातंत्र्याच्या काळात तर भावनाविष्कार करणे अगत्याचे असते. विकासाच्या दृष्टीने ते मौलिक ठरते. एवढेच की त्या प्रेमभावनेला शारीरिक शृंगाराची झालर नसावी.

'मन तुझ्याचसाठी' या कवितेत अमरशेख भावनांचा प्रक्षोभ कसा व्यक्त करतात पाहा—

> लंडाव बस संपला आता
> बाध कोठला ना जुमानता
> प्रचंड फोडूनि पर्वतमाथा
> होउनिया बेहोष भेटण्या
> बघ मन-सरिता कोसळते

हा प्रणयाचा प्रकार 'वीराचा शुद्ध प्रणय' या प्रकाराचाच म्हणावा लागेल. प्रणयातली सात्त्विकता पाहायची असेल आणि संयमितता बघायची असेल तर खालील ओळी वाचाव्या.

> झाले अधीर या या हो राया
> आता लपता कशाला हो वाया
> हात चंदेरी द्या, मला उचलून न्या
> सारि जिनगानी घ्या
> देह पडला हो घ्या चरणावरीं
> मजा लुटाया दुनियेची सारी—

१ केशवसुतदर्शन—प्रा. जोग

या अशा ओळींतून शाहिरी शृंगारांतील कसदारपणाची आणि सरळपणाची जाणीव होते. आणखी शाहिरी शृंगारातील नाजुकता आणि वेधकता खालील ओळींतूत प्रतीत झालेली दिसते.

सळकन् नागिणीवानी, येऊनि वनांतुनि एळ साधुनि
नयनी सोडिला बाण—सोडिला बाण
जरी हाती धरली गोफण, होती गुंड्यानं तुझ्या करणीनं
भरला जाऊन झालो हैराण—झालो हैराण ॥

किंवा—

फडकतो शालू तुझा हिरवा गार
लकलका तळपते तुझी तनू तलवार
उफनत सोडुनि गोड धुंदीची वार
नोक झोक सारं काई न्यारं, नवतिची नार सुगीचं दार
फाटच्या पारं आलि ओलांडून—आली ओलांडून
झपाटले पुरा जाऊन—प्राण मुठितून, उभा घेऊन
चरणि ठेविले घेई ग दान—सजणे वीर होऊन ॥

प्रेम स्त्री-पुरुषांमध्ये अद्वैत उत्पन्न करते. दोघांचीही सुखदुःखे समान होतात. कारण एकावर, तर कार्य दुसऱ्यावर असा असंगति अलंकार साधतो.

हृदयिं तुझ्या सखि दीप पाजळे
प्रभा मुखावरि माझ्या उजळे
..गुलाब माझ्या हृदयी फुलला
रंग तुझ्या गालावर खुलला

असे प्रेमाचे अद्वैत कविवर्य तांबे यांनी आपल्या कित्येक कवितांतून दाखविले आहे. त्याच तऱ्हेचे अद्वैत, त्यातील भावमाधुर्य अमरशेखांच्याही कवितेत कसे ओतप्रोत भरले आहे ते दिसून येते.

राधिके, प्रीती माझी तुझ्याचवरती
गे तुजवरती विशुद्ध अगदी, आणु नको तू मनात किंतू
कृष्ण असे मी, आहे परंतु नव्या युगातील

अशी प्रथमदर्शनीच भूमिका मांडून आपल्या अद्वैताची साक्ष दिली जाते.

राधेवाचुनि जगणे अगदी अशक्य राधे
शपथ गळ्याची, शपथ तुझ्या मंगल प्रेमाची
कण कण माझा आत्मा झुरतो दावु कसा मी ?
दिन जो येतो

येतो तो मुळि भाला घेउनि विरहाचा
अन् करतो जखमी !
जखमेवरती वार निशीदिन साहत आहे.
जवळ न माझ्या चक्र सुदर्शन
घडता फक्त तुझे गे दर्शन
हजार हत्तीचे बळ येते
बळ ते सुदर्शनाचे ठरते
जखम हृदीची क्षणात भरते
राधे राधे तुजविण मजला
जीवन जगणे अशक्य अगदी
अशक्य केवळ
आत्म्याचे आत्म्याशी मीलन व्हावे

अमरशेखांचे केवळ शरीरी प्रेम नाही. त्यांच्या उदात्त प्रेमाची परिणती रे. टिळकांप्रमाणे भक्तीत होते. त्यामुळे कवितेचा नूर सोज्वळ होत जातो. खालील उदाहरण त्या दृष्टीने पाहिले म्हणजे खात्रीच होते.

शोभु देत डौलदार मधुघट
रतिलाही लाजविलसे
जगा पोसण्या जीवन मौक्तिक
घटामधुनि त्या उसळू दे

आणि नंतर

अजोड तुझिया तारुण्याला
मधुर फळे ती यावीत
वेलिंत चिमण्या डोलिंत कोकिळ
नवगीते आळवावीत

अशा तऱ्हेच्या भक्तीत परिणती होत जाताना दिसते.

अमरशेखांनी जागोजाग प्रेमाचे जे उच्च शुद्ध आणि सात्त्विक स्वरूप उभे केले आहे ते कौतुकास्पदच म्हणावे लागते. ‘ जलधारांनो ’ ही एकच कविता या सर्वांचे मूर्तिमंत चित्र साक्षात साकार करणारी दिसते.

“ हे माझ्या प्रिय जलधारांनो—भिजवुनि टाका हिला
ओलेतीचा शुद्ध रंग द्या नव्या छुमक छकडिला
ही पहाटेची कळी उमलती
स्वप्निं धुंद अजुनिही दिसे ती
स्वप्नांतच चालली ठुमकती

दवबिंदूचा शिडकाव करा, जरा जागवा तिला......

शृंगार गीतांतील शुद्धता आणि उच्च अभिरुची

माझ्या मनिच्या जलधारांनो भरून घ्या पिचकारी
नवी नवेली नार समोरी भुलवित राधा प्यारी
बहू तृषार्त ही मैना फोडित पहाटेची ललकारी
मज पाहू द्या भिजली राधा आला बहर प्रीतिला

आणि

मीहि भाळले अनुनय पाहुन
अनुरुप कोण मिळे मज याहुन
छळले उगाच वाटे राहुन
जीव कुशीतच दिला विसावून
हरपुन बसले भान—

या वरील ओळी निश्चितच चांगल्या तऱ्हेनें दाखवू शकतात. शृंगारातील प्रसन्नता पहायची असेल तर--

प्रथम पाहिले अन बावरले
पळतच सुटले फुलांत दडले
तिथेही आला छेल छबीला
लाच सुगंधाची त्यां देऊन
मला आणिले लांब
पाठी बघ कसा लागला चांद

आणि

छंदि फंदि बेबंदि टाक सख्या हा धुदा
करिन तुला आनंदी मी धरा
दिले प्रेम मीच तुला माझ्या सुकुमार फुला
जीव गुंतला तुझ्यात ये जरा
येई विसाव्याला मुशाफिरा

या उपरोक्त ओळी नीट न्याहाळाव्यात म्हणजे भावपूर्ण मोहकता किती नाजुकतेनें अमरशेख हाताळतात त्याचा चांगला प्रत्यय येतो. या प्रसन्नतेत एक प्रकारचा ताजेपणा जसा आढळतो तसाच रेखीव कसदारपणाही दिसून येतो.

केवळ तरुण-तरुणींचे प्रेम म्हणजेच काय ती प्रीति अशी संकुचित कल्पना अमरशेख करीत नाहीत. त्यांच्या प्रीतीच्या जगांत पृथ्वीपासून ताऱ्यांपर्यंतच्या सर्वच गोष्टी येतात.

बाळाशी अतीव प्रेमाने हितगुज करणारी माताही प्रेम करताना दिसते. कारुण्याने ओथंबलेले तिचे भाव अतिशय हळुवार बनतात आणि त्यांचे चित्रण अमरशेखही अतिशय नाजुकतेने करतात. वात्सल्याचे हृदयस्पर्शी चित्रण त्यांनी गहिवरून केले आहे.

चांदोबा तव हाती द्याया
माते पदरी नाही माया
सुखवाया परि झिजविन काया
हास्यातुनि तो बोल उद्याचा

'शृंगार-रसाचे शाहीर' अशी पदवी मिळण्याइतके प्रेमरसाने थबथबलेले विपुल व मधुर काव्य गोविंदाग्रजांनी लिहिले आहे. 'मी प्रेमाचा बंदा माझा हाच असे धंदा' अशी आपली भूमिकाही त्यांनी एका कवितेत मांडली आहे. 'प्रेम आणि मरण' ही तर त्यांची 'अमर' कविता. या कवितेत आपले प्रेमाचे तत्त्वज्ञानच त्यांनी एका कथेद्वारे निवेदिले आहे. ते असे—

क्षण एक पुरे प्रेमाचा। वर्षाव पडो मरणाचा

तरुण अंतःकरणांतील प्रेमभावनेची शीतल रम्य कारंजी माधव ज्यूलियनांच्या कवितेतून सर्वत्र उडत असत. त्यांनी तरुण प्रभाकराद्वारे आपले प्रेमविषयक तत्वज्ञान मांडलेले आहे. प्रभाकराला वाटे की, खरे प्रेम हे उदबत्तीप्रमाणे स्वतःला जाळील, पण दुसऱ्याला ताप देणार नाही. तो म्हणतो—

अन्याला बुडवावया बिलगते ते प्रेम नाही खरे।
तत्स्वातंत्र्य हिरावयास बघते ते प्रेम नाही खरे।
स्वांगे धूप जळूनि गंधित करी वायूस, जाई वरी।
सेवा-धर्महि यापरीच जग हे आनंददायी करी॥

या दोन शाहिरांप्रमाणे हे 'अमर' शाहीरही आपल्या प्रेमाचे तत्वज्ञान 'मन माझं हिरवंगार' या कवितेत खालीलप्रमाणे मांडतात.—

प्रीत रीत पतंगाची सख्या वेडी रे
खरी प्रीत आनंद देई मस्त मद गंध
जीवनी सुगंध येई जोडी रे

'तरू नाहीतर मरू' हीच त्याच्या प्रेमाची 'शान' आहे. 'आत्म्याचे आत्म्याशी मीलन व्हावे' ही त्याची उत्कट इच्छा आहे. ज्या प्रेमाच्या बाबतीत अद्वैत साधले जाते तेच खरे प्रेम, खरी प्रीति गंधित होते, अशी अमरशेखांची प्रांजल भावना आहे.

प्रेमविषयक गीतांत एक प्रकारची जशी नाजूकता आढळते तसाच संयमही आढळतो. एक प्रकारची सहृदयता आढळते त्याचबरोबर उदात्तताही दिसते. जशी विशुद्धता दिसते तशीच उच्च अभिरुचिही दिसते. प्रेम म्हणजे इंद्रियासक्ती, इंद्रियभोग अशी विपरीत कल्पना अमरशेखांच्या कवितेत कुठेही दिसत नाही. प्रेमविषयक कल्पना मांडताना हवी असलेली भावनेची मोहकता, शब्दांची प्रसन्नता, वातावरणाची सार्थता त्यांच्या कवितेत चांगल्या प्रकारे दिसून येते. प्रेमाची धाव जीवनाकडेच आहे; ती मरणाकडे किंवा सरणाकडे असलेली काही दिसत नाही.

• • •

प्रकरण १०

# पोवाडे आणि लावणी

" शाहीर व शाहिरी म्हणजे कवी व कविता. ही दोन्ही मराठी संस्कृतीतीलच आहेत. त्यांच्यात नावाखेरीज परकीय संस्कृतीचा भाग नाही. मुसलमान राजवटीत केवळ ऐट म्हणून हे शब्द स्वीकारले गेले इतकेच. शाहिरी रचनेत पोवाडा, लावणी, डफगाणे, भेदिक गाणे, देहावरचे गाणे हे प्रकार येतात. त्यांची व्युत्पत्ती व त्यांचा आशय पाहता अशा तऱ्हेची रचना वेदकालातही होत असल्याचे दिसून येते... उदा. प्र + स्तुती — प्रशस्ति = ठासून स्तुती करणे, म्हणजे पोवाडा गाणे ही कल्पना आर्य संस्कृतीत अगदी पुरातनची आहे. इंद्राला सम्राटाभिषेक झाल्यावर तो आसंदीवर बसला असता विश्वदेवांनी 'अभ्युत्क्रोश' केला असे ऐतरेय ब्राह्मणात वर्णन आहे. 'बन्दिनो राज्ञः कीर्ति कुर्वानी एवं गुणकीर्तनमभ्युत्क्रोशनम् (सायणाचार्य); हा 'अभ्युत्क्रोश' म्हणजे इंद्राचा पोवाडाच होय."[1] अशा प्रकारे व्युत्पत्तीच्या आधारे या काव्यप्रकाराचे प्राचीनत्व ठरविण्याचा लेखकाचा प्रयत्न इतिहासज्ञांना मान्य होवो वा न होवो, इतके खरे की,

'निवृत्ती मुक्ताबाई चांगदेव गाढा। हरिचा पवाडा झेलताती ॥'

'तुवां संग्रामी हरु जिंकला ..पवाडा तुवां केला। गंधर्वासी'

'मृत गुरुपुत्र आणिला। तो तू पवाडा देखिला'

यासारख्या ज्ञानेश्वरकालीन उल्लेखांवरून पराक्रमाचे कृत्य वा लक्षणेने त्या पराक्रमाचे वर्णन या अर्थी पवाडा हा शब्द यादवकालात रूढ होता, असे स्पष्ट होते.

मुसलमानी आमदानीत मराठ्यांचे स्वतंत्र अस्तित्वच संपुष्टात आले. मग पराक्रम आणि त्याचे वर्णन यांचा मेळ कसा बसणार? त्यामुळे शाहिरी कवितेची निपजच मुळी बंद पडली.

१७ वे शतक. महाराष्ट्रातील चैतन्याचा आणि जागृतीचा काळ. स्वराज्याची आकांक्षा आणि अद्‌भुत पराक्रम यांचा काळ. शिवप्रभूंच्या तेजाने हा सारा काळ अदभुत बनलेला. जिकडे तिकडे ध्येयवेड्यांचा सुळसुळाट झालेला. निष्ठा पणाला लागलेली. त्यागाचा मूर्तिमंत आदर्श निर्माण झालेला. वीरत्वाचा पूर आलेला. अशा

१ श्री. म. ना. सहस्रबुद्धे.

ह्या काळात नव्या आकांक्षा पल्लवित झाल्या, नव्या उत्साहाचे सर्वत्र वारे वाहायला सुरुवात झाली. नव्या गाण्यांच्या महाराष्ट्राच्यागळ्या गळ्यांत ताना येऊ लागल्या. तलवारीच्या खणखणाटालाच घोड्यांच्या टापाचे संगीत मिळू लागले. आणि याच काळात ढोलकी संबळ, डफ या देशी वाद्यांच्या साथीत वीरश्रीच्या कथा गाणारा कवींचा व गायकाचा एक नवा वर्गच शाहीर व गोंधळी या नावाने निर्माण झाला आणि जुन्या मराठी वाङ्मयात पोवाडा हा नवा प्रकार अस्तित्वात आला.

"पोवाडा म्हणजे कीर्तिकाव्ये. कीरत-कृति 'पुरुषववासुकृतम' (ऐतरेय), देहाभिमानाचा त्याग करून निःस्वार्थीपणे थोर कार्यासाठी प्राणार्पण करणे ही खरी सुकृती. या पुरुषार्थाचे कौतुक करणारे 'वीरमाल' काव्य तो पोवाडा. अशी व्युत्पत्ती देऊन या प्रकाराचे मूळ बीज आध्यात्मिकच असल्याचे 'मराठी शाहिरी वाङ्मय'-कर्ते' श्री. म. ना. सहस्रबुद्धे सांगतात. शाहिरी कवितेचे उद्दिष्ट संतांसारखेच आहे हे पटवून देण्यासाठी त्यांनी काही साम्यस्थळेही दर्शविली आहेत. उदा. पोवाडा गात्याला उद्राण (उद्धरण) ऐकत्याला बडो पुण्य' असे तुळशीदास शाहीर म्हणतो. त्यामध्ये 'अनुभवी गुरुपुत्र तोचि स्वये बुझाला। ऐकल्या उद्धरण गायक सहज उद्धरला ॥" या ज्ञानेश्वरांच्या अभंग चरणाचा पडसाद जाणत्यांना ऐकू येतो.

अमरशेख शाहीर आहेत. ते आधुनिक युगातील ध्येयवेडे शाहीर आहेत. शाहिराची दृष्टि ही वस्तुनिष्ठ असते, वर्ण्य विषयांची चित्रे ते तन्मयतेने रेखाटतात. वाङ्मयाचे ध्येय बदलले की रचनातंत्रहि बदलते. अमरशेखांचे पोवाडे व लावण्या यांच्या रचनेत आणि जुन्या रचनेत फरक असलेला दिसतो. समाजजीवन बदलले की काव्याच्या आशयातही फरक पडत जातो. जुने शाहीर आणि अमरशेख यांच्या काव्यातील आशयात आणि अभिव्यक्तीत आपल्याला फरक दिसेल. "शाहिरांची रचना स्वयंस्फूर्त मात्र नाही. कोणाच्या तरी सांगण्यावरून ते पोवाडे लिहीत व बक्षीस मिळवीत" हा निष्कर्ष थोड्या फार प्रमाणात जरी जुन्या शाहिरांना लागू पडत असला तरी अमरशेखांना मात्र तो कधीच लागू करता येणार नाही अमरशेख तर ठासूनच सांगतात—"कोणत्याही प्रकारच्या आमिषाने माझी ओळच काय, पण एक शब्दही लिहिलेला नाही." यावरूनच जुने शाहीर आणि हे नवे शाहीर यांच्यातील फरक चटकन जाणवतो. अमरशेख हे एक अपवादात्मक शाहीर या बाबतीत म्हणावे लागतात. ज्या जुन्या काळात शाहिरी वाङ्मय जोपासले गेले तो काळ परवशतेचा होता, उदाराश्रयाचा होता.. पण आजचे युग त्याचे नाही. अमरशेख हे नव्या युगधर्माचे शाहीर आहेत. त्यांच्या शाहिरी कवितेत आत्मनिष्ठ काव्याचे कितीतरी गुण आढळतात. जुना शाहीर स्वयंस्फूर्ततेच्या अभावी अशी रचना करण्यास निश्चितच असमर्थ होता. त्याला काळाचा महिमा म्हणता येईल. आजचा आमचा हा शाहीर स्वयंस्फूर्त रचना करतो आणि समकालीनांच्या भावनांशी समरसही होतो. अमरशेखांचे पोवाडे आणि लावण्या यांच्याकडे नुसती ओझरती नजर

जरी फिरवली तरी आपल्याला कळून येते की त्यांनी मराठी माणसांची सुखःदुखे उघडपणे मांडली आहेत. मराठी बाण्याचे रक्त जिच्या धमन्यांतून सळसळते आहे अशा 'कुंती'ची ओळख करून दिलेली आहे, तर महाराष्ट्रातील 'कुणबी-राजाचे' जिवंत चित्र रेखाटून त्याच्या दुःखांना वाचा फोडली आहे.

"शाहिरांनी आपल्या काव्यात विषय निवडले ते बहुजन समाजाला आवडतील असे व प्रामुख्याने त्यांच्याच जीवनातील. पण हा बहुजनसमाज खेड्यातील नाही; तो बराचसा शहरातील आहे. यामुळे शाहिरांच्या काव्यात खेडी, खेडूत व त्यांचे शेती-भातीसारखे उद्योग यांची वर्णने नसून तुळजापूर, पंढरपूरसारखी क्षेत्रे, पुणे, कोल्हापूर, सोलापूर यासारखी शहरे, त्यातील सरदार, दरकदार, त्यांच्या स्त्रिया, रखेल्या व अभिसारिका आणि त्यांचे जीवन यांचीच वर्णने आहेत."[1] ...पण आमच्या ह्या शाहिराचे अगदी याच्या उलट आहे. खेड्याखेड्यांत राबणारा शेतकरी आणि गिरणीच्या धुराड्यांच्या आसपास वावरणारा, गिरणीत काम करणारा मजूर हा अमरशेखांचा खरा बहुजन समाज आहे. एकच दाणा, सुगीराणीची मोहिनी, तांबडं फुटलं, माझी दिवाळी, मालन कामानं सुकली, ब्रह्मा, विष्णु, महेश, कैफियत, शेतकरी राजा, गुराख्याचं गाणं, कामगारांची हाक, मोटकरी दादा, कोळ्याचे गाणे भलरी या सर्वच कविता श्रमणाऱ्या, कष्टकऱ्या कामगारांबद्दलच्या आहेत. जुना शाहीर आणि नवा शाहीर यांच्यातील फार मोठा फरक इथे जाणवतो. शाहीर ही एक त्या त्या काळची अपरिहार्य अशी एक गरजच ठरते. कुठल्याही नेतृत्वाची महती त्या त्या कालमानाच्या संदर्भानच विचारात घेतली तर तिचे महत्त्व पटते. अमरशेख ही बहुजनसमाजाच्या प्रतिनिधित्वाची एक गरजच आहे. नाहीतर मराठी कवितेत 'चार दोन' जानपदगीतांखेरीज बहुजन समाजाच्या जीवनाचे, त्याच्या आशा-आकांक्षेचे, स्फुल्लिंग कुठे पाहायला मिळतात ? मध्यम वर्गाची हलाखीची स्थिती, यंत्रयुगाने त्याची चालविलेली ससेहोलपट आमच्या नवकाव्याद्वारे (दुर्बोध असूनही) आम्हाला आज समजू तरी शकते; पण एवढा मोठा अफाट जनसमुदाय आमच्या खेडीप्रधान देशात पसरला आहे, त्याच्या जीवनाचे पडसाद अगदी अपवादात्मकच उमटलेले पाहायला सापडतात. ही एक प्रकारची कोंडी निर्माण झालेली आहे. ती फोडण्याचे कार्य अमरशेखांनीच खऱ्या अर्थाने पहिल्या प्रथम हाती घेतले आहे. म्हणूनच बहुजन समाजाचा एक प्रातिनिधिक कवी म्हणून अमरशेखांच्या कवितेचे फार मोल आहे. उद्याच्या इतिहासाला नेमके हेच नमूद करावे लागेल. आजवर मध्यम वर्गापलीकडे दुसरे कुठे जीवन असू शकेल याची साहित्यातील 'मिरासदारांनी' कल्पनाच येऊ दिली नाही. अमरशेख हे त्यांना माझ्या मते मोठेच उत्तर आहे. एखादे तत्त्वज्ञान केवळ टूम म्हणून स्वीकारणे वेगळे आणि जीवन-

१ मराठी लावणी, पान ११



वि:

निष्ठेतून त्याचा उगम होणे वेगळे. आमच्या मराठी कवितेत समाजवादी विचारसरणी मांडली गेली आहे, पण ती जीवनाचा खोलवर वेध घेऊन मात्र नव्हे. बिचकत लाजत जशी. आपणही युगधर्माच्या फारसे पाठीमागे नाही हे केवळ दाखविण्यासाठीच. अमरशेखांचे तसे नाही. समाजवादाचा विचार हा मुळी त्यांच्या जीवननिष्ठेतूनच निर्माण झाल्यामुळे तो ज्यांच्यासाठी निर्माण व्हायला हवा त्यांच्याच जीवनाचे बारकावे शोधून तो येण्याचा उपाय त्यांनी जागजागी सांगितला आहे. 'मिरासदार' मंडळी भले त्याला प्रचार म्हणोत. त्याचे सोयरसुतक अमरशेखांसारख्या निष्ठावंत कवीला निश्चितच नाही.

"शाहिरी कवितेत लोकांच्या त्या त्या वेळच्या भावनांची प्रामाणिक प्रतिक्रिया अगदी स्पष्टपणे प्रतिबिंबित झाली आहे. म्हणूनच वि. का. राजवाड्यांसारखे इतिहासशास्त्रज्ञही अस्सल साधनांत बखरींपेक्षा पोवाड्यांना वरचा दर्जा देतात.

"पौराणिक प्रसंग आणि दैवी शक्ती यांच्या बुरख्यातून सभ्यतेच्या, प्रतिष्ठेच्या मर्यादा सांभाळून प्रतिष्ठितांपुढे प्रकट होणारी लौकिक भावनांच्या समाराधनाची प्रवृत्तीच शाहिरांच्या समवेत शहर वस्तीतील उघड्या जागेत, अठरापगड जातींच्या आणि अनेक पेशांच्या लोकांपुढे पोवाडे आणि लावण्या यांच्या वेषात उभी राहिली. या दृष्टीने पहता शाहिरी काव्य म्हणजे उत्तरकालीन पंडिती काव्याची दुसरी बाजू."[1]

आजची अमरशेखांची व इतरही शाहिरांची कविता पौराणिक प्रसंगाच्या वा दैवी व्यक्तींच्या बुरख्याआडून प्रकट होत नाही. आणि तशी तिला गरजही पडत नाही.

"आर्थिक दृष्ट्या संपन्न, पण सामाजिक व राजकीय दृष्ट्या विपन्न अशा धर्मग्लानीच्या काळात, महाराष्ट्रीय समाजाच्या अवनत परिस्थितीत केवळ सामान्यजनांच्या रंजनासाठी लावणी वाङ्मय लिहिले गेले." आजचा काळ रंजनाचा नाही. तो भंजनाचा आहे. विलासाचा नाही; विकासाचा आहे. आज जग फार पुढे गेले आहे. यंत्रयुगाने मानवाच्या जीवनाला एक प्रकारची गती दिली आहे. तेव्हा केवळ विलासासाठी वाङ्मयनिर्मिती ही बहुजन समाजाच्या प्रतिनिधीकडून तरी अशक्यच. अमरशेखांच्या कवितेत सामाजिक व राजकीय दृष्ट्या विपन्नावस्थेचे हुबेहूब चित्र सापडते आणि त्याचबरोबर सामान्यजनांच्या आत्मोद्धाराचा खुला मार्गही सापडतो. त्यांच्या शाहिरी कवितेचा जन्मच मुळी यासाठी झालेला आहे.

शाहिरी वाङ्मय लढवय्या जातीतच उदयाला येते. "पवाडे किंवा लावण्या हे प्रकार राष्ट्राच्या दैन्यावस्थेत किंवा पडत्या काळात आढळत नाहीत. हेमंत सरून राष्ट्राच्या भाग्याला वसंतऋतू आला म्हणजेच या कवनाचे फुलोरे फुलू लागतात; व त्यावरील शाहिरांचे गुंजारव चोहोकडे ऐकू येतात... सर्व जातींच्या व सर्व पंथांच्या लोकांनी आनंदात मग्न असावे वीररसाने नाहून जावे आणि त्यांच्या चेहऱ्यावर मदाची

१ पैंजण (पान १८)

धुंदी चढावी हीच राष्ट्राच्या संपन्नतेची, हीच राष्ट्राच्या संपन्नतेची व जिवंतपणाची खूण आहे. आणि शाहीर व त्यांची कवने ही त्याची एक निशाणी आहे."[१]

"शिवकालात पूर्णतेस पोहोचलेला पोवाडा (पवाडा–प्रवाद) उत्तर कालातील स्थितीच्या अनुकूलतेमुळे लावणीच्या रूपात प्रगट झाला आहे. पोवाड्याने समाजाची चित्तवृत्ती थरारून जाई, तर लावणीने तिला आमोदाची प्राप्ती होत असे."[२] "लावणी पोवाड्यापासूनच निघाली आहे. पोवाडा मुख्यतः नृत्यमय असतो." (A ballad is really a dance song–H. B. Colteril.)[३]

"शायर या मूळच्या अरबी शब्दापासून मराठी शाहीर हा शब्द आलेला आहे. शाहीर म्हणजे कवी; काव्यलेखन करणारा मनुष्य."[४] (शाहिरी वाङ्मयातील समाजदर्शन) नवभारत १९५५

शाहीर अमरशेखांचे पोवाडे– १) शिवछत्रपती, २) उद्धमसिंगाचा पोवाडा, ३) महाराष्ट्र झेंड्याचा पोवाडा असे तीनच आज तरी उपलब्ध आहेत.

अमरशेखांचे पोवाडे हे अस्सल राष्ट्रीय बाण्याचे आहेत. त्यांचे विषय वाचले तरी मी काय म्हणतो हे पटेल. "ज्या कवीचा वीररसाशी गाढ परिचय आहे तो कदाचित स्वानुभवाच्या जोरावर युद्धाचे वर्णन सरस रीतीने करू शकेल. परंतु स्वत्व, स्वाभिमान, स्वार्थ-निरपेक्षता, राष्ट्रैक्यदृष्टी इत्यादि ज्या राष्ट्रीय गुणांची शाहिराला विशेष आवश्यकता आहे ते नुसत्या वीररसाच्या परिचयाने अंगी बाणत नाहीत. काही अंशी ते उपजतच असतात व बहुतांशी परिस्थितीची आच लागल्यानेही अंकुरित होतात."[५] "अमरशेख म्हणजे धग, रग, आग, धुंदी आणि बेहोषी ह्यांची जिवंत बेरीज."[६] त्यांची कविता वीर, रौद्र, आणि करुण या रसांचे मधुरमीलन आहे.

> घेई आता एकजुटीची मशाल। उचल निशाण
> येईल काळ कराया वार। वारावरती करीन वार

यांसारख्या ओळी म्हणजे बंदुकीच्या फैरीच.

पराक्रमाची खूण पटविणारा सर्वांत जुना असा पोवाडा अग्निदासाने लिहिला. आजपर्यंत उपलब्ध झालेल्या पोवाडा वाङ्मयाची हीच जुनी निशाणी आहे. या कवीने शिवाजी महाराजांनी अफझुलखानाची जी इतिहासप्रसिद्ध भेट घेतली तिचे

---

१ महाराष्ट्र सारस्वत.
२ श्री. म. ना. सहस्रबुद्धे (मौज १९४८)
३ श्री. रा. वि. काळी
४ डॉ. सरोजिनी बाबर.
५ रत्नाकर (आधुनिक पोवाडे व त्यांचे कार्य)– श्री. ना. म. भिडे.
६ आचार्य अत्रे.

वर्णन या पोवाड्यात केले आहे."[१] ह्याची रचना सरळ, गद्यप्राय पण परिणामकारक अशी आहे. गोविंद कवींचा "देशाचा पालनवाला। तो शिवाजी राजा झाला ॥" हा पोवाडा मराठी माणसाने कितींदा तरी गळ्यात रुळवलेला आहे. शिवाजी हे तर महाराष्ट्राचे दैवत. त्यांचे पोवाडे अनंत असावेत यात आश्चर्य नाही; पण अमरशेखांनी रचलेला पोवाडा आणि आजवरचे पोवाडे यात महदंतर आहे. या पोवाड्यात शिवाजीचे समाजवादी स्वरूप अमरशेखांनी अतिशय कौशल्यपूर्ण दाखविले आहे. बाळ शिवाजी कसा होता?—

दिसे काबाडकष्ट करणारा। त्याला बाळ शिवबा देई तुरा
तो श्रमपूजन करणारा। स्वतः मार्ग दावणारा
...दैवाला पंगु ठरविले। मनगट श्रेष्ठ म्हणविले

हा शिवबा समाजवाद कसा प्रस्थापित करीत होता?

शिवबा सरजा राजा होतो। भूमिहीना कवटाळितो
त्यांना जमिन मिळवुनी देतो। मिळवून बियाणं देतो
भू लागवडीला आणितो। माळरानी मळा फुलवितो
महसुलाची शिस्त लावितो। झेपेल इतका कर घेतो
गरिबांना वचन जे देतो। ते पुरेपूर पाळितो
नव्हती सत्ता पोलीसाहाती
लाच खायचि नव्हती हिंमत कुणाची छाती
...काळा बाजार हा शब्दच नव्हता शिवबा समयाला
शेठ्या एखादा नाडी जनतेला मिळे फास त्याला...

"पोवाड्यात वर्णिलेले सगळेच प्रसंग पूर्वीच्या शाहिरांनी प्रत्यक्ष अवलोकन केले होते असेही म्हणता येत नाही. त्यांतले बरेच पोवाडे केवळ ऐकीव माहितीवरच आधारलेले असत असा खुद्द शाहिरांचा पुरावा सापडतो. पानिपतावरचा पोवाडा असाच उभारला आहे. खर्ड्यांचा युद्धप्रसंग तर शाहिरांच्या हयातीतला, पण होनाजी बाळाने तो वडीलधाऱ्या मंडळींच्या मुखातूनच ऐकून रचला असावा... 'केला विराचा पवाडा दाजी रायानं। नाही मुळचा मजकुर माहित' असा उल्लेख सापडतो."[२] ...पण आज अशा ऐकीव माहितीवर विसंबावे लागत नाही. अमरशेखांनी इतिहास-पंडित प्रा. न. र. फाटक आणि प्रा. द. वा. पोतदार यांच्यासारख्यांच्या साहाय्यानेच प्रस्तुत पोवाडा रचला असल्याने त्याला बराचशा प्रमाणात

१ डॉ. सरोजिनी बाबर.
२ श्री. ना. म. भिडे.

ऐतिहासिक आधार आहे. आज इतिहासाची साधने विपुल झाल्यानेच ह्या अशा तऱ्हेच्या पोवाड्यांना सत्याचे अधिष्ठान आहे. अर्थात लेखकाची–कवीची जीवन-निष्ठा समाजवाद, त्या दृष्टीनेच कौशल्यपूर्ण रचना आधुनिक काळाचा वेध घेऊन केलेली आहे हे काही लपत नाही.

'शूर मर्दाचा पोवाडा शूर मर्दाने ऐकावा' या ईर्षेनेच या काव्याचे स्फुरण झाले आहे. या 'शूर–मर्दाच्या' पराक्रमाची माहिती देताना अमरशेखांनी वीररसाचा उद्रेक एकापेक्षाही एक अशा वरचढ पायऱ्यांनी केला आहे.

> जेव्हा शिवबा सर्जा रणि आला खुल्या मैदानाला
> रवि लकाकला ध्वनी "हरहर महादेव" घुमला...
> ...उठला अवघा मराठा उठला बाण जणु सुटला
> बॉंब जणु फुटला दगडातही नवा जीव आला...
> ...तोफेमधून पण गोळा उडायचा अजब मासल्याचा
> कर्दनकाळच भासे शत्रुला शिवबा भोसल्यांचा
> ...नव्या दुर्योधनाचा कोथळा त्यानं काढला

शाहिस्तखान पुण्यात आला त्या वेळी—

> दरोबस्त पहारा बसविला। कड्याभोवति कडा रचलेला
> त्याच्या आत खान बसलेला। सदोदित सावध असलेला....
> एक रात्री शिवबाचा गनिमि कावा जागला
> तो शास्ता खानाच्या पाठी क्षण लागला
> थय थय थय थय निस्त्या बोटावर्ती त्या नाचविला
> त्याच्या चक्रव्यूहाचा चुथडा चुथडा जाहला.

नंतर सिंहगडचा संग्राम —

> त्या उदयभानुचा पुरा अस्त घडविला
> दिलीर खानाचा दिल हलवुन सोडिला

हा शिवाजी

> ... महाराष्ट्राच्या दऱ्या कपारित सिंहाचा छावा
> पळता थोडि भुइ करित शत्रुला दावुन गनिमि कावा

आणि असा हा 'मर्द' अंतःकरणाने किती मृदु होता, तर–

> परकी स्त्री मानी माता। असा शिवबा सर्जा होता..."

या पोवाड्यात शिवाजीच्या लोकोत्तर कार्याची अमरशेखांनी थोरवी गायिली आहे. आणि असाच समाजवाद निर्माण करणारा शिवाजी त्यांना पुन्हा हवा आहे. "अशी फुलवेली, पुनः उगवली नाहि बघा राजे" असे सांगून अमरशेखांनी आपली ही

अभिलाषा व्यक्त केली आहे. हा शिवबा म्हणजे अमरशेखांना काही केवळ एक व्यक्ती म्हणून नको आहे. तर—

हा समाज–शिवबा बनुन मजपुढे यावा
तो साडेतीन कोटीत सामावला जावा
त्यानं शिवबा सरजाचा कित्ता आज गिरवावा
...अवघा समाज—समृद्ध सुखी बनवावा...

असे ते म्हणतात.

या पोवाड्यात प्रकट केलेल्या भावना आजच्या काळाचा विचार केल्यास केवळ अमरशेख या व्यक्तीच्या नाहीत तर त्या समष्टीच्याच आहेत. सामुदायिक भावनेचा अविष्कार ' आजवर शाहिरी काव्यातून होत आला आहे हे या एका पोवाड्याच्या उदाहरणाने पटते.

" जित मनुष्यास स्वत्वबुद्धीचा विसर पडून त्याच्या अंगी नामर्दपणा खिळून जाणार नाही एवढी खबरदारी घेणे हे राष्ट्रपुरुषाचे कर्तव्य होय. जेत्यापुढे जित हा सकृत्दर्शनी दुबळा व कःपदार्थ भासला, तरी स्वत्वसंपन्नतेच्या व नैतिक गुणांच्या जोरावर जेत्याच्या अजस्र भौतिक शक्तीला नमविण्याची धमक जिताच्या अंगी असू शकते. या गोष्टीचे प्रत्यंतर आणून दिले तर जिताच्या मनावरील आश्चर्य, कौतुक व दरारा ह्या भावनांचा पगडा दिवसेंदिवस कमजोर होत जाऊन त्या जागी उत्साह-वर्धक, सात्त्विक स्वाभिमानाची वृत्ती नांदू शकेल. यात शंका नाही. राष्ट्रकवीचे हे काम करीत असताना शाहिराला प्राचीन, ऐतिहासिक प्रसंग बहुत उपयोगी पडतात व तो सगळ्या उपलब्ध साधनांचा सढळ हाताने व स्फूर्तीच्या आवेशाने उपयोग करून घेतो. या दृष्टीने प्राचीन प्रसंगांचे महत्त्व आणि कार्य ही अमोलिक असून त्यांच्या ठायी शाहिरांची प्रतिभा घालविण्याचे सामर्थ्य नवोत्थित प्रसंगांइतकेच असू शकते. "[1]

राष्ट्रकवीचे कार्य जागृती निर्माण करण्याचे. ते करीत असताना राष्ट्रात स्वाभिमान सत्त्व आणि स्वत्व यांची जोपासना कशी होईल हे सांगण्याचे असते. ' उद्धमसिंगाचा पोवाडा ' या पोवाड्यात अमरशेखांनी एका क्रांतिवीराच्या कार्याचा मुक्तकंठाने गौरव केला आहे. ज्या वीरांनी राष्ट्रासाठी सारसर्वस्वाचा होम केला त्यांच्या कार्याचा थोर आदर्श राष्ट्रापुढे सतत ठेवण्याचे कार्य कवींनी आपल्या तेजस्वी वाणीने केले पाहिजे; किंबहुना ते एक राष्ट्रीय कर्तव्यच आहे. अमरशेख ते निरलसपणे पार पाडीत आहेत. ' शाहीर नाही विसरत शूर वीराला ज्यांनी देशासाठी नरदेह पणा लाविला ' त्यातीलच उद्धमसिंग एक आहे. पण हा–

१ आधुनिक मराठी पोवाडे व त्यांचे कार्य.

उद्धमसिंग अज्ञात वीर । पंजाबि पोर
कवळा सरदार । येवढं हाय ठाऊक साऱ्या जगतास
क्षणार्धात बसला त्याला गळफास

आणि एप्रिलच्या तेरा तारखेला, सहा वाजण्याला जालियनवाला बागेत लोकांचा जमाव जमला होता. स्वराज्याची मागणी करण्यासाठी केवढा अपराध होता हा भारतीयांचा.

काळपट पांढऱ्या संगिनी लालेलाल झाल्या
गाराच्या पावसावाणि गोळ्या वर्षु लागल्या

आणि त्यानंतर —

रक्ताच्या धारा अन्याय वर्णु लागल्या

निःशस्त्रावरती आपण गोळी झाडली ही 'सायबाला भादुरी' वाटली... पण पंधरा वर्षांच्या उद्धमसिंगाने २१ वर्षानंतर कॉक्स्टन हॉलमध्ये धुंद डोळ्यांनी खुर्चीला खुर्ची लावून इग्लंडमध्ये माय्‌केल-ओडवायर, झेटलंड, लुईडेन बसले होते. इतक्यात 'फटाकफट' आवाज केला आणि ओडवायर खाली कोसळला. 'सूड घेऊन उद्धमसिंग । मेरुमणी छातीठोक' निर्भयपणे उभा राहिला. एका पराक्रमी वीराची ही कथा या पोवाड्याच्या रूपाने उभी आहे.

"प्रत्येक स्वतंत्र देशाला राष्ट्रीय निशाण ही त्याच्या स्वत्वाची, अभिमानाची व इभ्रतीची बाब वाटते. फार काय, पण ते त्याच्या अत्यंत जिव्हाळ्याचे व नाजूक मनोवृत्तीचे स्थान होते असे म्हटल्यास अतिशयोक्ती होणार नाही. निशाणाचे हे महत्त्व ओळखूनच आमच्या प्राचीन शाहिरांनी तत्संबंधी गौरवाने उल्लेख केले आहेत व तसे करण्यास अर्वाचीनांकडूनदेखील मुळीच कसूर झालेली नाही. पोवाड्याचा विषय झालेली अशी कोणतीही लढाई सापडू शकणार नाही की, तिच्या स्वारीमध्ये शाहिरांनी आपल्या जरि पटक्याचा खास निर्देश केला नाही. आणि असा कोण..ही प्रसंग अर्वाचीन शाहिरांनी दवडला नाही की मराठ्यांच्या राष्ट्रीय निशाणाचे प्रत्यक्षाप्रत्यक्ष दर्शन घडण्याचा सुयोग आला असताना मग तो कोठेही व कसाही येवो, त्यांनी तो प्रसंग आत्मियतेच्या जाणिवेने व जिव्हाळ्याच्या रसभरित वर्णनाने सादर करून स्वतःला कृतार्थ मानून घेण्यास कमी केले नाही."

'महाराष्ट्र झेंड्याचा पोवाडा' यामध्ये जरिपटक्याच्या गुणगौरवाचाच फार मोठा भाग आहे. हा झेंडा घेऊनच मराठ्यांनी एकापेक्षा एक वरचढ असे पराक्रम करून यश संपादिले.

बंगालच्या समुद्राला हादरा त्याचा बैसला
दर्शनासाठी तिष्ठतच बसलि होती सिंधुमाई अटकेला
कटकेहून दौडला घोडान् अटकेला गेला...
अटकेला झेंडा लागला । होता पाहिला । आनंद होता झाला

यांच झेंड्याला खाली ओढायला सेना सज्ज झाली तेव्हा शाहीर साऱ्या समाजाला उद्देशून सांगतो---

मेढे कोट रक्ताचा झेंड्याभोवति उभा करा
रहा जिवंत नाहितर लढता लढता मरा
ब्रीद मराठ्याचं जर असंल दावाय पुढं सरा
नाहीतर बांगड्या भरान् खुशाल जा घरा

पण जरी एक मराठा राहिला तरी —

शत्रूशी करिल मुकाबला। येउ द्या भला भला।
लाविल वाटेला

एक एक मराठा किल्ला होऊन गनिमी काव्याचा हिसका दाखवील असे अमरशेखांना वाटते म्हणूनच ते मराठ्यांना आवाहन करतात–

राखेल झेंड्याला देऊन प्राणाचं मोल

त्यासाठीच तर 'मजबूत एकीचा हात' हवाच हवा.

अमरशेखांनी या पोवाड्यांद्वारे वीरपुरुषाचा, मराठी अस्मितेचा आदर्श मराठी समाजासमोर ठेवला आहे. तो ठेवण्यापाठीमागे वीरकर्तव्याची जाणीव सतत जागृत राहावी हा उद्देश आहे. वर्ण्य विषयाशी तादात्म्य पावूनच या पोवाड्यांचे लेखन केलेले आहे. साहजिकच भाषा ओजस्वी बनली आहे. वातावरणनिर्मिती करण्यातील अमरशेखांचे कौशल्य पाहायचे असेल तर 'समाजवादी छत्रपती' या पोवाड्याच्या सुरुवातीच्या "एके रात्री... गाण्याचा थाट" या ओळी मुद्दाम नजरेखालून घालाव्यात. उद्धमखिंगाच्या पोवाड्यातील 'उंच उंच...माझी धरतीमाई" या ओळी बघाव्यात. प्रत्येक ओळ म्हणजे अगदी काळजाचाच ठाव घेते. भावनोत्कटता हा अमरशेखांच्या पोवाड्यांचा प्रमुख विशेष. सहज, सोप्या भाषेत या पोवाड्यांची रचना केलेली दिसते.

उदाहरणार्थ—

१) उठला अवघा मराठा उठला बाण जणु सुटला
बॉंब जणु फुटला......

२) पुनः काढू नका असा शब्द होतो अपमान
जाणून बुजुन मी मारिलेत सैतान ॥

एकापेक्षा एक सरस उपमा अगदी घरगुती व नित्य व्यवहारातल्या अमरशेखांनी दिल्या आहेत. वाक्प्रचारही समयोचित असेच वापरले आहेत. 'तिळपापड झाला,' 'पळता भुई थोडी' अशासारखे आणि 'गारांच्या पावसावाणि' गोळ्या

काव्य
दि: २९।१।५९

वर्षु लागल्या ' अशा उपमा यांनी पोवाड्यांची सुंदरता सहज नजरेत भरेल अशी वाढविली आहे.

" पोवाड्यांत वीररस आहे, तर लावण्यांत शृंगार आहे. पोवाडे नर, तर लावणी कामिनी आहे. पोवाडे हे भ्रमर तर लावणी ही कमलिनी आणि वेदान्ताच्या परिभाषेत बोलायचे तर पोवाडे हा पुरुष तर लावणी ही प्रकृती आहे. "[१]

" कवनांचे हे दोन प्रकार बाहेरून दिसण्यात जरी विरोधी दिसतात खरे, परंतु ते विरोधी किंवा भिन्न नसून एकाच वीररसाची दोन अंगे आहेत. "[२]

"जानपदाचे सुख दुःख, आशा, निराशा, इच्छा, ध्येये, आवडीनिवडी, आचार-विचार–संस्कार या सर्वांचे पडसाद लावणी वाङ्मयात उमटले आहेत...लावणीत दृश्य व श्राव्य काव्य एकवटले आहे. साहित्य, नृत्य, संगीत या त्रयीचा मधुर मिलाफ लावण्यात झालेला आहे. लावण्यांतील विषय-वैचित्र्यामुळे मराठी जीवनाच्या साऱ्या छटा पाहायला मिळून मराठी समाजाचे विश्वरूप दर्शन घडते. "[३]

" भाटांच्या कवितांतून चमत्कारिक वर्णरचना मराठीने उचलली, ती प्रथम कटावात व नंतर तेथून लावणीत आली आहे. बालेघाटी म्हणून लावणीचा जो प्रकार आहे त्यात सैन्याच्या हालचालीचे, तयारीचे आणि सजावटीचे वर्णन असते. लावणी सांप्रदायाने मराठी राज्याच्या विस्ताराबरोबर नागपुरापासून बडोद्यापर्यंत आणि तुंगभद्रा तीरापासून ग्वाल्हेरपर्यंत आपली छाप कायम बसविली आहे.

" शाहिरी कवितांत शृंगार नटविला जातो. त्यातही काही चमत्कृती असतेच. स्त्री-पुरुषांचा अनुराग हा मुख्य विषय...लावणी कवनस्वरूपाची आहे. व त्या कवनाच्या म्हणण्याला पोषक असे अनेक संवाद वगैरे प्रकार त्याला अंगभूत आहेत संस्कृत वृत्तांच्या काव्याची सरसहा निर्मिती होण्याच्या पूर्वीपासून मराठीत सर्व-साधारण जनांच्यासाठी कवने रचली जात होती. त्यांची एक विशिष्ट पद्धती होती. त्यांनाही या नव्या संस्कारयुक्त रचनाकारांनी छंद असे नाव दिले. हे छंद म्हणजेच लावणी. व्युत्पत्तीच पाहावयाची तर, जी म्हटली जाते ती लावणी असा शुद्ध अर्थ निघतो. या रीतीने लावणी हे महाराष्ट्राचे स्वतःचे असे म्हटले जाणारे काव्य आहे. "[४]

येथवर लावणीची स्थूल रूपरेषा पाहिली. अमरशेखांच्या ' जलधारांनो ', ' तुझा नखरा बघून पाखरा ', ' मन माझं हिरवं गार ', ' मोळीवाली ', ' पृथ्वीचं प्रेमगीत ' ' सुगीराणीची मोहिनी ', ' लावणी ( नर्तिकेची ) ', ' कळी उमलली ' इ. लावण्या

---

१ महाराष्ट्राचे कलात्मक काव्य

२ महाराष्ट्र सारस्वत.

३ श्री. रा. वि. काळी.

४ लावणी संप्रदाय.

उल्लेखनीय अशा आहेत. बहुतेक लावण्यांत शृंगाररसाचाच परिपोष केला आहे. पण अमरशेखांचे वैशिष्ट्य त्यांच्या मार्मिक उपमांत आणि उत्प्रेक्षांत आहे.

१) लकलका तळपते तुझी तनू तलवार

२) अप्सरा उतरली स्वर्गावरची खरी
जणू चम्‌चम् चमकती मोती कपाळावरी

३) सळकत नागिणीवानि

४) मन माझं हिरवंगार, मनची हिरवळ तयार

५) सोनसळी तुझं केस लांब
तुझ्या मांड्या ग दर्यातली वांब
देह लचके लव्हाळ्याची कांब

६) ही पहाटेची कळी उमलती
स्वप्नि धुंद अजुनिही दिसे ती

७) ठुमकत चाले घेत हिंदोले
जणु हंगामी शिवार डोले.

आपल्या लावणीत अशी अलंकारिक रचना करणारे अमरशेख चित्रसौंदर्य कौशल्याने प्रकट करतात.

१) अग्नि प्रीतिचा हृदयी फुलला
म्हणुनि हिचा चेहरा व्याकुळला
दिसे जीव तगमग झालेला

२) गेली चालुन थकुन
गेला चेहरा सुकुन
अंगी निथळती
घामाच्या धारा...

अमरशेख मराठी समाजजीवनाशी शाहीर परशुरामाप्रमाणे समरस झालेले आहेत. त्यांच्या कवनात अस्सल मराठी खेडवळ जीवन पाहायला मिळते. प्रभाकराप्रमाणे नादमधुर शब्दयोजनाही त्यांच्या लावणीत दिसते.

१) नोक झोक सारं काही न्यारं, नवतिची नार सुगीचं दार.

२) छंदिफंदि बेबंदि टाक सख्या ही धुंदी
करिन तुला आनंदी मी धरा...

३)　नवी नवेली नार समोरी भुलवित राधा प्यारी
बहु तृषार्त ही मैना फोडित पहाटेची लल्कारी

तदाकारता, तादात्म्य हेच प्रेमाचे एकमेव व परमोच्च स्वरूप अमरशेखांच्या लावण्यात दिसते.

१)　मज पाहू द्या भिजली राधा आला बहर प्रीतीला
हे माझ्या प्रिय जलधारांनो भिजवुन टाका हिला.

२)　तुझी माझी जोडी त्यात खरी गोडी
प्रीतरीत पतंगाची सख्या वेडी रे
खरी प्रीत आनंद देई मस्त मंद गंध
जीवनी सुगंध येई जोडी रे

३)　सोंगढोंग कराय नको लावू
नको आंब्याच्या डोलीत गावू
बोल एकदा मला " माझा राऊ "

४)　झाले अधीर या या हो राया
झुरणि लागे वधा माझि काया
...हात चंदेरी द्या, मला उचलून न्या
सारि जिनगानि घ्या...

अमरशेखांच्या लावणीतील शृंगार कधीच उत्तान सापडणार नाही.

हिंदोळ्यावर क्षण डोलू द्या
लपंडाव पळभर खेळू द्या
थकल्या, दमल्या या जीवा मग
हवाच कर अपुला

बस्स; संपली सीमा. यापेक्षा शृंगार पुढे पाऊल टाकत नाही. शारीरिक किंवा भावना पेटवून सोडणारा शृंगार अमरशेखांच्या लावणीत शोधूनही सापडणार नाही. उलट आजवर इतर लावण्यांतून जी आढळली नाही ती मनाची उदात्तता अमरशेखांच्याच लावणीत पाहायला मिळते.

उदा.—

त्यागिली रात्र, सोडली शेज। महाराष्ट्राची राखण्या लाज
लावणीला मी चढविला साज
ऐका नवलाई, अग बाई। सांगा पुढे काही

तरुण—　मग मवाशी दौलतजादा मिळवलीय ती?

नर्तिका— ती मी माझ्या राष्ट्राच्या पायावर ठेवणार आहे.

दुसरे एक उदाहरण—

झपाटलो पुरा जाऊन, प्राण मुठितून, उभा घेऊन
चरणि ठेविले घेई ग दान–सजणे थोर होऊन घेई ग दान

संयमित शृंगार, अलंकारिक रचना, तादात्म्य आणि भावनोत्कटता यांनी अमरशेखांची लावणी अधिक 'लावण्यमय' बनली आहे. मराठी शाहिरांची जुनी परंपरा पुढे नेऊन तिच्यात नवीनता–कालानुरूप आणि व्यक्तित्वानुरूप अमरशेख निर्माण करीत आहेत.

● ● ●

८०९५८ १६८५ का०५ २९।१४

## प्रकरण ११

# बालेघाटी बोली

भाषाशास्त्राच्या खोल दृष्टीने पाहिले तर जितक्या बोलणाऱ्या व्यक्ती तितक्या भाषा असे ठरते. इतकी नितान्त शास्त्रीय दृष्टी जरी लाविली नाही तरी वरवर पाहणारालाही दर बारा कोसावर कांही भाषा-भेद—मग ते सूक्ष्म का असेनात— आढळून येतात. या दृष्टीनेच दर बारा कोसांवर भाषा बदलते अशी म्हण लोकांत रूढ झाली आहे. शब्दवैचित्र्यावरून, स्वरभेदावरून, जातीपरत्वेही निरनिराळे भाषाभेद आपल्या ऐकण्यात आहेत. मराठीच्या विस्तीर्ण क्षेत्रात निसर्ग-निर्मित असे विभाग पडले आहेत. ज्या ज्या प्रांतांच्या सीमांवर महाराष्ट्र प्रांताची सीमा मिळाली आहे, त्या त्या प्रांती त्या त्या भिन्न भाषेचे शब्द किंवा प्रयोग मराठीत मिसळून भाषाभेद उत्पन्न झाले आहेत. कानडीलगतच्या कोल्हापूर, सोलापूर वगैरे ठिकाणी मध्यवर्ती मराठीपासून निराळे असे भाषाभेद आहेत.

शाहीर अमरशेख यांच्या काव्यसंग्रहात उपयोजिली गेलेली भाषा बाळबोध स्वरूपाची आहे. ती संस्कृतप्रचुर असून मराठीतील सर्वच वैशिष्ट्ये तिच्यात एकवटलेली दिसतात. परंतु व्याकरणशुद्ध भाषेशी तुलना केली तर मात्र थोडाफार फरक जाणतो. अमरशेखांनी ज्या बोलीभाषेचा वापर केलेला आहे ती शुद्ध मराठी असूनही आपले वेगळेपण सहजपणे दाखविणारी अशी आहे. ह्याच बोलीला सातारी, कोल्हापुरी, पंढरपुरी, बालेघाटी मोड फुटलेले दिसतात. भाषेत पोटभेद त्या त्या स्थानावरून, पडलेले आपल्याला नेहमीच दिसून येतात.

"पुणे, नगर, नासिक, सातारा, सोलापूर हे जिल्हे; भोर, अक्कलकोट, फलटण औंध, कोल्हापूर, सांगली, मिरज, कुरुंदवाड ही पूर्वीची संस्थाने ह्यांनी जे क्षेत्र व्यापिले आहे त्यात मध्यवर्ती मराठी बोलली जाते. मध्यवर्ती मराठी किंवा दक्षिणी ह्या भाषेत प्रांतपरत्वे उपभेद फारसे पडत नाहीत. काही थोडे अत्यंत सूक्ष्म भेद आहेत. नासिकची मराठी भाषा थोडीशी खानदेशी भाषेच्या वळणावर जाते. मुंबईतील मराठी कोकणी भाषेच्या वळणावर जाते. सोलापूर व कोल्हापूर ह्या प्रांतांच्या भाषेतील शब्दप्रयोगांत थोडेसे कानडीचे वळण दिसते. सातारा, नगर ह्या प्रांतांत देशस्थी मराठी भाषा प्रामुख्याने वावरते. देशस्थी भाषेत आरंभीच्या 'अ' चा उच्चार पसरट करतात. प्रांतपरत्वे किंवा जातिपरत्वे असे थोडेसे सूक्ष्म भेद असले तरी मध्यवर्ती मराठी सर्व क्षेत्रांत जवळजवळ एकाच

स्वरूपाची आहे असे म्हणावयास हरकत नाही. मध्यवर्ती मराठी कोंकण, मुंबई, व वऱ्हाड नागपूर ह्या प्रांतांत शिष्ट भाषा म्हणून समाजातील शिष्ट लोक वापरतातच. ग्रंथाची वाङ्मयाची, अभिजात लेखनाची शिष्ट भाषा म्हणून हीच मध्यवर्ती भाषा वापरतात."[१]

याच मध्यवर्ती भाषेशी जुळती मिळती, संस्कृताशी पूर्णपणे साम्य असलेली पण व्याकरणदृष्ट्या थोडेसे वेगळेपण दाखविणारी अशी जी एक प्रकारची ग्रामीण बोली आहे आणि जिचा वापर अमरशेखांसारखे शाहीर प्रामुख्याने करतात तिचाच या प्रकरणात विचार करावयाचा आहे. त्यापूर्वी ग्रामीण भाषा व त्या बोलींतील शब्दांकडे पाहण्याची दृष्टी कशी असावी याचा प्रथम विचार करणे आवश्यक वाटते.

"प्रांतिक बोलींतील किंवा ग्रामीण बोलींतील शब्द नागर, मध्यवर्ती आदर्श भाषेत वापरण्याचा सहेतुक प्रयत्न काही लेखकांकडून केला जात आहे. विदर्भातील कवी वऱ्हाडी बोलीतील शब्द आपल्या काव्यात सहेतुक रीतीने वापरतात. कोकणातील कातोडी, वारली ह्यांच्या बोलीतील शब्द काही कादंबरीकार आपल्या कादंबरीत मुद्दाम वापरीत आहेत. तीच गोष्ट दक्षिण कोकणमधील लेखकांची. आपल्याकडील ग्रामीण भाषेतील शब्द वापरण्याने नागर भाषेचे स्वाभाविक व सहज स्वरूप हेंगाडे होते अशी त्या लेखनावर सत्प्रवृत्तीच्या टीकाकारांकडून टीकाही केली जाते. सूक्ष्म दृष्टीने पाहू गेले तर ह्या शब्दांच्या वापरात वावगे असे काहीच नाही. जुन्या शब्दांचे संकेत ( concepts ) नाहीसे झाल्यामुळे त्या मृत शब्दांचे पुनर्जीवन करणे फलदायी होणार नाही, अशी तक्रार करता येते. तशी तक्रार ह्या प्रांतिक किंवा ग्रामीण शब्दांसंबंधी करता येत नाही. हे सर्व शब्द जिवंत असतात. ते वापरण्यास आपणास काहीच अटकाव नाही. उलट मध्यवर्ती आदर्श भाषा त्या शब्दांच्या वापराने अधिक संपन्नच होईल. प्रांतिक बोलींनी मध्यवर्ती भाषेचे पोषणच होते. ह्या शब्दांच्या व प्रयोगांच्या वापराने मध्यवर्ती नागर मराठी अधिक लवचिक, अधिक प्रकटनक्षम होईल यात शंका नाही. त्या दृष्टीने ही प्रवृत्ती समर्थनीयच ठरते."[२] अमरशेखांच्या कवितेत त्यांनी वापरलेल्या बोलीचा अभ्यास म्हणजे पर्यायाने त्या एका विशिष्ट प्रचलित अशा प्रवृत्तीचाच अभ्यास करणे होय. होनाजी बाळाच्या रचनेतही तीच प्रवृत्ती आहे हे स्पष्ट दिसून येते. होनाजीची 'अमर भूपाळी' हिचा मूळ कर्ता गोमंतकीय कवी विठ्ठल नरसिंह असल्याचे आता चांगल्या प्रकारे उजेडात आलेले आहे. म्हणजे गोव्याकडील या कवीच्या काव्याचीही प्रकृती तीच आहे. याचा अर्थ

---

१ भाषा, उद्गम आणि विकास– प्रा. कृ. पां. कुलकर्णी

२ प्रा. कुलकर्णी

अमरशेखांसारखे अनेक कवी ज्या बोलीचा मुक्त वापर करतात त्या बोलीचे क्षेत्र फारच विस्तृत असले पाहिजे. विठ्ठल नरसिंहाच्या ' भूपाळी ' तही ( की जी होनाजीची अमर भूपाळी ठरली ) त्याची साक्ष जागजागी सापडते.

" ठोकळ मानाने सातपुड्यापासून खाली कावेरीपर्यंतचा पश्चिमेकडील प्रांत मराठी भाषेने व्यापला आहे. उत्तरेस दमणपासून दक्षिणेस गोव्यापर्यंतचा अरबी समुद्राचा पश्चिम किनारा ही मराठीची पश्चिमेकडील मर्यादा आहे. उत्तरेस ती दमणपासून दमणगंगेच्या काठाकाठाने तिच्या उगमापर्यंत जाऊन नंतर घाटावर चढून घाटावरील पाणलोटाच्या अनुरोधाने भिल्ल, कोळी वगैरे रानटी लोकांत मिसळून नर्मदा नदीस गाठते. येथेच तिची गुजराती आणि नेमाडी ह्या भाषांशी भेट होते. ह्यापुढे मराठीचा प्रवास सातपुडा पर्वताच्या रांगेने होतो. सातपुड्याच्या एका रांगेतून गाविलगडाच्या आसपासच्या प्रांतातून तिचा रोख पूर्वेकडे वळून बैतुल आणि सिओनी वगैरे प्रदेशांस अर्धवर्तुळाकार वळसा घालून नागपूर मध्या-वर ठेवून थोडीशी दक्षिणेस तर थोडीशी पूर्वेस व पश्चिमेस वळून लांजी व वैरा-गडजवळ गोण्डी व तेलगु ह्या भाषांना ती भेटते. पुढे चांद्यापर्यंत जाऊन पश्चिमेकडे पैनगंगेच्या पात्रापात्राने माहूरपर्यंत आल्यावर तिचा आणि तेलगूचा संबंध तुटतो. माहूरवरून दक्षिणेकडे, गोदावरीकडे जाऊन नैर्ऋत्य दिशेकडे वळणावळणाने देगलूर, नलदूर्ग, सोलापूर, विजापूर ह्या गावांवरून ती कृष्णा नदीजवळ येते. येथे कानडीचा आणि तिचा संबंध येतो तो कोल्हापूरपर्यंत टिकतो. नंतर कोल्हापुराहून पुन्हा नैर्ऋयेकडे ती जाते व सर्व करवीर इलाख्याचा प्रदेश व्यापून गोव्याच्या घाटालगतच्या वरील व खालील प्रदेशावरून टेराकोल येथे पश्चिम समुद्रास भेटते. "[१] ही मर्यादा पाहण्याचा उद्देश एवढाच की ह्याच मर्यादेत मोडणारी बालेघाटी भाषा आहे. आणि मराठीतील ती एक विशिष्ट अशी बोली आहे. हिचे वैशिष्ट्य अमरशेख कसे दाखवतात ते पाहा---

पुष्पवतीस पाणी नाही बालेघाटी काळी आई

यात्र काळ्या आईच्या कुशीत सुखावलेली ही बोली आहे.

गोदेकाठी, कृष्णेकाठी । द्राक्षांच्या, आंब्यांच्या बागा  
माझ्या पुष्पावतिच्या काठी । बाभुळ, कडुलिंबांच्या रांगा  
......रुक्ष अशा या माळावरती । महाराष्ट्र धर्माची ज्योती  
थोर पंढरीची भागवती । धो धो जवळुन वाहत होती  
भागवतीची पुष्पवतीची । गांठ कुठे जरि पडली नाही

१ प्रा. कुल्कर्णी

असे सांगून अमरशेख म्हणतात—

माझ्या तू सहृदयी मित्रा
अल्प भेट या 'कलशी' पाही

आणि 'कलशात' उपयोजिलेल्या बोलीकडेच आपल्याला सहृदयतेने पाहायचे आहे. अमर भूपाळीत होनाजीबाळाने किंवा भूपाळीत (दोन्ही एकच) विठ्ठल नरसिंहाने उपयोजिलेली बोली ही बालेघाटीच आहे. यावरून मराठीतील हा एक बोलीचा नवा प्रवाह सातत्याने वाहत असलेला प्रामुख्याने दिसून येतो.

"शब्दांचा उच्चार व अर्थ यात झालेल्या फरकानेच भाषेचा विकास होतो. शब्दाच्या स्वरूपात बदल, अर्थात बदल किंवा दोहोंत बदल, शब्दाचे स्वरूप कायम राहून अर्थ बदलणे किंवा अर्थ तोच राहून त्याच्या स्वरूपात फरक पडणे, जुने शब्द येणे हे सर्व प्रकार भाषेत प्रत्यही चाललेले असतात. असे पुष्कळ प्रकार झाले तरी भाषेस कमीपणा येत नाही. उलट हे प्रकार म्हणजे भाषेच्या जिंवतपणाची लक्षणे होत."[१]

अमरशेखांच्या लेखनांत ही जिवंतपणाची उदाहरणे निश्चितच दिसतात. शब्दांच्या उच्चारातच हा फरक खरे म्हणजे प्रामुख्याने जाणवतो. सर्वसाधारणपणे मराठीत पूर्ण स्वर उच्चारण्याकडे कल असलेला दिसतो. उदा. कोमल, महान, जीवन, टाकून, ठाऊक, बस, चल, अन, न; वास्तविक यातल्या प्रत्येक अ मध्ये फरक आहेच. परंतु मात्रा पूर्ण उच्चारण्याची एक प्रकारची सवय लागून राहिलेली आहे. मात्र बालेघाटी बोलीत हेच शब्द कोमल्, महान्, जीवन्, टाकून्, ठाऊक् असे उच्चारले जातात. संस्कृत ध्वनीचे अर्थ पाहिले तर ते असे दिसतात की 'क्' ध्वनीला शब्द करणे, जाणे, करणे हे अर्थ आहेत. ल् मध्ये धरणे, चिकटणे, तोडणे ह्या क्रिया व्यक्त करण्याचे सामर्थ्य आहे. मराठीतील 'न्' मध्ये सजीवत्व, प्राणी, द्रवत्व, हिंसा, आवाज, वाहन, नकार इ. अर्थांच्या कल्पना (असाव्यात); मात्र संस्कृत 'न्' मध्ये नेणे, वाहणे, स्तवणे, हलणे हे अर्थ आहेत. या बोलीत अन्त्य स्वर ऱ्हस्व करण्याकडे कल आहे आहे असे प्रामुख्याने दिसत असून न् हा अर्धस्वर संस्कृतशी आधिक्याने संबंध प्रस्थापित करतो. उच्चारात अर्धी मात्रा कमी करण्याची एक स्वतंत्र लकबच असलेली दिसून येते. बस, चल, अन, न ह्यांचे उच्चार वास्तविक ऱ्हस्वच केले जातात पण लिखित स्वरूपात ते पूर्णोच्चारित असे लिहिले जातात. व्याकरणशुद्ध भाषेत हे शब्द बस, चल, अन, न असे लिहिले जातात. पण या बोलीत लिखित स्वरूपात ते उच्चारानुसारी उपयोजिले जातात. म्हणजे त्यांचे लिखित रूप बस्, चल्,' अन्, न् असे होते. म्हणजे हे लिखित

१ शब्द, उद्गम आणि विकास–प्रा. कुलकर्णी

स्वरूप बऱ्याचशा प्रमाणांत उच्चारानुसारी असेच आहे. ऱ्हस्व ध्वनी त्वरा दाखवतो. कोमल, मृदु मंद भावना ऱ्हस्व ध्वनींनीच प्रकट केल्या जातात. बऱ्याचशा प्रमाणात ह्या बोलीतील ध्वनीचा वापर संस्कृत ध्वनीप्रमाणेच केला जातो. व लिखित स्वरूपही तसेच असते. उदा. उ, क्, ख्, ग्, घ्, ज् च्, इत्यादि.

खुमखुमी, लखलखाट, अजगरागत, खडबडीत, तलवार यांचा उच्चार खुम्खुमी लख्लखाट, अजगरागत, खड्बडीत, तल्वार असा होतो. शब्दोच्चारात ध्वनीप्रमाणे असा फरक पडत गेलेला दिसतो. दुसरा स्वर ऱ्हस्व करण्याची ही प्रवृत्ति शब्दा-शब्दांद्वारे वेळोवेळी प्रकट होते. याची आणखी उदाहरणे—सळ्सळ, हास्डू, चल्-चल् झुळ्झुळ, दड्ली, खब्ला अब्घा. अशी कितीतरी दाखविता येतील. या ऱ्हस्व-उच्चाराद्वारे आपल्याला भाषेतील गतिमानता आणि तिची ओघवत्ता स्पष्टपणे जाणवावी इतकी उघड आणि स्वच्छ आहे. ही एक स्वतंत्र लकबच म्हणावी लागते. ही बोलभाषा बऱ्याचशा प्रमाणात आखूड अशाच स्वरूपात वापरली जात असल्याने तिचे व्याकरणशुद्ध भाषेशी असलेले वेगळेपण चटकन जाणवते. चटकन भस्मसात हे शब्द देखील चटकन्, भस्मसात् असेच वापरले जातात. ही गतिमानता दृष्टिआड करून चालत नाही तर तिचाच प्रामुख्याने विचार करणे अपरिहार्य होते.

पारवा हा शब्द कलशामध्ये तिसऱ्या पानात योजिलेला आहे. ओळ आहे— व्हला पारवा करतो गायन.

पारवा— सं. पारापत; पारावत : प्राकृत पारवअ

कुसळ— सं. कुश + ल

सराटा— सं. शर, A thorny Shrub.

खडबडीत— सं. (?) हिंदी खरबर, सिंधी खरबरी= ओबडधोबड जमीन.

कोमल— सं. कोमल

महान्— सं. महत्.

खुमखुमी—स्त्री. प्रा. खम्मखम्म (पु.) अर्थ आहे संग्राम, मनोदुःख; मराठीत जोर, रग या अर्थी.

जोबन— सं. यौवन (< युवन, √ यु) प्राकृत जोव्वन, हिंदी जोबन (मराठीत हिंदीतून आला आहे)

छाती— स्त्री. उरोभाग. संस्कृत वक्षस्थल, बंगाली छाति, हिंदुस्थानी, पंजाबी, सिंधी, गुजराथी—छाती.

फिर्कावे— फिर (णे) सं. स्फिर (?) प्रा. फिर, प्राकृत— फिरक्क कु. फिर्को

सळसळ— सळणे (सं. क्षत्) अर्वाचीनकालीन मराठी सामान्यनाम सळसळ =उकळी.

तारका— तारा, चांदणी (सं. तारका म. तारका)

मौका—अरबी मौक् अ=संधी.

निरखा—निरख (णे) सं.-निर+ प्रा. निरिक्ख ईक्ष. यादवकालीन मराठीत निरख.

हास्डू— हसड (णे), जोरात ओढणे. सं. अ+सध, हिंसायाम्. अर्वाचीन कालीन मराठीत आसड हासड, हसड.

शिवी—अपशब्द. सं. शप्-शाप; प्रा. सव; हा शब्द द्राविड मूल असावा.

सुर्वात-सुर (रु) वात-आरंभ Beginning अर–शुरू अ

चर्बी—मेद. फारसी-चर्बी.

किकार—किरकिर-किर=आ. ध्वनिशब्द सं. किल्; प्रा. किर.

जीवन—जीव. सं. जीव

कवाड— सं. कपाटम्; प्रा. कवाड.

जिनगानि— जिनगानी. पेशवेकालीन मराठी शब्द.

खवूला— खोव (णे), रोवणे; सं. खव्.

अमरशेखांच्या कवितेतील कांही शब्द घेऊन त्यांची व्युत्पत्ति दाखविण्याचा हा प्रयत्न केलेला आहे. हेतू एवढाच आहे की, त्यांनी ज्या ज्या शब्दांचा वापर केला आहे ते ते शब्द संस्कृतोद्भव असून मराठीत सरसहा रुळलेले आहेत. संस्कृतशी या बोलीचे किती निकटचे साम्य आहे याची थोडीशी कल्पना यावी म्हणूनच वर उल्लेख केला आहे. मराठीने अनेक भाषांचे ऋण घेतले आहे. पण संस्कृताशी तिचे रक्ताचेच नाते आहे. तिच्याशीच या बोलीचे साम्य दाखविण्याचा हा प्रयत्न आहे. मग या बोलीत आणि व्याकरणशुद्ध भाषेत नेमका फरक कुठे आहे ? तर तो तिच्या बाह्य अविष्कारात आहे, असेच म्हणावे लागते.

नाहीतरे हा शब्प या बोलीत नाहितरे असा येतो बरोबरी हा शब्न बरोबरि असा योजिला जातो. मानीचे रूप मानि होते. कधी चे कधि होते. दडपून, चोहोबाजू, न्याहाळून, धुवून, ओढून, खालून, समजून, लावून, जगून, नटून. पुसून, ओकून हे दीर्घ ऊकार या बोलीत ऱ्हस्व होत गेलेले दिसतात. त्यांची रूपे अनुक्रमे अशी होतात—दडपुन, चोहोबाजु, न्याहाळुन, धुवुन, ओढुन, खालुन, समजुन, लावुन, जगुन, नटुन, पुसुन, ओकुन इ. उकार ऱ्हस्व करण्याकडेच केवळ या बोलीचा कल आहे असे नाही, तर इकार देखील ऱ्हस्वच केलेला दिसून येईल. संस्कृत काव्यशास्त्राप्रमाणे कवितेतील मात्रा मोजायचा प्रयत्न केला तर मात्रादोष प्रामुख्यानेच आढळतो. पण या बोलीची मात्रा तोकड्या करण्याची प्रवृत्ती पाहिल्यावर संस्कृत शास्त्राशी, व्याकरणशुद्ध बोलीशी तिचे असलेले वेगळेपण जाणवते. उच्चारांत अर्धी मात्रा कमी करण्याचीच पद्धत अविष्कारांत प्रामुख्याने दिसून येते.

अकारान्त शब्दांचे उपान्त्य ऱ्हस्व कसे होते ते पाहा—

| व्याकरणशुद्ध बोली | आविष्कारयुक्त बोली | व्याकरणशुद्ध बोली | आविष्कारयुक्त बोली |
|---|---|---|---|
| छातीच | छातिच | गातील | गातिल |
| टाकीत | टाकित | मोजीत | मोजित |
| सामील | सामिल | अधीर | अधिर |
| घालील | घालिल | देईल | देइल |
| मातीत | मातित | राहील | राहिल |
| आणील | आणिल | गाईल | गाइल |
| करील | करिल | होईल | होइल |
| टाकील | टाकिल | जातीय | जातिय |
| मागील | मागिल | त्यातील | त्यातिल |
| छेडीत | छेडित | नाहीत | नाहित |
| बहीण | बहिण | पोशील | पोशिल |
| दलीत | दलित | नागीन | नागिन |

अकारान्त शब्दांचे उपान्त्य ऱ्हस्व करण्याची जशी पद्धत आहे तशीच ईकान्त ऱ्हस्व करण्याचीही आहे.

| व्याकरणशुद्ध बोली | आविष्कारयुक्त बोली | व्याकरणशुद्ध बोली | आविष्कारयुक्त बोली |
|---|---|---|---|
| मानी | मानि | कधी | कधि |
| जानी | जानि | झाली | झालि |
| स्वप्नी | स्वप्नि | येई | येइ |
| सारी | सारि | गेली | गेलि |
| जोडी | जोडि | माझी | माझि |
| नाही | नाहि | आम्ही | आम्हि |
| मुळी | मुळि | आई | आइ |
| हाती | हाति | खळी | खळि |
| संधी | संधि | किल्ली | किल्लि |
| त्यांनी | त्यांनि | त्यांची | त्यांचि |
| रवी | रवि | कोणी | कोणि |
| व्याली | व्यालि | दावी | दावि |
| भाजी | भाजि | पाणी | पाणि |

अर्थात ही ऱ्हस्व इकाराची पद्धत मात्र सर्वत्रच आढळते. उकार आणि इकार ऱ्हस्व करणे ही एक व्याकरणशुद्ध बोलीपेक्षा खास वेगळी अशीच लकब म्हटली पाहिजे. याची उदाहरणे पाहा. मूळ शब्द अस्सल मराठी, उच्चारस्वरूप मात्र थोडेसे वैशिष्ट्यपूर्ण असे वेगळे होते.

| | | | |
|---|---|---|---|
| बरोबरी | बरोबरि | गर्वातुनी | गर्वातुनि |
| भिजवुनी | भिजवुनि | उतरुनी | उतरुनि |
| जगतातुनी | जगतातुनि | जिनगानी | जिनगानि |
| आम्हावरी | आम्हावरि | रणसंगरी | रणसंगरि |
| सर्वव्यापी | सर्वव्यापि | करपुनी | करपुनि |
| उफगुनी | उफगुनि | धन्यासाठी | धन्यासाठि |
| समजुनी | समजुनि | हुलकावणी | हुलकावणि |
| बडवेगिरी | बडवेगिरि | झटकुनी | झटकुनि |
| आळविशी | आळविशि | नदीकाटी | नदीकाठि |

सर्वसाधारणतः य, त्व, ता, इ, की, गि, री, पण, पणा हे भाववाचक नामांचे प्रत्यय मानले जातात. मात्र हेच प्रत्यय या बोलीत ऱ्हस्वात लिहिले जातात. पाटीलकी या नामाचे लिखित स्वरूप पाटीलकि, बडवेगिरी ह्या भाववाचक नामाचे रूप बडवेगिरि होते. म्हणजे फरक होताना अगदीच अंशतः असा फरक होतो. आणि तो ऱ्हस्वात करण्याच्या लकबीमुळेच. धातुसाधित अव्ययेही ऱ्हस्वोपान्तच होतात. धुवुन, पुसुन, जगुन, ओढुन इ. याची ठळक अशी उदाहरणे. दिसणे, उठणे, करणे, येणे, लोळणे, ठोकणे या क्रियापदांचा वापर जेव्हा काव्यात केला जातो, त्या वेळी गद्यप्राय रचनेपेक्षा त्यांची रूपे अधिक पद्यमय केली जातात. उदा. दिसणे याचे काव्यात दिसुनी होते. उठणे याचे उठुनी, करणे—करुनी, येणे —येउनी, लोळणे—लोळुनी इ. पण अशीच क्रियापदांची रूपे काव्यात उपयोजिताना विठ्ठल नरसिंहाने ती ऱ्हस्वान्त केलेली त्याच्या भूपाळीत दिसतील.

उदा. उठी—उठि, करुनी—करुनि, उठुनी—उठुनि, घेउनी—घेउनि, प्रक्षाळुनी प्रक्षाळुनि, अंगिकारी—अंगिकारि, सरसाउनी—सरसाउनि, गाती—गाति, येती—येति प्रवर्तुनी—प्रवर्तुनि, काढिती—काढिति, घेई—घेइ, चर्चुनी—चर्चुनि, आराधुनी—आराधुनि, टाकिताती—टाकितानि.

होनाजीने मात्र जो काही थोडाफार बदल केलेला दिसतो तो असा—घेउनिचे घेउन केले आहे, जानिचे जाता केलेले आहे, प्रक्षाळुनिचे प्रक्षाळुन, सरसाउनि चे सरसाऊन; गाति दोन्हीकडे कायम; येति विठ्ठल नरसिंहाचे भूपाळींत, तर येती होनाजीच्या भूपाळीत ( दोघांची नावे कायमच ) प्रवर्तुनिचे प्रवर्तोनि, लेयीचे

होनाजीने घालि केले आहे. घेइ दोन्हीकडे साम्यतादर्शकल. लक्षिताति (होनाजी) तर विठ्ठल नरसिंहाच्या भूपाळींत 'क्षुधित बहु' आहे. करुनि दोन्हीकडेसाम्यदर्शक. टाकिताति ( विठ्ठल नरसिंह ) टाकिताती ( होनाजी ) असा थोडाफार फरकसोडला तर इकार ऱ्हस्वान्त करण्याकडे दोघांचाही बराचसा कल असलेला दिसतो. पण ते जास्त प्रमाण विठ्ठल नरसिंहाच्याच भूपाळींत दिसून येते. म्हणजे इकार ऱ्हस्वान्त करण्याची लकब गोमांतकापर्यंत पोहोचल्याचा स्पष्ट पुरावा आढळतो. आता अमरशेखांच्या कवितेतील क्रियापदाचे स्वरूप पाहू या— घेउनि, पाहुनि, बनुनि, करुनि, लाभुनि, मोजुनि, साधुनि, धरुनि, सेवुनि, ठोकुनि, लावुनि, फोडुनि, होउनि, वाहुनि, लोकुनि, वेचुनि, हेरुनि, इ. रूपे स्पष्टपणे दिसून येत आहेत आणि थोडा बारकाईने विचार केला तर त्याचे साम्य विठ्ठल नरसिंहाच्या भूपाळीतील बित्येक क्रियापदांच्या रूपांशी त्यांचे निकटचे साम्य असलेलेच प्रामुख्याने दिसते.

इकार आणि उकार ऱ्हस्व करण्याची विशिष्ट लकब सरास किती रूढ झालेली आहे याची अधिक खात्री पटण्यासाठी खालील शब्दांकडे एकदा दृष्टी टाकणे अगत्याचे होइल. उदा.— याचाचि, म्हणति, म्हणशिल, उगवतिचा, उधळित, विचारिति, अगदि, झरति, जगातिल, अजुनि, छकडिला, उडविन, कसोटिचा, भीतिनि, बकुळि, जवानिचा, मैदानि, आघाडिचा, नरडिचा, पणति, झळकविला, तुतारि, तुझ्यावरिल, कोवळि, म्हणुनिच, उमेदित, उपाशि, जमिनि, कुणबि, खळ्यावरिल, पोचतिल, क्रोधाग्नित, तुडवित, आघाडिला, अजुनि, भारतिय, दिसशि, भवानि. सर्वसाधारणपणे विभक्तिप्रत्यय लागताच शब्दाचे रुपांतर दीर्घ करण्याकडे व्याकरण-प्रचुर शब्दांचा कल असतो. पण विभक्तीचा कोणताही प्रत्यय लागला तरी या बोलीतील शब्दांच्या मात्रेत मुळीच बदल होत नाही. उमेदीत असे न होता उमेदित होते, कसोटीचाचे कसोटिचा होते. जवानीचाचे जवानिचाच होते. ही गोष्ट लक्षात घ्यावी लागते.

क्रियाविशेषण अव्यये देखील ऱ्हस्व उच्चारण्याकडे या बोलीचा विशेष कल दिसतो. उदा० दडपुन, न्याहाळुन, समजुन, करपुन, झटकुण, उफगुण, उतरुन, भिजवुन इ०

कडे, पेक्षा, वर, अशा तऱ्हेच्या शब्दयोगी अव्ययांचा वापर सरास मराठीप्रमाणेच केला जातो. विभक्तीकरिता उपयोगात येणारी शब्दयोगी अव्यये जी प्रत, लागी, करून, द्वारे, मुळे, कडून, करिता, साठी, पेक्षा, पासून या सर्वांचा वापरा पाहिला की मराठी भाषेशी असलेली एकरूपता चटकन दिसून येते.

" भाषेतील शब्दांची वाढ जशी ध्वन्यनुकरणाने होते तशी ती भावनामय उद्गारांनीही होते. ही भाषेची व्युत्पत्ती विद्वानांनी मानिली आहे. भावनांच्या उद्रेकामुळे जे शब्द निर्माण होतात ते मूळ स्वतःसिद्ध असे शब्द असतात. इतर शब्दांपासून ते साधित झालेले नसतात. भावना किंवा विकार पुष्कळ असल्यामुळे

त्यांचे दर्शक शब्दही पुष्कळ होतात. भावनेचा किंवा विकाराचा जो स्फोट होतो, तोच त्याचा दर्शक शब्द बनतो. "[1]

" मनाला एकाएकी होणारे हर्ष, शोक इत्यादि विकार दर्शविण्याकरिता जे शब्द एकदम उच्चारले जातात अशा अविकारी शब्दांना केवलप्रयोगी किंवा उद्गारवाचक अव्यये म्हणतात. "[2] अशी अगणित अव्यये, भावनादर्शक शब्द ज्या बोलीत सर्रास वापरले जातात त्या बोलीचे वैशिष्टय चटकन डोळ्यात न भरले तरच नवल. अमरशेखांच्या काव्यसंग्रहात अशा तऱ्हेचे वैशिष्टयपूर्ण शब्द वापरलेले दाखवून देणे काही कठीण नाही.

कलशात पान १३० वर ' रामराम ' हा शब्द कितीतरी वेळ पुन्हा पुन्हा वापरला गेलेले आहे. ह्या शब्दाद्वारे कवीला विशिष्ट भावनेचाच परिपोष करावयाचा आहे ह्याची स्पष्ट जाणीव होते. पान ३१ ( कलश ) वर १२ व्या ओळींत ' अबब ' हा एकच शब्द दोनदा वापरलेला दिसतो. तो सहेतुकच वापरलेला दिसतो. त्याद्वारे कवीला आश्चर्य व्यक्त करायचे आहे. ( मात्र त्यात खेदाची भावना आहे. ) ११५ पानावर १३ व्या ओळींत ' छे ' शब्दाची द्विरुक्ती केलेली आहे. त्याद्वारे कवी एका वेगळ्याच भावनेचा अविष्कार घडवितो. ' तुफानांत ' या कवितेत ' रं ' ह्या शब्दाची पुनरुक्ती झालेली दिसते. ' बर्फ पेटला ' कवितेत ' रे ' शब्द तर जागोजाग दिसतो. त्याद्वारे आर्ततेची अधिक जाणीव होण्यास निश्चितच मदत होते. ' आशादीप ' कवितेत प्रत्येक कडव्यांत ' आरे ए ए ए ए ' ची जाणीवपूर्वक योजना केलेली दिसते. या शब्दांद्वारे कवीला उत्कट भावनांची प्रचीती आणून द्यायची आहे. त्याच कवितेत ' आ, आ, आ, ' अशा भावनादर्शक शब्दाचीही सहेतुक योजना केलेली आहे. ' क्षयाने मेली ' या कवितेत कवीने ' नाही' शब्दाची योजना पुनरुक्तीचा दोष पत्करून केलेली दिसते. त्या शब्दाद्वारे एक प्रकारच्या निर्धाराची अगदी स्पष्ट कल्पना येते. ' ढोंगी ' या कवितेत शेवटच्याच ओळींत ' हः हः हः हः हः हः ' हेच भावनादर्शक शब्द काय ते आढळतात. या शब्दाद्वारे कवीने उपहासाची स्पष्ट कल्पना आणून दिलेली आहे. ' वेडी आई ' कवितेत ' कड् कड् कड् कड् ' अशा शब्दाची योजना करून भयानकतेचा प्रत्यय आणून दिलेला आहे.

अशा तऱ्हेच्या अविकारी शब्दांचा पुरेपूर भरणा झालेला पाहिल्यावर त्या बोलीतील जोम कशा प्रकारचा आहे ह्याची पुरी खात्री होते. हे भावनोद्गार जिवंतपणाची, सचेतनतेची, जाज्वल्यतेची साक्ष देण्यास निस्संशय कारणीभूत

---

१ प्रा. कुलकर्णी.

२ घटना– रचना– परंपरा.

उरतात. या भावनोद्गारामुळे भाषेतील जोम, आवेश आणि जिवंतपणा समजून येतो.

द्विरुक्त शब्दयोजनेने भाषेला एक प्रकारचा गोडवा प्राप्त होतो. द्विधातु योजना प्रमाणशीर होत गेलेली दिसली की त्या भाषेतील संयमिततांहि समजून येते भाषेत कठोर वर्णांचा वापर करण्याकडे कल असला की त्या भाषेत कमी माधुर्यच असलेले दिसते. द्विरुक्त शब्दयोजना ज्या भाषेत, ज्या बोलीत प्रामुख्याने झालेली दिसते त्या भाषेचा निसर्गतः ओढा माधुर्याकडे असलेला दिसतो. अमरशेखांच्या रचनेत द्विरुक्त शब्दयोजना जी झालेली दिसते, त्यावरून या बोलीत माधुर्याला विशेष प्राधान्य असले पाहिजे हे प्रथमदर्शनीच कळून चुकते. लुकलुक, लालेलाल, लुळाखुळा, धक्काबुक्की, हुरहूर, लखलखाट, खटनट, लवलवती, खुदुखुदू, किरकिर धडपड, गरमगरम, कुजबुज, कच्चीबच्ची, कणकण, तटातट, थरथर, झगमग, तळमळ, तडफड, किलबिल, झुळझुळ अशा तऱ्हेची नादमधुर रचना भाषेचे सौंदर्य वाढविते.

"शब्दाचा उच्चार व अर्थ ह्यात झालेल्या फरकानेच भाषेचा विकास होतो. शब्दांच्या स्वरुपात बदल शब्दाचे स्वरूप कायम राहून अर्थ बदलणे किंवा अर्थ तोच राहून त्याच्या स्वरुपात फरक पडणे, जुने शब्द नाहीसे होणे, नवे शब्द येणे. हे सर्व प्रकार भाषेत प्रत्यही चाललेलेच असतात. असे पुष्कळ प्रकार झाले तरी भाषेत कमीपणा येत नाही. उलट हे प्रकार म्हणजे भाषेच्या जिवंतपणाची लक्षणे होत."[१] प्रचलित मराठीत फिरकावे, सुरुवात (सुरवात) चरबी, किरकिर, डरकाळी वरसती अशी शब्दयोजना केली जाते. पण अमरशेखांनी ज्या बोलीचे काव्याद्वारे दर्शन घडविलेले आहे तिच्यात या शब्दांचा फार थोडा बदल झालेला दिसतो आणि तो असा-फिर्कावे, सुर्वात, चर्बी, किर्कीर, डर्काळी, वर्संती इ. यामुळे शब्दाच्या अर्थात काडीमात्र बदल होत नाही. उलटपक्षी या बोलीचे वेगळे अस्तित्व प्रकट होते. हे जिवंतपणाचेच लक्षण नाही तर काय ?

"मूळभाषा आणि तिच्यापासून निघालेल्या पोटभाषा, ह्या दोहोंमध्ये उच्चार, प्रयोग, प्रत्यय. शब्दसमूह ह्या बाबतीत साम्य आणि वैषम्य दोन्ही असावी लागतात. साम्य नसेल तर दोघींचे मायलेकीचे नाते राहणार नाही वैषम्य नसेल तर दोन्ही-मध्ये अलगपणा राहणार नाही. पोटभाषा बोलणारे समाजही एकमेकांशी संबद्ध असावे लागतात. पोटभाषा ही सुद्धा समाजातील एखाद्या घटकाची बोलीभाषाच असते"[२] उच्चारात अर्धी मात्रा कमी करण्याची लकब, अर्धस्वर उच्चारण्याची पद्धत हे ह्या पोटभाषेचे वैशिष्ट्यच आहे. ह्या पद्धतीचा प्रत्यय खालील ओळीतून कसकसा येतो ते पाहा —

१ प्रा. कृ. पां. कुलकर्णी

२ घटना-रचना-परंपरा

९६५९ २८।११।८५

चार दोनही नाहितरे (पान ९), कोण बरोबरि करणार
धन्य मानि तू स्वतःला, परि मित्रांना कधिपासून
जानिदोस्त मी तुझा असून, छातिच दडपुन जायाची
प्रीतिच्या चदेरि नद्यांना आला आहे पूर
दोघाविण तिसरे कुणीही न फिर्कावे
ही सळसळ् धडपड हे यौवन जगण्याची
लख्लखाट होइल उजळतील ही अवनी
हासडू मी कसल्या शिव्या मला उमगेना
बस म्हणशिल याची झालि शिवी सुर्वात
अंगावर चर्बी मास न्याहालुन घेती
दुष्काळ अजगरागत पिच्छापुरवितो
मानवी जीवनकांक्षा मराय् लागे
चल्चल् ल्वकर चल् धावत जावोनी
बसता आम्हा संत म्हणति जन
किर्कीर कीटक करू द्या भयकारी
डर्कांळु द्या हिंस्र श्वापदे सारी
होई तो चिमण्यांची जीवन पहाट
तुजसम लाभुनि आवाज करडा
जीवनसरिता झुळझुळ वाहति

"पोटभाषा ह्या मूळ भाषारुपी अश्वत्थाच्या पारंब्या होत त्यावरून खाली खोल अदृश्य जागेत जमिनीच्या थराथरात चांगली जागा पकडून बसतात व मूळ वृक्षास पोसण्याचे व वारा, पाऊस तुफान वगैरे संकटात बेगुमान अचल राहण्याची शक्ती त्यास देण्याचे कार्य करतात. प्रांताच्या कोणत्या तरी कोपऱ्यात पोटभाषा दबा धरून बसते. आणि मूळ मातृभाषेस सारखी मदत करून वर्णाचा त्याग, आगम वगैरे संकटांना तोंड देण्याचे सामर्थ्य तिच्या अंगी उत्पन्न करते. योग्य अन्वर्थक शब्दांची ज्या वेळेस मूळ भाषेस उणीव भासते त्या वेळेस पोटभाषाच ती दूर करून तिला मदत करू शकते."[१] मध्यवर्ती भाषा समृद्ध होण्यास पोटभाषेत जिवंतपणा कायम राहणेच हिताचे असते. पोटभाषा मरून चालत नाही कारण त्याविना मूळ भाषेचा वृक्षच उन्मळून पडण्याची भीती असते.

अमरशेखांच्या काव्यांतली बोली कधी कधी आपले वेगळेपण कसे प्रकट करते ते पहाणे मजेशीर ठरेल. जिला आम्ही जानपद, ग्रामीण भाषा संबोधतो ती वस्तुतः मूळ भाषेचीच एक वेगळी प्रकृती असते. तिचे वैशिष्ट्य प्रांताप्रांतातून भिन्न असलेले

१ कृ. पां. कुलकर्णी.

आढळते. तरी पण तिचे साम्य मध्यवर्ती भाषेशी निश्चितच असते. मध्यवर्ती भाषेची ठळक वैशिष्ट्ये सामावून घेऊनही ती आपले वेगळेपण निश्चितच प्रकट करते. अमरशेखांनी उपयोजलेल्या भाषेत वेगळेपण नेमके कसे दिसते ते पहा—

रात पुनवची समद्यात न्यारी ( ७६ )
बांध फोडाया त्या म्होरं सरती
रात सारी खुदखुदु हसतो
वख्त जाई टळून
चंदाराया कसा न्हाई आला
मरणालाबी गाडून राया येईल चढुन
नाहि राह्यचा अडुन ( ७७ )
झळझळा झळकते लाल कुकाची चिरी
तानभूक पन गेली
बस थोडा एळ शेकोटीला
अशी लई झोप नाई बरी
गेलं म्होरं आळशास्नि टाकून म्हागं
फार पिकलेलं जांभूळ ताजं
निस्त्या सायीच रं लोणि ताजं
पोर न्होत्याल कुळाला म्होरं
बहिरी ससाणा आला त्याला टांग मारणे
काय कुणाच्या बाचे खाते
माल घेउनी घरापतुर चल
त्याचा देइन दाम वेगळा

मराठी साहित्यात यशवंत, ग. ह. पाटील, ठोकळ यांच्या जानपद गीताशी या बोलीचे निकटचे साम्य असल्याचे आढळून येईल. "तेराव्या शतकातील ज्ञानेश्वरीत आढळणारे कितीतरी भाषिक प्राचीन अवशेष मराठीच्या ग्रामीण व प्रांतिक बोलीत—कोकणी अहिराणी, वऱ्हाडी ह्यात आढळून येतात."

"प्रमाणभूत मानलेली भाषा हे काही त्या भाषेचे प्राचीन स्वरूप नव्हे. प्रमाणभूत मानिलेली भाषा ही तिच्या स्थानिक बोलीच्या किंवा पोटभाषांच्या मिश्रणापासून कोणत्यातरी ऐतिहासिक कारणानी निर्माण होते. भाषा व तिच्या पोटभाषा ह्या सर्वांचे एक कुटुंबच असते. ह्या कुटुंबातील एक कोणती तरी पोटभाषा दुसऱ्या पोटभाषांच्या मिश्रणाने राजमान्यता, सुधारणा व उच्च अभिजात लेखन वगैरे कारणामुळे अभिजात भाषा किंवा ग्रांथिक भाषा म्हणून मान्यता पावते. तीच प्रमाणभूत मानली जाते, व बाकीच्या तिच्या पोटभाषा म्हणून मानल्या जातात. ह्याच

न्यायाने यादवकालात विदर्भातील रिधापूर येथील स्थानिक बोलीच गुण्डमरावून व चक्रधर वगैरे महानुभावांची ग्रांथिक भाषा झाली. पंधराव्या–सोळाव्या शतकात पैठण अंबेजोगाई वगैरे प्रदेशात रूढ असलेली बोलीच दासोपंत, एकनाथ वगैरेची ग्रांथिक भाषा बनली. पुढच्या काळात ग्रांथिक भाषेचा केंद्रबिंदु पुणे–सातान्याकडे झुकलेला दिसतो. सतराव्या शतकात शिवाजीमहाराज, तुकाराम, रामदास वगैरे थोर पुरुषांच्या वापरात असलेल्या पुणे, सातारा येथील बोलीस ग्रांथिक भाषेचा दर्जा प्राप्त झाला. पुढे पेशवेकालात पुण्याची, तर एकोणीसाव्या शतकात मुंबईची बोली ह्यांना ग्रांथिक भाषा म्हणून प्रतिष्ठा प्राप्त झाली. ग्रांथिकभाषा ही अशा रीतीने भाषेचे प्राचीन स्वरुप नसून ती कोणत्यातरी बोलीपासून तिच्या इतर भगिनींच्या साह्याने तयार होते."[१] अमरशेखांच्या कवितेत बालेघाटी मातीतील जी बोली वापरलेली आहे तिचे क्षेत्र ठरवायचे झाले तर मराठीच्या व्यापक क्षेत्राचाच विचार करावा लागेल. पण तो उल्लेख पूर्वीच आलेला आहे.

सर्व प्राकृत भाषा अपभ्रंश व संस्कृत या भाषांनी आपापल्या परीने व प्रामुख्याने महाराष्ट्री व अपभ्रंश ह्यांनी मराठीस जन्माला आणण्यास हातभार लावलेला दिसतो निरनिराळ्या प्राकृत भाषा बोलणारे निरनिराळे समाज निरनिराळ्या काळी उत्तरेकडून आर्यावर्तातून अनेक कारणामुळे महाराष्ट्रात आले आणि तेथे स्थायिक झाले. त्यांच्या संमिश्र बोलण्यानेच मराठी भाषा बनली. महाराष्ट्र देश ज्याप्रमाणे गोपराष्ट्र, मल्लराष्ट्र अश्मक, कुन्तल, विदर्भ कोकण इ. लहान देशविशेषाचा मिळून बनला व महाराष्ट्राची लोकवसाहत ज्याप्रमाणे निरनिराळ्या लोक घटकांची मिळून झाली त्याच प्रमाणे मराठी भाषा ही निरनिराळ्या प्राकृत भाषांच्या–विशेषतः महाराष्ट्री व अपभ्रंश यांच्या मिश्रणाने बनली ...राष्ट्रीकांची उत्तरेकडील प्राकृत शौरसेनी ही बोली होती. ह्या लोकांनी आपली वसाहत दक्षिणेकडे बेळगावकडे, सोलापुराकडे स्थूलमानाने बीडपासून सौदत्तीपर्यंतच्या टापूत केली.

मराठीत 'ण' 'न' हे दोन उच्चार विशेष चिंतनीय आहेत. महाराष्ट्रातील सर्व प्रांतातील कुणबी लोकांच्या बोलण्यात ण बद्दल न व न बद्दल ण हा उच्चार होता त्यातही सातारा जिल्ह्यातील दक्षिण व पूर्वभागात हा उच्चार विशेष आढळतो नगर, सातारा, सोलापूर, खानदेश ह्या प्रांतात वसाहत करून राहिलेल्या शुक्ल यजुर्वेदीय ब्राह्मणांच्यामध्ये स्त्रीपुरुष ह्या दोघांतही अजमासे चाळीस टक्के प्रमाणात हा उच्चार आहे. खेडेगावांतील देशस्थ ब्राह्मणापैकी अजमासे पंचवीस किंवा तीस टक्के देशस्थात हा उच्चार आहे. कोकणस्थ चित्पावन ब्राह्मणामध्येही लकब आढळून येत नाही. 'न'च्या ठिकाणी 'ण' येण्याचा उच्चारविशेष हा महाराष्ट्रात सर्व ठिकाणी आहे. 'ण'चा 'न' करणे हा स्वभाव पैशाची ह्या प्राकृत भाषेने महाराष्ट्रीपासून उचलला. महाराष्ट्री-

१ कृ. पां. कुलकर्णी

मध्ये 'ण'चा हा उच्चार ण, न, श, ल, म, त, र इतक्या सात निरनिराळ्या वर्णांपासून सिद्ध होतो. पैशाची भाषेतील प्रक्रियेवरून तिला 'न-प्रधान' प्राकृत भाषा म्हणता येईल. मराठी भाषेत हा 'ण'चा 'न' होणारा व्युत्क्रम तिच्या जन्माच्या आगोदर-पासून आहे. संस्कृत प्राकृत भाषेतून तो मराठीत उतरला. मणगट, दाणादाण ही उदाहरणे ग्रामीण भाषेत आहेत. शिष्ट भाषेत 'न' मिश्र उच्चार आढळतो. कोण, दाणा, चिमणी, कुराण, हैराण, वैराण इ. अन्त्य 'ण' अमरशेखांच्या कवितेतही जागोजाग प्रतीत होतात.

मराठी भाषेचे अस्सल अगदी निष्कलंक असे मराठी स्वरूप यादवकालात पाहावयास सापडते.

वर्तमानकाळ प्रत्यय— ए, सी, इ, त, तांतां.

उदा०-करीत, घेई, करीती, ठेविती याची रूपे बालेघाटी मार्तीतील बोलीत करित, घेइ, करिति, ठेविति अशी झालेली दिसतात.

ल्यबन्त-प्रत्यय-नि, अनी, ओनि, औनि.

उदा.-जाऊनि, उठौनि, करवून, म्हणौनि, घेऊन.

यांची रूपे या बोलीत जाऊनि, उठुनि, करवुन, म्हणुनि, घेउनि अशी होतात.

पेशवेकालीन मराठीत ओळखिले, टाकिले, धरिले, मांडिले ही कृदन्ते ऱ्हस्व लिहिण्याकडे कल असलेला स्पष्ट दिसतो. त्याचप्रमाणे आलासि, पडिलो, हारपिली, आनंदभरिन असे शब्द ऱ्हस्व केले जातात. अमरशेखांच्या रचनेत प्रामुख्याने ही गोष्ट जाणवते.

"उच्चारशुद्धीचे प्रमाण 'प्रमाणभाषा.' प्रमाणभाषा ही काही एखादी स्वतंत्र भाषा नव्हे. अमूक एकाच ठिकाणची किंवा अमूक एकाच वर्गाची वा जातीची भाषा म्हणजे प्रमाणभाषा नव्हे. प्रमाणभाषेला स्वतंत्र आविष्कार नसतो. एखाद्या भाषेच्या भिन्नभिन्न बोलींना म्हणजेच आविष्कारांना व्यापून राहिलेली, शिष्टा-चाराला अनुसरणारी, पुनर्घटित भाषा म्हणजे प्रमाणभाषा. या प्रमाणभाषेला अनुसरून केले जाणारे उच्चार ते शुद्ध उच्चार."[1] अमरशेखांच्या कवितेतील बोली ही बऱ्याचशा प्रमाणात शुद्ध उच्चारित आहे. फक्त उकार व इकार हेच काय काय ते ऱ्हस्व उच्चारले जातात. आणि हे वैशिष्ट्य तिच्या प्रकृतीचा विशेष गुण दर्शविते. प्राकृत भाषेची परंपरा संस्कृतपूर्वीची आहे असे आता सिद्ध होत आहे. मराठीच्या जनकत्वाचा मान बऱ्याचशा प्रमाणात तिच्याकडे दिला जात असला तरी तो सर्वच्या सर्व काही दिला जात नाही ही गोष्ट लक्षात घ्यावी लागते. कारण महाराष्ट्री, अपभ्रंश, पैशाची, शौरसेनी इ. प्राकृतिक भाषांचे ऋण तिच्यात सामाव-लेले आहेच. प्रमाणभाषा हे उच्चारशुद्धीचे गमक मानले तरी तिच्यातील सर्वच

१ प्रा. कुलकर्णी.

उच्चार संस्कृतप्रमाणे आहेत असे थोडेच आहे? संस्कृतचे प्राबल्य माजताच बहुजन समाजाच्या 'प्राकृतिक बोलीतच' ज्ञानदेवांना आपल्या वाङ्मयाची निर्मिति करावी लागली ना?" "संस्कृतवाणी देवे केली। प्राकृत काय चोरापासून झाली?॥" असे नाथांनी खडसावून विचारले आणि प्राकृत भाषेतच आपल्या ग्रंथांचे लेखन केले ना? तेव्हा प्राकृतिक बोलीत वाङ्मय निर्मिति होण्याची जी परंपरा आहे तिला खंड असा पडलेलाच नाही. ज्या समाजाचे उद्‌बोधन करावयाचे असते, ज्या समाजाला वैचारिक खाद्य पुरवायचे असते, त्या समाजाच्या प्राकृतिक बोलीतच ग्रंथ निर्मिति वाङ्मय निर्मिति होणे अपरिहार्य असते. ती संस्कृतातच निर्माण झाली पाहिजे ही 'मिरासदारी' आता संपलेली आहे. संस्कृतातून आलेले काव्य प्रकार मराठी साहित्यात मानाचे स्थान मिळवून बसले तरीही तेच केवळ काव्य असे मानण्याची आज पद्धत अस्तित्वात नाही. मुक्तछंदाने नाही का पाश्चात्यांच्या अनुकरणाने आपले स्थान पटकविले? निर्यमक रचना रेंदाळकरासारख्यानी करून वेगळेपण नाही का सिद्ध केले? आज नव्या युगाला सामोरे जाऊन समाजाचे उद्‌बोधन करायचे असेल त्याच्या प्राकृतिक बोलीतच वाङ्मय निर्मिति होणे अगत्याचे झाले आहे. "वाङ्मय म्हणजे ज्याची घडण (मय) वाणीने म्हणजे भाषेने (वाक) झाली आहे अशी वस्तू अर्थात काही विशिष्ट अर्थ व्यक्त करण्यासाठी योग्य ते शब्द वाक्यात गुंफून जी सलग रचना केली जाते. तिचे नव्या वाङ्मय. यालाच 'सारस्वत' किंवा साहित्य' असेही म्हणतात. अर्थात जे जतन करण्याजोगे असेल त्यालाच रुढीने 'वाङ्मय' असे नाव देण्यात येते."[१] आता वाङ्मयाचा विस्तार वाढता आहे तेव्हा ते लिपिबद्ध करण्याची अधिकाधिक आवश्यकता वाटू लागलेली आहे. आणि म्हणूनच उच्चारानुसारी वाङ्मयनिर्मितीच्या मार्गात जे जे अडथळे येऊ पहात आहेत ते दूर करण्याचे प्रयत्न झाले पाहिजेत. ग्रामीण भागातून नवे कवि नवा आशय व नवा अविष्कार घेऊन येत आहेत. त्यांच्या मार्गात गण मात्राचे, शुद्ध उच्चाराचे काटे पसरवून चालणार नाही तर त्यांचे स्वागत करून आविष्कार व आशयसंपन्न निर्माण होणाऱ्या नवा वाङ्मयाला सामोरे गेले पाहिजे. या दृष्टीने संतांचा आदर्श ठेवल्यास तो अनाठायी होणार नाही. जे जे वाङ्मय आपल्या प्राकृतिक बोलीत फोफावू पहात आहे ते अधिक जोमदार कसे होईल याचीच तळमळ सर्वत्र आढळून यायला पाहिजे कारण त्यामुळे तोटा न होता भाषेचाच अधिक फायदा होणार आहे. प्रमाण–भाषेला बोलीच्या संपन्नतेने एक प्रकारचे आगळे सामर्थ्य प्राप्त होणार आहे. तिच्यात नवे चैतन्य खेळण्यास मदत होणार आहे.

सेतुबंध, सप्तशती, कर्पूरमंजिरी हे महाराष्ट्रातील प्रमुख ग्रंथ होत. 'प्रकृत्या

१ घटना–रचना–परंपरा

सिद्धं प्राकृतम्' आणि 'प्रकृतीनां इदं प्राकृतम्' या व्युत्पत्तीवरून महाराष्ट्री वा इतर प्राकृत या सामान्य जनांच्या भाषा होत्या. आजही सामान्य जनांच्या ज्या प्राकृतिक बोली आहेत त्यात ग्रंथरचना झाली पाहिजे. त्यामुळे समाजाचे निरनिराळे घटक जवळ येण्यास निश्चितच मदत होईल.

"महाराष्ट्रात बोलली जाणारी 'प्रकृष्ट प्राकृत' म्हणजे महाराष्ट्री अशी व्याख्या दण्डीने केली आहे व अलीकडे डॉ. ग्रियर्सन व प्रो स्टेन कोनौ यासारख्या आधुनिक भाषाशास्त्रज्ञांनी ती उचलून धरली." यावरून मराठीच्या जनकत्वाचा मान विद्वान संपूर्णपणे संस्कृतकडे द्यायला तयार नाहीत ही गोष्ट स्पष्ट होते. पण तरीही मराठीचा पिंड संस्कृतवर बऱ्याचशा प्रमाणात पोसलेला आहे ही गोष्ट मान्य करावी लागते. वाद आहे तो जनकत्वाचा.

आपल्याला पहायचे आहे ते हे की ग्रंथरचना ही प्राकृतिक भाषेत आजवर होत आलेली आहे की नाही ? त्याचे स्पष्ट उत्तर मिळते की होत आलेली आहे. तेव्हा जी बोली आपले प्राकृतिक विशेष दाखवून ग्रंथरचना करील ती बोली अधिक समृद्ध कशी होईल याचा विचार करण्याची वेळ आलेली आहे.

काव्य निर्मितीस प्रतिभा आणि भावनात्मकता या दोन गोष्टींची नितांत आवश्यकता असते. आणि या दोन गोष्टी कोणत्याही बोलीत काव्य करणाऱ्या कवीत प्रामुख्याने असल्या की काव्यनिर्मिती जोमदार होण्यास अडचण पडत नाही 'सृष्टिकर्त्याची परिपूर्ण कलाकृति असे ज्याचे वर्णन करतात तो मानव, त्याच्या भावना त्याच्या कृति हा काव्याचा सर्व प्रधान विषय होय." मला वाटते आज प्राकृतिक बोलीत काव्यनिर्मिति करणारे कवी या प्रधान विषयालाच जास्त प्राधान्य देत आहेत. अमरशेखांच्या काव्यसंग्रहात मानवतावाद, भावनोत्कटता आणि मानवाच्या विविध कृतींचा घेतला गेलेला अचूक वेध अगदी ठळकपणे दिसून येतो. म्हणजे या कवीने काव्याच्या सर्वप्रधान विषयाचे महत्त्व निश्चितच जाणलेले आहे. यापूर्वी आपण त्यांच्या भावनोत्कटतेचे आणि प्रतिभेचे वेगळेपण मागील प्रकरणात पाहिलेलेच आहे. "जगातले सर्वोत्कृष्ट काव्य किंवा निर्मिति ही अश्लील, बीभत्स, घृणोत्पादक, अनिष्ट अशी कधीच असू शकत नाही. सौंदर्याच्या आकारामध्ये आविष्कृत झालेल्या कालाचा हा एक विशेषच आहे. उत्तम काव्य हे कधीच विषारी नसते." मला वाटते ही कसोटी अमरशेखांच्या कवितेला लावली तर त्यांची कविता सर्वतोपरी श्रेष्ठ ठरेल इतक्या उच्च दर्जाची आहे. याबाबत कुणाचेच दुमत असल्याचे कारण नाही. म्हणून काव्याकडे काव्य या दृष्टीनेच पाहिले गेले पाहिजे. त्या काव्याने प्रमाणभाषेच्या विकासाला अडथळा न येता उलट तिच्या सामर्थ्यात जर भर पडत असेल तर विविध बोलीतील काव्याला वाव कसा देता येईल याचा विचार अपरिहार्य ठरतो.

अमरशेखांच्या कवितेतील बोली ही बाळबोध स्वरूपाची आहे. संस्कृतशी तिचे निकटचे साम्य आहे. तिच्यात तिचा असा वैशिष्ट्यसंपन्न 'प्राकृतिक' विशेष आहे. फक्त वेगळेपण कशात असेल तर ते आविष्कारात आणि हेच आविष्कारातील वेगळेपण उच्चारानुसारी आहे म्हणूनच ती बोली अधिक समृद्ध होऊन मध्यवर्ती मराठी भाषा जोमदार बनवील असा विश्वास वाटतो.

प्रकरण १२

# काव्य आणि तालबद्धता . . .

" काव्याच्या बाबतीत मी एकच सिद्धांत मानतो. काव्य आणि ही एक वेगळीच भाषा आहे एक विशिष्ट तऱ्हेने योजिलेली प्रचलित भाषा म्हणजे काव्य असे जे सामान्यतः समजले जाते. ते बरोबर नाही. मानवाच्या अभिव्यक्तीचे उच्च स्वरूप म्हणजेच काव्याची भाषा, ती नेहमीच उदात्त असते. " [१]

अमरशेखांच्या कवितेत विशिष्ट तऱ्हेने योजिलेली प्रचलित भाषा फारच थोड्या प्रमाणात पाहायला सापडते. त्यानी छंदांचे काटेकोर बंधन पाळलेले दिसत नाही. कधी त्यांच्या गीतात मुक्तछंद डोकावतो, कधी पादाकुलक सारखी जाती हाताळली जाते. कधी मात्रावृत्तात रचनेला सुरुवात होते. आणि मग तिचे बंधन हळूहळू ढिले पडलेले दिसते. त्यामुळे अमरशेखांची कविता ही विशिष्ट वृत्तात विशिष्ट जातीत लिहिली गेलेली आहे. असे ठासून म्हणताच येत नाही. त्यांच्या कवितेचा आत्मा भावनोत्कटता जरी असला तरी प्रचलीत मात्रावृत्ताची फारच थोडी बंधने त्यानी पाळलेली दिसतात. मग त्यांच्या कवितेची रचना तरी कोणत्या प्रकारची आहे ? ती पूर्णपणे नियमक आहे का ? की पूर्ण 'मुक्त' आहे ? त्याचे उत्तर निर्णयात्मक निश्चितच देता येणार नाही. मात्र एक गोष्ट खरी की अमरशेखांच्या कवितेत एक प्रकारची सुसंगत अशी तालबद्धता आहे. आणि हे पथ्य सातत्याने पाळले जात असल्यानेच नियमकता हवी किंवा जाती, वृत्ताचे बंधन हवे अशी काळजी घेतलेली दिसत नाही. ढोबळ मानाने मात्र असे म्हणता येईल की बाह्य रचनेकडे दुर्लक्ष करून त्यांची कविता अधिकाधिक 'मुक्त' होण्याचा प्रयत्न करते. अमरशेखांची शैली ही सर्वार्थानेच 'मुक्त' आहेसे वाटते. याचे कारण त्यांच्या अभिव्यक्तीच्या स्वरूपात सामावलेले आहे. मंथन, वेडी आई, भारतरत्न कर्वे यासी, लोकलमध्ये, प्रयोग, मुंग्या आणि साप, मानव जाइल यशाप्रति, चरित्र माझे, अशा सारख्या अनेक कवितांची रचना जाति वृत्तात, मात्रावृत्तात केल्याचे बाह्यदर्शनी वाटते. पण नियमांच्या काटेकोरपणाने या कवितांचे वाचन केले की संपूर्णतः निराशाच पदरी पडते. बाह्यतः दिसणारा मात्रावृत्ताचा,

---

१ जां कॉक्तो.

जातिवृत्ताचा घाट आपली फसगत करतो आणि या कवीचा शास्त्रीय अभ्यास तोकडा आहे याची खात्री होते. पण वस्तुस्थिति अगदी वेगळीच आहे. प्रचलित पद्धतिपेक्षा अभिव्यक्तीचे स्वरूप एकदमच वेगळे असल्यामुळे कविता वाचताना इतर कवींच्या तुलनेने फरक वाटतो. अमरशेखांच्या कवितेतील अभिव्यक्तीत तालाला अधिक महत्त्व दिलेले असल्याने मात्राबंधने वा वृत्तबंधने आपोआपच शिथील होतात. ही अभिव्यक्ति परंपरेत रुळणारी नसल्याने तिचा वेगळेपणा तपासूनच पहावा लागतो.

अमरशेखांची कविता कधी गद्यकाव्याचे रुपधारण करते तर कधी मुक्त छंदाला जवळ करते, कधी जातिवृत्ताचा बुरखा पांघरते तर कधी सर्वच बंधने झुगारून देते असे कविता वाचताना पदोपदी मनात येते एवढे मात्र खरे आहे.

अभिव्यक्तीच्यासौष्ठवामुळे कवितेचा रंग काही न्याराच दिसतो. तिची ओघवता चट्कन मनाला आकर्षून घेते पण ही ओघवता एकसंधी म्हणावी तर तशीही नाही. ठराविक संकेतस्थळी कवितेतील ओळी थबकतातही. या सर्वांचा एकच अर्थ आहे तो हा की अमरशेखांच्या कवितेत जो एक प्रकारचा ताल आहे तो धमन्यातील असून गेयतेला अधिक जवळचा आहे. तो शब्दाची लय चटकन पकडतो आणि पकडता पकडता त्यातले संवादित्व टिकवून धरतो. अमरशेखांची कविता गेय बनली आहे त्याचे कारण तिच्यात असलेला लयही लयबद्धता ( Rhythm ) ओघवता निर्माण करण्यास खऱ्या अर्थाने कारण झालेली असते.

सर्वच भावानुभव ललित वाङ्मयाच्या सगळ्याच प्रकारातून सारख्याच परिणामकारकपणे नेहमी व्यक्त होऊ शकतीलच असे नाही. विशिष्ट स्वरुपाचे भावानुभव विशिष्ट प्रकाराद्वारेच व्यक्त होतात आणि ते तसे झाले नाही तर त्यातली खरी गंमत त्यातला चार्म ( Charm ) निघून जातो. अभिव्यक्तीचे स्वरूप हे भावानुभावाप्रमाणे बदलावे लागते. प्रत्येक वाङ्मय प्रकाराची भाषा ही पूर्णपणे वेगळी आहे. ती एकच प्रकारची असावी असा हट्ट धरणे अयोग्य आणि त्याज्य ठरेल " एक विशिष्ट स्वरुपाचा भावानुभव हा एका विशिष्ट स्वरुपातच अभिव्यक्त होण्याचा प्रयत्न करणार. त्याचे स्वरुप असे असेल की त्याची अभिव्यक्ती ही एका विशिष्ट प्रकारच्या ललित वाङ्मय प्रकारातून जर झाली तरच तिला कलात्मकतेच्या दृष्टीने पूर्णता येऊ शकेल. हे विवेचन जर बरोबर असेल तर मग असे म्हणायला हरकत नाही की काही विशिष्ट स्वरुपाचे भावानुभव हे काव्याच्या द्वारे व्यक्त होणेच कलादृष्ट्या उचित असते. किंवा याच्याही पुढे जाऊन असे म्हणता येईल की काही विशिष्ट स्वरुपाचे भावानुभवच तेवढे काव्याच्या द्वारा व्यक्त होण्याला उचित असतात. निदान काही भावानुभव तरी असे असतात की ज्यांची अभिव्यक्ती काव्याखेरीज इतर कोणत्याही वाङ्मय प्रकाराचे द्वारा करणे

अशक्य असतें. ते काव्यातूनच व्यक्त होतात व त्यातील संपूर्ण सौंदर्य अभिव्यक्त करण्याचे सामर्थ्य काव्याच्याच ठिकाणी असते "[1]

अमरशेखांच्या कवितेतील अभिव्यक्ति ही निराळेपणाची जाणीव करून देते याचे कारण हेच आहे की विशिष्ट स्वरूपाचे भावानुभवच प्रगट करण्याचा तिला ध्यास लागलेला आहे. शेतकरी, कामगार यांची दुःखे, त्यांचे विशिष्ट भावानुभव ती विशिष्ट तालबद्धततच मांडते. याच तालबद्धतेत मांडल्यास ती परिणामकारक होऊ शकेल, किंवा हीच तालबद्धता भावानुभवाच्या दृष्टीने उचित आहे अशी मुळी कवीचीच खात्री पटलेली आहे. त्यामुळे तिचा नादापेक्षा तालाकडे सहज ओढा असलेला दिसतो. त्यामुळे त्याचे नाते मुक्तछंदाशी अगदीच निकटचे असलेले दिसते. मुक्तछंद हाच प्रकार विशेष करून अभिव्यक्तीस पोषक असावा असे कवीला वाटते. पद्य बंधने शिथील करून मुक्तछंदात तालबद्ध मांडणी करण्यात एक प्रकारचा जिवंतपणा आढळतो. "खऱ्या खुऱ्या जातिवंत काव्याचे लक्षण हेच की त्यात व्यक्त झालेला भावानुभव हा केवळ त्या छंदमयी स्वरूपात अतीव सौंदर्याने व्यक्त होण्यासाठी अवतरलेला असतो.[2]

"काव्यरूपाने प्रगट होणाऱ्या भावानुभावाच्या मूळ स्वरूपातच असे काही तरी असते की ज्यामुळे ते भावानुभव कलादृष्ट्या काव्यरूपाने छंदोमयी वाणीतून प्रगट होणे अपरिहार्य असते. ते ज्या अन्तर्मनात फुलतात, ते मन जर कवीचे असेल, म्हणजे असल्या भावानुभवाना शब्दाच्या द्वारा काव्यरूपाने व्यक्त करण्याची शक्ति असलेल्या प्रतिभावान् लेखकाचे असेल, तर अर्थातच ते भावानुभव विशिष्ट अशा तालबद्ध स्वरूपातच वाङ्मयात अवतरतील."[3]

अमरशेखांची सर्व कविताच तालबद्ध आहे. कापसाची कहाणी ही कविता किती तालबद्ध आहे पाहा—

ठरवले कापसाने
करावे सत्कृत्य
जन्माला येऊन
कांही तरी...
करून मानवाला थोडेसे सुसंस्कृत
सार्थक जन्माचे आपुल्या परी
मानव कसला वस्ताद बेटा
कापसाचे कापड घेऊन अंगावर

८०९५८ लि: का/८५
१९८५ नों. दि: २१।५

---

१ वा. ल. कुलकर्णी

२ वा. ल. कुलकर्णी

३ वाङ्मयातील वादस्थळे

अंतरी नागडा नागडाच राहिला
संस्कार संस्कृति गेली नाल्यांत
पुनः ठरविले कापसानेहि मग
येता अपयश विद्ध होऊन
तंतू तंतूंनी अलगाच रहावे
ठेवावा मानव होता तसाच– . . . . . .

ही कविता गेय आहे आणि तालबद्धही आहे. एका विशिष्ट लयीत तिची रचना झालेली दिसते. अशीच दुसरी एक कविता आहे ती म्हणजे 'मोळीवाली' कवि म्हणतो —

डोईवरती आहे मोळी
मोळीवाली राधा भोळी
ठुमकत चाले घेत हिंदोले
जणुं हंगामी शिवार डोले
मोडित डोळे निळसर काळे
जाई आगीचे विणीतच जाळे
अर्धी उमलली कळी कोवळी
मोळी खाली राधा भोळी
गेली चालुन थकुन गेला चेहरा सुकुन
अंगी निथळती घामाच्या धारा
वाटे धावत जाऊन हाती पंखा घेऊन
तिला घालावा वाळयाचा वारा
खुले मग ती पुनः पाकळी
मोळी खाली राधा भोळी. . . . . .

या गीतातील एखाद्या ओळींत पाच अक्षरे, एखाद्या ओळींत सहा, एखाद्या ओळीत आठ सुद्धा आहेत. तेव्हा अमुकच अक्षराचे ओळींत बंधन आहे असे काही दिसत नाही. त्यामुळे पंचाक्षरी षडाक्षरी, अष्टाक्षरी असा एखादा अनिलांच्या 'मुक्तछंदा' प्रमाणे काही छंद दाखविता येत नाही. तरीही ही छंदोमयी रचना आहे असे जाणवतेच. अलीकडच्या मुक्तछंदात एक प्रकारचा ताल हा असतोच पण कित्येकदा शब्दांचे, अक्षराचे बंधन सहेतुकपणे पाळले जाते व सर्वस्वी 'मुक्त' समजल्या जाणाऱ्या छंदावर नकळत बंधन पडते. अमरशेख मात्र आपल्या धमनीतल्या तालावरच गीताची रचना करताना दिसतात. त्यामुळे त्यांच्या छंदमयी कवितेत तालाचे सुरम्य स्वरुप जाणवते आणि एक प्रकारची गेयताही येते. असे असूनही अमरशेखांच्या अशा छंदोमयी रचनेला मुक्त शैलीच म्हणणे अधिक योग्य ठरावे.

लयबद्ध रचनेचा या कवीला हव्यास नसला तरी कविवर्य बोरकरांच्या कविता प्रमाणे अमरशेखांच्या कवितेतहि लयबद्ध आल्हादकारक रचना आढळते. त्यामुळे ती रचना संगीतानुकूलच जास्त झालेली दिसते. बोरकरांच्या लयबद्ध रचनेचा हा नमुना पहा--

वर्षे सोळा झाली गोळा तुझिया डोळा भावमयी
तयासवे आसवे तुझी ती पाझरली माझ्या हृदयी
झांकियल्या प्रणयाची लाली गालीं तुझ्या सखि झळझळली
दाहे तिचिया धर्म जले या भाळावरूनी ओघळली--[1]

याच लयबद्ध रचनेशी सर्वतोपरी जुळती मिळती रचना अमरशेखांच्या कवितेतहि दाखविता येते.

उदा.

(१) तू ग कशाला बांधला चाळ, कवड्या पैशांचा
तो आहे ग कर्दनकाळ, रस्ता नाशाचा
तुझ्या कमरेला कक्कुच फडक
कधी हेलेनच घेतेस धुडक
वैजयंतीच घेतेस मडक

नखरा मराठ मोळा, त्याचा चोळा मोळा, वरून फिरवून बोळा तुझ्या भंवती ग सुटला ताळ हौशा गौशांचा

(२) जग हे कोडे, मी ही कोडे, कोडे का वेडे?
वेड्यांनी का चालविले हे जगताचे गाडे

(३) कड् कड् कड् लवली वीज अन् स्वप्न भंगले गेले
धडपडले घाबरले धावत बाळा कघटाळियले

(४) बुरखा घेउनि दुनिया राणी उचलि पावलांना
लचकत मुरडत टाकि पावले गात यक्ष गाना
पावलात लय होता, होती लयहि पावलांना
भातशेतिवर डुलती लोंब्या गात शीळ गाना--

(५) घरा घरातुनि होति चालली राजरोस या इथे दिवाळी
मी माझ्या ओसाड शेति अन् निरखित होतो दीन लव्हाळी

---

१ बा. भ. बोरकर

संगीतानुकूल रचना करण्याकडे अमरशेखांच्या कवितेचा जात्याच ओढा आहे. यमक, अनुप्रास रचण्यापेक्षा, त्याचा हव्यास धरण्यापेक्षा आणि भाषा नुसती नटवी करण्यापेक्षा ती अधिक गेय कशी होईल, तालबद्ध रचनेने तिचे सौंदर्य कसे वाढेल ह्याचीच काळजी जास्त घेतलेली दिसते. कवीच्या मनात ज्या दोलायमान अवस्थेत गीतनिर्मिति हो तेत्याचाच आविष्कार लिखित स्वरूपात झालेला दिसतो. ही छंदमयी वाणी अधिकाधिक तालबद्ध होत जाते.

'फ्रीस्टाईल' याला अनुलक्षून अमरशेखांच्या कवितेला 'मुक्तशैली' ही संज्ञा मी वापरतो. मराठी मुक्तछंद आणि मुक्तशैली ही दोन्ही यात सामावली जातात.

'ओवी' संज्ञेची व्याप्ती तशी नक्की आहे–तीन चरणानी बांधलेली, सयमक रचनेची व ब्रहुधा अंत्यचरण लघु असलेली रचना ती 'ओवी'

पण या संज्ञेला पात्र होणारी अमरशेखांची 'ओवी नाही. पहिल्या तिन्ही चरणात सयमक रचना मुळी आढळतच नाही. थोडेफार साम्य आढळते ते अंत्यचरण लघु असतो यातच–तरीही ही ओवीच म्हणावी लागते मात्र या ओवी प्रकाराला मुक्तसदृश ओवी म्हणणेच इष्ट वाटते. उदाहरणाने आपण पाहू या—

ज्ञानदेवाची ओवी—

आता विश्वात्मके देवे येणे वाग्यज्ञे तोषावे
तोषोनि मज द्यावे पसायदान हे
जे खळाची व्यंकटी सांडो तया सत्कर्मी रती वाढो
भूतां परस्परे पडो मैत्र जीवाचे ॥

रामदासाची ओवी—

कष्टेवीण फळ नाही कष्टेवीण राज्य नाही
केल्यावीण होत नाही साध्य काही
आळसे काम नासते हे तो प्रत्ययास येते
कष्टाकडे चुकविते हीन जन
विचारे इहलोक परलोक विचार होतसे सार्थक
विचारे नित्यानित्य विवेक पाहिला पाहिजे.

या ओवीत पाहिल्या तिन्ही चरणात सयमक रचना निश्चितच आहे. पण अंत्यचरणात मात्र अक्षराचे निश्चित असे बंधन नाही. ज्ञानदेवाच्या आणि रामदासांच्या दोघांच्याही ओवीत हे दिसते. उलट अमरशेखाच्या काही ओवीत अंत्यचरणात कधी कधी अक्षराचे बंधन पाळलेले दिसते.

उदा.—

डब्यातला वस्त्र गेला हो चोरीला
अंधार जाहला मोती सारा
हॅंडल आरसा ट्यूब पळवीला
सांगू मी कुणाला मंञ्याला का ?
त्यानेही कापिला खिसा माझा काल
कराची कमाल झाली त्याच्या........

यात अंत्यचरणात चार अक्षरे योजिलेली दिसतात. मात्र पाहिल्या तीन चरणात यमकाचे बंधन पाळलेले दिसत नाही. पहिल्या कडव्यातील अंत्यचर णचतुर्थाक्षरी आहे. दुसरी एक ओवी—

मते लाग्वो कोटी मीच त्याचा धनी
पुढारी मी गुणी जना वाटे
गुणानी संपन्न बुद्धिचा सागर
आदर सत्कार चोहीकडे
माझ्या ना विरुद्ध गेले मत एक
निनादे त्रिलोक डंका माझा

या ओळीत अंत्य चरणात चार अक्षरांचे बंधन काटेकोर पणे पाळलेले दिसते. अमरशेखांच्या ओवीत दुसऱ्या आणि तिसऱ्या चरणात यमकाचे बंधन पाळलेले मात्र निश्चितच दिसून येते.

ही एक आणखी ओवी—

सत्याचे गा ओझे राईचे ही नाही
जिव्हेला ते काही पेलवेना
असत्याचे ओझे पडे छातीवर
शब्द साठे चूर जिव्हेखाली
गारुडीही येई बसे तरु तळी
पुंगी ती आपुली सुरु करी
पोतडीत त्याच्या विषारी भुजंग
डसे अंगांग विषारले

आता या ओळीत एका ठिकाणी अंत्य चरणात चार अक्षरे दिसतात. दुसऱ्या ठिकाणी पाच दिसतात. तर एके ठिकाणी सहा दिसतात. मात्र पहिल्या तीनही चरणात सहा अक्षराचे बंधन पाळलेले आहे. पण ‘डसे अंगांग’ ही अक्षरे मोजली तर पाचच आहेत. दुसरी एक ओवी अशी आहे—

असा हा उंदीर   असा हा धनीक
सांगे एकमेक   साव तो मीच
फुंकर घालून   कुर्तडी पाय
सांगावे काय   उंदीरच बेटे
धोत्या पावतर   जातो खरा पाय
झाले परी काय   कळेचिना......

या ओळींत अंत्य चरण सहा अक्षरांचा व पांच अक्षराचा आहे. तेव्हा अंत्यचरणात अक्षराचे बंधन पाळलेले नाही. सारांश, अमरशेखांच्या ओवीत पाहिल्या तीन चरणात यमकाचे बंधन पाळले जात नसून ते नेमके दुसऱ्या व तिसऱ्या चरणात पाळले जाते. मात्र पहिल्या, दुसऱ्या व तिसऱ्या चरणात सहा अक्षराचे बंधन पाळून अंत्यचरणात ते बंधन ढिले पडताना कधी कधी दिसते. अमर शेखांच्या या ओवीला मुक्त सदृश ओवी म्हणायला काही हरकत नाही. मग सर्वत्रच काटेकोरपणा का पाळला जात नाही ? निश्चित बंधन पाळून घेण्याकडे कवीचा कल का नाही ? कवी स्वतःवर बंधने का घालीत नाही ? त्या सर्वांचे उत्तर एकच की तालबद्ध रचनेमुळे बाकी इतर सर्व गोष्टीकडे दुर्लक्ष होते. पाळता येणे शक्य होतील तेवढी बंधने पाळली जातात. पण त्यात नेमका काटेकोरपणा असत नाही. सर्वस्वी काळजी घेऊन कलाकुसर निर्माण केली जात नाही. जाता जाता झाली तर हवी असते पण आग्रह नाही. कवीच्या लयबद्ध, तालबद्ध रचना करण्याच्या प्रवृत्ती मुळेच बऱ्याच वेळा बंधने ढिली पडताना दिसतात. मात्र ताल कुठेही सुटणार नाही याची काळजी घेतली जाते. गीत गेयानुकूल कसे होईल याकडे दुर्लक्ष होऊंन दिल्याने इतर बंधने शिथील होतात इतकेच.

अमरशेखांचा 'छंद' हा 'मुक्त' तर आहेच पण तो लयबद्ध आणि तालबद्धही आहे. एकीकडे तो मुक्त असावा असे वाटते पण तालाचे बंधन त्याने पाळलेलेही दिसते म्हणून तो 'मुक्तबंध' म्हणावा लागतो.

उदाहरणानेच पाहू या—

एकच दाणा ही कविता तालबद्ध 'मुक्तछंद' आहे.

याच ठिकाणी निर्मिला होता—दाणा मोत्याचा
नाही सोन्याचा—नाही नाही दाणा ज्वारीचा
माझ्या निढळाच्या गाळून घामाचा—एकच थेंब एकच थेंब
ढवळ्या पवळयांच्या दमल्या मुखातुन—पडल्या फेसाचा तोही अगदी एकच थेंब एकच थेंब
नक्षत्र मृगाच्या मुखातून पडल्या—पर्जन्याचा पण एकच थेंब एकच थेंब

दुसरी एक कविता—'पाथरवट'

हाही छंद 'मुक्त असून तालबद्ध आहे—

जुनाट इमला झाला सारा पाडून टाका—देऊन धक्का
आज इमारत जुनाट झाली—जीव अकारण मरतील खाली म्हणुनी आधी या पाडुनि टाका देऊनी धक्का
मारा हाका जमवा लोका लोकशक्तिचा साधुनि मोका पाडून टाका देऊनी धक्का
एक दगड तरि घडु द्या रे या माझ्या हातुन
एक छन्निचा एक घाव तरि—बसु द्या माझा त्या दगडावर
मानवतेचे नवीन मंदीर—येथे बांधा या जागेवर टाळा धोका
जुनाट इमला झाला सारा पाडुन टाका देऊनी धक्का

या साऱ्या छंदांतून एकीकडे मुक्तता दिसते तर दुसरीकडे बद्धता दिसते. मुक्तता आहे ती गण, मात्रा, वृत्त यांची, तर बद्धता आहे ती तालाची.

"कलेच्या सर्वच प्रकारात सुसंगति, प्रमाणबद्धता, समतोलपणा, सुसंवादित्व, सुप्रमाण साम्य विरोध इत्यादींचा आढळ दिसून येतो. कलाकृतीतील या अंगाची जाणीव झाल्यानेच आपणास सौंदर्य दर्शनाचा आनंद होत असतो. कलेच्या वेगवेगळ्या प्रकारात ही सुखकर जाणीव आपणाला वेगवेगळ्या मार्गांनी, वेगवेगळ्या अंगातून होत असते. चित्र पाहत असता त्यातील छाया प्रकाशातून, त्यातील रेषातून चित्र विषयाच्या अंगोपांगातून त्याच्या मांडणीतून आपणास ह्या सुसंगतीचा, प्रमाणबद्धतेचा, समतोलपणाचा प्रत्यय येत असतो. जी गोष्ट चित्राबाबत तीच संगीताबाबत दिसून येते. तेथे ध्वनीतील सुसंवादित्व आपल्याला मोहून टाकीत असते. काव्याभिव्यक्तीला अनुरूप असलेला भावानुभव जेव्हा शब्दरूपाने प्रगट होऊ लागतो, त्यावेळी शब्दांच्या नादातून, अर्थातून निर्माण होणाऱ्या कल्पना चित्रातून ( Images ) व त्या कल्पना चित्रानी निर्मिलेल्या भावातून एक प्रकारचा सुसंवाद प्रत्ययास येतो."[१]

अमरशेखांच्या काव्य रचनेत तालबद्धतेबरोबरच अर्थ व नाद यांचे साहचर्य आढळते. मात्रा बंधनापेक्षा त्यांची कविता अर्थ व नाद याची संगति साधते. कधी कधी गद्यप्राय वाटणाऱ्या त्यांच्या रचनेत संगीताचे सारे गुण सामावलेले आढळतात. विचाराच्या जोरकसपणामुळेच खरे म्हणजे शब्दाला एकप्रकारचा खणखणीत नाद आलेला दिसतो. प्रसंगोचित भाषेचा वापर होत असल्याने नादमय रचना अर्थवाही होते. कवीला काही तरी सांगायचा ध्यास असल्याने ते तो तालावर, सुरावर आणि विशिष्ट गतिवरच सांगत असतो. शब्दांचा ताल आणि तोल सांभाळायची जबाबदारी पार पाडताना कवीला कित्येकदा शब्दाची मोड तोड करावी लागते. पण अर्थ आणि नाद यात तो विसंगति उत्पन्न होऊ देत नाही. ध्वनीतील सुसंवादित्वाला बाध न येईल याचीच चिंता केली जाते.

१ (वा. ल. कुलकर्णी–वाङ्मयातील वादस्थळे)

अर्थ आणि नाद यात संगति निर्माण करावी लागल्याने शब्दांची कधी कधी ओढाताण कशी होते पहा.

१) ओझ्यांनि करांच्या जीव जिकीरिस येतो
दुष्काळ अजगरागत पिच्छा पुरवीतो
अन् काळ्या बाजाराची काळीं छाया
महागाई त्याची बहिण पसरवी माया

२) का सहनशक्तीला सीमा अमुच्या नाही
का यौवनावरी हक्कच आमुचा नाही !
जीवन जगणे हा हक्क गुन्हा ठरला गे
मानवी जीवनाकांक्षा मराय लागे—

शाहीर अमरशेखांच्या कित्येक कविता गद्यात्मक असलेल्या दिसतात. त्याना कोठल्याही वृत्ताचा गंध असलेला दिसून येत नाही. धन्यवाद, ढोंगी नवसंस्कृति, राधे राधे काहूर, मुग्वेस, या कवितांची रचना गद्यात्मक असलेली दिसते. पण हे गद्य उघड गीता प्रमाणेच श्राव्य गद्य आहे. कारण खुद्द गद्याच्याच बांधणीतून विशिष्ट नाद अंकुरित होतात. आणि विशिष्ठ आंदोलनात्मक गति सारखी प्रतीत होते. हे गद्य म्हणताना स्वरही गद्याची मर्यादा ओलांडून विशिष्ट गेयाची लकब धारण करतात. यातील स्वराघातामुळे (कमी अधिक स्वराघात) शब्दाशब्दातील झोके घेण्यामुळे ही रचना नाट्यपूर्ण झालेली असते. ही गीते कथनात्मक असल्यामुळे यांच्यात कुठे थांबून श्वास घ्यायचा, कुठें स्वर चढवायचा, कुठे संथपणे अगदी हळूवार कथन करायचे आणि सर्वच भाग कसा नाट्यपूर्ण करायचा हे जणू काही ठरूनच गेलेले आहे.

विशिष्ट दोलायमान तालबद्ध गेयतेशी संबद्ध अशा शैलीचा पहिला ग्रांथिक आविष्कार उपनिषदात पहायला मिळतो.

सत्यंवद। धर्मंचर। स्वाध्यायान्मा प्रमदः।

आचार्यस्य प्रिय धनमाहृत्य प्रजातन्तु मा व्यवच्छेत्सीः। सत्यान्न प्रमदितव्यम्। धर्मान्न प्रमदितव्यम्। कुशलान्न प्रमदितव्यम्। भूत्यैन प्रमदितव्यम्। मातृदेवोभव। पितृदेवो भव। आचार्य देवो भव। अतिथि देवो भव।...... संविदा देयम हे तैतिरीय उदनिषदातले गद्य किती प्रभावी आणि प्राणभूत तालाने भरलेले आहे! तसेच बृहदारण्यकोपनिषदातले याज्ञवल्क्याचे—

आत्मा वा अरे द्रष्टव्यः श्रोतव्यः मन्तव्यो

निद्रिध्यासितव्यः। ...त्याच प्रमाणे याच उपनिषदातले "असतो मा सद्गमय। तमसो मा ज्योतिर्गमय। मृत्यो मा ऽ मृतं गमय।" हे वचन, पाषाणातून अमर

कलापूर्ण प्रतिमा घडून यावी त्या प्रमाणे प्रायः रुक्ष असलेल्या गद्यमय वाणीची उत्स्फूर्त घडण आहे. गद्यापासून उंचावलेल्या एका अतर्क्य नादमय तालान्वित स्वरात ही वचने विलीन झाली आहेत. वैयक्तिक अनुभूती व सामाजिक अनुभूती यांची एकतानता या स्तरात हमखास जाणवते "[1]

अमरशेखांच्या गद्यमय वाणीत नादमय तालान्वित स्वर कसे आहेत ते पाहा —

> राधे राधे, होय राधिके. प्रीती माझी तुझ्याचवरती
> गे तुजवर ती विशुद्ध अगदी
> आणु नको तू मनात किंतू
> कृष्ण असे मी, आहे परंतु नव्या युगातिल

हे गद्य असूनही गद्याच्या साऱ्या परिचित मर्यादा ओलांडते आणि तरीही मात्र ते पद्यात सामावेल असे वाटत नाही. जणू काही त्यातली अंतरंगातील सूक्ष्म अशी नादमय, तालबद्ध गती पेलायला पद्याचेही बंधन असमर्थ असेच असावे. यातील अनुभूती जितकी उत्कट आहे तितकेच निवेदन सुगम आणि सरळ आहे. ही सरलता, ऋजुता व भावघनता अत्यंत प्रबळ अशा प्राकृतिक शक्तीतून जन्माला आली आहे याची निश्चिती होते.

अमरशेखांची गद्यसदृश गीते श्राव्य बनलेली आहेत. त्यांनी गद्याच्या सर्व सीमा उलटलेल्या दिसतात. यात शैलीचा–निवेदनाचा एक अनलंकृत असा डौल असतो. वेगघनतेने गीत ओसंडलेले दिसते. यात तालबद्ध, लयबद्ध भाषेचा वापर केल्याने नियमक पद्य शीघ्ररचित आणि गेय पूर्ण होते. वाक्यरचना लहान, बाळबोध स्वरूपाची असून त्यात प्रासादिकता असते. गतीचा ताल वाढत असतो. त्यातून एक प्रकारचा नाद ध्वनित होत जातो. चढता उतरता नाद, द्रुत आणि विलंबित तालाचा डौल यांनी अशा गीतांची शैली मोठी मनोरम झालेली आढळते. अशा तऱ्हेची गीते म्हणजे सहज विभूषित, तालान्वित गद्याने भरलेले निरनिराळे घटच. यातील जोर असतो तो वेगघनतेत. ती जसजशी वाढत जाते तसतशी तालबद्धता एक प्रकारचे गोंडस रूप धारण करते. नादान्वित रचनेचा डौल पद्याच्या उणीवा संपूर्ण भरून काढून भावनोत्कटतेला एक प्रकारचे सौंदर्यच प्राप्त करून देतो.

" गद्य किंवा पद्य हे अभिव्यक्तीच्या यशाचे अंग नसून त्यात सामावलेल्या तालतत्वाचा हृदयंगम व सहज अविष्कार हेच कोणत्याही तऱ्हेच्या अभिव्यक्तीच्या यशाचे मूळ रहस्य आहे."[2]

---

१ दुर्गा भागवत– छंद, जुलै, ऑगस्ट, १९५५

२ छंद १९५५

म्हणूनच सुरुवातीस अमरशेखांची अभिव्यक्ती निराळ्या स्वरूपाची असल्याचा उल्लेख केला आहे. त्यांच्या कवितेची भाषा म्हणजे त्यांच्या अभिव्यक्तीचे उदात्त स्वरूपच म्हणावे लागते. काव्याची भाषा, अभिव्यक्ती ही कवीच्या व्यक्तिमत्वा-प्रमाणे भिन्नच राहत असते. म्हणूनच ती प्रचलित अशाच तऱ्हेची असावी असा हट्ट कुणीही धरू नये.

अमरशेखांची गद्यसदृश कविता ही तालाने आणि नादाने ओथंबलेली असून विचारघनता, सहजता आणि ऋजुता यांनी ती बद्ध झालेली असल्याने अलंकृत नसूनही ती भावपूर्ण झालेली दिसून येते. अभिव्यक्तीच्या यशाचे रहस्य तालात असते, नादात असते. तिच्या सौंदर्याची खुलावट या दोन्ही तऱ्हेने व्हावी लागते. अमरशेखांच्या सहज, सोप्या रचनेत ओघवत्ता आढळते ती त्यांच्या विचारप्रकटीकरणाच्या सामर्थ्यामुळे. “ जिथे विचारांत किंवा भावनांत गतिशील सामर्थ्य (dynamic) असते तेथेच तालानुसारी वाणी अगदी सहज स्वरूपात प्रकट होते.”[१] त्याची पुरेपूर जाणीव करून देणारी अमरशेखांची कविता आहे.

●●●

१ छंद, १९५५

... ग्रंथ, ठा... स्थळप्रत
४०९५८ वि: ...९७।८५...
१२६३५ नों: दि: ...२१।१२।८५

## प्रकरण १३

# रसग्रहण

### मन तुझ्याचसाठी तळमळते—

अमरशेखांनी लिहिलेले हे एक सुंदरसे प्रेमगीत आहे. मनात उमटलेल्या विविध विचारतरंगांचे स्वरूप या कवितेत मजेदार दिसते. आर्ततेबरोबर जिव्हाळ्याचा, स्निग्धतेबरोबर आत्मीयतेचा आणि चित्तवृत्ती फुलविणारा आशावाद चांगला प्रत्ययास येतो.

मन तुझ्याचसाठी तळमळते
आगीत मन मोहळ जळते

या दोनच ओळीतून एक अनोखी मानसिक अवस्था समजते. आग आणि मोहळ ही दोन परस्परविरोधी प्रतीके, पण त्यांची गुंफण फारच कलात्मक रीतीने केली आहे. त्याद्वारे प्रीतीचे 'स्वरूप' समजण्यास मदत होते.

रुक्ष अशा जगतात देखील गुलाब, बकुळी दरवळते. डोळ्यांची कवाडे घट्ट लावून घेतली तरी नीज मात्र येत नाही त्याचे कारण रूपकाद्वारे कवीने प्रतीत केले ते असे की-

जळासाठि मृग सतत धाव घे

मनाची दोलायमान अवस्था कशी होत जाते याचे अर्थवाही चित्रण अमरशेखांनी या कवितेत केले आहे. यात भावनेच्या हळुवारपणाला कठोरतेची जोड दिलेली आहे. आणि—

पिसाटापरी शोधित निघुनी
मार्गावर वणवण भटकोनी
येइ न का यश न ये उमगुनी

अशी खंत व्यक्तविलेली दिसते. एका उत्कट भावनेचा या कवितेत चांगलाच प्रत्यय येतो.

होउनिया बेहोष भेटण्या। बघ मन सरिता कोसळते

या ओळीतून भावनेचा आवेग समजून येतो.

प्राप्य गोष्टीसाठी तळमळणाऱ्या मनाची आगतिक अवस्था पाहून आपलेही मन

बेचैन बनते. कारुण्याने ओतप्रोत भरलेली ही कविता असली तरी तिच्यात निराशेच्या सर्व छटा गडद केलेल्या नाहीत.

अमरशेखांनी प्रीतीची विशुद्ध भावना अगदी नीटनेटक्या आणि सुटसुटीत शब्दांनी रंगविली आहे.

गुलाब बकुळी नाहि अंगणी
सहाऱ्यात का येइल कोणी
रुक्ष अशा माझ्या जगतातुनि
चोर पाउले, गुलाब बकुळी । न कळे कोठुनि दरवळते

या ओळींतील प्रासादिकता मन प्रसन्न करते. या कवितेतील अर्थवाही रचनेमुळे दोलायमान मनाचे प्रतिबिंब बहारीचे वाटते. समर्पक शब्दयोजना हा या कवितेचा विशेष गुण आहे. व्यक्तिचित्रणापेक्षा भावचित्रणावर अमरशेखांनी फार मोठा भर दिलेला दिसतो.

टिक् टिक् नाजुक कुठुनि ऐकता
नीज जीव घेउनि पळते

या ओळींतून सूचकता चांगलीच प्रत्ययास येते. विषयाची मांडणी कलात्मक करण्याचा जरी सहेतुक प्रयत्न केलेला नसला तरी 'कुलुपे दोन्ही नयना ठोकुनि' अशी एखादीच कल्पना मन मोहून टाकते. कवितेत कवीचा एक प्रमुख विशेष दिसून येतो तो अभिव्यक्तीचा. लपंडाव...कोसळते' या ओळींतून प्रकट होणारी अभिव्यक्ती अगदी रसरशीत अशीच वाटते. ही अभिव्यक्ती एखाद्या जुन्या नाणावलेल्या कवीची चांगली आठवण करून देते. मनोविश्लेषणात्मक अशी ही एक भावकविता आहे. नाट्यगीतातील सर्व विशेष गुण या कवितेत सामावलेले आहेत.

आशागर्भ प्रवृत्तीने नटलेल्या या कवितेचा आत्मा आहे मुग्ध शृंगार. आणि ह्या शृंगाररसाचा परिपोष अमरशेखांनी भावपूर्ण असाच केला आहे.

शब्दरचना ओघवती, आवेशपूर्ण असली, शृंगाराचा परिपोष जरी चांगल्या रीतीने होत असला तरी यतिभंगाचा दोष मात्र दुर्लक्षिता येत नाही. नाद आणि लय सुंदर रीतीने वावरत असताना दिसून येते. अमरशेखांच्या व्यक्तित्वाचा ठसा या कवितेत प्रामुख्याने उमटलेला पाहायला सापडतो.

## पृथ्वीचे प्रेमगीत—

या कवितेची रचनाच मुळी शाहिरी थाटाची झालेली आहे. शृंगाररसाने ओथंबलेली आणि नाजूक शब्दाने फुलविलेली अशी ही एक कविता आहे.

पृथ्वीचे प्रेमगीत हे एक भावनोत्कट असे नाट्यगीत आहे. या गीतात कवीने विचारापेक्षा भावनेला आणि शब्दांना अर्थापेक्षा स्वरामध्ये गुंफलेले आहे. या

कवितेत आकारापेक्षा अंतराला महत्त्व दिलेले दिसते. या कवितेतील प्रत्येक भावना इतकी ठसठशीत आहे की ती शब्दाकरिता जराही अडून बसत नाही. शब्द कविते-मागून झेप घेतात त्यामुळे भावनेचा गोंधळ जराही दिसत नाही. या कवितेला दुर्बोधतेचा ओझरताही स्पर्श झालेला नाही.

परकायाप्रवेश करून भावनांचे हळुवार चित्रण करून त्या भावना जास्तीत जास्त सजीव अर्थपूर्ण करण्याचे कार्य नाट्यगीताद्वारे कसलेल्या कवीला करावे लागते. भावनांशी त्याचे तादात्म्य पावावे लागते. व्यक्तित्वाचे उघडे दर्शन घडता कामा नये याची काळजी घ्यावी लागते. ती या कवितेत अमरशेखांनी निश्चितच घेतलेली आहे असा आवर्जून उल्लेख करावासा वाटतो. पृथ्वीच्या रूपाने प्रेमिकाचे भावविश्व समृद्ध करून भावनांची उकल अतिशय नाजूक आणि हळुवारपणे केलेली या कवितेत दिसते

पृथ्वीला चंद्राची ओढ लागलेली आहे. आणि दुनियेची सारी मजा लुटायला 'पुनवेची रात समद्यात न्यारी' असल्याचे सुरुवातीसच सांगितले गेले आहे. पृथ्वीची चंद्रावर गाढ प्रीती आहे. ती म्हणते—

चांद पुनवला गगनात नसतो
माझ्या पलंगावर येऊन बसतो
रात सारी खुदुखुदू हसतो
देतो इष्काचा रंग, त्याचा आगळाच ढंग
त्यात होते मी दंग —

आणि दंग झाल्यावर भावनांचा सारा फुलोराच फुलून येतो, हे पृथ्वीच कसे गमतीदारपणे सांगते. ती म्हणते—

माझ्या दर्याला आली हो भरती
धरला लाटांनी पिंगा त्यावरती
बांध फोडाया त्या म्होरं सरती
दुग्ध धारा वरुन, वर्षे ना का अजून ?
वख्त जाई टळून
उभि तहानेले ग बाई भारी
मजा लुटाया दुनियेची न्यारी

मीलनासाठी आतुर झालेल्या स्त्रीच्या भावनांत शृंगाराचा सुंदर मेळ साधून त्या रूपकाच्याद्वारे मोठ्या कलात्मक रीतीने कवीने मांडलेल्या आहेत. भावनोत्कटता किती शिगेला पोहोचली आहे हे अमरशेखांनी चांगलेच दाखवून दिले आहे. देहाचा कण नि कण घुसळून निघाला आहे हे लाटांच्या रूपकाने कवीने मांडले आहे.

नाट्यमय प्रसंगाच्या चित्रणाला अनपेक्षितता, उत्कंठा, जागृती, चमत्कृती यांची आवश्यकता असते. नुसत्या एकसुरी भावनेच्या अविष्काराला यांची जरूरी नसते. तेथे केवळ उत्कटता आणि आत्मनिष्ठा हे गुण असले म्हणजे पुरेसे आहेत. भावगीत आणि नाट्य यांमधील भेद अनेक अंगांनी दाखवावा लागतो. नाट्य हे दृश्य काव्य आहे. नाट्यगीत हे प्रत्यक्ष नाट्य नसले तरी नाट्याचा आत्मा त्यात असावा लागतो. उत्कंठा आणि चमत्कृती यांची तर नाट्यगीतात नितांत आवश्यकता असते. याचा प्रत्यय अमरशेखांच्या 'पृथ्वीचे प्रेमगीत' या गीतात पुरेपूर येतो.

पृथ्वीची उत्कंठा क्षणाक्षणाला कशी वाढत आहे, चंद्राची भेट व्हावी म्हणून तिची कशी तगमग चाललेली आहे हे अमरशेखांनी नाट्यपूर्ण दाखविले आहे. भावनांचा परिपोष अतिशय बहारीचा झालेला आहे. पृथ्वी म्हणते—

रात बाराचा अंमल झाला
चंदाराया कसा न्हाई आला
दूर पिंगळा कुठं किरकिरला

पण असे असले तरी प्रियकराबद्दलचा तिचा आत्मविश्वास लगेच उफाळून येतो आणि ती सांगते -

मरणालावी गाडुन, राया येई चढून
नाहि राह्यचा अडून

चंद्राचा खट्याळपणा तिला चांगलाच परिचयाचा असल्यानेच ती शंका घेतो की

दडली का हो ढगाआड स्वारी ?...

वातावरणनिर्मिती जितकी सुबक असेल तितका मूळ भावनेला उठाव मिळतो. अमरशेखानी वातावरणनिर्मितीच मुळी बहारदार केली आहे. म्हणूनच भावनेचा धागा न धागा सुटा होत गलेला आहे

मीलनाची अधीरता, आतुरता पृथ्वीच्या मनाला जराही स्वस्थ बसू देत नाही. ह्याचे हृदयंगम चित्रण अमरशेखांनी खालील ओळींत मोठे मजेदार केले आहे. पृथ्वी म्हणते—

झाले अधीर या या हो राया
झुरणि लागे बघा माझी काया
आता लपता कशाला हो बाया ?
हात चंदेरी द्या, मला उचलून न्या
सारि जिनगानी घ्या
देह पडला हो घ्या चरणावरी ..."

नाट्यगीतांत केवळ मनोव्यथाच तेवढ्या रंगविता येतात असा काही संकेत नाही; तरुणतरुणींच्या नाजूक भावनांनाही बोलके करता येणे काही अशक्य नसते हे

अमरशेखांनी या कवितेद्वारे दाखवून दिलेले आहे. ' सुख-स्वप्न ' हा देखील नाट्य-गीताचा विषय असून तो यशस्वी रीत्या रंगविता येतो, उत्कंठेबरोबर चमत्कृतीही साधता येते हे अमरशेखांचे ' पृथ्वीचे प्रेमगीत ' वाचले की पटायला लागते.

या कवितेत उत्कट प्रीतीचा चांगलाच प्रत्यय येतो. मात्र प्रेमभावना एकांगीच म्हणावी लागते. चंद्राबरील आपले प्रेम व्यक्त करताना पृथ्वी अगदी कासावीस होते. तिच्या मनात काही शंकेचे ' ढग 'ही येतात. प्रेमाच्या बाबतीत असे होतेही. उत्कट प्रेमच जास्त शंका घेते हे अमरशेखांना निश्चितच माहीत असणार.

चंद्र आणि पृथ्वी यांच्या प्रेमाची ' कहाणी ' दर्शविणाऱ्या या कवितेला अतिशय मनोवेधक अशी पार्श्वभूमी निर्माण केली आहे. वातावरणनिर्मितीमुळे मूळ कवितेतील भावना अधिकाधिक फुलण्यास निश्चितच मदत झालेली आहे हे नाकारता येत नाही.

ग्रामीण शब्दयोजनेचा जाणीवपूर्वक शिडकावा केल्यामुळे मूळच्या वातावरणाची खुमारी विशेषच वाढली आहे. शब्दांवर प्रभुत्व असल्याने शब्दचित्रासाठी कुठेही अडून बसावे लागलेले नाही.

पृथ्वीच्या तोंडूनच तिच्या प्रेमाला अमरशेखांनी सजीवता प्राप्त करून दिलेली आहे. तिच्या अंतरंगाची आणि मुग्ध प्रेमाची चांगली ओळख पटवून देण्यात अमरशेख यशस्वी झाले आहेत. त्यांचे निसर्गातील बारीक, सारीक छटा रंगविण्याचे कसब या कवितेत अगदी पणाला लागले आहे दुग्धधारा, चंदेरी हात, पुनवेची रात, इष्काचा रंग, झुरणी इ. शब्दयोजना समर्पक आणि निर्दोष अशीच झालेली आहे.

शृंगाररसाचा परिपोष करताना अमरशेखांनी उत्कटता चांगलीच प्रत्ययाला आणली आहे. शृंगाररसाचा परिपोष हळूहळू पण अतिशय बहारदारपणे केलेला आहे. वातावरणनिर्मितीमुळे उत्कट प्रीतीची रसिकांस चांगली ओळख होते.

संयमित रचना, भावानुकूल शब्दयोजना संगीतानुकूल शब्दसंगती आणि कलात्मक रसपूर्ण आशय यांनी ही कविता ओतप्रोत भरलेली आहे. त्यामुळे ती जिवंत आणि सार्थ असल्याची तेव्हाच खात्री होते.

## तांबडं फुटलं—

ही एक रूपकात्मक कविता आहे. सूर्योदयाची वेळ झाली आहे. गाडी जुंपायचीही वेळ झाली आहे. कालचा अंधार संपला, अशुभ वेळा संपल्या. जीवन प्रकाशमय बनत आहे; अशाच वेळी गाडी जुंपायचे आवाहन केले जाते. ग्रामीण जीवनाच्या पार्श्वभूमीवर ह्या कवितेचा सारा डोलारा उभा आहे. सैतानी सत्तेची काटंकुटं नष्ट होन आल्यामुळेच गाडी जुंपायला योग्य समय प्राप्त झालेला आहे. गुलामगिरीच्या कर्दमात रुतलेल्या खेड्यांतील भोळ्या–भाबड्या जीवाला दिलासा देणारी अशी ही कविता अस्सल ग्रामीण थाटातच रचली गेली आहे.

आता लावु आग अशा कुपाटीला
बसू थोडा एळ शेकोटीला

अशी आपल्या सजणीला जाणीव देऊन नायक लगेच इशारा मात्र देतो की
अशी लई झोप नाही बरं चागली.

भोवतालचा सारा समाज जागा झाला आहे. जे जे कुणी आळशी त्यांना मागे टाकून बाकी कुणबी पुढे गेले आहेत. नाचक्की व्हायची वेळ आली आहे. म्हणूनच तर आता गाडी जुंपायला हवी असे नायक पुन्हा पुन्हा तिला-सजणीला-बजावून सांगतो.

गाडी जुंपून क्रांतिगीते गायची असा संदेश देऊन नायक मोठ्या आवेशाने, सात्त्विक संतापाने म्हणतो—

दुस्मान तुडवु ग टाचेखाली.

दिलेला संदेश, केलेले आवाहन आणि घातलेली साद यांची परिणती फार गोड स्वरूपात झालेली आहे. पहिल्या वातावरणात तर अमूलाग्र बदल झालेला दिसतो. अमरशेख म्हणतात—

फडफडला झेंडा अन् वारा गोड गार
खवला पदर माझी रानी तयार

अशी एकाएकी चमत्कृतिपूर्ण घटना घडते. आणि आघाडीला जोडी निघते.

या कवितेत सर्वत्र अस्सल ग्रामीण वातावरण चित्रित केले आहे. भाषा, चाली-रीती यांच्या आधारे कवीने आशादायक वातावरणाची निर्मिती केली आहे. 'कुपाटीला आग लावून शेकोटीला' बसण्याची प्रथा ग्रामीण भागाखेरीज इतरत्र कोठून असणार ?

कवितेचा सारा साज मात्र प्रचारकी अशा थाटाचाच वाटतो ही गोष्ट काही केल्या लपून राहत नाही. अमरशेखांनी 'तांबडं फुटलं' या शब्दातूनच आशादायक प्रेरणा निर्माण केलेली दिसते. क्रातिगीते गाण्याची जी ऊर्मी येते तिच्यातून 'सज्जता' अमरशेखांना सूचित करायची आहे. या कवितेचा आत्मा आहे विचार. विचार-प्राधान्यतेमुळे इतर कलाकुसर करण्याकडे संपूर्ण दुर्लक्ष झालेले आहे. दुस्मान जागजागी मार्ग रोखून बसलेला आहे, पण म्हणून काही मार्ग सोडता येत नाही, धैर्यहीन होता येणार नाही, याची पुरती जाणीव असल्यामुळेच दुष्मान टाचेखाली तुडविण्याची कल्पना आवर्जून मांडली जाते.

आवेशयुक्त रचना, घोटीव शब्दयोजना, गेयता आणि उचित वातावरणनिर्मिती यांनी ह्या कवितेच्या सौंदर्यात निश्चितच भर घातली आहे.

वीररसाचा प्रादुर्भाव करणारी अशी ही एक ओजस्वी कविता असून अमरशेखांच्या व्यक्तिमत्वाचे तिच्यातून दर्शन घडण्यास निःसंशय मदत होते. त्यानी आपल्या

स्वतःचा दृष्टिकोन एका रूपकाच्या साहाय्याने मांडलेला आहे. प्राप्तस्थिती आणि तिच्यात बदल घडवायचा असेल तर क्रांतीच हवी हे अमरशेखांनी निर्भीडपणे मांडले आहे.

समाजाच्या सामूहिक शक्तीला आवाहन देऊन, त्याच्या पुरुषार्थाला जागे करून ध्येयसिद्धीचा मार्ग अमरशेखांनी 'गाडी जुंपायची एळ झाली' या अस्सल मराठमोळ्या शब्दातून सूचित केला आहे. वीररसाला पोषक अशी वातावरणनिर्मिती करून अमरशेखांनी क्रांतिप्रवण समाजाला नवा आदर्श घालून दिलेला आहे.

अस्सल ग्रामीण शब्दांच्या समर्पक शब्दयोजनेमुळे कवितेची रंगत वाढली आहे. कल्पनेची ओढाताण न होऊ देता मोठा आशय मोजक्या शब्दात मांडून अमरशेखांनी आपले शब्दप्रभुत्व सिद्ध केले आहे.

## मालन कामानं सुकली—

कामगारजीवनाचे वास्तवदर्शी असे चित्रण अमरशेखांनी या कवितेत केले आहे. यंत्रयुगात माणूस सर्वच प्रकारे कसा भरडला जातो, त्याचे यान्त्रिकीकरण कसे होते, त्याच्यातला माणूस कसा 'यान्त्रिक' बनतो आणि त्यामुळे समाजात वर्गकलह कसा माजतो याची स्पष्ट जाणीव देणारी अशी ही कविता आहे.

पोटाची खळगी भरण्यासाठी प्रत्येकाला आपल्या कुटुंबाचा डळमळता डोलारा सावरण्यासाठी हाडाची काडे करावी लागत आहेत. स्त्री-पुरुष असा यांत्रिकतेने मुळी भेदच ठेवला नाही. पण या यंत्राने श्रमजीवी जनतेच्या श्रमावर पोसला जाणारा एक सुखासीन वर्ग निर्माण केला आहे. स्वतःसाठी, कुटुंबासाठी कोणालाही राबण्याचे अपमानास्पद वाटत नाही, वाटणार नाही; पण ज्या ठिकाणी राबावे लागते आहे तिथलेच जीवन मात्र दिवसेंदिवस असह्य आणि भेसूर बनत आहे. त्यामुळे रात्रंदिवस राबणारा कामगार, निर्मितीसाठी आपल्या रक्ताचे वंगण घालणारा कामगार मात्र चांगलाच पिचून निघतो आहे; तो अगतिक बनला आहे. दुसरीकडे भांडवलशाही अधिकाधिक उद्दाम आणि बेफाम बनत आहे.

गिरणीत काम करून थकलेल्या मालनची करुण कहाणी अमरशेखांनी या कवितेत सांगितली आहे. मालनचे तारुण्य, ते देखील लोप पावले आहे हे सांगताना अमरशेखांनी म्हटले आहे—

ज्वानि साच्याच्या सांध्यात टाकली रं
माझी मालन कामानं सुकली

आजच्या श्रमजीवी कामगार वर्गाचे मालन हे एक प्रकारचे प्रातिनिधिक स्वरूपच आहे. तिच्याकडे अत्यंत सहानुभूतीने अमरशेख पाहतात त्यामुळे तिच्या जीवनातील दुःख आणि दैन्य यांचे बारकावे त्यांनी सूक्ष्मतेने रेखाटलेले आहेत. उदाहरणार्थ—

कोंडवाड्यात कोंडून घेऊन । टाकला जीव रहाटानं खाऊन
काम केलं तरी मन लावून । वर्ति नायकीनीची चाले टकली रं

हा अनुभव अर्थातच नित्याचा होऊन बसलेला आहे. कामगारजीवन बरोबर दुःख, अश्रू हे समीकरण आजच्या भांडवलशाहीच्या जगात मुळी ठरून गेल्यासारखे झाले आहे. सारे दुःख, यातना, क्लेश केवळ पैशासाठी सहन करावे लागते; त्याशिवाय टिचभर पोटाची खळगीच भरत नाही त्याला कोण काय करणार? पैशासाठी सत्त्व गमवावे लागत आहे. माणूस लाचार बनून स्वत्वाचे त्यासाठी मोल देत आहे. कामगारजीवनाला मुळी भवितव्यच उरलेले नाही. सारे कसे अशाश्वत बनले आहे. सर्व काही दिसते ते मृगजळ आहे.

कच्ची बच्ची तुला व्हावी चार
सुखी संसार, शाळेत पोर
पोर न्हेयाला कुळाला म्होरं

पण अखेर हे स्वप्नच ठरते. मालनच्या नशिबी हे सुख कोठून असायला? तिचे मनोरथ म्हणजे दवबिंदूंचीच माळ कारण—

समदि आशा ही धनाला विकली रं

हे आहे. आशेचा किरण असा कुठेच नाही. सगळीकडे कसा भेसूर काळाकुट्ट अंधार.

ह्या भेसूर जीवनातील दाहकता चित्रित करूनच काही अमरशेखांचे समाधान होत नाही, तर त्याच्यात बदल, अगदी अमूलाग्र बदल त्यांना व्हायला हवा आहे.

गरिबांच्या जवानीचा बळी
धनि त्या दिसा बाधून मोळी
करतो आठच घंट्यांत होळी

ह्या जीवनातून बदल नको व्हायला? नाहीतर जीवनाला अर्थ तो काय उरला? असे असले तरी उदासीनतेची भाषा मात्र बोलायला अमरशेख तयार नाहीत. त्यांचा प्रखर आशावाद चिडून उठतो आणि ते म्हणतात—

आता पायवाट ह्यातून निघाली रं

कामगारांच्या दुःखद, कष्टप्रद आणि लुटारू जीवनात काही बदल घडवून सुख, समृद्धी आणि शांती यांची निर्मिती करायची असेल तर कांहीतरी कृती करणे अटळ बनलेले आहे. केवळ आशेवर जगून उपयोगाचे नाही. म्हणूनच अमरशेख कामगारांना कृतियुक्त जाणीव देताना म्हणतात—

चल मिळून मैदानि जाऊ ये
झेंडा सुखाचा मैदानि पाहू ये
गाणि मिळुन क्रांतिची गाऊ ये

ही अशी क्रांतीची गीते आळवताच कवीला एकाएकी साक्षात्कार होतो. 'आलि ज्वानी हसत ही आपली ग, ' सुकलेल्या मालनची कळी खुललेली दिसते.

मालनच्या ज्वानीचे वर्णन अस्सल मराठमोळ्या भाषेत अमरशेखांनी खालील-प्रमाणे केले आहे.

फाटं पिकलेलं जांभूळ ताजं
नाचे चौखूर हरिणच माझं
निरल्या सायीचं रं लोणि ताजं

अलंकारिक पद्धतीने केलेले हे वर्णन प्रथम आकर्षक आणि मोहक वाटते, परंतु पुढे तिचे पिचले जाणारे तारुण्य पाहिले की मनाला अगदी चिमटाच बसतो. कारुण्याने मन गदगदते; आणि संताप येतो.

सामाजिक विषमतेचे रौद्र स्वरूप दर्शविणारी ही एक कविता आहे. आठ तास राबणाऱ्यांच्या श्रमाचे चीज होत नाही ही खरी चीड आहे. गरिबांच्याच ज्वानीचा चाललेला बळी अमरशेखांना काही केल्या पाहवत नाही. ते दृश्य त्यांना असह्य होते. आणि मग अमरशेख धनिकशाहीविरुद्ध चिडून उठतात; क्रांतीचा संदेश देतात.

या कवितेत उपमादि अलंकारांचा जरूर तेथे समर्पक असा उपयोग करून अमरशेखांनी मूळच्या आशयाला चांगलाच उठाव प्राप्त करून दिला आहे. दुःखाने व्याकुळ झालेल्या मनाने या कवितेद्वारे आपले दुःख हलके केले आहे.

खेडवळ भाषा समयोचित अशी वापरलेली आहे. फाटं, साय, न्हेल्याल, समदि या शब्दांनी कवितेची लज्जत वाढविण्यास मदत केली आहे.

कामगारवर्गाबद्दल वाटणाऱ्या अथांग सहानुभूतीतून जन्मेलली ही कविता करुण रसाचा यशस्वीरीत्या असा परिपोष करते.

## केशवसुतांप्रती–

मराठी भाषा, मराठी परंपरा आणि मराठी माणूस यांच्या प्रेमाने बहरलेली अशी ही कविता आहे.

अमरशेखांनी केशवसुतांचा गौरव करताना प्रथमच म्हटले आहे–

रे तात कृष्ण केशवा
ज्ञानेशाच्या वंशाचा तू
एक शोभतो दिवा...

हा गौरव केल्यानंतर सामाजिक सत्यावर झगझगीत प्रकाश टाकला गेला आहे. काळ कुठलाही असो. माणसांची प्रवृत्ती मात्र सर्वत्र कायम असते. कलावंतांची,

समाजसेवकांची समाजाकडून कशी अवहेलना होते, उपेक्षा केली जाते हे एक कटु सत्य आहे त्यासंबंधी अमरशेख म्हणतात--

ज्ञानेशाच्या मराठिची अन तुझ्या तुतारीची
झालि उपेक्षा तशी तुझी अन कुणबट तुकयाची

पण असा जरी उलट अनुभव येत गेला तरी या निष्ठावंतांनी आपला निर्धार काही सोडला नाही. त्यांची निष्ठा अखेरपर्यंत अविचल अशीच राहिली. केशवसुतही नेमके याच परंपरेतील. ज्ञानोबा आणि तुकोबा ही तर बोलूनचालून मराठी माणसांची, भोळ्या भाबड्यांची परमदैवतेच. ज्ञानेशांचा आणि तुकोबांचा निर्धार कसा होता हे सांगताना अमरशेख म्हणतात---

जिंकिल माझी माय मराठी पैज अमृताची
विष्णुदास मउ मेण भेदु परि कठीण वज्राशी

आणि याच थोर परंपरेतील केशवसुत. 'देवदानवा अडवायाला' त्यांचाच निर्धार हवा; कारण हा निर्धार ज्ञानेशांच्याच वंशाला शोभतो.

मराठी संतांच्याबद्दल उत्कट भक्तीने लिहिताना अमरशेखांच्या लेखणीला अक्षरशः भरते येते. आणि या वेळी त्यांची रचना ओजस्वी आणि तेजस्वी बनते. मनाचा बांध पार फुटून जातो आणि त्यातून शुद्ध, निर्मळ, सात्त्विक भाव प्रकट होतात. भक्तीने पुरेपुर ओथंबलेल्या त्यांच्या मनाचे प्रतिबिंब ओळीओळीतून दिसते. ज्ञानोबा आणि तुकोबा यांच्या कार्याची महती गाताना ते म्हणतात-

बंडाचा या झेंडा ज्ञानेशाने रोवियला
अभंगवाणी तुकयाने तो तेजे फडकविला

आणि हीच बंडाची परंपरा तितक्याच तेजस्वीपणाने पुढे नेणाऱ्या केशवसुतांबद्दल अमरशेख म्हणतात---

प्रसंग येता त्या झेंड्याचे रक्षण करण्याला
प्राणपणाने तुतारिगाने हल्वी तू भूला
तू नव मनुचा, नव्या दमाचा शूर शिपाई नवा...

१८५७ च्या स्वातंत्र्यसमराची अमरशेखांना केशवसुतांच्या लेखणीच्या संदर्भात नेमकी आठवण येते. दुसरी त्यांना उपमाच देता येत नाही. उद्दाम कल्पना अमरशेखानीच रंगवाव्या. कल्पनेची उत्तुंग झेप कशी असावी असा प्रश्न केल्यास गडकऱ्यांनंतर अमरशेखांकडेच बोट दाखवावे लागेल. इतर कोणालाही इतकी मर्मभेदी उपमा सुचली नसती. त्या स्वातंत्र्यसमरात विजेसारख्या तळपणाऱ्या लक्ष्मीची अमरशेखांना आठवण येऊन ते म्हणतात—

४०९५८ १८५ ७०१०५ २.९।१२ १६८५

दशक बावरे बीज सुप्तजन-मन-मंदिरात
तीच बीज साकार लेखणी तुझी करी लवलवा

पारतंत्र्याच्या काळात मलूल झालेल्या मनाला उफाळून उठविण्याची ताकद ज्या लक्ष्मीबाईच्या शौर्यात होती तीच ताकद, ईर्षा, तोच बाणा केशवसुतांच्या लेखणीत असल्याबद्दल अमरशेखांची पुरेपूर खात्री पटलेली असल्यामुळेच त्यांनी अशी उपमा दिली आहे. इतकी सार्थ आणि समर्पक शब्दांत केशवसुतांच्या लेखणीबद्दल प्रत्यक्ष त्यांच्या टीकाकारानीही थोरवी गायिली नसेल.

केशवसुतांच्या तत्त्वज्ञानाची रुपरेषा मांडून त्यांच्या कवितेत श्रेष्ठतम पुरुषांच्या, उच्चारांचा व विचारांचा कसा मजेशीर समन्वय साधलेला आहे हे अमरशेखांनी उदाहरणानेच पटविले आहे. ते म्हणतात—

आगरकरांच्या मनिच्या उठल्या आशामय लहरी
ज्योतीबाची मानवता ती प्रेमरुप मारी
टिळकांच केसरी गर्जला मराठिच्या उदरी
आशा प्रेम नि शौर्याच्या तू उधळुनि सरिवर सरी
टिळक, आगरकर, ज्योतीबांचा दिला साधुनी दुवा... "

केशवसुतांच्याबद्दल वाटणाऱ्या उत्कट प्रेमाने सारी कविता नाहून निघाली आहे. प्रेमाची जागा भक्तीने घेतलेली पुढे पुढे दिसते. अमरशेखांची ही कविता म्हणजे एक सुंदरसे शब्दशिल्पच आहे. शिल्प म्हटले की त्यांत घोटीवतेचा अभावच असायचा. अमरशेखांची शब्दरचना या कवितेत तरी तशीच आहे. मात्र त्यांच्या रचनेतील ओबडधोबडपणातही सूक्ष्म दृष्टीने पाहिल्यास सौंदर्यच आढळते. भावनेचा जोरकसपणा आणि आवेश यामुळे आंतरिक विचाराचाच पगडा मनावर मोठा पडतो. केशवसुतांचा गुणगौरव करताना अमरशेखांची भावसरिता ओसंडून वाहताना दिसते.

इतिहासाचा मागोवा घेऊन त्याच्या गडद पार्श्वभूमीवर केशवसुतांसारख्या एका युगप्रवर्तकाचे उत्कृष्ट चित्र रेखाटून अमरशेखांनी त्यांच्या कलाकृतीचे मोल कोणत्या प्रकारचे होते हे दाखवून दिले आहे.

मराठी भाषा, इतिहास मराठी आदर्श यांचा मागोवा घेत घेतच अमरशेखांनी केशवसुतांच्या कार्याचा मुक्तकंठाने गौरव केला आहे. तो गौरव करताना कुणाचाही उपमर्द होणार नाही याची त्यांनी दक्षता घेतली आहे. मराठी बाणा कसा सातत्याने पुढे जातो, मराठी मन कसे झेपावत जाते, याचा आलेखच जणू काही अमरशेखांनी रेखाटलेला आहे.

अलंकारिक रचना, वंशाचा दिवा, बंडाचा झेंडा, अभंगवाणी, लवलवा या सर्वांनीच कवितेच्या सौंदर्यात निस्संशय भर घातली आहे.

## ब्रह्मा–विष्णू–महेश—

या कवितेत अमरशेखांचे कल्पनाचातुर्य चांगलेच प्रत्ययास येते. ब्रह्मा, विष्णू, महेश ही तिन्ही रूपके आहेत. या रूपकांद्वारे खरा परमेश्वर या पृथ्वीवर नेमका कुठे आहे हे अमरशेखांनी मोठे कलात्मक आणि नाट्यपूर्ण रीतीने दाखविले आहे.

कृष्णाचे रूप अमरशेखांना शेतकऱ्यांत दिसते. 'शेतकरी भोळे कृष्ण माझे' अशी शेतकऱ्यांची थोरवी त्यांनी गायिली आहे. ह्या शेतकऱ्यांत साऱ्या दैवतांची रूपे अमरशेखांनी खालीलप्रमाणे दाखविली आहेत.

काळ्या आईचा सखा पुत्र तूच खरा घनश्याम
ब्रह्मा होउनि तूंच निर्मिले, निर्मियले जग सारे
दरी डोंगरी फोडुनि सगळे विश्व सजविले न्यारे
गाळुनिया तू घाम......राजा कुणबी

शेतकऱ्यांत ब्रह्मा, विष्णू महेश ही तिन्ही रूपे कशी एकवटली आहेत हे अतिशय समर्पक रीत्या दाखविले गेले आहे.

शेतकरी हाच पृथ्वीवरील खरा परमेश्वर. तोच घाम गाळून देवत्वाचे दर्शन घडवितो. श्रमणाऱ्या खपणाऱ्या, कष्टकऱ्यांच्यातच अमरशेख देवत्व आणि दिव्यत्व पाहतात.

विष्णू होऊन तू सारे जग पोसले आहेस, कुठेही ओसाड माळ तू राहू देत नाहीस, धान्याची कोठारेही तूच उभी करतोस (मात्र नामानिराळा होतोस.) खरा राजा कुणबीच आहे. तोच खरा जगत्पाल आहे; अन्नदाता आहे.

शेतकऱ्यांत महादेवाचे–महेशाचे स्वरूप कोठे आढळते याचे मार्मिक वर्णन अमरशेख—

महादेव तूच पार्वतीशंकर रूप कधी तव महाभयंकर
त्रिभुवन जाळुनि भस्म लावुनी पुनः तू भोळा सांब

अशी ओळख करून देतात.

...पण याच परमेश्वराची आजची स्थिति ? ...त्याला आज भांडवलशाहीच्या जगात टीचभर निवारा नाही; हा जगन्नियंता असून याला स्वतःला खायला मात्र कुटकाही नाही. हा विष्णू आज उपाशीच उभा असतो. आणि ही त्याची आगतिक अवस्था पाहून अमरशेखांना अगदी भडभडून येते. ते आतडे पिळवटून त्याला सांगतात–

नाही तुझ्या हाती मृत्यु राहिला रे भोळ्या सांबा
घालु लागले नीच दैत्य या जगामध्ये थैमान

आणि म्हणूनच–

उठ रे राजा कुणबि हरे राम

शेतकऱ्यांचा ज्याच्यासाठी घाम गाळला जातो, ज्यांच्यासाठी सर्वस्वाचा होम केला जातो, ज्यांच्याकरिता धान्याची कोठारे तो उभी करून ठेवतो, त्यांतलीच काही ‘ श्वापदे ’ मात्र त्याला ‘ कुटका ’ही खाऊ देत नाहीत. त्याचे उलट शोषणच करतात. अमरशेखांना हे सारे असह्य होते. आणि मग ते त्याला आपले ‘ स्वरूप ’ दाखविण्याचे आवाहन करतात. त्या परमेश्वराची आराधना करताना अमरशेख म्हणतात–

घे हाती या साऱ्या जमिनी घे ब्रह्मा अवतार
पहिले खा तू विष्णू होऊन जगुन जगाला तार
उघड नेत्र तो तिसरा भयकर लाले लाल अंगार
ऐतखाऊंचे कर निर्दाळुन घेइ रुद्र अवतार
ऊठ सर्वव्यापि भगवान......

देवांची आयुधे जी गदा, चक्र, त्रिशूळ ही आजच्या जगात कुचकामी ठरलेली आहेत. बदलत्या काळात बदलते हत्यार असते. आता देवांची हत्यारे पार जुनी झाल्याचे अमरशेख सांगतात. डमरूचा आवाज आता येत नाही. काळ पूर्ण बदलला आहे. अमरशेखांचे क्रांतिप्रवण मन जागे होऊन शेतकऱ्याला संदेश देते––

पद्म पोथिची गळली पाने नको सर्प निष्प्राण
घेई आता एकजुटीची मशाल, उचल निशाण

मराठी मातीच्या–काळ्या आईच्या–सख्या पुत्रावर ओढवलेल्या संकटावर मात करायला अमरशेख वरीलप्रमाणे सांगतात. क्रांतिदर्शी विचार मांडताना अमरशेखांच्या वाणीला एक वेगळीच धार कशी चढते हे वरील ओळी वाचताक्षणीच ध्यानात येते.

माधुर्यापेक्षा ओजाकडे कवीचा कल अधिक दिसतो. रचनेत कलाकुसर करण्यापेक्षा ती खडबडीत झाली तरी चालते, पण ओज मात्र कमी होता कामा नये याची काळजी घेतलेली. मूळच्या वाणीतच तो ओज आहे. त्यामुळे कृत्रिम काही वाटत नाही. कुणब्यांच्या थोरवीची महती पटविणाऱ्या या कवितेत रौद्ररसाचा चांगला परिपोष केलेला आहे.

## ढोंगी–

ढोंगी कवितेत कवीने मानसिक व्यंगावर अचूक बोट ठेवलेले आहे. माणूस असेपर्यंत त्याच्याशी कठोरतेने, निर्दतेने वागणारे जग त्याच्या मृत्यूनंतर मात्र हळहळते. वास्तविक हे जीवनतले फार मोठे ढोंग आहे. जगात सत्यापेक्षा ढोंगाचाच बडीवार जास्त हे कवीने चांगले ओळखलेले आहे. माणसाची धाव अनंताकडून अनंताकडे असते. तो जेव्हा व्यवहारी जगात वावरतो त्या वेळी त्याची प्रतारणाच जास्त केली जाते. अगदी सहेतुकपणे केली जाते. याची जाणीव कवीने या कवितेत मोठ्या मार्मिकपणे दाखवून दिलेली आहे.

माणूस आपल्या जीवनात असहायपणे जगत असतो. त्याची धाव आपल्यापासून अनंताकडे असते. आणि असाच एक दिवस कुणीतरी या जगातून कायमचा निघून जातो. त्याच्या जड देहाला घेऊन खांद्यावरून ढकलत ढकलत कसे तरी सरणापर्यंत नेले जाते. परंतु त्याला सरणावर नेल्यानंतर मात्र मग एकाएकी जाणीव होते. अमरशेख म्हणतात

पाहिल बेटा सरणावरुनी  
उठून बसुनी  
हाती निखारे जळते घेउनि  
जळता जळता डोके रोखुनि  
फेकिल मजवर,

आणि खरोखर तो अनंतातून झेप घेऊन चितेवर लाल अग्नीची जीभ काढून साकार होतो, आणि नंतर दात खाऊन व्यवहारी जगातल्या लोकांना पुटपुटतो–

अहंकारी अन् नाटकवाले

सामाजिक जीवन जगताना ज्याची प्रतारणा सहेतूकपणे केली जाते तो सरणावर ठेवताच चिडून उठून ढोंगी लोकाना 'नाटकवाले' म्हणूत खडसावून सांगतो. त्याला पूर्ण माहीत असते की अश्रू गाळण्याचे, कोरडी सहानभूती दाखविण्याचे या लोकांनी सगळे नाटक केलेले असते. आत्मीयतेने, श्रद्धेने त्यांच्याकडून कांहीही घडवलेले नसते. या ढोंगी जगातून नाहीसा होतानाही त्याचा राग उफाळून येतो. स्वतःच्याच हाताने पिस्तूल रोखून आपली कवटी फोडून घेतो. सरणापर्यंत पोहोचविण्याचे देखील एक नाटकच केलेले असते. जग ही रंगभूमी आहे; या रंगभूमीवर माणसे फक्त नाटकतील 'पात्रा' सारखीच वावरतात. पण या व्यवहारी जगात वावरताना सत्याची साधी चाडही त्यांना असत नाही. दुसऱ्याला नष्ट करण्यात, जीवनातून कायमची हकालपट्टी करण्यात, याच ढोंगी लोकांनी खरा पुढाकार घेतलेला असतो. मात्र तो माणूस सरणावर चढला की आपल्या

ढोंगाचा बुडबुडा फुटणार नाही असे ढोंगी लोकांना वाटते. ते त्याची शेवटपर्यंत 'साथ' करण्याचा प्रयत्न करतात; पण तेही एक मोठे ढोंगच असते. हे कवीने या कवितेत मर्मावर अचूक बोट ठेवून दाखविले आहे. त्या पिस्तुलाचा आवाज होताच आम्ही (ढोंगी) धूम ठोकतो. फट्दिशी आवाज एकून पलायन केले जाते. देहाने दूर जातात ? पण... त्याचे ते शब्द आमचा (ढोंगी) कायमचा पाठलाग करतात. या नाटकातून मी सुटलो असे शब्द पिच्छा पुरवतात पण त्यामागून येणाऱ्या विकट हास्यातून जे शब्द येतात ते फारच भयंकर असतात. त्यामुळेच या व्यवहारी जगातल्या ढोंगी माणसांचा बुरखा टरटर फाटला जातो.

व्यवहारी जगातील मानवी प्रवृत्तीतील विसंगतीचे दर्शन या गद्यकाव्यातून कवीने मार्मिकपणे दाखवून दिले आहे. ओळीओळीतून कवीने आपला सात्त्विक संताप व्यक्त केलेला दिसून येतो. या जगात सत्याचे पाठीराखे हेच खरे ढोंगी असतात, किंबहुना त्यांचे सत्यदर्शन हेच मुळी मोठे ढोंग असते, हेच कवीने दाखविलेले आहे. अनंतातून अनंताकडे निघालेल्या माणसाला या ढोंगीपणाच्या बुरख्याआड वेळोवेळी लपून सत्याची पायमल्ली करावी लागते; तशी ती केली जाते हेच या कवितेतून कवीने सूचित करून ढोंगी लोकांचा एक इरसाल नमुना दिलेला आहे. अर्थवाही शब्दरचनेमुळे व सुबोधतेमुळे कवितेतला आशय चटकन् समजण्यास मदत होते.

## गांधीजींचे बलिदान—

गांधीजींचे बलिदान ही एक भारतात अतिशय दुःखद अशी घटना. ही घटना अनुचित घडली असा त्या वेळी सर्वांनीच अभिप्राय व्यक्त केला. ही घटना म्हणजे एक प्रकारचा साऱ्या राष्ट्रावरचा प्रहारच होता. उभ्या भारताचे हृदय गदगदून टाकणारी ही हृदयद्रावक घटना पाहून अमरशेखांचे कविहृदय स्वस्थ थोडेच बसणार? अमरशेखांसारख्या चिंतनशील वृत्तीच्या कवीला संताप अनावर झाला. त्यांनी आपल्या अंतर्यामातील संताप शब्दरूप केला. गांधीजींचे बलिदान होताच अमरशेखांनी साऱ्या राष्ट्राला सावधानतेचा इशारा दिला की

लोकशत्रु साधण्या बैसले अजूनही मोका

गांधीजींबद्दल सर्वांनाच आदर. अमरशेख आपला आदर खालील ओळीतून व्यक्त करतात—

किल्ली दाखविली ज्याने साम्राज्याशी लढण्याची
प्रतिकाराने अन्यायाचे बांध फोडण्याची
जातियता भस्मसात् करि जो सदा नभी तळपून...

गांधीजींनी भारतीय राजकारणात सत्याग्रह आणि असहकार ही दोन शस्त्रे

निर्माण केली. त्यामुळे भारतीय जनतेला स्वातंत्र्यप्राप्तीचा अगदी जवळचा मार्ग सापडला. नेतृत्वहीन राष्ट्राला एक प्रकारचा दिलासा प्राप्त झाला. तो ज्यांनी प्राप्त करून दिला त्या गांधींवर क्रूर हल्ला झाला खरा, पण तो हल्ला केवळ त्या व्यक्तीवर नव्हता. अमरशेख म्हणतात—

गांधीजींवर वार नाहि हा जनतेवर हल्ला

या हल्ल्यापाठीमागील रहस्याची उकल अमरशेखांनी फारच सुंदर रीतीने करून दाखविली आहे. ते म्हणतात, जो कुणी वार करायला धजला त्या 'जातियवादा-' मागे धनिक दडलेला आहे. देवळातले तर काही पुजारीच मुळी चोराला सामील व्हावे अशातला प्रकार घडला आहे.

.. पण या बलिदानाने कवी संतापला असला, तरी हताश मात्र होत नाही. उलट तो म्हणतो–दृष्टिआड होताना रवीने ( जणू काही ) रक्त उधळून दिले आहे. आणि हिंदु–मुस्लीम एकजुटीची मशाल तेजाळून टाकली आहे.

मावळताही सूर्य उगवतो उद्या तुम्हा ठावे
मग का रे आम्ही रडत बसावे अन् ठेचाळावे

असे हताश होणाऱ्यांना उलट अमरशेख विचारतात. आजच्या निराशेतून उद्याची आशा फुलणार असताना रडत बसण्यात अर्थ नाही असे सांगून अमरशेख संदेश देतात—

ध्या मशाल ती तेजाळ
पेटवा पुन्हा त्या वरती
घालुनी तेल रक्ताचे
तेजाळा लाखो कोटी
मशाल मोर्चा एकजुटीचा चोहिकडे फेका

भारतीय मनाला बसलेल्या एका जबरदस्त तडाख्यामुळे एक मोठा तडाच गेला होता. एक पोकळी राजकीय जीवनात निर्माण झाली. अशा वेळी एकजुटी-खेरीज काही करता येणे शक्य नाही. मनामनाचे सख्यत्व निर्माण होणे अपरि-हार्य ठरते. आणि नेमकी त्याचीच आवश्यकता ओळखून अमरशेखांनी वरील-प्रमाणे संदेश दिला. खरोखर एकजूट निर्माण झाली तर त्याचा परिणाम काय होईल ?—

जातियवादी दिवाभिते मग शोधतील जागा
सत्ताधारी धनिकांच्या कुणि राजाच्या पागा
हुल्कावणि देऊन कुणी देउळात शिरतील
महादेवाच्या पिंडीमागे हळूच दडतील

आणि मग.....

लाचखाऊ कुणी पुजारी
ते दया, क्षमा जपतील
भडवेगिरी करुनी कोणी
ती मशाल हिसकवतील

म्हणूनच अमरशेख धोक्याचा लाल कंदील दाखवून म्हणतात—

आश्रयदाते, छुपे पुजारी, त्याहुनिही धोका

गांधीजींच्या आत्म्याच्या हाती ऐक्याची मशाल आहे. म्हणून 'दिसल्या जागा दिसले शत्रू तुडवित जाउ खुशाल' असे अमरशेख प्रतिपादतात. प्राप्तपरिस्थितीने हतबल होणारा, हताश होणारा अमरशेखांचा पिंडच नाही. त्यांचा पिंड आहे बोलून चालून क्रांतिकारकाचा. त्यांची आशावादी वृत्ती संकट येताच खरी पल्लवित होते. त्यांचा विश्वास वाढीस लागतो. त्यांचे मन भविष्यकाळात रुंजी घालू लागते आणि चित्र रेखाटते—

लढता लढता मंगलतारा लाल नभी येणार
रवि नवतेजे, लोकक्रांतिने नटुन पुन्हा दिसणार

आणि त्यानंतर—

आघाडीला कामगार स्वागती वाजवील डंका

आणि असे एकदा घडल्यावर ?

" माय कुणाची व्यालि साधण्या कुठला मग मोका ? "

सुरुवातीपासून शेवटपर्यंत मात्र करुणरसाने ही कविता काही ओथंबलेली नाही. सुरुवातीला करुण रसाला प्राधान्य आहे, पण पुढे पुढे त्याची जागा वीररस घेतो.

'लाल' हे क्रांतीचे प्रतीक वापरून अमरशेखांनी उद्याची स्पष्ट कल्पना आणून दिली आहे. एक प्रासंगिक कविता इतकेच या कवितेचे महत्त्व नसून आशावादाने प्रेरित झालेली आणि भविष्यकाळाचा अचूक वेध घेणारी कविता म्हणून तिचे मोल फार मोठे आहे.

या कवितेत अमरशेखांच्या व्यक्तिवैशिष्ट्याचे ठसे ठळकपणे दिसतात.

ओघवती रचना, शब्दचापल्य, जळजळीतपणा यामुळे कविता चटकन मन आकर्षून घेते.

## बर्फ पेटला—

राष्ट्रीय भक्तीने ओथंबलेली अशी ही कविता. क्रूर काळाने दिलेल्या आव्हानाचे

प्रतिबिंब या कवितेत चांगले उमटले आहे. शत्रूबद्दलचा द्वेष, स्वराष्ट्राबद्दलची निष्ठा यांचा प्रत्यय ही कविता वाचताना सहजच येतो. अंतःकरणाला पीळ पाडून कवीने मोठ्या आर्ततेने साऱ्या भारताला हाक दिली आहे. हे एक संग्रामगीत आहे. बर्फ पेटला ही कल्पनाच मुळात किती उत्तुंग आहे. बर्फ आणि पेटणे या परस्परविरोधी गोष्टी एकत्र येऊच शकत नाही. ह्या असंभाव्य गोष्टींचीच उलट कवीने खात्री पटवून दिलेली आहे. बर्फ पेटला या शब्दांतूनच आलेल्या भयंकर संकटाची प्रथमदर्शनीच कल्पना येते. कवीने हाक दिली आहे—

बर्फ पेटला हिमालयाला विझवायाला चला
वृद्ध तरुण या फक्त रक्त द्या, रे साद हाकेला

पाशवी चिन्यांचा प्रतिकार करायचा म्हणजे साक्षात मृत्यूचे आव्हानच स्वीकारायचे आहे. बलिदानाची अपरिहार्यता निर्माण झाली आहे. म्हणूनच मातृभूमीच्या पुत्रांना आवाहन अगदी पिळवटून केले आहे.

स्वातंत्र्याचे बाळ रांगते असताना, स्वतंत्रपणे विहार करण्यास उत्सुक असताना घडू नये ते घडले आहे. ज्याला बंधू म्हणत होतो तोच सुरा घेऊन काळ होऊन आलेला आहे. त्याचा प्रतिकार करण्याखेरीज गत्यंतर नाही, ही जाणीव कवीने कठोर शब्दांत दिली आहे.

रक्ताचे खत मिळता थोडे
सीमेवरची झुडपे झाडे
देशरक्षणा बनतिल वेडे
तृणपर्णांना मिळेल शक्ती—तेच रोखतिल हल्ला

रक्ताची आवश्यकता कोणती आहे त्याची महती पटवून देऊन कवीने पुढले भविष्यही रेखाटून टाकले आहे. आता झेप घेण्याखेरीज भारतीय सिंहांना दुसरा काही पर्याय उरलेला नाही. म्हणून अमरशेख त्वेषाने आवाहन करतात—

रक्तकलश हिमागिरिवर चढु द्या
जनसागर सीमेला भिडु द्या
शिरकमले अग्नीत पडू द्या

आणि—

ध्वज राष्ट्राचा सीमेवरचा भिडु द्या रे गगनाला

मातृभूमीवर अढळ चिरंतन निष्ठा ठेवणाऱ्या या नम्र सेवकाने बर्फ पेटल्याची ग्वाही दिशादिशात फिरविली आहे. पण त्याचबरोबर दुसऱ्याने आक्रमण केले म्हणून त्याचा वचपा काढण्यासाठी आम्ही चिडून उठायचे ही नीती भारतीयांची नाही याचीही जगाला जाणीव देण्यासाठी अमरशेख खऱ्या संस्कृतीची ओळख पटवून देतात—

पक्ष पंथ धर्म भेद सारुनी
गिळिली भूमी मुक्त करोनी
गान शांतिचे धुमवू गगनी

आणि मग ?—

न्यायी भारत नाहि आक्रमक दावू या जगताला

भारतीयांची आक्रमक वृत्ती जशी नाही त्याचप्रमाणे ते हिंसकही नाहीत. मात्र याचा अर्थ वाटेल तो अन्याय ते सहन करतील असा नव्हे असाच जवळ जवळ आपल्या जळजळीत भाषेत अमरशेखांनी भाव व्यक्त केला आहे.

ओजस्वी रचनेत हे एक राष्ट्रगीत रचले गेले आहे. भारतीयांच्या भावना जणू काही कवीने बोलक्या केल्या आहेत. त्या करताना स्वातंत्र्याच्या जाणीवे-बरोबरच आपल्या 'कर्मयोगाची' ओळखही पटवून दिलेली आहे.

बर्फ पेटल्यानंतर कोणत्या गोष्टीची आवश्यकता आहे त्याबद्दल सार्थ आवाहन करून कवीने आलेल्या आक्रमकाशी कोणत्या नीतीचा कसा वापर करावा ह्याचीही यथोचित जाणीव दिलेली आहे.

राष्ट्रप्रेमाने पेटून उठलेल्या एका सहृदय कवीची ही मनोव्यथा निःसंशय क्रांतिकारक बनलेली आहे. पुरुषार्थाला तिने केलेले आवाहन स्वीकारण्यातच खरे धैर्य आहे.

## वेडी आई--

ही कथानात्मक वळणाची कविता. या कवितेत कवीने केलेले भावचित्रण निश्चितच हृदयस्पर्शी अशा स्वरूपाचे आहे.

भारतावर आलेले दुष्ट चक्राचे आक्रमण परतवून लावण्यासाठी आज भारतीय पुत्रांनी सीमेवर आपल्या जीवाची 'समिधा' टाकायची वेळ आलेली आहे. खेड्यातील एक भोळी भाबडी माता आपला पुत्र देऊ इच्छित असताना तिच्या कोमल आणि आर्त भावना कशा असतील याचे हृदयविदारी चित्रण कवीने आपल्या सिद्धहस्त लेखणीने केले आहे. राष्ट्राबद्दल वाटणाल्या आत्मीयतेतून तिची भावता प्रकट झालेली दिसते. कारुण्याचा इतका आर्त अविष्कार कवीच्या कुठल्याही इतर कवितेत झालेला क्वचितच दिसून येईल. हे एक करुण आर्त गीत आहे. एकीकडे पुत्राबद्दल वाटणारा जिव्हाळा, त्याच्या होणाऱ्या संभाव्य ताटातुटीने गदगदलेले हृदय मात्र देशभक्तीने पूर्णपणे ओथंबलेले दिसते. भारतीय पुत्राची माता एका डोळयात आसू आणि दुसऱ्या डोळयात हासू ठेवून कसा निरोप देऊ शकते याचे चित्रण या कवितेत केले आहे.

नको लढाई लादलीच तर घ्या पोराला
देशकारणी देते मी एकुलता माझा राजा

भोळ्या, भाबड्या मातेलासुद्धा लढाई नको आहे, पण ती जर लादलीच गेली तर मात्र आपला एकुलता राजा द्यायला ती भारतीय माता तयार आहे.

ती आपली व्यथा बोलून दाखवीत आहे. माझ्याजवळ काहीच नाही. सौभाग्य हरवले आहे, भर ज्वानीतच राजे सोडून गेलेत. परंतु जाताना मात्र त्यांची एकच एक अपेक्षा होती—

तळहाताच्या फोडागत करि तू बाळाची रक्षा
वेल मांडवा लावुनि त्याची घे मग विश्रांती
बाळ लाडका वंशदीप तेवावा इतुकी भ्रांती

आणि या भ्रांतीतच त्यांची जीवनज्योती विझून गेली. असा हा जिवाचा कलिजा घेऊन ती माता

अंधारी वल्हवित होती बाळासह नौका
बादळातही धरला होता अंगाईने ठेका

हे छोनुकलेसे बाळ ठेक्यावरती जगवीत होती. त्याला जगवताना तिला कोणत्या आपत्तीतून जावे लागले ते तिच्याच शब्दात पाहण्यासारखे आहे—

धुणी नि भांडी कधी उपाशी पोसायास्तव त्याला
सोसाट्याच्या वाऱ्यातच तो भर ज्वानीला आला

ज्वानीत आलेल्या मुलाचे वर्णन आईचे हृदय कसे छानदार रीतीने करीत आहे—

ओठ पिळावे, दूध निघावे मिसरूड फुटले काही
माझी वेडी माया त्यातुन स्वप्न वेगळे पाही
फुललेली स्वप्नात पाहिली गोरी गोरी पान
हिरवा शालू, चुडा पाचुचा बसलेली लाजून
बाळ भरवितो घास तिला ती अधोवदन झालेली
माझी जीवनसृष्टी तिचिया दृष्टीतच फुललेली...

त्या पवित्र डोळ्यात वंशज क्षणभर चमकून गेला, हृदय भरून आले आणि हात डोळ्यांना भिडले; कडकड वीज लवली आणि माझे स्वप्न भंगून गेले. आणि मग—

धडपडले धाबरले धावत बाळा कवटाळियले

अशी अगतिक अवस्था झाली. परंतु भीतीचा लवलेश राज-मुखावर न दिसता उलट तो तिच्या कुशीत खुदकन हसला आणि पुटपुटला मात्र—

आई—आई जाऊ दे गे उत्तर सीमा धगधगते
मज निरोप दे गे वेगे

जणू काही ओच्याला पकडून बाळ विनवीत आहे. त्याचा तो बालहट्ट मला आठवला, त्याचा प्रातःकाल दिसला; तेव्हा बाळ म्हणाला—

उत्तर सीमेहुनी येई गे किंकाळी
आई, लावुनि बसू कसा गे ब्रह्मानंदी टाळी

त्याच्या ओतप्रोत भरलेल्या देशभक्तीचा अविष्कार कसा मजेदार झाला आहे. तो आपल्या आईला उद्देशून म्हणतो—

उद्या तुझ्यावर हात टाकला जाता जाता कोणी
सांग आइ तू, मुळमुळ गाळित बसू काय गे पाणी
वंशाचा मी दिवा, तुला मी फक्त काजळी द्यावी ?
काजळिने का माझ्या आई, तुझी कूस उजवावी ?

आपल्या आईत भारतमातेचे दिव्य स्वरूप पाहणाऱ्या त्या पुत्राच्या ओठी केवढे मोठे तत्त्वज्ञान सामावलेले आहे. तो आईला सांगतो—

नाग केवड्यामागे दडती तुला नाहि का ठावे ?
समाजवादी फुलांमधुन हे पिवळे घेती चावे

या पिवळ्या नागांच्या चाव्यामुळेच तर भारतीय स्वातंत्र्य धोक्यात आले आहे. म्हणून स्वतंत्र भारतासाठी झटलेल्या आपल्या पित्याची जाणीव आईला देऊन मुलगा आज्ञा मागतो—

त्याच्या उरल्या कार्याची सांगता कराया आई
झटकन हो म्हण आज्ञा दे गे म्हणू नको तू काही
...मला तरी का हवी लढाई ? आई गे तू सांग
फुलवायाची होती ना मज स्वातंत्र्याची बाग
बागच जाइल गळून त्यातिल पाचोळा ना तू—मी
आग विझविण्या जाऊ दे गे क्षण जाइल हा नामी

त्या नामी क्षणाची आतुरतेने वाट पाहणारा हा भारतीय पुत्र आईला तळमळून सांगतो—

माझ्यागत सगळा पाचोळा जर सीमेवर गेला
आग कशी लागेल सांग उरल्या हिरव्या बागेला

मी सीमेवर नच गेलो तर वध शेवट होईल
सुक्याबरोबर ओलेही पण जळून गे जाईल.

अशी रास्त भीती व्यक्त करून आपला आत्मविश्वास प्रकट करतांना मात्र भारतीय पुत्र आवर्जून सांगतो—

हा पाचोळा आई, जळण्यासाठी नाही
सुवर्ण पाचोळा हा तावुन सुलाखून घेई
बाबांच्या वेळेला नव्हती असली शस्त्रे काही
चालवीन रणगाडा शत्रूच्या छातीवर आई

आणि शेवटचा निर्धार कसा तेजःपुंज भाषेत व्यक्त करतो. तो म्हणतो—

जिंकणार मी स्वातंत्र्याचा वारा प्यालां वीर
विजयी होउन तुझ्या कुशीची ऊब पुनः घेणार

...परंतु या अनाहूत स्वप्नातच त्याची मिठी आईच्या गळ्याला पडते. आणि मग वेडी माया, वेडी आई वेडातच बडबडते—

नको लढाई. लादलीच तर घ्या पोराला माझ्या
देशकारणी देते मी एकुलता माझा राजा

भावनोत्कटता हा या कवितेचा एक प्रमुख विशेष आहे. कवी अमरशेखांचे व्यथित हृदय या कवितेतून अक्षरशः ओसंडताना दिसते, त्या व्यथित हृदयाचा थोरपणा

वेडी माया वेडी आई, वेडातच बडबडली
नको लढाई, लादलीच तर घ्या पोराला माझ्या
देशकारणी देते मी एकुलता माझा राजा

या ओळींतून व्यक्त झालेला दिसतो.

करुण रसाचा अविष्कार होत असल्याने हे नाट्यगीत जितके कलात्मक तितकेच भावस्पर्शी उतरलेलं आहे.

अमरशेखांचे संवादकौशल्य आणि भावनोत्कटता हे विशेष या कवितेत जणू काही पणाला लागलेले दिसतात. करुण आणि वीर या रसांचा मनोहारी संगम या कवितेत झालेला दिसतो.

उत्तुंग कल्पना, उदात्त विचार आणि मानसिक संघर्ष यांच्या चित्रीकरणामुळे कवितेत एक प्रकारची विशेष गोडी निर्माण झालेली आहे.

मात्रादोष आणि पाल्हाळिकता हे दोष मात्र दृष्टिआड करता येत नाहीत.

२०९५८ १८२५ दि: २९।१।५ नों. दि.

## रसग्रहण

### खंडाळा—

निसर्गचित्र रंगविण्याची परंपरा मराठी साहित्यांत तरी नवी नाही. गडकरी, बालकवी यांनी तर निसर्गाचे बारकावे इतक्या सूक्ष्मपणे रंगविले आहेत की त्यांच्या कविता वाचताना मूर्तिमंत चित्र मनःचक्षूपुढे उभे राहते. त्याच परंपरेत शोभून दिसणारी अशी अमरशेखांची 'खंडाळा' ही एक सुंदर कविता आहे.

निसर्गातल्या सूक्ष्म छटा रेखांकित करण्याचे त्यांचे विशेष कौशल्य कवितेत ठायी ठायी प्रत्ययाला येते. पहिल्याच दोन ओळी किती बहारीने रेखाटल्यात ते पाहा—

उषा देवीने दीप लाविला पहाटेच्या प्रहरी
दिव्य प्रकाशी दुनिया राणी दिसे नवी न्यारी

कल्पनारम्यतेचा प्रत्यय जागजागी येतो. एक अभिनव कल्पना कशी छान रेखाटली आहे.

धुके भासते या हिरवाळीवर स्वप्नाची साई

उपमा आणि उत्प्रेक्षांची तर या कवितेत कवीने अक्षरशः खैरात केली आहे. आपल्या प्रतिभेचा कलश ओसंडू दिला आहे.

अथवा दुनिया राणीच्या या अधुऱ्या स्वप्नाची
रेंगाळत राहिली पाउले साक्ष असे त्याची
साक्ष हवी तर पुनः विचारा या तृणांकुरांना
त्याच स्वप्नी धुंदल्या रंगल्या इवल्या नयनांना

दरी-कपारीतील सौंदर्याचा वेध किती अचूक आणि रसिकतेने घेतला आहे ते पाहिल्यावर कवीच्या मनातील रसरसलेली भावना निःसंशय जाणवते. निसर्गातील हे शब्दचित्र किती रेखीव आहे—

फेर धरी ही दरी कपारी हिरवे नेसोनी
सोनसळी नाजुक किरणांचा बुरखा ओढोनी

—किरणांचा बुरखा! वाहवा!! काय बहारीची कल्पना आहे. पहाटेचे दृश्य बोलके तसेच आल्हादक बनविण्याचाच जणू काही कवीचा अट्टाहास असावा असे कविता वाचताना वाटते.

धुमे शीळी तो डोंगरमाथी थरारली गेली
थरारली स्वागतार्थ आता सेनाही सजली

कड्याकपाऱ्यांतून वाहणाऱ्या ओढ्यांचे वर्णन किंवा डोंगरमाथ्यावरील किरणांचे वर्णन तर अतिशय मजेदार आहे—

तिरंदाज सुळक्याच्या फितिवर झालरि मोत्यांच्या
सुवर्ण केशी मुकुट शिरी वर चंदेरी पाणी
पाणी वाहते अंगांगावर गात यक्षगाणी

हे भव्य, दिव्य दर्शन घेतल्याबरोबर कवीला उत्कटपणे बालकवींचीच आठवण होते.

गर्द झाडीचे कधी मधी खोवले तुरे न्या रे
बालकवींच्या गालीचाचे झगे करुनि या रे

सूर्य उगवला, सारे क्षितिज त्याने उजळून टाकले. त्याची स्वारी कशी येत आहे ते कवीने मोठ्या मार्मिकपणे सांगितले आहे—

आला आला रविकर, भास्कर आला उदयाला
डोंगरमाथा स्वागति सुळका कडेकोट सजला

आणि उदयाला येणारा हा भास्कर दुनिया राणीच्या दरबारी यायला आसूसला आहे. परंतु तो रवींद्र मात्र क्षणात दिसतो, क्षणात नाही. तो आल्यावर चंदेरी काया होईल आणि मी–तू मधले अंतर क्षणात लोपेल असा विश्वासही प्रकट केला आहे.

इथला सोहळा कसा लज्जतदार आहे: पऱ्यांनी आपल्या ज्वानीचा मेळा भरविताच रंगून जाल, दंग व्हाल आणि रविउदय न होईल आणि आपले मधुर स्वप्न भंग न होईल असेच म्हणू लागाल. पण स्वप्नातच आनंदाच्या सरीवर सरी बरसतील आणि मग भिजून चिंब झाल्यावर जमिनीवर पडाल. मग बेशुद्धासारखे चंडाळा सोडू नये असेही बडबडाल; असा इशारा येथील अतृप्त सौंदर्य पाहणाऱ्या रसिकांना अमरशेख देऊन ठेवीत आहेत.

पल्लेदार रचना, अलंकारिक शैली, सौंदर्याच्या सूक्ष्म छटांचे आल्हादक रेखाटण यामुळे मूळच्या सौंदर्यात अधिकच भर पडली आहे

निसर्गचित्रण करताना कवी वेडावून गेला आहे. त्याचे भान हरपले आहे त्याचे मन अगदी बेहोष बनले आहे.

मात्रादोषामुळे कविता वाचताना मात्र निश्चितच खटकते.

उत्कृष्ट शब्दचित्रांनी गुंफलेली अशी ही कविता असून सुंदर निसर्गगीत म्हणून या कवितेचा खास गौरव करावासा वाटतो.

## जय – महाराष्ट्र

संयुक्त महाराष्ट्र निर्मितीपूर्वीची ही कविता आहे. महाराष्ट्रप्रेमाने ही कविता ओतप्रोत भरलेली आहे. कविता प्रासंगिक असली तरी तिच्यात व्यक्त झालेली भावना हृदयंगम आणि मनोहारी अशीच आहे.

भाषेचा थाट मराठी । अहिराणी कोकणी घाटी
शब्दोच्चाराची खोटी । शत्रूला वाटते धास्ती
ज्ञानेशापासुनी भिल्ल वारली । घेई नित नवरसता

असा हा महाष्ट्राच्या मराठीचा थाट आहे.

महाराष्ट्राच्या प्राकृतिक सौंदर्याचे वर्णन करताना अमरशेखांच्या लेखणीला एक वेगळेच तेज चढते.

सौंदर्य महाराष्ट्राचे । क्षणक्षणा प्रत्यया येते
माती सुगंध उधळीते । दरिकपार रिझवि मनाते
गोमंतक, वेरूळ दावि अजिंठा । अमर मानवी स्वप्ना

महाराष्ट्रातल्या नद्यांची थोरवी अमरशेख खालीलप्रमाणे गातात—

कोयना नी गोदा, कृष्णा । भागवुनी अमची तृष्णा
उदरात मोती पिकवोनी । महाराष्ट्र उभा सुखवोनी
कधी उग्ररूप खंदकरूपाने । पाणी पाजी शत्रूंना

महाराष्ट्रातले पर्वत आणि नरवीर यांच्याबद्दलच्या अमरशेखांच्या कल्पना किती उद्दाम आहेत पाहा—

या पर्वतराजी कसल्या । कर्वतीच तापविलेल्या

ही कल्पना वाचताच मन आश्चर्याने अगदी थक्क होते. सह्याद्री आणि सातपुडा म्हणजे काय तर जणू काही संताजी आणि धनाजीच. आजही या पर्वतांची छाती उघडीच आहे. ही पर्वतराजी अजूनही गर्जना करीत आहे. मराठी बाण्याविषयी अमरशेखांनी याच कवितेत म्हटले आहे की—

घाल घण अमुच्या छातीवर अन् पहा मराठी बाणा

महाराष्ट्राभोवती पर्वतराजी पसरल्या असून त्यांनी अरिसेना विचरून टाकल्यात आणि तीच परंपरा घेऊन आमचा 'शिवबा तान्हा' मिरवितो.

महाराष्ट्राच्या ज्वलंत आणि जागत्या इतिहासाची पाने उघडून पाहिली तर ती सर्वच अभिमानाने भरली आहेत. शतकानुशतके वळून पाहिली तर ती रक्तानेच लिहिलेली दिसतील. त्यांचीच स्फूर्ती घेऊन जगत्शक्तींना आम्ही जागवू असा अमरशेखांना विश्वास वाटतो.

आपला समतावादी दृष्टिकोन अमरशेख या कवितेत मांडतात. संयुक्त महाराष्ट्र वैभवाप्रत नेण्याचे स्वप्न अमरशेख रंगवतात. ते म्हणतात—

स्वातंत्र्य शांतता स्थापू । अवघे जग त्याने व्यापू

फुलापेक्षा कोमल पण प्रसंगी वज्रापेक्षा कठोर असलेल्या महाराष्ट्राचे भावभक्तीने हे एक पूजनच केलेले आहे. मातृभूमीवरील अविचल श्रद्धा व्यक्त करताना, तिचे गुणगान करताना अमरशेखांचे हृदय हेलावते आणि त्यांच्या लेखणीतून एका-पेक्षाही एक सरस अशा भावपंक्ती झरू लागतात.

संयुक्त महाराष्ट्राचे दिव्य स्वप्न पाहणाऱ्या अमरशेखांच्या दमदार लेखणीतून उतरलेले हे एक मूर्तिमंत असे सुंदरसे शब्दशिल्प आहे.

## प्रणाम—

कुसुमाग्रजांनी ‘ गर्जा जयजयकार ’ कविता लिहून सारा महाराष्ट्र हादरून सोडला. कुसुमाग्रजांची सारी लेखनवैशिष्ट्ये आणि त्यांचा विचारात्मक दृष्टिकोन जवळ जवळ त्या एकाच कवितेत एकवटलेला दिसतो. शाहीर अमरशेखांच्या ‘ प्रणाम ’ या कवितेनेही एके काळी सारा महाराष्ट्र गाजवला. अमरशेखांच्या लेखनाची वैशिष्ट्ये आणि वैचारिक दृष्टिकोन कुसुमाग्रजांच्या ‘ गर्जा जयजयकार ’-प्रमाणेच याही कवितेत स्पष्ट होतो. मला वाटते, या एकाच कवितेने अमरशेखांना महाराष्ट्राने कीर्तीच्या उत्तुंग शिखरावर नेऊन बसविले. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर तर ही कविता घराघरांतून गाताना ऐकायला मिळाली आहे. अमरशेखांनी ही एकच कविता जरी लिहिली असती तरी त्यांना स्वतंत्र प्रतिभेचे श्रेष्ठ कवी म्हणून आज ना उद्या मान्यता मिळायला काहीच हरकत नव्हती. ह्या एकाच कवितेने अमर-शेखांना अक्षरशः ‘ अमर ’ करून ठेवले आहे.

हिंदी संघराज्याची स्थापना व्हावी हा अमरशेखांना जणू ध्यासच लागलेला आहे. आज स्वातंत्र्याकांक्षेची पूर्तता झाली असली, तरी संघराज्य निर्माण झाले आहे असे काही छातीठोकपणे म्हणता येत नाही.

हिंदी संघराज्याचा ‘ जन ’ आत्मा आहे, त्याला प्रथमतः प्रणाम केला असून भारताच्या अनेकविध प्रांतांची नामावली अतिशय कौशल्यपूर्ण अशी अमर-शेखांनी गुंफली आहे. महाराष्ट्र, गुजरात, आंध्र, ओरिसा, कर्नाटक, तमिळनाड, केरळ, आसाम, राजस्थान, बिहार या प्रांतांचा उल्लेख करून देशाच्या भौगोलिक मर्यादा निश्चित समजाव्यात म्हणून अमरशेखांनी मार्मिकपणे ओळख करून देताना म्हटले आहे—

उगवतिचा पंजाब
मावळतीचा वंग

साध्या, सोप्या मराठमोळ्या कल्पनांनी अशी ओळख क्वचितच कुणी करून दिली असेल. हे प्रांत म्हणजे केवळ दगड-धोंड्यांचे, माती-नद्यांचे असे नाहीत.

अमरशेख म्हणतात हे प्रांत म्हणजे " लुकलुकती रत्ने ' आहेत. ही रत्ने नेहमीच ' नवरंग ' उधळीत असतात. या ओळीद्वारे अमरशेखांना सजीवितेची, चैतन्याची कल्पना आणून द्यायची आहे. निर्जीव प्रांत आपला रंग उधळूच शकणार नाहीत. ' उधळित नित नव रंग ', ही अमरशेखांची नुसतीच काही कवि-कल्पना नाही. या कल्पनेद्वारे त्यांना इतिहासाची कल्पना आणून द्यायची असल्यानेच ती वास्तव वाटते. पूर्वी पारतंत्र्यात जखडलेली ही रत्ने जेव्हा खऱ्या अर्थाने स्वतंत्र होतील तेव्हाच ती रत्ने ( सर्व प्रांत ) अधिकच खुलतील आणि सारे जग त्या तेजाने दिपून जाईल असा अमरशेखांना विलक्षण विश्वास वाटतो. पण दुनियेला दिपविण्याचे सामर्थ्य खऱ्याखुऱ्या बलिदानात असते, समर्पणात असते, असे अमरशेखांनी सूचित केले आहे. या वेळी कविवर्य तांबे यांच्या ' मरणात खरोखर जग जगते ' या कवितेची आठवण होते. " सर्वस्वाचे दान अधी करि। सर्वस्वच ये स्वये तुझ्या घरि " हीच कल्पना " दिपेल दुनिया... पाहुनि तव बलिदान " या ओळीत अंतर्भूत झालेली आहे खास.

या हिंदी जनतेने कळिकाळाची मगरमिठी छिन्नभिन्न केली असून दीड शतक मूर्च्छित पडलेल्या, पारतंत्र्याने हतबल झालेल्या मानवाला जाग आली आहे. हिंदुस्थानला तेजस्वी इतिहास आहे आणि त्याच इतिहासाचे स्मरण झाल्यानंतर जाग आलेल्या मानवाची कृती कशी असेल ? ती अमरशेखांच्याच शब्दांत पाहणे सयुक्तिक ठरते. अमरशेख म्हणतात—

ठोकिल आरोळी
हा प्रातःकाळी
वृद्ध, तरुण, बाळे
उठतिल या वेळी
नव्या यशाने, नव जोमाने, गातिल गाणे
करावया बलिदान........

ब्रिटिशांची पाशवी सम्राज्यसत्तेची मगरमिठी हिंदभूला पडलेली. या साम्राज्यशाहीला पंजाब चिरायला, सिंध, पठाण अलग ठेवायला किंवा वंगभूमीला आग लावायला जरी यश आले, तरी क्रांतिवीर भगतसिंगाने जी क्रांतीची, जागृतीची ज्योत निर्माण केली आहे ती विझणेच शक्य नाही. अमरशेख विचारतात—

भगतसिंग आत्मा
दुभंग होइल का ?

भारताला ग्रासणारे अनेक पापी ग्रह त्या काळी होते. ब्रिटिशांप्रमाणेच आपले कायमचे पाय रोवून बसलेले दुसरे ' साम्राज्यवादी ' पोर्तुगीज होते. ( आज

सुदैवाने गोवा स्वतंत्र झाला आहे, पण तो अजूनही खऱ्या अर्थाने 'स्व-तंत्र' बनलेला नाही. तो 'शापितच' आहे. मात्र आमच्या या कवीचे स्वप्न निश्चित साकार झाले आहे.) या पोर्तुगीजांचे शल्य अमरशेखांसारख्या जाज्वल्य मराठी कवीला का बोचू नये? त्याची आठवण पडल्याबरोबर हिंदी जनतेला ते बजावून सांगतात, ब्रिटिशांप्रमाणेच—आता—

उरल्या सुरल्या साम्राज्याला देउ मूठमाती
शरण आणु हे पोर्तुगीज पण तृण धरुनी दाती

आणि हे कशासाठी करायचे? बलिदानाची आवश्यकता काय? तर तांबे म्हणतात त्याप्रमाणे 'मारिल मरणचि मरणा भावी;' गुलामगिरीत पुढे राहावे लागू नये म्हणून आज त्याग केलाच पाहिजे. म्हणूनच जो मंत्र तांबे यांनी स्पष्टपणे दिला नाही तो मंत्र अमरशेखांनी अगदी उघड रीतीने दिला आहे. ते म्हणतात—

मंत्र दिशा दाही । संपूर्ण लोकशाही
हिंदी ऐक्य स्थापू । हीच पुनः ग्वाही

'स्वतंत्र' होण्यासाठी पारतंत्र्याची सारी बंधने शिथिल झालीच पाहिजेत. ती बंधने म्हणजे धनिकशाहीला वाव, गुलामगिरी, (शारीरिक-मानसिक), जातीयता. या साऱ्या गोष्टी पारतंत्र्याला कारणीभूत ठरतात. म्हणूनच तर या तिन्ही गोष्टींना थारा देता कामा नये, आरामही मिळू देता कामा नये.

अर्थात लोकशाही—संपूर्ण लोकशाही निर्माण होणे ही वाटते तितकी सहजसाध्य आणि सोपी गोष्ट नव्हे. साम्राज्यवादी, भांडवलशाही राष्ट्रे लोकशाहीची बीजे कुठे सहसा निर्माण होऊ नयेत म्हणून डोळ्यात तेल घालून असतात. त्यांना अशी लोकशाहीवादी राष्ट्रे जगणे धोक्याचे वाटते. पण अमरशेख विचारतात—

कोण जिंकु शकणार आम्हाला अटम हैड्रोजन बाँब?

अणि समजा असाच बाका प्रसंग आला तर? लोकशाहीच्या रक्षणासाठी त्यांना मैदानी येऊ द्या असे आव्हान देउन अमरशेख बजावतात,

त्या वेळी आम्ही घालू लोकजुटीचा बांध

त्यासाठी इथे तोफा, रणगाडे लढतील, जे जे मानवाचे शत्रू म्हणून पुढे येतील त्यांचे मुडदे पडतील. जरूर तर शस्त्रे घेऊ, अस्त्रे घेऊ, पण जिंकून एकच गोष्ट सिद्ध करून देऊ; ती म्हणजे

मानव नाहि गुलाम

मानवतेच्या मंगलतेसाठी झटणे हाच आमचा बाणा आहे. लोकशाहीच्या पावित्र्याला जराही धक्का लागू देणार नाही. एकदा मानव गुलाम नाही हे सिद्ध

करून दिले की त्याच्या कल्याणाचा मार्ग आमचा आम्हीच आखू. तो कसा ? अमरशेख म्हणतात—

अणु परमाणू जनतेच्या सेवेला आणू<br>
संघ संस्कृती नवीच बाणू<br>
नवजनशक्ती हेच सुकाणू हाती धरुनी<br>
खुलवू जीवन-बाग<br>
लावु जुन्याला आग<br>
नव्या जगापुढती<br>
नवा आळवू राग

आणि हे सारे कशासाठी करू ? तर स्वतंत्र राहण्यासाठी. समता प्रस्थापित करण्यासाठी. हीच आण सर्व जनता घेईल असा शेवटी अमरशेखांनी अशावाद प्रकट केला आहे.

शाहीर अमरशेखांच्या राष्ट्रीय वृत्तीचे समग्र तेज जर पाहायचे असेल तर त्यासाठी प्रथमतः याच कवितेचे वाचन करावे लागेल. हिंद-भूबद्दलचा ज्वलंत अभिमान या कवितेतून नुसता वाहताना दिसतो.

स्वातंत्र्य मिळताक्षणीच सौदेबाजीच्या राजकारणातून जातीयवादाचा डोंब उसळणार हे लक्षात येताच अमरशेखांसारख्या कट्टर राष्ट्रीयवाद्याला भवितव्यातील धोका समजून चुकला आणि त्याने साऱ्या जनतेला धोक्याचा इशारा या कविते-द्वारे देऊन आपली लोकशाहीवरील निष्ठा निःसंदिग्ध शब्दांत स्पष्ट केली.

● ● ●

प्रकरण १४

# काव्यरचनेतील दोष

" अमरशेख हे कवी आहेत हे सांगण्याची जरूरी नाही . अष्टौप्रहर त्यांच्या डोक्यात आणि डोळ्यांत काव्याची धुंदी चढलेली असते...सृष्टीमध्ये जी सर्वत्र जादू भरलेली आहे त्या जादूमधूनच काव्याचा उगम झालेला आहे...जी ध्येये वा कल्पना साध्य होण्यासारख्या असून अद्याप साध्य झालेल्या नाहीत, त्यांच्याबद्दल जनतेच्या मनात आकांक्षा निर्माण करणे हे कवीचे काम आहे. बेलेन्स्की म्हणतो— "Poetry is the idealisation of reality" ( काव्य हे वास्तवतेचे उदात्तीकरण आहे. ) त्याचा अर्थ हाच आहे. ही कल्पना गॉर्कीने जास्त स्पष्ट केली आहे. तो म्हणतो " Our art must rise above reality and raise man above it without detaching him from it. ( वास्तवाचा संबंध न तोडता त्याच्या पातळीपासून कलेने माणसांना घेऊन वर गेले पाहिजे. "

आचार्य अत्र्यांनी अमरशेखांच्या कवितेचे विवेचन करतांना वरीलप्रमाणे भाष्य केले आहे. तरीपण काव्य म्हटले की त्यांतील दोष हे पाहायलाच पाहिजेत. अगदी निर्दोष असे काव्य शक्य नाही. हे कालिदास– मम्मटादि लोकांनी दाखविलेल्या दोषांवरून स्पष्ट होते. सदोष रचना ही काव्यास निश्चितच मारक होते. रसहानी करण्यास अनेक दोष कारणीभूत होतात. कवीच्या काव्याचे विशेष जसे पाहणे अगत्याचे असते तसेच त्याच्या दोषांचेही दिग्दर्शन करणे महत्त्वाचे असते. आचार्य अत्र्यांनी जे म्हटले आहे की, " शाहीराचे व्याकरण चुकले असे म्हणणे म्हणजे जंगलात गर्जना करणाऱ्या सिंहाने ' धैवत ' बरोबर लावला नाही असे म्हणण्यासारखेच आहे, " ते मान्य करूनही अमरशेख कवी आहेत म्हणूनच त्यांचे दोष दाखविणे इष्ट वाटते.

काव्यात्मकतेला बाधक असणारी आणि रसभंग करणारी उथळ आणि प्रसंगी अनावश्यकसुद्धा वाटणारी उपदेशपरता अमरशेखांच्या स्फुट कवितांतून डोकावते. ' मंथन ' ही धरणीमाता संग्रहांतील कविता या दृष्टीने पाहण्यासारखी आहे. ही सर्वच कविता उपदेशपर अशी आहे.

१ ) मंथनात त्या सामिल व्हारे कृतार्थ साधा मोका.

२ ) परिस्थितीचे दहि घुसळावे व्हा कृतार्थ साधा मोका.

३ ) दसकी लकडी एक्का बोजा दहा जमविण्यासही शिका

४ ) सुगंध केवळ सेवुनि त्यातिल आनंदाला विकू नका.

दुसरी कविता—आपले धोतर सांभाळी बा—या कवितेतील शेवटच्या चार ओळी

नेम नाही काही । सांगोनी अमर
आपुले धोतर । सांभाळी बा

पाथरवट कवितेतील—

जुनाट इमला सारा पाडुन टाका
देउनि धक्का

गोव्याकडेमधील—

वेचुनि काढा मत्त पोर्तुगिज मुळासकट अन्
चला पुढे

हैड्रोजन बॉम्बमधील—

याला झोपेतच मारा
ठेचा झोपेतच याला
हैड्रोजन हा दुष्ट आहे
घात करिल हे स्पष्ट आहे.

सिने-संगीतमधील—

या ' मायावी ' दुनियेचा अन कराच चक्काचूर

अशा या वरील सर्वच ओळींतून उद्देशपरतेची वृत्ती चांगल्या प्रकारे दिसून येते. "काव्यस्य आत्मा ध्वनिः" अशी संस्कृत कवि-पंडितांनी व्याख्या केलेली आहे. ती जरी सूचकता आजच्या कालाला सर्रास लागू पडली नाही तरी ही काव्याला आवश्यक अशी बाब आहे हे मान्यच करावे लागते. आणि सूचकता, ध्वन्यता अमरशेखांच्या कवितेत फारच थोड्या प्रमाणात पाहायला मिळते. सूचकता कमी असल्यामुळेच मग कवितेचा थाट बराचसा ' प्रचारकी ' वाटू लागतो.

"लहानमोठ्या प्रसंगांतून काहीतरी तत्त्व काढून उपदेश करण्याची गिरीशांची वृत्ती त्यांच्या सामाजिक कथाकाव्यात अनेक ठिकाणी रसापकर्षक ठरलेली आहे." तीच गत अमरशेखांच्या काही कवितांच्या बाबतीत झालेली दिसते. ' वेडी आई ' ही कविता तर याचे उत्कृष्ट उदाहरणच आहे. भावनोत्कट अशा या कवितेत कवीने अधूनमधून तत्त्व काढण्याचा प्रयत्न जाणून बुजून केलेला दिसतो.

माझ्यागत सगळा पाचोळा जर सीमेवर गेला
आग कशी लागेल सांग उरल्या हिरव्या बागेला
हा पाचोळाही आई जळण्यासाठी नाही
सुवर्ण पाचोळा हा तावून सुलाखून घेई

कापसाची कहाणी कवितेत—

कापसाचे कापड । त्रेऊन अंगावर
अंतरी नागडा । नागडाच राहिला...

लोकलमध्ये या कवितेत—

जग हे कोडे, मीही कोडे, कोडे का वेडे ?
रेड्यांनी का चालविले हे जगताचे गाडे ?

ही उदाहरणे अगदी ठळक अशीच आहेत.

अमरशेखांची सर्वस्पर्शी कविता अनेक भावानुभाव शब्दद्वारा साकार करीत असली तरी त्यांच्या लेखणीत अंगभूत अशी कलात्मकता निश्चित नाही. त्यांनी शब्दछटांचे औचित्य, त्यांचे सौंदर्य, त्यांची संगती यांकडे बरेचसे दुर्लक्ष केलेले आहे. उद्दाम कल्पनाशक्तीचा आपल्याला मधून मधून चांगला प्रत्यय येत असला आणि—

कोपऱ्यांतल्या उदबत्तीगत
परिमल देतचि जळत रहावे

अशी जरी त्यांची उदात्त भावना असली तरी रचनेतला सफाईदारपणा, शब्दांचा घोटीवपणा काही फारसा आढळत नाही. त्यांच्या कल्पनाशक्तीत मूळचाच एक प्रकारचा रांगडेपणा आहे. त्यामुळे त्यांच्या भाषेतील परखडपणाच सौंदर्याला विशेष बाधक ठरलेला आहे.

" अमरशेखांनी शालेय शिक्षणासाठी प्राथमिक शाळेच्या पायरीला कसाबसा तरी हात लावला " हे त्यांचे चरित्र पाहणाराला निश्चितच समजते. आणि त्यामुळेच काव्यावर सफाईचा हात फिरविण्यासाठी आवश्यक असलेल्या शास्त्राशी त्यांची गाठ-भेट झाली नसावी. त्याचा दोष व्यक्तिशः त्यांच्याकडे जाण्यापेक्षा तो सर्वतोपरी भोवतालच्या परिस्थितीकडेच जातो. परंतु त्यांच्या काव्यातील अंतर्गत विचारांवरून त्यांच्या प्रगल्भ बुद्धीचे सहज आकलन होते व कौतुक वाटते; अभिमान वाटतो. " काव्य हे शास्त्री पंडितांकरिता नसून सामान्य जनांकरिता आहे " हे जरी खरे असले तरी काव्यरचनेत अंगभूत गोडवा असल्यास त्याच्या मूळच्या सौंदर्यात अधिकच भर पडते. आणि त्यामुळे रसिकवृत्तीचे चांगले समाधानही होते. अमर-शेखांच्या फारच थोड्या कवितांत अंगभूत सौंदर्य आढळते. बाकी सर्वत्र बहुधा

केशवसुतांसारखा, रामदासांसारखाच खडबडीतपणा आढळतो. अर्थात या सर्वांचे सामर्थ्य त्यांच्या विचारांत आहे, आकारात वा अंतरात नाही.

अमरशेखांनी आपल्या कोणत्याच कवितांवर सफाईचा नाजूक हात फिरविला नसल्याने कित्येक ठिकाणी रचना गद्यप्रायच राहून गेलेली आहे. उदा.

१) तो मरतो हे पाहुनिसुद्धा
धडपडतो मी जगण्यासाठी
जगण्यामधेच आहे गंमत
ती पुरती अनुभवण्यासाठी

–(तो मरतो हे...)

२) पुरे शतक दावूनि वाकुल्या
यमास तुजसम मी हिणवावे
मातेचे कोमल मन मजला
अगदी तुझ्यासारखे मिळावे

—(भारतरत्न कर्वे)

दुसरा एक महत्त्वाचा दोष अमरशेखांच्या कवितेत आढळतो, तो म्हणजे विचाराच्या पुनरुक्तीचा. 'ब्रह्मा-विष्णु-महेश,' मंथन, कर्ण आणि कुंती, क्षयाने मेली, एकच ठेवीन या कविता या दृष्टीने उदाहरणादाखल देता येणे शक्य आहे.

अमरशेखांची लढाऊ झुंजार वृत्ती बहुतेक कवितेत आढळत असल्याने अभिव्यक्ती सर्वत्र एकाच प्रकारची दिसते. त्यामुळे कुठलीही कविता वाचायला सुरुवात केली की अमरशेख अशाच तऱ्हेचे काहीतरी सांगणार हे मुळी गृहीतच धरावे लागते. अर्थात यालाही 'माझी माय आहे मरहट्टी, माझी आई, खंडाळा, चक्र मनाचे, मोळीवाली, माझा देहचि धरतीमाता, भारतरत्न कर्वे यांसी, ओढ, बैलगाडी, मरण, कैफियत, वाद्ये आणि माणूस, बाळास, तुझ्या दिलाच्या सरदाराला, चंद्रावळीस, जलकमळ इत्यादि कितीतरी कविता अपवादही आहेत. असे असले तरी बऱ्याचशा कवितांत तोचतोपणा आढळतो हे अमान्य करता येणार नाही.

अमरशेखांच्या कवितेत पदलालित्य आणि रचनासौष्ठव यांचा बराचसा अभाव आहे. त्यांनी काही जातिवृत्ते हाताळण्याचा प्रयत्न थोडाफार केला आहे, पण त्यात त्यांना यश मिळालेले दिसत नाही. त्यामुळे प्रभुत्वाच्या अभावी कित्येकदा रचना ढिसूळ झाली आहे; आणि वृत्तभंगाचा दोष घडला आहे. अर्थात हा दोष अमरशेखांच्या बाबतीत क्षम्यच मानावा लागेल.

आचार्य अत्रे 'अन्नान्नदशा' ज्याला म्हणतात त्या अन् या शब्दाच्या सर्रास वापरामुळे अमरशेखही त्या 'दशेतून' सुटलेले नाहीत. मराठीतल्या नामवंत कवींच्याही कवितेत अन् शब्दाचा कितीतरी वापर केलेला दिसतो.

गर्जा जयजयकार क्रांतिचा गर्जा जयजयकार
अन् छातीवरती वज्रांचे घ्या झेलून प्रहार

—कुसुमाग्रज

गंजदार, पांढऱ्या नि काळ्या
मिरवित रंगा अन् नारिंगी

—मर्ढेकर

अन् स्वप्नांतुन हे दचकुन उठले चित्त
अन् थेंब टपोरे सर्पापरि ते थंड

—इंदिरा संत

असाच अन् चा वापर अमरशेखांच्या खालील ओळींतून दिसतो.

१ मनातले माझ्या आंदोलन । घालमेल अन् अश्रू नाटक
२ अन् इतक्यातच गालावरती । हात कुणाचासा
३ निर्मितिसाठी हात शरीर अन्
४ कष्टाळू अन् मेहनती मोठ्या
५ अन् जावे आम्ही जगापासुनी दूर

कोणताही पद्यचरण घेतला तर त्यात एक वा दोन टप्पे असतात. तेथे वाचक किंचित काल थांबतो. त्यालाच आपण यती म्हणतो. ह्या यतीबाबत ढिलाई झाली की यतिभंगाचा दोष घडतो. अमरशेखांच्या कवितेत तो आहे.

शृंगार व बीभत्स यांचा उपयोग नागेशाने आपल्या सीता-स्वयंवरात केला आहे. याला रसामधील विरोधत्वाचा दोष म्हणतात. हा विरोधत्वाचा दोष अमरशेखांच्या काही कवितांतून दिसतो. 'वेडी-आई' ही कविता भावनोत्कट असली तरी तिच्यात रसविरोधत्वाचा दोष निःसंशय घडला आहे. काही कवितांत करुणरसाच्या परिपोषा-बरोबरच वीररसाचाही परिपोष एकाच वेळी केला आहे.

●●●

## प्रकरण १५

# हिंदू नाही मुस्लिम नाही

सगनभाऊ जातीने मुसलमान, पण संस्कृतीने पूर्ण हिंदु मराठा आहे. महाराष्ट्र ही मातृभूमी, मराठ्यांचा इतिहास, मराठी संतकवी, मराठ्यांच्या चालीरीती, आपल्याच मानणारा तो कट्टर मराठा आहे. त्याच्या काव्यात पौराणिक देवदेवतांचे दृष्टांत व दाखले आहेत. त्याला मऱ्हाटमोळ्याचा मोठा अभिमान आहे.

नाव तुझे साळू चल आज खेळू
उभी द्वारी नार नखऱ्याची
चाल तुझी मऱ्हाटमोळ्याची
कुंकु कपाळीं राजसबाळीं बांधा बिन अरवा
बुचड्यामध्ये खोवुन मरवा
पेंडे तन्मणी जिवल्ग गडणी शालू नेसुन आज हिरवा
नाकि नथ हलती नागिन डुलती

सगनभाऊनंतर अस्सल "मराठा" म्हणून अमरशेखांकडे बोट दाखवता येईल.

१ महाराष्ट्र–धर्माची ज्योती–
थोर पंढरीची भागवती

२ झळझळा झळकते लाल कुकाची चिरी

३ आजचा तुझा नूर पाहुनी
ब्रह्मदेव पण हसला गाली

४ राधे, राधे...आणु नको तू मनात किंतू
कृष्ण असे मी, आहे परंतु नव्या युगातिल

५ झुंझाराची तू स्फूर्ती
मूर्ती प्रत्यक्ष कालिमातेची

६ बोबड्या बोलात
ये ध्वनि ब्रह्म
जै अन्न ब्रह्म
फिके फिके...

७ घराघरांतुनि होति चालली राजरोस या इथे दिवाळी
मी माझ्या ओसाड शेति अन् निरखित होतो दीन ल्व्हाळी

८ कुणास ठाऊक त्या घटकेला
तम सटवीही छळत असावी

९ नाचे चौखूर हरिणच माझं
निरुत्या सायीचं रं लोणि ताजं

१० गायचेच तर काढ नवा स्वर
साद शिंपुनी बनांत निर्भर
उठव वनींचा भोळा शंकर
नाचायाला लाव तयाला...

११ छे, पणतीचा प्रकाश नाही
चमत्कार हा असेल काही
'भुताटकी' ही असेल अथवा
असेल 'लीला' परमेशाची

१२ रे तात कृष्ण केशवा!
ज्ञानेशाच्या वंशाचा तू एक शोभतो दिवा
बंडाचा या झेंडा ज्ञानेशाने रोवियला
अभंगवाणी तुकयाने तो तेजे झळकविला

१३ मानवि-जीवन चरित्र माझे
तुकयाची ही आहे गाथा

१४ सूत्रे गाउनि। अनेक ऋषिंनी
महर्षिनीही। परंतु अजुनी
नाहि जाहले। सुसूत्र, जीवन, सुस्थिर, सुदृढ

१५ विकास मम संस्कृतिचा व्हावा
मानव्याचा वेल चढावा

१६ जय जय राम कृष्ण हरी–राम राम राधे कृष्ण हरी
राम राम राधे कृष्ण राधे–शेतकरि भोळे कृष्ण माझे
महादेव तूच पार्वतीशंकर–रूप कधी तव महा भयंकर
...नाहि तुला टिचभर निवारा तोच ब्रह्म तू कां!
नाहिं तुला कुटकाहि खावया विष्णु उपाशी उभा

१७ देवळातली ती घंटा
मंजुळ नाद तिचा ऐका

१८ कंसानेही कपट योजिले कृष्ण जन्मण्याआधी
कारागारी बहिण देवकी, तिच्या भोवती प्यादी

१९ कोयना नी गोदा, कृष्णा । भागवुनी आमुची तृष्णा
उदरात मोती पिकवोनी । महाराष्ट्र उभा सुखवोनी

वरील सर्व ओळींकडे जरा बारकाईने लक्ष दिले तर अमरशेख महाराष्ट्र संस्कृतीशी किती तादात्म्य पावले आहेत हे चटकन नजरेत भरते. अमरशेखांच्या कवितेत कृष्ण, राधा, ब्रह्मा, विष्णू, राम या देवतांची नावे जशी जागोजाग येतात तशीच संतांबद्दलची भोळी भाबडी भक्तीही दिसते. ‘ भुताटकी ’ बरोबर सटवीही वावरते. अमरशेखांची कविता ही अस्सल मराठमोळी कविता आहे. हिंदु–मुस्लीम या धार्मिक कल्पनेच्या पलीकडे ते गेले आहेत. त्यांची मानसिक अवस्था या बंधना-पलीकडे गेलेली दिसत असून साऱ्या मानवतेचीच अहोरात्र चिंता लागून राहिलेली असल्याने त्याचाच उद्रेक कवितेतून दिसतो. पण जगाचा विचार एकीकडे करता-नाच आपल्या राष्ट्राचा त्यांना विसर पडत नाही. भारतात लोकशाही सुखाने नांदून समता, शांती आणि बंधुप्रीती निर्माण झाली पाहिजे ही त्यांची उत्कट तळमळ असली तरी भारतांतील जातीयवादाचे भूत अद्याप गाडले गेले नसल्याने त्याची त्यांना फारच भीती वाटते. प्रणाम या कवितेत त्याचे त्यांनी स्पष्टीकरण केलेलेच आहे. राष्ट्रीयतेची भावना जोपासताना हिंदु–मुसलमान असा भेद निर्माण होणेच त्यांना अनुचित वाटते. म्हणूनच तर राष्टीय दृष्टीने विचार करताना पुन्हा पुन्हा ते ऐक्याचा पुरस्कारच करतात. त्याची त्यांना राष्ट्रसमृद्धीसाठी नितांत आवश्यकता वाटते. ही भावना त्यांनी खोल चिंतनात्मक आशय असलेल्या ‘ माझा देहचि धरतीमाता ’ या कवितेत सुंदर रीतीने मांडली आहे. ते म्हणतात—

माझा देहचि धरती माता
हा कुराण ही माझी गीता
यांतच धन ऋण शक्ति उपजल्या
बुद्धि भावना रूप जाहल्या.

राजकीय स्वातंत्र्य टिकाऊ व सुखद व्हावयाचे असेल तर सामाजिक आणि वैयक्तिक स्वातंत्र्यही असावयास हवे. याच कल्पनेने तत्कालीन सुधारक आणि कवी यांनी रूढिभंजनावर व व्यक्तिस्वातंत्र्यावर भर दिला.

ब्राह्मण नाही, हिंदुहि नाही, न मी एक पंथाचा

किंवा

न ब्राह्मण वा महार मी । जन्मभूमिसेवाधर्मी

असे केशवसुत–टिळक हे म्हणू लागले.

शाहीर अमरशेख हे कुठल्याही पंथाचे नाहीत. संकुचित कल्पना उराशी कवटाळून देशाच्या ऐक्याला धोका उत्पन्न व्हावा आणि महत्प्रयासाने मिळविलेल्या स्वातंत्र्याची शकले व्हावीत असे चुकूनही त्यांना स्वप्नात वाटणार नाही. उलट भारतीय जनतेचे दुःखाश्रू जितके म्हणून पुसता येतील, आपल्या हाडाची काडे जितकी म्हणून करता येतील तितकी आज ते करीत आहेत. इतकेच काय, पण स्वातंत्र्य मिळाल्यानंतर जातीयवादाचे भूत पुन्हा नंगा नाच घालणार असे दिसताच त्यांनी

१ हिंदी संघराज्याच्या जन आत्म्या तू घेई प्रणाम

२ रात्र आहे वैऱ्याची जागा रहा

३ गांधीजींच्या बलिदानातुन हाक आली ऐका

अशा एकापेक्षा एक तेजस्वी कविता लिहून जातीयवाद्यांचे हिंस्र स्वरूप त्या त्या वेळी अमरशेखांनी दाखविले आहे. हे जातीयवादी म्हणजे—

झेंड्याची काठी पोखरण्या शिरले काही किडे
विजयध्वज गगनात डोलता तळमळुनी तडफडे
पिसाळले सूर्याजी तेही संधि शोधण्या खडे
अब्रू लागली पणास जनता जनार्दना तू पहा...
...साम्राज्याच्या छुप्या दलाला अन् जातियवाद्यांना
कोटि हातांची मूठ बांधुनी काढ झोडपुन त्याला

भारतभूमीच्या कडव्या अभिमानाने अमरशेखांना कधीही स्वस्थ बसू दिले नाही. स्वातंत्र्यपूर्व कवितेत काय किंवा स्वातंत्र्यप्राप्तीनंतरच्या कवितेत काय, ऐक्याचाच जागोजाग त्यांनी घोष केलेला आहे. राष्ट्र म्हटले की मग विचार करताना केवळ तो हिंदूंचाच केला पाहिजे वा मुसल्मानांचाच केला पाहिजे असे त्यांना कधी चुकूनही वाटलेले नाही आणि अशी संकुचित वृत्ती प्रकट करणारी एकही ओळ त्यांच्या आजवरच्या कवितेत लिहिलेली दिसणार नाही राष्ट्रीयतेच्या एका उत्तुंग, उज्वल कल्पनेपुढे त्यांना धार्मिक कल्पना संकुचित वाटतात. त्यांना संघशक्ती निर्माण होणेच श्रेयस्कर वाटते. जातीयवाद नष्ट होण्यावर संघशक्ती हाच एक त्यांना 'रामबाण' उपाय वाटतो. ऐक्य ही पवित्रतम भावना; माणूस म्हणून जो जो आहे त्याने ती जोपासलीच पाहिजे असे त्यांना वाटते. ते मानवधर्म हाच श्रेष्ठ असा धर्म समजतात. समाजसेवा करणे आणि देशाशी एकनिष्ठ राहणे हे त्यांचे ब्रीद आहे.

●●●

०९५८ का ०२०/....
१६६५..नों. दि: २१।४८

प्रकरण १६

# काही निष्कर्ष—आणि अपेक्षा

शाहीर अमरशेखांच्या कवितेचा धावता आढावा घेतल्यानंतर काही प्रमुख निष्कर्ष मनापुढे तरळू लागतात. आजची नवकविता दुर्बोध, बीभत्स, अर्थहीन, अनाकलनीय अशा स्वरूपाची असलेली टीकाकारांकडून दाखविली जाते. तिने जुने संकेत, जुनी प्रतीके यांची बरीचशी मोडतोडही केलेली आहे. तिची धडपड अजूनही चालूच आहे आणि याच काळात अमरशेखांची कविता आपल्या नवीनतेचा प्रत्यय आणून देत आहे, ही गोष्ट विसरता येणार नाही. प्रथमतः तिचे निष्कर्ष पाहू आणि अशाच तऱ्हेचे इतर जे कुणी कवी आहेत त्यांना कसा न्याय मिळाला पाहिजे याचा विचार करू—

१) अमरशेखांच्या कवितेत शब्दापेक्षा अर्थाला, चमत्कृतिपेक्षा भावनेला आणि विषयापेक्षा आशयाला जास्त प्राधान्य दिलेले दिसते. त्यामुळे सामान्य वाचकाला मोहिनी घालणाऱ्या शैलीचा गोडवा आढळत नाही, पण आजच्या काळातल्या आपल्या भावनांचे प्रातिनिधिक स्वरूप मात्र पहायला मिळते.

२) कवितेची रचना केशवसुती थाटाची असून तिच्यात ओजगुणाचा फार मोठा वाटा आहे.

३) कवितेचे कार्य बुद्धीला चालना देण्याचे आहे. भावनांचा प्रक्षोभ निर्माण करून अंतर्मुख बनविण्याचे आहे.

४) कवीच्या लढाऊ प्रकृतीमुळे व प्रवृत्तीमुळे बाह्याविष्कार तेजस्वी आणि चेतनामय दिसतो. असे असल्यामुळे प्रत्येक ओळ नि ओळ ठसठशीत व सुंदर बनली आहे.

५) गोविंदाग्रजांच्या भाषेच्या वेडाने उलट काव्याची हानी झाल्याचे बहुतेक टीकाकारांनी मान्य केलेले आहे. या हव्यासामुळे अर्थहीनता प्राप्त होते. तशी ती प्राप्त होण्यापेक्षा कधी कधी रांगडेपणा परवडतो आणि तसा तो अमरशेखांच्या कवितेत आहेही.

६) अमरशेखांच्या आवेशयुक्त कवितेला नरम आणि नखरेल शैली मानवणार कशी ? कारण कवितेचा सूक्ष्म अभ्यास केल्यास एक गोष्ट स्पष्टपणे

जाणवते; ती ही की, कवीच्या झुंजार वृत्तीलाच गोंडसपणाचा बुरखा पांघरून वावरणे पसंत पडणार नाही.

७) केशवसुतांच्या कवितेतही भाषादोष आहेत, मग "वैराण माळरानात खडकाळ जमिनीवर काव्याचे बीज अंकुरले" त्या कवीच्या काव्यांत काव्याभ्यासाच्या अभावीच दोष राहिले तर आश्चर्य नाही.

८) धगधगत्या शब्दांनी आपल्या अंतरंगाची रसिकांना ओळख पटवून देणे आणि खरी 'वेदना' प्रकट करणे हा कवितेचा एकमेव उद्देश आहे. सहेतुकपणे काव्यलेखन होते.

९) उपरोध, उपहास यांनी कविता नटलेली आहे.

१०) कारुण्याचे विदारक चित्रण करणे हा कवितेचा स्थायीभाव आहे.

११) कविता वास्तववादी असून तिचा आशय संपूर्णपणे सामाजिक स्वरूपाचाच आहे. समाजांतील दुःखांना आर्ततेने वाचा फोडली जाते. आणि त्या त्या वेळी भाषेत एक प्रकारचा 'अंगार' फुलविला जातो.

१२) उद्दाम कल्पना, सूक्ष्म निरीक्षण, पराकाष्टेची सहृदयता, प्रासादिकता आणि जीवनावरची अविचल श्रद्धा यांनी कविता ओतप्रोत भरलेली असून ती सहजस्फूर्त आहे.

१३) कवितेचा साज मराठमोळा आणि रांगडा असून तो निर्मळ आणि पारदर्शक आहे.

१४) आशावाद आणि मानवतावाद कवितेतून जळजळीत आणि कधी कधी भावपूर्ण शब्दात प्रकट होतो.

१५) कवितेचे सौंदर्यापेक्षा विचारदर्शनाकडे जास्त लक्ष आहे. तरीपण रांगड्या, ओजस्वी शैलीनेही कित्येक शब्दचित्रे रेखीव आणखी बोलकी झालेली आहेत.

१६) अमरशेखांची कविता ही एका थोर अनुभविकाची आणि विचारवंताची हृदयस्पर्शी अशी कविता असून उत्कटतेबरोबर तिच्यात उदात्तता आणि विविध विषयांबरोबर आशयाची खोलीही आहे. ती सर्वव्यापी आणि सर्वगामी अशा प्रकारची आहे.

१७) अमरशेखांची कविता सामान्य मनुष्याच्या उद्याच्या आशा-आकांक्षेची पवित्र ज्योत रसिकाच्या अंतःकरणात प्रज्वलित करण्याची हाव बाळगून आहे. "आपल्या उत्कट आणि सौंदर्योपासक मनोवृत्तीच्या बळावर धुमसून राख होऊ पाहणारी जीवनमूल्ये जिवंत व ज्वलंत करण्याकरिता ती धडपडत आहे."

१८) कविमनाचा कोमलपणा, हळुवारपणा, याला वीरत्वाची अमरशेखांनी यथोचित जोड दिलेली आहे.

१९) कविता प्रयोगशील असून तिच्यात जीवनातला विशाल विरोध दर्शविणारी चिंतनशीलता सामावलेली आहे.

२०) "झाडांना जशी पाने येतात तशी कवीला कविता सुचायला हवी" असे कीटसने एके ठिकाणी म्हटले आहे. अमरशेखांची कविता ही अगदी अशाच प्रकारची आहे. ती मुळी जीवनातूनच स्फुरलेली आहे आणि नव्या जीवनाला स्फूर्ती देण्याची तिला आच लागून राहिली आहे.

"मन हे मुळात आत्मनिष्ठ असूनही ते वास्तवाशी तादात्म्य पावून त्याचा आकार घेऊ पाहते. उलट वास्तव हे आपली बाह्यार्थाची स्थिती सोडून कविमनाच्या आकाराचा आशय बनू पाहते. या परस्परप्रतिक्रियेतून कलाकृती निर्माण होते. कलेच्या निर्मितीत अशा रीतीने व्यक्तित्व व वास्तव याचे द्वंद्व असते."[१]

अमरशेखांच्या कवितेचा आढावा घेताना व्यक्तित्व आणि वास्तव यांची वैशिष्ट्ये मागील भागात पाहिली आहेत.

आज लोकशाहीचे युग निर्माण झाले आहे. कधी नव्हे त्या भागाभागांतून आता नव्या आशा-आकांक्षा पल्लवित होऊ लागल्या आहेत. साहजिकच त्याचा साहित्यनिर्मितीवर बराचसा परिणामही होऊ लागला आहे. मध्यमवर्गाचे प्रतिनिधित्व करणारे काव्य 'उदंड' निर्माण होत आहे. त्याचबरोबर ग्रामीण भागांतील लोकांच्या आशा-आकांक्षांचा पाठपुरावा करणारे वाङ्मयही निर्माण होत आहे. पण साहित्यक्षेत्रात त्यांना स्थान मिळणार की नाही, हा एक जिव्हाळ्याचा प्रश्न निर्माण झालेला आहे. संस्कृत काव्यशास्त्राच्या फूटपट्ट्यांनी त्यांचे माप करायचे म्हटले तर कदाचित ते काव्यही ठरणार नाही. सर्वस्वी दोषी असेच ते ठरण्याचा संभव आहे. मग आपल्या भावनांना वाट मोकळी करून देणाऱ्या साहित्यिकांना अंधारातच चाचपडत राहावे लागणार का? की त्यांच्या काव्याला वेगळा काही तरी निकष लावावा लागेल? मला वाटते, कोणतेही साहित्य हे उपेक्षणीय असूच शकत नाही. पण आज आम्हीच आमच्या भोवती ज्या भिंती उभ्या करून ठेवल्या आहेत त्यांच्या जरा पलीकडे डोकावून पाहायलाच हवे. भिंतींच्या पलीकडे उदयाला येणाऱ्या वाङ्मयांतील नावीन्याची जपणूक करणे हे अपरिहार्य ठरणार आहे. बहुजनसमाजाचे प्रतिनिधित्व करणाऱ्या काव्याचा एक प्रवाह आता वाहत आहेच आणि तो याहीपुढे वाहणार आहे. तो आता

१ प्रा. दि. के. बेडेकर

थांबवू म्हटल्या थांबवता येणार नाही. म्हणूनच त्याचा विचार करायला पाहिजे. शाहीर अमरशेख हे एक त्या पुढे येणाऱ्या काव्यप्रवाहाचे प्रतीक आहेत. म्हणूनच त्यांच्या कवितेचा विचार केला; आणि भविष्यात येणाऱ्या त्यांच्या-सारख्याच कवींना सरस्वतीच्या पवित्र मंदिरात प्रवेशाला वाव मिळावा अशी आंतरिक इच्छा आहे.

यंत्रयुगामुळे मानवी संस्कृतीची व मानव्याची जी राखरांगोळी होत आहे त्याचे भयानक चित्रण कविश्रेष्ठ मर्ढेकरांनी जसे आपल्या काव्यातून केले तसेच निर्भयपणे चित्रण करणारे असंख्य कवी पुढे सरसावू लागले आहेत. 'भांडवली वृत्ती मनातून नष्टचर्य पिकवीत असून कामगाराहाती करवंटीच' असा विदारक अनुभव त्यांनाही येत असून ते तो उत्कट जाणिवेने मांडत आहेत. त्यांच्या काव्यात सामाजिक अन्यायाविरुद्ध त्वेष व चीड उफाळून येत आहे, लब्ध-प्रतिष्ठितांचा दंभस्फोट करण्यास ते आसुसलेले आहेत, भांडवलशाही मनोवृत्तीचा मर्ढेकरांप्रमाणेच ते कडाडून निषेध करीत आहेत. आपल्या अनुभूतीशी प्राजळ व प्रामाणिक राहण्याचा त्यांचा प्रयत्न आहे; स्वप्नरंजनापेक्षा सत्यदर्शनाची त्यांना उत्कंठा लागून राहिलेली आहे; आर्थिक विवंचनेमुळे माणसाची चाललेली कुतर-ओढ कवितांतून रेखाटण्याची त्यांची धडपड आहे. आजचा मानव पराभूत झाला असून तो कसाबसा जगतो आहे ह्या विदारक सत्याचा अशा कवींना प्रत्यय आलेला आहे, पण तो विजयी ठरलाच पाहिजे हा त्यांना लागलेला ध्यास आहे आणि त्यासाठी त्यांनी आपल्या ध्येयमार्गाची निश्चतीही केलेली आहे; बदलत्या जीवनमूल्यांचा अचूक वेध घेण्याचे सामर्थ्य त्यांच्या प्रतिभेत आहे. जगातील विषमता पाहून त्यांना वेदना होत आहेत आणि त्या वेदनांना ते आपली वाट मोकळी करून देत आहेत. असे असतांना त्या कवींना काव्यक्षेत्रात दर्जा का प्राप्त होऊ नये ? याचा विचार करायलाच पाहिजे. आणि त्याचे कारण एकच; ते म्हणजे टीकाकारांनी उभा केलेला संस्कृतप्रचुर मराठी भाषेसाठी बनवल्या गेलेल्या वृत्त जातींच्या फूटपट्ट्यांचा बागूलबुवा. पण तो दूर केला नाही तर मराठीतील फार मोठ्या समृद्ध साहित्याला मुकावे लागेल.

" वस्तुतः काव्याचा हेतु ज्ञानप्रतिपादनापेक्षा भावनेचे आवाहन हा आहे... मुक्तेश्वरासारख्या कवींच्या काव्यात भावनेचे आवाहन अत्यंत उत्कटपणे झाले आहे...देशभेद आणि कालभेद यांना न जुमानता काव्य आणि साहित्य यांचा आस्वाद घेत राहतात याचे कारण त्यामधील ज्ञानाचा अंश काही निराळा असतो म्हणून नव्हे, तर त्यामध्ये वाचकाच्या भावनेला आणि कल्पनेला काही खाद्य मिळते म्हणून होय "[१]

---

१ प्रा. रा. श्री. जोग [ अर्वाचीन मराठी काव्य ]

बहुजन समाजातून उद्याला येणाऱ्या काव्यात भावनेचे आवाहन किती आहे हे एकट्या अमरशेखांच्या कवितेत पाहिले तरी पुरेसे आहे.

एखाद्या पतित व दलित व्यक्तीचे वा वर्गाचे दुःख पाहून किंवा स्वतःच्याच विशिष्ट मनोवृत्तीच्या चिंतनात काही अर्थपूर्ण पण बाह्यतः पृथगात्म व विसंगतिपूर्ण जाणवणारा अनुभव, संज्ञेला चाटून जाऊन कवीच्या मनात ज्या प्रतिक्रिया उमटतील त्या सर्व प्रतिक्रियांची अभिव्यक्ती काव्यरूपच मानावी लागेल. "[१] या दृष्टीने अमरशेखांच्या कवितेचा विचार होणे अगत्याचेच वाटते. "ज्याला जी अनुभूती येईल, ज्याची जी प्रतिक्रिया असेल त्याला ती त्याच्या पद्धतीने व्यक्त करण्याचे स्वातंत्र्य मूलतः मान्य करावयास पाहिजे "[२] शाहीर अमरशेखांची कविता सामाजिक संघर्षांच्या प्रतिक्रिया रंगविण्याचे कार्य अतिशय यशस्वीरीत्या पार पाडीत आहे. त्यांच्या वैयक्तिक अनुभूतीचा तो एक धर्मच बनलेला आहे. " स्फुट भावगीत हेच शुद्ध काव्याचे खरे स्वरूप होय असे प्रतिपादन पाश्चात्य देशांत झाले आहे व आपल्याकडे ते स्पष्टपणे झाले नसले तरी कवींना व रसिकांना बऱ्याच प्रमाणात पटले आहे. "[३] धरतीमाता या अमरशेखांच्या काव्यसंग्रहात अशी स्फुट भावगीतात्मक रचना तर सर्वत्र विखुरलेली आहे. हे काव्याचे निस्संशय शुद्धच रूप आहे. " आज वाङ्मयदृष्ट्या सामान्य माणसाला अधिक महत्त्व प्राप्त झाले आहे. त्याच्या भावना, याच्यापुढील प्रश्न, त्यांचे गुंतागुंतीचे अनेक वेळा शोचनीय होणारे पर्यवसान यांना ऐतिहासिक, वा पौराणिक व्यक्तींच्या भावना व प्रश्न यांइतकेच उत्कट आणि परिणामकारक स्वरूप मिळते ही गोष्टही वादविषय उरली नाही. "[४] ही गोष्ट अमरशेखांच्या कवितेच्या संदर्भात मुद्दाम विचारात घेतली गेली पाहिजे. अमरशेख सामान्य माणसाखेरीज मुळी काही बोलायलाच तयार नसतात हे मागे आपण अनेक उदाहरणाच्या साहाय्याने अवलोकिले आहे.

अर्वाचीन काव्याचे मूळ स्फूर्तिस्थान इंग्रजी काव्य असले तरी, केशवसुतांनी इंग्रजी वळण पक्के उचलले असले तरी, त्यांच्या बहुसंख्य कविता स्वतंत्र आहेत. व महत्त्वाच्या अशा तुतारी, गोफण, झपूर्झा, नवा शिपाई, स्फूर्ति, मूर्तिभंजन इ. कवितांना इंग्रजी कवितेचा आधार नाही. अशाच अमरशेखांच्या पाथरवट, पाव शतक, नवे संत, पेटत नाहीत, एकच ठेवीन इ. कविता अगदीच स्वतंत्र आहेत. त्यांना इंग्रजीचाच काय, पण कुठल्याही परभाषेचा ओझरताही स्पर्श झालेला नसल्यानेच त्या अस्सल मराठमोळ्या झाल्या आहेत. तिचे बाह्य वा अंतरंग पूर्णपणे अगदी स्वतंत्र असेच आहे. त्यामुळे तिच्यावर परपुष्ठतेचा आरोप कुणालाही करता येण्याचे धैर्य होणेच शक्य नाही. अर्थात हा केशवसुती

१-२ डॉ. ना. ग. जोशी. [नवभारत मे १९६५].

३-४ अर्वाचीन मराठी काव्य. [सिंहावलोकन.]

परंपरेचाच परिपाक म्हणावा लागेल. अमरशेखांच्या कवितेत केशवसुतांप्रमाणेच स्त्री, निसर्ग, स्वदेश हे विषय आहेतच. आणि त्यांत अधिक भर शेतकरी, कामकरी यांच्याबद्दलच्या विषयाने घातलेली आहे.

नवीन कवितेवरील एक महत्त्वाचा आक्षेप म्हणजे 'ती राष्ट्राच्या सुखदुःखांची प्रातिनिधिक नसून, बहुजन समाजाच्या जीवनाशी तर तिचा यत्किंचितही संबंध नाही.' पण हा आक्षेप अमरशेखांच्या कवितेला थोड्या अंशानेही लागू पडणारा नाही. उलट ती सर्वार्थानेच प्रातिनिधिक ठरते.

"अर्वाचीन कवितेला प्रारंभ झाला तो व्यापक स्वातंत्र्याच्या कल्पनेने होय. त्या कवितेला प्रथम स्वातंत्र्य हवे होते. 'अशी असावी कविता फिरून तशी नसावी कविता म्हणून' जे काही निर्बंध काव्यविषयक रुढीमुळे कवितेवर पडले होते, त्याविरुद्ध बंड केशवसुतांना प्रथम उभारावे लागले. नवीन कवितेमध्ये जे काही बाह्य व आंतर परिवर्तन झाले ते पुष्कळसे काव्यरचनेबाबत कवींना हव्या असणाऱ्या स्वातंत्र्याच्या इच्छेने झाले आहे. वृत्ते फार ठराविक बंधनांनी जखडलेली आहेत असे दिसून आल्याने मात्रावृत्तांकडे व नंतर आता मुक्तछंद व गद्यकाव्य यांकडे नवीन कविता वळली आहे व यमकाचे बंधनही ती झुगारून देऊ पाहत आहे, अलंकाराचे ओझेही तिने फेकून दिले आहे. विषयाच्या बाबत आध्यात्मिक, पौराणिक ऐतिहासिक यांची मर्यादा ओलांडून केवळ लौकिक आणि वैयक्तिक विषय तिने स्वीकारले आहेत."[1]

अमरशेखांच्या कवितेने मुक्तछंद आणि गद्यात्मकता यांना कसकसा वाव दिला आहे याचा आढावा पूर्वीच घेतला आहे. म्हणजे नवकाव्याचे सर्वच गुण तिच्यात एकवटलेले आहेत असे म्हणणे सयुक्तिक ठरते. सुबोधता हा तर सर्वच कवितेत स्थायीभाव म्हणावा लागेल. यमकाचे बंधन पाळण्यापेक्षा ते तिने उलट झुगारून दिले आहे असेच म्हणणे भाग पडते. आणि म्हणूनच त्यांच्या कवितेत मुक्तशैली प्राधान्याने आढळते असा उल्लेख केला आहे. आजच्या काळाच्या संदर्भात विचार केला तर अमरशेखांची कविता नवीन कविताच ठरते. अलंकाराचे तिला संपूर्ण वावडे आहे असे मात्र मुळीच नाही. उलट जुनी कविता आणि नवीन कविता यांचा समन्वय साधण्याचाच अमरशेखांनी यशस्वी प्रयत्न केला आहे ती अंतराच्या बाबतीत, आधुनिक आहे आणि आकाराच्या बाबतीत नवीन आहे. राजकीय स्वातंत्र्य टिकाऊ व सुखद व्हायचे असेल तर सामाजिक आणि वैयक्तिक स्वातंत्र्य असावयास हवे याच कल्पनेचा पुनरुच्चार अमरशेखांच्या कवितेने पदोपदी केलला आहे. मात्र ती प्रणयपिपासेने धुंद बनलेली नाही,

१ प्रा. जोग

वेडावलेली नाही की झपाटलेली नाही. जातिनिरपेक्षता, स्त्री-विषयक उदात्तता आणि शृंगारविषयक संयमितता हे तिचे ठळक विशेष मानणेच भाग पडते.

" कोणत्याही वाङ्मयाचे व विशेषतः काव्याचे दोन प्रकार पडतात. एक अंतर्मुख वृत्तीने लिहिलेले म्हणजे आत्मलेखनात्मक भावगीताचा व दुसरा म्हणजे बहिर्मुख वृत्तीने लिहिलेले नाट्यकाव्य किंवा कथनकाव्य हा होय. "[१]

अमरशेखांची प्रवृत्तीच मुळी चिंतनशील आहे. त्यामुळे आत्मलेखनात्मक भावगीतांची रचना त्यांनी केली असणे उचितच ठरते. पण ते जसे अंतर्मुख आहेत तशीच त्यांची वृत्ती बहिर्मुखही आहे. परचित्तप्रवेश करून, बाहेरील जीवनाचे दर्शन घेऊन ते इतरांना घडविण्याचे कार्य त्यांच्या कवितेने सहज लीलेने पार पाडले आहे. पृथ्वीचे प्रेमगीत, माझा माग, काहूर, सुगीराणीची मोहिनी, वेडी आई, एकच दाणा, मन तुझ्याचसाठी, बरोबरींच्या कैद्यास अशा कितीतरी कविता उदाहरणादाखल दाखविता येतात. अमरशेख भावगीतरचना जितकी सहजपणे करतात तिच्याहीपेक्षा थोडी सरसच अशी नाट्यात्मक रचनाही करतात. त्यातच त्यांचा भावनोत्कटतेचा अनोखा प्रत्यय येतो. " प्राचीन काव्य बरेच बहिर्मुख स्वरूपाचे होते, तर अर्वाचीन काव्य बरेच अंतर्मुख वृत्तीने लिहिले गेले; आत्मनिष्ठेची बैठक न सोडताही बहिर्मुख राहून सर्व जगाचे आकलन करणारे कवीच श्रेष्ठ ठरतात. "[२] अमरशेखांची भावगीतात्मक रचना पाहिली तर त्यांनी आत्मनिष्ठेची बैठक सोडलेली दिसत नाही. अशा वेळी त्यांचा 'मी' नेमका प्रातिनिधिक बनतो आणि आपल्या भावनांना वाट मोकळी करून देतो. परंतु मानसिक प्रक्षोभाचे प्रकटीकरण करताना तीच वृत्ती बहिर्मुख बनून नाट्यपूर्ण रचना करते आणि साऱ्या जगाचे आकलन करते; मानवी जीवनाचा संभाव्य विध्वंस टाळण्याची भाषा बोलते; तर साऱ्या जगात समता व बंधुप्रीतीचे नाते निर्माण झाले पाहिजे या तत्त्वाचे गोडवे गाते. आणि म्हणूनच वरील व्याख्येप्रमाणे पाहिल्यास अमरशेख एक श्रेष्ठ कवी ठरतात यात तिळमात्र संशय उरत नाही.

" ज्ञानदेव, मुक्तेश्वर, वामन व मोरोपंत यांचा संस्कृत भाषेशी सशास्त्र परिचय असल्यामुळे आणि त्यातील काव्यवाङ्मय त्यांच्या यथास्थित पचनी पडल्यामुळे त्यांच्या वाणीत पांडित्य, विद्वत्ता, प्रौढी व अलंकारिकपणा ही ठळकपणे आढळतात. परंतु नामदेव, तुकाराम, रामदास, महिपती हे पूर्वोक्त कवींच्या मानाने प्रत्यक्ष संस्कृत वाङ्मयाशी फारच थोडा व्यासंग ठेवणारे आहेत. त्यामुळे त्यांच्या शब्दां-वर संस्कृतापेक्षा देशभाषेचा ठसा जास्त ठळक आहे. रामदास वगळले असता या कवींचा वाङ्मयव्यासंग पूर्वकालीन कवींच्या प्राकृत ग्रंथांद्वारेच होता. रामदासां-

१ प्रा. जोग.

२ अर्वाचीन मराठी काव्य ( सिंहावलोकन )

सही शुद्ध संस्कृताची पर्वा यथातथाच आहे. याचा परिणाम असा झाला आहे की, या कवींची भाषा म्हणजे मुख्यत्वेकरून त्या त्या वेळच्या बहुजन समाजाची भाषा होय. पूर्व कवींच्या कृतीचा दृढ अभ्यास असल्यामुळे बरेच सांप्रदायिक शब्दप्रयोग त्यांनी साहजिक त्यांच्यापासून जसेच्या तसेच उचलले आहेत. परंतु एकंदर शब्दांची ठेवण, घडण व निवड त्यांनी आपापल्या काळच्या चालू व्यावहारिक बोलीतून केलेली आहे. या कारणास्तव त्यांची वाणी सामान्य वाचकाच्या हृदयात जशी भिनते, तशी याच कवींचे पूर्वोक्त समकालीन जे पंडित त्यांची भिनत नाही."[१]

ज्यांच्या भावनांना बोलके करायचे असते त्यांच्याच भाषेत लोककवी बोलत असतात. शब्दबंबाळपणा किंवा शब्दच्छल करीत राहिले तर बहुजन समाजाच्या मनात त्यांना मानाचे, आदराचे स्थान प्राप्त होत नाही हे काळाने सिद्ध केले आहे. तुकाराम, नामदेव, रामदास, महिपती यांच्याप्रमाणेच अमरशेखही लोक-कवी आहेत. बहुजन समाजाच्या भावनांचे प्रातिनिधिक स्वरूप म्हणूनच त्यांच्या कवितेत पाहायला मिळते. आपला कवी आपला प्रतिनिधी आहे हे बहुजन समाजाला केव्हा समजते ? तो त्यांच्याच भाषेत त्यांच्याच सुखदुःखांचा विचार करतो तेव्हा आणि अशाच वेळी त्याला आपल्या काळच्या व्यावहारिक बोलीचा वापर करावा लागतो. अमरशेखांनी—ह्या लोककवीने—तो तसा केलेला आहे हे 'बालेघाटी बोली' या प्रकरणात पाहिलेच आहे.

"ज्या वस्तूंचे किंवा कल्पनांचे किंवा विचारांचे किंवा त्यांच्या छटांचे, दर्शक शब्द आज आपल्या प्रचलित भाषेत आढळत नाहीत, आणि त्यामुळे इंग्रजी शब्दांवर गुजराण करावी लागते किंवा संस्कृताच्या साह्याने अगडबंब शब्द नवेच बनवावे लागतात, तद्दर्शक शब्द कधी कधी प्राचीन मराठीत किंवा ग्राम्य बोलीत आढळतात; आणि ते आटोपशीर असले, तर त्यांची शिष्ट ग्रंथभाषेत मोठ्या आदराने संभावना केली पाहिजे."[२] अमरशेखांची व्यावहारिक प्रचलित बोली पाहिली तर तिचे संस्कृतशी जसे नाते आहे तसेच प्राकृतशीही असलेले दिसते. पण इंग्रजीच्या शब्दांवर गुजराण करायची या भाषेला गरज पडलेली नाही. या बोलीत प्राचीन मराठीचे कित्येक शब्द असून त्यांचे बरेचसे स्वरूप शुद्ध स्वरूपाचेच राहिले आहे.

'नदितिर,' 'क्रीया,' 'निति,' 'वधुवर,' 'रघुविर,' 'महति,' 'सति' असे शब्द पूर्वकालीन कवी निःशंकपणे योजीत असत. असेच शब्द काही प्रमाणात अमरशेखांच्या कवितांत दिसतात आणि त्याचे कारण एकच आहे. ते म्हणजे उच्चारानुसारी लिहिण्याची एक स्वतंत्र लकब. अर्थात यावर विचारवंतांकडून

---

१–२ आधुनिक काव्यवाङ्मयाचे विशेष. — बा. अ. भिडे. ( रत्नाकर )

आक्षेप घेण्यात येतो तो असा की यामुळे भाषेला अस्थिरता व अनिश्चितपणा येतो. परंतु एक गोष्ट लक्षात घेतली पाहिजे की त्यामुळे मोठी अर्थचमत्कृती काही वेगळी होणार आहे असे थोडेच आहे? ज्यांना काव्यामध्ये वापरलेला शब्द संस्कृतोत्पन्न आहे की नाही याचे पूर्ण आकलन झालेले नाही आणि ज्यांना परिस्थितीमुळे आवश्यकताही तशी वाटली नाही त्यांच्या बाबतीत सहानुभूतिपूर्वक पाहण्याची दृष्टी ठेवली पाहिजे. एखाद्या कवीच्या काव्यात शब्दयोजनेपेक्षा अर्थाला जर प्राधान्य असेल तर ऱ्हस्व-दीर्घांच्या काटेकोर नियमाने तोलण्यापेक्षा त्याच्या भावनेचीच कदर केली पाहिजे. अशा वेळी शुद्ध लेखनाचा बाऊ करताच कामा नये. आणि तसा केला तर मराठीतील एका समृद्ध दालनाला, भावविश्वाला कधी वावच सापडणार नाही. भाषेच्या जिवंतपणाला, प्रवाहिततेला काही अर्थच उरणार नाही. जसा संस्कृताभिमानी असा एक प्रवाह मराठी कवितेत निरंतर वाहतो त्याचप्रमाणे व्यावहारिक बोलीभाषेचा वापर करून त्या भाषेत होणाऱ्या काव्यरचनेचा एक प्रवाह वाहतोच की. रामदास हे याचे एक ठळक उदाहरण आहे. रामदासांना संस्कृताचे ज्ञान नव्हते असे थोडेच आहे? पण त्यांनीही गण-मात्रा-वृत्त याचे बंधन झुगारून देऊन विचारप्रकटीकरण केलेच की नाही? त्या वचनामृताला महाराष्ट्राने शिरोधार्य मानलेच की नाही. जनस्वी कवी म्हणून आदराने मस्तक नम्र झालेच का नाही? या सर्वांचे उत्तर होकारार्थीच देणे भाग पडते. म्हणूनच ज्या भाषेचा जो प्रकृतिधर्म असेल त्या भाषेत रचना केली गेली तर तिच्याकडे शुद्धलेखनाच्या, व्याकरणाच्या फुटपट्ट्यांनी पाहण्यापेक्षा अर्थनिर्मितीला, विषयापेक्षा आशयाला आणि कृत्रिमतेपेक्षा स्वाभाविकतेला प्राधान्य हे दिलेच पाहिजे. आज जरी ही भूमिका मान्य करावयाचे नाही असे ठरविले तरी एक काळ असा येईल की बहुजन समाजाचे प्रतिनिधित्व करणारे कवी बरेचसे निर्माण होऊन त्यांच्या भाषेचे एक स्वतंत्र व्याकरण निर्माण देखील होईल. अमरशेख हे त्यांचे एक प्रातिनिधिक असे रूप आहे, ही गोष्ट विचारात घेतली पाहिजे. अमरशेखांच्या कवितेने मराठी साहित्यात हा एक नवा विचारप्रवाह आणून सोडलेला आहे. तो दुर्लक्षिण्यासारखा मुळीच नाही. " कोणताही जिवंत क्रियापर व विचार-विकारयुक्त समाज जसा आचारनिर्बंध व नीतिनियम पाळीत पाळीतच, ठामपणाला-बसलेल्या घडीला-एकदम विस्कटू न देता निरंतर प्रगतीच्या मार्गावर चालत असतो, त्याप्रमाणेच अशा समाजाची भाषाही निर्बंध पाळूनही प्रगतिपर असते. " अमरशेखांच्या कवितेने सर्वच निर्बंध धाब्यावर बसवलेत असे मुळीच नाही. परंतु शुद्ध मराठी भाषेत जे ऱ्हस्व-दीर्घांचे नियम सर्वसाधारणतः मानले जातात त्यांचे काटेकोर पालन मात्र केले नाही. याचे कारण त्यांनी केलेला बोलभाषेचा वापर. त्यांना पंडितांकरिता लिहायचे नाही. सामान्यांकरिता लिहायचे आहे. त्यांची कृती वाङ्मयाच्या उपासकांकरिता निर्माण झालेली नाही, ती जीवनाच्या

उपासकाकरिता आहे. 'काव्यस्य आत्मा ध्वनिः' हे तिचे ध्येय नाही; तिला सूचित करण्यापेक्षा सांगायचे आहे. व्यंगार्थापेक्षा शब्दार्थाला, सरलार्थाला तिने प्राधान्य दिले आहे. तिच्यात पांडित्याचा कठोर बाणा दिसत नाही आणि जुन्या शाहिरी रचनेचा स्वैराचारही नाही. भाषेचा खडबडीतपणा हा महान दोष तसा महान गुण आहे. शब्दरूपांच्या बाबतीत ती संस्कृताच्या संस्कृतीशी जवळीक करते तशीच ती ग्रामीणतेशीही नाते जोडते. तेव्हा अशी समन्वयवादी भूमिका घेणारे कवी कोण आहेत त्याचा शोध घेता आला तर घेतला गेलाच पहिजे पण ज्यांची समन्वयवादी अशी अमरशेखांसारखी भूमिकाही नसेल त्यांना ते केवळ तसे नाहीत म्हणून दुर्लक्षिता कामा नये. त्यांच्याकडे पाहण्याचा एक स्वतंत्र दृष्टिकोन ठेवला पाहिजे आणि असे प्रवाहित वाङ्मय हुडकून काढून मराठीतील जानपद गीतांप्रमाणेच त्यांना विशिष्ट दर्जा दिला गेला पाहिजे. त्यासाठी सर्वसाधारणपणे खालील कसोट्या ठरविल्या जाव्यात.

१) कविता जीवनदर्शी आहे की नाही ?

२) कवितेचे स्वरूप आत्मनिष्ठ की अनात्मनिष्ठ ?

३) भावनोत्कटता कितपत आहे. ?

४) कविता बहुजन समाजाचे प्रतिनिधित्व करण्यास योग्य की अयोग्य आहे ?

५) विचारांत जोरकसपणा असून जीवनवादी मूल्यांची जपणूक करण्याची ईर्षा आहे की काय ?

६) उपहास आणि उपरोध यांना कितपत आणि का वाव दिला आहे ?

७) कवितेचा हेतू स्वप्नरंजन की सत्यदर्शन ?

८) मानवतावादी, ध्येयवादी, आशावादी की पलायनवादी ?

९) बदलल्या जीवनमूल्यांचा वेध घेण्याची शक्ती प्रतिभेत आहे काय ?

१०) जीवनविषयक विशिष्ट तत्त्वज्ञान आहे का ?

११) भावनेला आव्हान करण्याचे सामर्थ्य अंगभूत आहे अगर कसे ?

१२) चिंतनशील प्रवृत्ती आहे का ?

१३) अनुभूती ठिसूळ की कशी ?

१४) भावगीतात्मक रचना की नाट्यात्मक की दोन्ही प्रकारची ?

१५) परंपरावादी की प्रयोगवादी ?

१६) वृत्ती बंडखोर की शांत ?

१७) वृत्त-मात्रा याचे बंधन पाळण्याकडे कटाक्ष आहे की सहज, उत्स्फूर्त भावदर्शन ? मुक्तछंदाचा वापर की जुन्या सांकेतिक कल्पनांचा आधार ?

१८) आशय आणि आकार यांतील वैशिष्ट्ये.

१९) रचना कृत्रिम की अकृत्रिम ?

२०) रचनातंत्र पारंपरिक की नवीन ?

२१) कवीची वृत्ती अंतर्मुख की बहिर्मुख ?

२२) लोककवी या नामाभिधानास पात्र होण्यास लागणारे गुण.

२३) बहुजन समाजाच्याच भाषेत लेखन आणि अभिनिवेश.

२४) कवितेचा हेतू आणि सिद्धी.

२५) जगाकडे पाहण्याचा कवीचा स्वतःचा दृष्टिकोन.

२६) मनातील उत्कट भावनांचा सहजोद्गार ?

केवळ कसोट्या ठरवून काही काव्याची श्रेष्ठता कनिष्ठता ठरत नाही आणि सर्वच कसोट्या सर्वच काळास उपकारक ठरतील असेही नाही.परंतु बहुजन समाजाचे प्रतिनिधित्व करणारे जे कोणी कवी काव्यसाधना करीत असतील त्यांनी गणमात्रा, वृत्त, अलंकार यांची बंधने पाळलीच पाहिजेत असा आग्रह करता कामा नये असे वाटते. अशी बंधने घातली तर त्या काव्याची वाढ पूर्णपणे खुंटेल मग प्रश्न असा येईल की त्या वरील कसोट्या तरी कशाला हव्यात ? त्या एवढ्याच-साठी की आमच्या कवींना संस्कृतांतील ग्रंथ वाचता आले नाहीत, तरी सर्व-साधारण या साच्यात कविता बसेल एवढा तरी विश्वास वाटावा एवढ्याचसाठी. संस्कृत कवितेच्या कसोट्यांचा विसर पडून आता नवा मार्ग निर्माण झाला पाहिजे. तरच नवा फुलोरा फुलून येईल अन्यथा नाही. जुन्या फुटपट्ट्यांच्या साहाय्याने समाजाच्या प्रातिनिधिक कवितेचे मोजमाप होऊ नये अशी अपेक्षा करावीशी वाटते. मराठी कवितेच्या विकासाकडे आणि तिच्या गतीकडे लक्ष टाकले की तिने हळूहळू काळाच्या ओघात कशी बंधने झुगारून दिली आहेत ते दिसते. हृदयस्पर्शी, भावनोत्कट असे गीत मग ते कोणाही कवीचे असो ते काव्य पदवीस पोचावे. धर्म, जाती, पंथ, संप्रदाय निरपेक्ष अशी काव्याकडे पाहण्याची दृष्टी ठेवावी व मराठीतील एका समृद्ध दालनाची भव्यता अधिक वाढीस लागावी हीच अंतरीची तळमळ आहे.

●●●

# संदर्भ-सूची


कलश प्रस्तावना : आचार्य अत्रे
धरती माता–परीक्षण : प्रा. हिंमतराव चव्हाण
आधुनिक मराठी वाङ्मयाचा इतिहास : डॉ. अ. ना. देशपांडे
आधुनिक कवि : दा. न. शिखरे
आचार्य विनोबा भावे
यशोनिधी-परीक्षण : वि. वा. शिरवाडकर
आधु. मराठी कविता : प्रा. रमेश तेंडुलकर
कविवर्य चंद्रशेखर
प्रा. माधव त्रिंबक पटवर्धन : सुधारक
वाङ्मयातील सत्य, शिव, सौंदर्य : प्रा. वा. ल. कुलकर्णी
कलेचे स्वरूप आणि कार्य : ग. त्र्यं. माडखोलकर
'सत्य' (धरती माता) : अमरशेख
रे. टिळकांची कविता : संपा. भा. कृ. उजगरे
साहित्याच्या दरबारात : प्रा. क्षीरसागर
वाङ्मयातील वादस्थळे : प्रा. वा. ल. कुलकर्णी
नवमानवतावाद : प्रा. क्षीरसागर
मराठी वाङ्मयाचा परामर्श
नवा शिपाई : प्रा. कुसुमावती देशपांडे
मर्ढेकरांच्या काव्यातील अनुभूति व अभिव्यक्ती : नवभारत, जुलै १९५६ – प्रा. भ. प्र. मोहरीर
रसगंगाधर
मुद्दे आणि गुद्दे : आचार्य अत्रे.
रत्नाकर : द. वि ताम्हनकर
लोकशिक्षण, जानेवारी १९३७ : ज. ग. जोगळेकर.
साहित्यातील आग्रह आणि दुराग्रह : वि. वा. शिरवाडकर.
लोकशिक्षण, ऑगष्ट-सप्टें. १९३८ : भ. व्यं. देशमुख.
प्राचीन मराठी वाङ्मयाचे स्वरूप : प्रा. शेणोलीकर.
साहित्याचे प्रयोजन आणि सामर्थ्य : काकासाहेब गाडगीळ
भक्तीचा कल्पवृक्ष : बहिरट
महाराष्ट्राचे कलात्मक काव्य : रा. वि. काळी : मौज दिवाळी अंक १९४८
प्रा. अनंत काणेकर : धरतीमाता-प्रकाशन.
संतांचे सामाजिक कार्य : प्रा. गं. बा. सरदार.
साहित्यांतील संप्रदाय : डॉ. वाळिंबे
कवींचे कार्य : पु. मं. लाड (सह्याद्रि, जून १९४२)
संतांचा साम्यवाद : प्र. न. जोशी (नवभारत, मार्च १९५७)
मराठी संतकाव्य–कर्मयोग : डॉ. शं. दा. पेंडसे.
संत आणि साहित्य— (तुकडोजी महाराज) : आचार्य अत्रे
आनंद, जून १९४२ : गोपिनाथ तळवलकर.
आधु. मराठी कविता : प्रा. मं. वि. राजाध्यक्ष.

मराठी लावणी : म. ना. सहस्रबुद्धे (पैंजण)
महाराष्ट्र सारस्वत : वि. ल. भावे.
शाहिरी वाङ्मयांतील समाजदर्शन : डॉ. सरोजिनी बाबर
आधु. पोवाडे व त्यांचे कार्य : ना. म. भिडे
लावणी संप्रदाय : म ना. सहस्रबुद्धे.
प्रवाहिनी : प्रा. भ. श्री. पंडित
घटना-रचना-परंपरा : प्रा. अरविंद मंगरूळकर
भाषा, उद्गम आणि विकास : प्रा. कृ. पां. कुलकर्णी
शब्द, उद्गम आणि विकास : प्रा. कृ. पां. कुलकर्णी
मराठीची पूर्वपीठिका
मराठी साहित्य व व्याकरण : कै. मोने.
काहीतरी–प्रस्तावना : प्रा. लागू
आनंदगीत : प्रस्तावना : मा. श्री. अणे
रत्नाकर : वि. कृ. आंबेकर.
वाङ्मयीन टीपा आणि टिप्पणी : प्रा. वा. ल. कुलकर्णी.
यशवंत, दीपावली अंक, १९६४
केशवसुत-दर्शन : प्रा. जोग
वाङ्मयातील वादस्थळे : प्रा. कुलकर्णी
सौंदर्यशोध व आनंदबोध : प्रा. रा. श्री. जोग.
काव्यविभ्रम : प्रा. रा. श्री. जोग.
आनंदभैरवी : बा. भ. बोरकर.
छंद १९५५ : जुलै-ऑगष्ट : दुर्गा भागवत.

०००

मराठा ग्रंथ सं. । प ठा . स्थलप्र
अनुक्रम ४०१५८ वि: का.०२
9६९५ नो: वि: २९।।५६
REFBK-C014791
REFBK-0014791
मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
क्र. ९४०९९
संग्रह शाखा